# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/ २०१८** **दिनांक ०४.०४.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०४.०४.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६९८३/ २०१८, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दिनांक ०४.०४.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य
०६. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०७. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०८. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेसाठी मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४.०४.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजुन कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४.०४.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर रहाणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजुनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. धन्यवाद.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०७.०३.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२४** दिनांक ०७.०३.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.१६१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामी यापुर्वी निश्चित केलेली जागा योग्य होणार नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता मंदिर परिसर अथवा भक्तनिवास परिसरामध्ये योग्य जागेची निवड करुन, जागा निश्चितीचा तसेच समिती सदस्य मा.श्री. प्रताप भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गोशाळेच्या व्यवस्थापन बाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामी यापुर्वी निश्चित केलेली जागा योग्य असून गोशाळा सुरु करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तत्पुर्वी प्रकल्प सुरु करण्यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मंजुरी घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

(२) निर्णय क्र.१६५-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे टेंडर/ करारनामा मसुद्यात Arbitration क्लॉजचा समावेश करणेस मान्यता देण्यात आली व या Arbitration क्लॉजचा मसुदा जेष्ठ कायदेतज्ञ व समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांनी तपासुन अंतीम करुन द्यावा, असे ठरले. (कार्यवाही- विधी अधिकारी)

या निर्णयामध्ये खालील मसुद्याचा समावेश करणेत यावा.

**उपरोक्तप्रमाणे ठरलेनुसार दरम्यानचे कालावधीमध्ये समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांनी Arbitration क्लॉजचा मसुदा खालीलप्रमाणे अंतीम करुन दिला आहे.**

**Article -29 Arbitration & Jurisdiction,** "The parties hereto shall attempt to resolve all disputes, claims and questions whatsoever which shall arise out of, or touching this Supply Agreement or the interpretation and efficacy of any of the Clauses herein contained by mutual agreement within 30 days of the receipt of notice from the concerned party addressed to the other party of the existence of any such dispute, claims or questions.

Any such disputes claim and /or question whatsoever which shall arise either during the validity of this Supply Agreement or thereafter between the Party hereto and the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi touching these presents or as to any other matter in any way relating to this Supply Agreement or the affairs thereof or the mutual rights, duties or liabilities under the Supply Agreement and which cannot be resolved by an agreement acceptable to both the parties as above, may be referred to the arbitration of a single arbitrator to be appointed by both the parties and such arbitration shall be in accordance with and subject to the provisions of the Arbitration and Conciliation Act 1996 or any statutory modification or re-enactment thereof for the time being in force. The arbitration proceedings shall be conducted in English language and the venue for the same will be at Aurangabad only.

All matters referred to above shall be subject to Laws prevalent in India and the courts in Aurangabad shall have exclusive jurisdiction.

**उपरोक्तप्रमाणे अंतीम करुन दिलेल्या मसुद्यास मान्यता देण्यात आली व सदरहू Arbitration क्लॉजचा समावेश संस्थानचे टेंडर/ करारनामा मसुद्यात करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

(३) निर्णय क्र.१८७-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे औचित्य साधून श्री साईलीला विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रु.१,८८,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे औचित्य साधून १०० पानांचा श्री साईलीला विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी सध्याचे मंजुर दराने छपाई करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

(४) निर्णय क्र.१९१-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये वेळोवेळी तयार होणारा अतिरिक्त प्लाझमा National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेस शासन नियमावलीप्रमाणे विक्री करणेस, व त्या बदल्यात त्यांचेकडून Inj.Albumin किंवा Inj. Immunoglobulin इंजेक्शन आवश्यकतेनुसार घेणेस तसेच यासाठी National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेबरोबर करार करणेस मान्यता देण्यता आली. (कार्यवाही- प्र.वैद्यकिय अधिक्षिका, साईनाथ रुग्णालय)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये वेळोवेळी तयार होणारा अतिरिक्त प्लाझमा National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेस शासन नियमावलीप्रमाणे, शासकीय दराने विक्री करणेस व त्यांचेकडून Inj.Albumin किंवा Inj. Immunoglobulin इंजेक्शन आवश्यकतेनुसार विकत घेणेस तसेच यासाठी त्या संस्थेबरोबर करार करणेस मान्यता देण्यता आली.**

(कार्यवाही- प्र.वैद्यकिय अधिक्षिका, साईनाथ रुग्णालय)

---

(५) निर्णय क्र.२०४-

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Agreegator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणाऱ्या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.

प्रथम महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.

सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे, त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

<u>या निर्णयामध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.</u>

**साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.०२** **दिनांक २२.०३.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२५** दिनांक २२.०३.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **द्वारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकरीता उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर (रु.३,५२,१००/-) दिलेल्या निविदाधारकांशी वाटाघाटी/ चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१) | | कामाचे नांव | :- | **व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेबाबत** |
| ०२) | | प्रशासकीय मान्यता | :- | ०१). विद्युत विभागाची दि.०६-११-२०१७ रोजीची टिपणी.<br>०२). मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-१२-२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.१३ निर्णय क्र.१०३५ |
| ०३) | | अपेक्षित खर्च | :- | रु. ४,७३,५००/- |
| ०४) | | सविस्तर तपशील | :- | संस्थानचे धर्मशाळा (२०० रुम) परिसरातील व्दारावती भक्तनिवास इमारतीतील रुम व पॅसेजमध्ये प्रकाशव्यवस्थेसाठी बाथरुम, टॉयलेट, वॉश बेसिन व रुम पॅसेजमध्ये १४ वॅट सी.एफ.एल.टयुब व रुममध्ये ४० वॅट, टयुबसेट लावलेले आहेत. संस्थानला आय.एस.ओ.सर्टिफिकेट प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी नेमण्यात आलेले मा.श्री.सी.केशवमुर्ती साई एन्टरप्राईजेस, बंगलोर, ISO 9001: 2008 ऑडीटर यांनी दि.१४-०९-२०१७ रोजीचे परिक्षण अहवालामध्ये व्दारावती भक्तनिवास यांनी या इमारतीत एल.ई.डी. बल्ब बसविणेविषयी सुचविले आहे. त्यानुसार व्दारावती भक्तनिवास विभागाने दि.२६-०९-२०१७ रोजीचे पत्रान्वये व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये प्रकाशव्यवस्थे करीता एल.ई.डी. बल्ब बसविणेस कळविले आहे. एल.ई.डी. बल्ब होल्डर मध्ये ओपन पध्दतीने लावलेस चोरीस जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तेव्हा रुममध्ये एल.ई.डी. बल्ब ऐवजी २० वॅटची एल.ई.डी. टयुब बसविल्यास योग्य होईल असे मत आहे. व्दारावती भक्तनिवास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | इमारतीमध्ये रुम, पॅसेज व जिन्यामध्ये एकुण ६५० टयुब पट्टया लावलेल्या आहेत. तसेच रुमचे बाथरुम, टॉयलेट, वॉश बेसिन व रुम पॅसेजमध्ये एकुण १४ वॅट १८१० नग सी.एफ.एल. टयुब बंदिस्त बल्कहेड मध्ये लावलेल्या आहेत. त्यांचे जागी लावणेस एल.ई.डी. टयुब सेट व बल्ब संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नसल्याने सदरचे एल.ई.डी.टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकरीता विद्युत विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता दि.०६-११-२०१७ रोजीच्या टिपणी अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. |
| ०५) | | टेक्निकल मान्यता | :- | मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८-१२-२०१७ चे सभेतील विषय क्र.१३ निर्णय क्र.१०३५ अन्वये रु.४,७३,५००/- इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे. |
| ०६) | | ई-निविदा तपशील | :- | विद्युत विभागाच्या दिनांक २७-०१-२०१८ रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी.टयुबसेट व बल्ब खरेदी करणे कामाची ई-निविदा विक्रीसाठी मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या मुंबई व पुणे येथील वर्तमानपत्रात जाहिरात देण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून त्यानुसार जनसंपर्क विभाग यांना दिनांक ०३-०२-२०१८ रोजी तसेच आय.टी. विभाग यांना दिनांक ०६-०२-२०१८ रोजी दैनिक वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेसाठी कळविण्यात आले. |
| | अ | दैनिक वर्तमानपत्रात प्रकाशित ई-निविदा विक्रीची अधिसुचना | :- | विद्युत विभागाच्या दिनांक २७-०१-२०१८ रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये विद्युत विभागाचे दि.२७-०१-२०१८ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१५-०२-२०१८ रोजी दै.सामना, मुंबई, दै.पुण्यनगरी, पुणे व दै.हिन्दुस्थान टाईम्स, मुंबई या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१४-०२-२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २६-०२-२०१८ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. |
| | ब) | कामाचा कालावधी | :- | ०२ महिने |
| | क) | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | :- | दिनांक १२-०३-२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजता तांत्रिक निविदा उघडण्यात आली. |
| | ड) | किती निविदा धारकांनी ई-निविदा प्रक्रियामध्ये सहभाग घेतला | :- | ०३ (तीन फक्त) |
| | ई) | सर्व निविदा धारकांनी ई-निविदा प्रक्रिया संबंधित सर्व कागदपत्र जमा केले होते का ? | :- | हो-जमा केले आहे. |
| | फ) | सर्व निविदा धारकांनी अर्नेस्ट मनी डिपॉझिटची रक्कम भरली (स्कॅन केली) आहे का ? | :- | हो-अदा केली आहे. |
| | ग) | ई-निविदामध्ये मंजुर झालेली रक्कम | :- | रु. ३,५२,१००/- (अक्षरी रु. तीन लाख बावन्न हजार शंभर मात्र) |

**तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांचा तपशील :-**

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | ई-निविदेमध्ये दिलेली अधिक/ वजा टक्केवारी | ई-निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१) | मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस, नाशिक | (-) वजा १५.६४ % | रु. ३,९९,४२५.४० |
| ०२) | मे.साईसिद्धी एन्टरप्राईजेस, राहाता | (-) वजा २१.८९ % | रु. ३,६९,८३०.०० |
| ०३) | मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव, राहाता | (-) वजा २५.६४ % | रु. ३,५२,१००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७) | | सर्वात कमी निविदाधारकाचा तपशिल | | |
| | अ) | नाव | :- | मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव, राहाता |
| | ब) | दिलेली रक्कम | :- | रु. ३,५२,१००.०० |
| | क) | अपेक्षित खर्चाच्या अधिक/ वजा टक्केवारी | | (-) वजा २५.६४ % |
| ८) | | ई-निविदा स्विकारणेचे अधिकार | :- | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

९). वर नमूद केल्याप्रमाणे, सदरच्या विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेपुर्वी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेपुढे खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव, राहाता यांनी व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकरीता रक्कम रुपये ३,५२,१००/- इतके दर दिलेले असून ते दर मंजुर असलेल्या रु. ४,७३,५००/- इतक्या अपेक्षित खर्चापेक्षा रु. १,२१,४००/- (वजा २५.६४%) इतके असून त्यांचेशी वाटाघाटी/ चर्चा करुन त्यांनी देऊ केलेले निम्नतम दर स्विकारणेबाबत निर्णयासाठी सादर.

१०). वरील नमूद तपशिलानुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव यांचे रक्कम रु. ३,५२,१००/- मात्रची निविदा स्विकारुन त्यांचेशी वाटाघाटी/ चर्चा करुन त्यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी ई-निविदेमधील मुळ दरावर १% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी.टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकरीता मे.श्री साई इलेक्ट्रिकल्स्, अस्तगांव यांचे एकत्रित रु.३,४८,५७९/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०२ **संस्थानकरीता तज्ञ जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक करणेकामी आलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन न्युनतम दरधारक यांची जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुदः१७(२) (झ)** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्तावनाः-** वित्त विभाग भारत सरकार यांनी वस्तु व सेवा कर (GST) हा कर दि.१ जुलै,२०१७ पासुन नव्यानेच लागु केलेला आहे. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. संस्थानचे आर्थिक व्यवहार संख्येने व रक्कमेने मोठे आहेत. लागु असलेल्या करप्रणालीनुसार व वेळावेळी नव्याने पारित करण्यात आलेल्या करप्रणालीस अनुसरुन आर्थिक व्यवहार अचुकपणे होण्याच्या दृष्टीने व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने आणि आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही होऊन अंतर्गत नियंत्रण सक्षम राहणेकामी, तज्ञ कर सल्लागारांची नेमणुक अत्यंत आवश्यक.

**प्रस्तावः-** उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे जी.एस.टी. कर सल्लागार (GST Consultant) नेमणुक करणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यास मा.व्य.स. निर्णय क्र. ९६५/दि.१४.११.२०१७ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन, दि.०१.०२.२०१८ रोजी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर दि.०१.०२.२०१८ रोजी माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. उपरोक्त माहितीस अनुसरुन जी.एस.टी. कर सल्लागार (GST Consultant) नेमणुक होणे कामी एकुण एकुण १२ लेखापरिक्षण संस्थांची तांत्रिक व वाणिज्यीक लिफाफे विहीत वेळेत आले होते. विहीत वेळेत असलेल्या लेखापरिक्षण संस्थांचे तांत्रिक लिफाफे दि.१७.०२.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले होते. पैकी पात्र ६ लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.१२.०३.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| S.No | Name of the firm | Expected Annual Fees with GST |
|---|---|---|
| 1 | M/s. S.G. Andani& Co. C.A. Ahemednagar | 3,18,000/- |
| 2 | M/s. N.U.Deshmukh& Co. C.A. Pune | 7,96,500/- |
| 3 | M/s Bagchi& Gupta & Co. C.A. Nagpur | 4,47,220/- |
| 4 | RSVA& Co. C.A. Pune | 21,24,000/- |
| 5 | S.M.Munot&ASso.C.A. Pune | 9,91,200/- |
| 6 | UlhasBorse&Co.C.A. Nashik | 3,54,000/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्यातील **मे.एस.जी. अंदाणी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, अहमदनगर हे** न्युनतम दर धारक आहेत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः** तरी संस्थानकरिता तज्ञ जी.एस.टी कर सल्लागार (GST Consultant) नेमणुक करणेकामी आलेली दरपत्रकांच्या तुलनात्मक तक्ताचे आवलोकन होऊन, न्यनतम दरधारकास कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे शिफारस होणेस्तव सदर प्रस्ताव सविनय सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक मे.एस.जी. अंदाणी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, अहमदनगर हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी रु.१८,०००/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरिता तज्ञ जी.एस.टी कर सल्लागाराची (GST Consultant) नेमणूक करणेकामी मे.एस.जी. अंदाणी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, अहमदनगर यांचे एकत्रित वार्षिक रु.३,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**०३ दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदारा समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेबाबत |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.४४४ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. १७,०६,६५५/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | संस्थानचे मुंबई येथील साईनिकेतन दादर या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी म्हाडा मुंबई बिल्डींग रिपेअर्स ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन बोर्ड तर्फे कार्यकारी अभियंता, एफ. एन. डिव्हीजन, एम.बी. आर. ॲण्ड आर. बोर्ड, मुंबई यांनी दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार म्हाडा यांचे MBR & R बोर्डाकडे नोंदणीकृतस्ट्रक्चरल इंजिनिअर Barve Consultant, Chembur, Mumbai यांचेकडून साईनितेकन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात आले आहे. सदरहू इमारतीचा स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट त्यांनी दि.१८/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये सल्लागार यांनी संस्थानकडे सादर केला आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२३/०५/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४४४ अन्वये सदरहू इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेसाठी सविस्तर अंदाजपत्रक व ई निविदा मागविणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. तृतीय मागणी ई निविदा सुचना प्रसिध्द केलेली असतांना Re-Hab Artifact Pvt.Ltd., Thane या एकाच ठेकेदाराने ई निविदा जमा केलेली आहे.<br>उपरोक्त कामी प्राप्त झालेले एकच निविदेमध्ये ठेकेदार Re-Hab Artifact Pvt. Ltd., Thane यांनी देऊ केलेले रु.१९,२१,१६५/- दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.५७% जास्त येत असल्यानेत्यावर निर्णय होणेसाठी मा.उप समितीचे दि.१६/१२/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णयानुसार याकामी फेर निविदा मागविणे बाबत ठरले होते. त्यानुसार याकामी दि.१९/०१/२०१८ रोजी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई-निवीदा सुचना प्रसिद्ध करणेत आली होती. दि.०१/०२/२०१८ रोजी पर्यंतचे ई- |

| | | |
|---|---|---|
| | | निवीदा जमा करण्याचे अंतीम मुदतीत एकही ई-निवीदा जमा झालेली नाही त्यामुळे याकामी फेर ई-निवीदा मागविण्यात आल्या आहेत. |
| ५) | निवीदा तपशील | दि.२८/०२/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई– निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०९/०३/२०१८ पर्यंतचे अंतिम मुदतीत ठेकदार, भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान जि. सातारा या एकच ठेकेदार कंपनीने ई-निवीदा जमा केलेली आहे. |
| अ) | निविदा कालावधी | ४ महिने |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.१२/०३/२०१८ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०१ (एक) |
| ड) | सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदा धारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय, रु.१७,०००/- मात्र UTR No.MAHBH18068410331 Dt.09/03/2018 द्वारे जमा. |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१७,०६,६५५/- |
| | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदारचे नांव | निविदा रक्कम | निविदा टक्केवारी कमी/ अधिक |
|---|---|---|---|
| १. | भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान, जि. सातारा | रु.१६,२३,५१०/- | ४.८७% कमी |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान, जि. सातारा |
| ब) | निविदा रक्कम | रु.१६,२३,५१०/- |
| क) | निविदा टक्केवारी कमी/ अधिक | ४.८७% कमी |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

९. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमा- २ दि.१२/०४/२०१७ रोजीचे शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.३ नुसार तृतिय वेळेस मागविलेली निविदा ही जर एकच निविदा प्राप्त झाली व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजीत दरा इतकी असेल ती स्विकारण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

१०. वरील नमूद तपशिलानूसार संस्थानचे दादर, मुंबई येथील साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेसाठी प्राप्त झालेल्या भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान, जि. सातारा यांचे रक्कम रु.१६,२३,५१०/- मात्रची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान, जि. सातारा हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. सभेने विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. परंतु दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दादर, मुंबई येथील साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेकामी भिवाई कस्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान, जि. सातारा यांचे रु.१६,२३,५१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच या साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे दुसऱ्या टप्प्यात Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning व Electrical ची कामे करणेसाठी ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०४ **महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिक अप FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ तसेच ९ फुट लांबीची ०३ अशी एकूण ०५ मालवाहतूक वाहने खरेदी करणेकरीता निम्नतम दर स्विकारुन संबधीत पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन २००४ ची अधिनियमन तरतुदः-** १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे. आणि या अधिनीमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उदीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

२. कलम २१ (१) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधिन राहुन समितीकडुन पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(ख) रुढी व प्रथानुसार मंदिरातील धार्मिक विधी व पुजा- अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समांरभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावनाः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६ अन्वये "प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे संस्थानमधील विविध विभागाच्या कामाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची पिकअप् FB MH PS या प्रकारची ८ फुट लांबीची २ व ९ फुट लांबीची ३ अशी एकुण ०५ मालवाहतुक वाहने विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे ".

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थीक विषय इ छाननी करुन अनुमान-** महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." असे तरतूद आहे.

दि.०६.०२.२०१८ रोजीचे प्रशासकीय मान्यते नुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६०५५/२०१८ दि.१०.०२.२०१८ चे दर मागणीचे पत्रान्वये महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची पिकअप् FB MH PS या प्रकारची ८ फुट लांबीची २ व ९ फुट लांबीची ३ अशी एकुण ०५ मालवाहतुक वाहने खरेदी करणे कामी दि.२७.०२.२०१८ अखेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरमागणी पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. महिंद्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीडून व या कंपनीचे विविध पुरवठादारांना फोन/ ई-मेलव्दारे दरपत्रके मागविण्यात आलेले होते. परंतू दिनांक २७.०२.२०१८ पर्यंत एकच पुरवठादार यांचेकडून दरपत्रक प्राप्त झालेले होते.

दि.२८.०२.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीकडूनच फेर सुधारित दरमागणी पत्रास मुदतवाढ देणे कामी मान्यता देण्यात आलेली होती.

यानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६४१०/२०१८ दिनांक २८/०२/२०१८ अन्वये महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी व कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दिनांक १०/०३/२०१८ अखेर फेर सुधारित मागणीदरपत्रके मागविण्यात आली होती. याकामी मुदतीत प्राप्त झालेली महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीकडूनच सुधारित फेर मागणी दरपत्रके खरेदी समितीचे दिनांक १२/०३/२०१८ रोजीचे सभेत उघडण्यात आलेली असून त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | कॉर्नरस्टोन ॲटोमोबाईल्स, अधिकृत डिलर, साकुरी ता.राहाता | | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., ॲटोमोटिव्ह सेक्टर, मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली, मुंबई. | |
|---|---|---|---|---|---|
| | | बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | बोलेरो बिग पिकअप FB MH PS या प्रकारातील ९ फुट हौदा असलेली | बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | बोलेरो बिग पिकअप FB MH PS या प्रकारातील ९ फुट हौदा असलेली |
| | | दर प्रती नग रु. | | | |
| 1 | **वाहनाची किंमत** | ६,५८,२३७/- | ६,६६,६४१/- | ४,६८,४७७/- | ४,७३,९२९/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | SGST/ UTGST | | | | |
| 3 | CGST | | | १,३२,५७४/- | १,३४,१००/- |
| 4 | CRTM | ९००.०० | ९००.०० | | |
| 5 | R.S.A. | १,२२०/- | १,२२०/- | | |
| 6 | Logistic/ Transportation | २,३६०/- | २,३६०/- | ५,०००/- | ५,०००/- |
| 7 | Insurance | ३४,२७३/- | ३४,४८९/- | १७,६९३/- | १७,८५६ |
| 8 | Grand Total (1+7) | ६,९६,९९०/- | ७,०५,६१०/- | ६,२३,७४४/- | ६,३०,८८५/- |
| | Remark | | | L1 | L1 |

<u>**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-**</u> महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे नियमानुसार जिल्हा निहाय डिलर त्या–त्या जिल्हात नवीन वाहनांचा पुरवठा करतात. त्यामुळे नगर जिल्हाचे डिलर कॉर्नरस्टोन यांचे दरपत्रक प्राप्त आहे. अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे पत्र संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. तसेच महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा या उत्पादक कंपनीकडून थेट दरपत्रके मागविण्यात आलेली होती. तसेच महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे कार्यालयातून दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील दरांचा विचार करता उत्पादक कंपनीचे दर डिलरपेक्षा कमी असुन त्याबाबत तपशिलवार माहिती तक्ता खालील प्रमाणे आहे.

| डिलरचे दर | | कंपनीचे दर | | फरक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ फुटी २ वाहनांचे दर | ९ फुटी ३ वाहनांचे दर | ८ फुटी २ वाहनांचे दर | ९ फुटी ३ वाहनांचे दर | ८ फुटी २ वाहनांचे दरातील फरक | ९ फुटी ३ वाहनांचे दरातील फरक | एकुण फरक |
| १३,९३९८०/- | २१,१६,८०३/- | १२,४७,४८८/- | १८,९२,६५५/- | १,४६,४९२/- | २,२४,१७५/- | ३,७०,६६७/- |

तथापि कंपनीचे दरपत्रकात दिलेल्या दराव्यतिरीक्त वेअरहाऊस ते डिलीव्हरी पॉईटचा ट्रान्सपोर्ट चार्जेस वेगळा द्यावा लागेल अशी अट आहे.

दि.१२.०३.२०१८ रोजीचे खेरेदी समितीचे सभेत उपरोक्त प्रमाणे महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता दिलेली आहे.

**मागणी**ः-उपरोक्त प्रमाणे यांचे महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप् FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ नग तसेच ९ फुट लांबीची ०३ नग अशी एकुण ०५ नग मालवाहतूक वाहने खरेदी करणे कामी महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देणे कामी मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणे करीता सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेपुढे सादर.

**सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी वाहन विभागप्रमुख यांनी माहिती दिली की, महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे प्रतिनिधींनी दुरध्वनीद्वारे, प्रस्तावित वाहनांच्या किमतींमध्ये वाढ होणार असल्याने मार्च-२०१८ अखेर पुरवठा आदेश मिळावा, अशी विनंती केली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिक अप FB MH PS या प्रकारचे मालवाहतूक वाहने खरेदी करणेकरीता महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीने दिलेले ८ फुटी २ वाहनांकरीता रु.१२,४७,४८८/- व ९ फुटी ३ वाहनांकरीता रु.१८,९२,६५५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना मार्च-२०१८ पुर्वी पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०५ **अग्नीशमन वाहन तयार करणेकामी भारत बेंज कंपनीची चेसी खरेदी करणेकामी निम्नतम दर स्विकारुन संबधित पुरवठादारास कार्यादेश देणे.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-**

१) कलम १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष् आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि या

अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे , ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम २१(१) मध्ये विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयक अधिनियम, १९६१ च्या तुरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करणत येईल,--

(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकविणीचा प्रचार करणे.

प्रस्तावना- फायर ॲन्ड सेप्टी विभागाचे प्रस्तावावर मा व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्रमांक ३८ व निर्णय क्रमांक ७२२ अन्वये "अग्नीशामक वाहनासाठी भारत बेंज कपंनीची चेसी, विहित पध्दतीने खरेदी करण्यात यावी असे ठरले. तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे ."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार व फायर ॲन्ड सेप्टी विभागाचे दिनांक ११/०९/२०१७ चे पत्रास अनुसरुन अग्नीशमन वाहन तयार करणे करीता भारत बेंज कंपनीची BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी करावी लागेल. चेसी खरेदी करणे करीता (विमा रकमेसहीत) अंदाजे रु. २३,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीके तील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." असे तरतूद आहे.

दिनांक २१/०९/२०१७ चे मंजुरीनुसार इकडील जा.नं.एसएसएस-वाहन-३८४९-२०१७ दि.१८/१०/२०१७ चे पत्रान्वये भारत बेंज कंपनीच्या अधिकृत पुरवठादारांकडून भारत बेंज कंपनीची BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी कामी दिनांक ३१/१०/२०१७ अखेर दरपत्रके मगविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणी पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. विविध पुरवठादारांना फोन/ मेलव्दारे देखील कळविण्यात आलेले होते परंतू दिनांक ३१/१०/२०१७ पर्यंत वाहन विभागाकडे एकही दरपत्रक प्राप्त झालेले नव्हते.

त्यामुळे दिनांक ३०/१०/२०१७ चे मंजूरीनुसार याकामी मुदतवाढ देऊन जा.नं.एसएसएस-वाहन-३९७६-२०१७ दि.३१/१०/२०१७ चे पत्रान्वये भारत बेंज कंपनीच्या अधिकृत पुरवठादारांकडून भारत बेंज कंपनीची BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी कामी दिनांक १५/११/२०१७अखेर दरपत्रके मागविण्यास मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणी पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. विविध पुरवठादारांना फोन/ मेलव्दारे देखील कळविण्यात आलेले होते परंतू दिनांक १५/११/२०१७ पर्यंत वाहन विभागाकडे एकही दरपत्रक प्राप्त झालेले नव्हते.

त्यामुळे दिनांक १५/११/२०१७ चे मंजूरीनुसार याकामी मुदतवाढ देऊन जा.नं.एसएसएस-वाहन-४२६८-२०१७ दि.१५/११/२०१७ चे पत्रान्वये भारत बेंज कंपनीच्या अधिकृत पुरवठादारांकडून भारत बेंज कंपनीची BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी कामी दिनांक २५/११/२०१७अखेर दरपत्रके मागविण्यास मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणी पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. विविध पुरवठादारांना फोन / मेलव्दारे देखील कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार १. घाडगे ट्रकींग केजीपी ॲटो पुणे २. प्रोवींचील ट्रकींग प्रा.लि. नागपूर, धुळे शाखा, ३. घाडगे ट्रकींग केजीपी ॲटो कोल्हापूर ४. घाडगे ट्रकींग केजीपी ॲटो पुणे पुरवठादारांची दरपत्रके २५/११/२०१७ पुर्वी वाहन विभागाकडे प्राप्त झालेली होती.

सदरची दरपत्रके दिनांक ०४/१२/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आली असता असे निदर्शनास आले की आपण सर्व पुरवठादारांकडून प्रथम एक वर्षाचे विमा रकमेसह दर मागणी केलेली होती. मात्र सर्व पुरवठादारांनी सदरचे दरपत्रकात विमा रकमेसह दर दिलेले नाहीत. त्यामुळे या सभेत BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी कामी भारत

बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यास मान्यता देण्यात आली होती. यानुसार दिनांक ०४/१२/२०१७ चे मान्यतेनुसार व जा नं. एसएसएस-वशी-वाहन-४६७५-२०१७ दि. ०५/१२/२०१७ चे पत्रान्वये दिनांक २०/१२/२०१७ अखेर भारत बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यात आली होती.

याकामी मुदतीत प्राप्त झालेली ५ दरपत्रके दिनांक ११/०१/२०१८ चे खरेदी समिती सभेपुढे उघडली असता त्यात Provincial Trucking Pvt Ltd Gondkhairi, Dist- Nagpur यांचे दर सर्वात कमी होते मात्र त्यांना यावेळी दुरध्वनीवरुन सदरचे चेसी पुरवठा किती दिवसात करणार याबाबत विचारणा केली असता त्यांनी दिनांक ०१/०१/२०१८ पासून सदर चेसीचे दरात वाढ झालेली असल्याने संस्थानला दिलेले दरपत्रकात चेसी पुरवठा करु शकत नसलेचे सांगीतले आहे. त्यामुळे BHARATBENZE- 2523R 6x2, 5175WB, BS-4 , SLC, TT या प्रकारची चेसी खरेदी कामी भारत बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यास खरेदी समितीने मान्यता दिलेली आहे.

यानुसार दिनांक ११/०१/२०१८ चे मान्यतेनुसार व जा नं. एसएसएस-वशी-वाहन-५६३०-२०१८ दि. २२/०१/२०१८ चे पत्रान्वये दिनांक ०५/०२/२०१८ अखेर भारत बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणीचे पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे मा.सदस्य व भारत बेंज कंपनीचे विविध पुरवठादारांना मेल/ दुरध्वनीव्दारे देखील कळविण्यात आलेले होते परंतू दिनांक ०५/०२/२०१८ पर्यंत वाहन विभागाकडे एकही दरपत्रक प्राप्त न झाल्यामुळे दिनांक ०७/०२/२०१८ चे मान्यतेने जा नं. एसएसएस-वशी-वाहन-६०३४-२०१८ दि. ०९/०२/२०१८ चे पत्रान्वये दिनांक २१/०२/२०१८ अखेर भारत बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेचअधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणीचे पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे मा.सदस्य व भारत बेंज कंपनीचे विविध पुरवठादारांना मेल/ दुरध्वनीव्दारे देखील कळविण्यात आलेले होते.परंतू दिनांक २१/०२/२०१८ पर्यंत वाहन विभागाकडे एकही दरपत्रक प्राप्त झालेले नव्हते.

त्यामुळे दिनांक ७/२/२०१८ चे मान्यतेने जा.नं. एसएसएस-वशी-वाहन-६२८७-२०१८ दि. २२/०२/२०१८ चे पत्रान्वये दिनांक ०५/०३/२०१८ अखेर भारत बेंज कंपनीचे अधीकृत पुरवठादारांकडून फेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेचअधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणीचे पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे मा.सदस्य व भारत बेंज कंपनीचे विविध पुरवठादारांना मेल / दुरध्वनीव्दारे देखील कळविण्यात आलेले होते.

यानुसार याकामी मुदतीत प्राप्त झालेली ४ दरपत्रके दिनांक १२/०३/२०१८ चे खरेदी समिती सभेपुढे उघडली असता त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | पुरवठादाराचे नांव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Ghatge Trucking, KGP Auto Ltd. Kolhapur | **Ghatge Trucking, KGP Auto Ltd. Nashik** | Ghatge Trucking, KGP Auto Ltd. Solapur | Ghatge Trucking, KGP Auto Ltd. Pune |
| | | रक्कम (रु.) | रक्कम (रु.) | रक्कम (रु.) | रक्कम (रु.) |
| 1 | Bharat Benze-2523R 6X2, 517 WB, BS-4 SLC, TT | 17,86,699.38 | 17,86,699.38 | 17,86,699.38 | 17,86,699.38 |
| 2 | SGST/UTGST | 2,50,137.91 | 2,50,137.91 | 2,50,137.91 | 2,50,137.91 |
| 3 | CGST | 2,50,137.91 | 2,50,137.91 | 2,50,137.91 | 2,50,137.91 |
| 4 | TCS @ 1 % | 22,869.75 | 22,869.75 | 22,869.75 | 22,869.75 |
| 5 | Total (1 to 4) | 23,09,844.96 | 23,09,844.96 | 23,09,844.96 | 23,09,844.96 |
| 6 | Insurance | 75,065.00 | 75,065.00 | 75,065.00 | 75,065.00 |
| 7 | Grand Total (5+6) | 23,84,909.96 | 23,84,909.96 | 23,84,909.96 | 23,84,909.96 |
| 8 | पुर्णांकित रक्कम | 23,84,910.00 | 23,84,910.00 | 23,84,910.00 | 23,84,910.00 |
| 9 | सुट | 00 | 25910.00 | 00 | 00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | अंतिम रक्कम | 23,84,910.00 | **23,59,000.00** | 23,84,910.00 | 23,84,910.00 |
| 11 | शेरा | | L-1 | | |

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील पुरवठादारांचे दरांचा विचार करता सर्व पुरवठादारांचे दर समान होते. शिर्डी करीता नाशिक विभाग असलेने केजीपी ॲटो लि. नाशिक यांचे प्रतिनीधी दरपत्रके उघडण्याचे वेळी हजर होते. त्यांनी यावेळी श्री साईबाबा सस्थान करीता विशेष सुट म्हणुन रु २५,९१०/- दिलेली असून दरपत्रकातील एकूण दर रु.२३,८४,९१०/- मधुन सदर सुट रक्कम वजा जाता अंतिम दर रु.२३,५९,०००/- मध्ये सदर वाहन देण्यास ते तयार आहेत. त्यांचे सदरचे निम्नतर दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस खरेदी समितीने मान्यता दिलेली आहे.

**मागणी-** तरी उपरोक्त प्रमाणे घाडगे ट्रकींग के जी पी ॲटो लि. नाशिक यांचे निम्नतर दर स्विकारुन त्यांना अग्नीशामक वाहन तयार करणे करीता चेसी खरेदीकामी कार्यादेश देणेबाबत मा व्यवस्थापन समितीस शिफारस करणे करीता सदर प्रस्ताव मा उप समितीचे सभेपुढे सादर.

**अग्नीशमन वाहन तयार करणेकामी भारत बेंज कंपनीची चेसी खरेदी करणेकामीचे निम्तनम दरधारक घाडगे ट्रकींग के.जी.पी. ॲटो लि., नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी सभेसमोर सांगितले की, दरम्यानचे कालावधीमध्ये चेसीच्या किंमतीमध्ये रु.५४,०००/- मात्रने वाढ झालेली असून, मार्च-२०१८ पुर्वी पुरवठा आदेश व बुकींग रक्कम रु.५०,०००/- मात्र आगाऊ दिल्यास दरपत्रकामधील निम्नतम दराने सदरहू चेसीचा पुरवठा करणेस तयार आहोत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अग्नीशमन वाहन तयार करणेकामी भारत बेंज कंपनीची चेसी खरेदी करणेकामी घाडगे ट्रकींग के.जी.पी. ॲटो लि., नाशिक यांचे रु.२३,८४,९१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना तात्काळ पुरवठा आदेश व रु.५०,०००/- मात्र बुकींगची रक्कम आदा करणेत यावी. तसेच या केलेल्या कार्यवाहीस व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०६ **सन २०१८-१९ या कालावधीकरीता वाहन विभागाकडील ११० वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी निम्नतम दर देणारे विमा कंपनीस कार्यादेश देणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-१७ (१)** मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील," असे नमुद केलेले आहे.

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-१७ (२) (झ)** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्ताविकः-** संस्थानचे १०६ वाहनांचा दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीतील विमा नुतनीकरण करणे करीता राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन दरपत्रके मागवून निम्नतम दर देणारे दि.न्यु.इंडिया इश्युरन्स कं. लि., श्रीरामपूर यांचेकडून संस्थान वाहनाचे वाहन विमा उतरविण्यात आलेला असुन या कामी एकुण रक्कम रु.२०,२८,२४४/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे चव्वेचाळीस मात्र) खर्च आलेला आहे.

सध्या वाहन विभागाकडील खालील तपशिला प्रमाणे विविध वाहनांचे पॉलिसी मुदत दि.३१.०३.२०१८ अखेर संपुष्टात येत असुन या वाहनांचा विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | वाहन प्रकार | संख्या | अ.नं. | वाहन प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यालयीन वाहने | १४ | ०५ | मालवाहतुक व इतर वाहने (ट्रॅक्टर व ट्रेलर) | २८ |
| ०२ | रुग्णवाहीका वाहने | १५ | ०६ | दुचाकी वाहने | ०८ |
| ०३ | सर्व बसेस | २४ | ०७ | बॅटरी कार वाहने | ०४ |
| ०४ | आपत्कालीन व इतर वाहने | ०७ | ०८. | मोबाईल टॉयलेट | १० |
| | | | | **एकुण वाहने** | **११०** |

उपरोक्त वाहनांचा विमा नुतनीकरण करणे करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ सभेतील विषय क्रमांक १३ व निर्णय क्रमांक ८७ अन्वये राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

यानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६२५३/२०१८,दिनांक ०५.०३.२०१८ अखेर राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून अखेर दरपत्रके मागविण्यात आलेली होती. याकामी मुदतीत प्राप्त झालेली राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांची दरपत्रके दि.१२.०३.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेली असून त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे. (दरपत्रक मागणीपत्र व प्राप्त दरपत्रकाच्या झेरॉक्स प्रती यासोबत परिशिष्ट अ म्हणुन माहितीसाठी जोडल्या आहेत.)

| अ.न | तपशिल | विमा कंपनीचे नांव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि.न्यु.इंडिया ॲश्युरन्स कं.लि. श्रीरामपुर | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक | नेशनल इन्श्युरन्स कं.लि. कोपरगांव | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. तत्पर सेवा कार्यालय शिर्डी |
| १. | विमा कंपनीने दरपत्रकात नमूद केलेली एकुण IDV | ४,०१,८६,४२० /- | ४,०१,८६,४२०/- | ४,०१,८६,४२०/- | ४,०१,८६,४२०/- |
| २. | संस्थानचे ११० वाहनांचे एकुण वार्षिक विमा हप्ता रक्कम (रु.) सर्व करांसहीत | २०,४९,५६४/- | **१७,६७,६२८/-** | २०,७०,०००/- | २१,६७,२३६/- |

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः**-उपरोक्त दरांचा विचार करता संस्थानचे ११० वाहनांचा एकवर्ष कालावधीकरीता (दि.०१/०४/२०१८ ते दि.३१.०३.२०१९) विमा नुतनीकरण करणे कामी युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांचे दर सर्वांत कमी आहे. तथापि त्यांचे दरपत्रकात Please Note that the Premium quoted is subject to revision as per I.R.D.A. guidelines and increase of G.S.T, if any by central Government. The premium quoted is negotiable at the time of discussion अशी अट आहे.

**मागणी**:- तरी युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांचे निम्नतम दर असलेने त्यांचेशी समक्ष चर्चा/ वाटाघाटी करुन त्यानुसार अंतीम दर स्विकारण्यास येवून त्यांना कार्यादेश देणेस व याकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणे करीता सदरचा प्रस्ताव मा.उप समितीचे सभेपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या कालावधीकरीता वाहन विभागाकडील ११० वाहनांच्या वार्षिक विम्याचे नुतनीकरण करणेकामी युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि., विभागीय कार्यालय, नाशिक यांचे एकत्रित रु.१६,६७,६२८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच दि.०१ एप्रिल पुर्वी सदरहू वाहनांच्या विम्याचे नुतनणीकरण आवश्यक असल्यामुळे युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि., विभागीय कार्यालय, नाशिक यांना तात्काळ कार्यादेश व अग्रीम रक्कम देण्यात यावी. त्याचप्रमाणे यासाठी केलेल्या कार्यवाहीस व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०७ **संस्थानचे विविध विभागाकरीता कार्यालयीन व संगणक स्टेशनरी सहित्य खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागांकरीता कार्यालयीन व संगणक स्टेशनरी साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. यामध्ये खालीलप्रमाणे ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

अ) कार्यालयीन स्टेशनरी-

१. बजाज जनरल्स, बार्शी

२. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई

३. एस कुमार एजन्सिज, धुळे
४. सागर स्टेशनरी मार्ट, अहमदनगर
५. श्री गणेश एंटरप्रायजेस, नाशीक
६. श्री साई मार्केटिंग, ठाणे
७. ए. डी. एंटरप्रायजेस, ठाणे
८. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर
९. साईसन्स टेक्नोकॉम प्रा.लि., मुंबई
१०. कबीर एंटरप्रायजेस, कोल्हापुर

ब) संगणक स्टेशनरी –

१. बजाज जनरल्स, बार्शी
२. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई
३. देवीश एंटरप्रायजेस, मुंबई
४. बहुचर ट्रेडर्स, मुंबई
५. शिवशक्ति इंजिनियरिंग सोल्युशन, डोंबीवली
६. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर
७. साईसन्स टेक्नोकॉम प्रा.लि., मुंबई
८. कबीर एंटरप्रायजेस, कोल्हापुर

वरील निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०९.०२.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये कार्यालयीन स्टेशनरीसाठी सर्व १० निविदाधारक व संगणक स्टेशनरीसाठी सर्व ८ निविदाधारक पात्र ठरले होते. सदर पात्र निविदाधारकांचे ई-निविदेचे Online Commercial Bid दिनांक १२.०३.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

सदर प्राप्त ऑनलाईन तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

अ) कार्यालयीन स्टेशनरी –

| Tender Sl.No | Description of Work / Item(s) | Shrinath General Stores | SAGAR STATUNERY MART | CLASSIC STATIONERS, CO. | kabir enterprises | SHREE GANESH ENTERPRISES | Saisons technocom Private limited | SHREE A. D. ENTERPRISE | Shri Sai Marketing | S Kumar Agencies | BAJAJ GENERALS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बॉलपेन निळा - नटराज/ बेली/ डॉल्फीन/तत्सम, Use & Throw 400 नग | 1.80 | 3.50 | 1.79 | 5.00 | 2.40 | 1.87 | 4.50 | **1.75** | 3.00 | 1.89 |
| 2 | बॉलपेन काळा- नटराज/बेली/ टॉवर/तत्सम, Use & Throw 20 नग | 1.80 | 3.50 | **1.79** | 5.00 | 2.40 | 1.87 | 4.50 | 1.80 | 3.00 | 1.89 |
| 3 | बॉलपेन लाल - नटराज/ बेली/ टॉवर/तत्सम, Use & Throw 100 नग | 1.80 | 3.50 | **1.79** | 5.00 | 2.40 | 1.87 | 4.50 | 1.80 | 3.00 | 1.89 |
| 4 | स्टॅप्लर मोठे - HD-23S17 - कांगारु/ तत्सम 3 नग | 786.00 | 847.00 | 951.00 | **165.00** | 1,125.00 | 854.44 | 1,390.00 | 940.00 | 1,440.00 | 910.00 |
| 5 | स्टॅप्लर (Max - 10) - कांगारु/ तत्सम- 300 नग | **23.50** | 50.00 | 26.50 | 27.00 | 33.00 | 24.70 | 40.00 | 28.00 | 48.00 | 29.00 |
| 6 | स्टॅप्लर (मेडियम २४/०६) - कांगारु/ तत्सम- 130 नग | **66.00** | 85.00 | 75.10 | 78.00 | 96.00 | 68.89 | 225.00 | 76.00 | 108.00 | 89.75 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | स्टॅप्लर मशिन पीन (Max - 10) - कांगारु/ तत्सम 4500 पॅकेट | **4.20** | 5.00 | 4.85 | 6.00 | 6.50 | 4.88 | 6.50 | 5.25 | 6.75 | 4.85 |
| 8 | स्टॅप्लर मशिन पीन मेडियम २४/६ - कांगारु/ तत्सम 500 पॅकेट | **9.85** | 14.00 | 11.25 | 10.50 | 12.00 | 10.17 | 14.90 | 11.10 | 14.5 0 | 11.65 |
| 9 | तारखेचे शिक्के - परनामी/ तत्सम 50 नग | 40.00 | 37.00 | 45.00 | **34.00** | 43.00 | 39.33 | 70.00 | 65.00 | 55.0 0 | 48.00 |
| 10 | पीन रिमुव्हर - कांगारु/ तत्सम 12 नग | 120.0 0 | 85.00 | 131.00 | **31.50** | 111.0 0 | 38.89 | 245.0 0 | 35.00 | 132. 00 | 101.0 0 |
| 11 | व्हाईट बोर्ड - मार्कर पेन - कॅमल/ तत्सम 30 नग | **13.95** | 17.00 | 16.00 | 16.00 | 21.00 | 20.00 | 24.80 | 18.00 | 25.0 0 | 17.00 |
| 12 | खोड रबर - एच. बी./ नटराज/ अप्सरा/ तत्सम 400 नग | 1.95 | 5.00 | **0.85** | 3.00 | 3.00 | 0.88 | 2.90 | 2.40 | 5.00 | 0.89 |
| 13 | शॉपनर - नटराज/ कॅमलीन/अप्सरा/ तत्सम- 100 नग | **1.95** | 3.00 | 2.45 | 3.00 | 3.00 | 2.18 | 2.90 | 2.40 | 5.00 | 2.50 |
| 14 | एच.बी.पेन्सिल - नटराज/अप्सरा/ कॅमलीन/ तत्सम 600 नग | 3.50 | **3.00** | 3.05 | 4.00 | 3.70 | 3.48 | 4.75 | **3.00** | 5.00 | 3.50 |
| 15 | स्केच पेन - पॅकेट - कॅमल/ तत्सम 30 पॅकेट | 19.00 | 20.00 | 21.50 | **17.65** | 23.00 | 21.16 | 23.50 | 18.00 | 25.0 0 | 19.75 |
| 16 | कॅलक्युलेटर मोठे - कॅसिओ/ सिटीझन/ ओरपट/ तत्सम, 12 Digits- 50 नग | **115.0 0** | 200.00 | 180.00 | 231.0 0 | 445.0 0 | 150.7 8 | 170.0 0 | 530.0 0 | 450. 00 | 348.0 0 |
| 17 | टिस्को टेप (Wondar) - कोरस /मॅक्स -४०/ तत्सम (12mm x 45mm)- 200 नग | 6.00 | 7.00 | 20.00 | **5.80** | 14.00 | 7.78 | 8.10 | 9.50 | 30.0 0 | 6.75 |
| 18 | खाकी टेप - (Wandar) - सेलो/ तत्सम- 300 नग | 23.00 | 25.00 | 20.00 | **15.50** | 24.00 | 26.22 | 24.70 | 20.00 | 30.0 0 | 25.00 |
| 19 | प्लॅस्टिक पट्टी- 12" - कॅमलीन/ तत्सम 150 नग | 7.50 | 8.50 | 9.25 | **6.50** | 12.00 | 8.71 | 10.50 | 8.00 | 12.0 0 | 8.50 |
| 20 | पेपर पंचिंग लहान - DP-280 - कांगारु/ तत्सम 100 नग | **47.00** | 50.00 | 52.50 | 49.00 | 62.00 | 48.47 | 65.00 | 53.00 | 72.0 0 | 55.00 |
| 21 | पेपर पंचिंग मेडियम - DP-500 - कांगारु/ तत्सम 10 नग | **82.00** | 90.00 | 95.00 | 93.85 | 118.0 0 | 87.01 | 185.0 0 | 98.00 | 140. 00 | 97.00 |
| 22 | पीन कुशन - बिमल/ तत्सम 50 नग | 28.00 | **18.00** | **18.00** | 18.95 | 26.00 | 22.22 | 35.00 | 35.00 | 40.0 0 | 25.00 |
| 23 | स्पंज बॉक्स (Water) - मंगल/ तत्सम 100 नग | 18.00 | 12.00 | 8.00 | 9.50 | 8.75 | **4.44** | 22.50 | 7.00 | 30.0 0 | 14.00 |
| 24 | कात्री, (Medium Size) - कॅमल/ गोरीला/ म्युझीक/ तत्सम-100 नग | 40.00 | 48.00 | 32.00 | **29.50** | 110.0 0 | 33.33 | 54.00 | 74.00 | 54.0 0 | 54.00 |
| 25 | डस्टर (Medium Size) | 21.55 | 30.00 | 18.00 | **14.00** | 33.00 | 15.73 | 35.00 | **14.00** | 55.0 0 | 27.50 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - ओमेगा /मिलन/ तत्सम 400 नग | | | | | | | | | | |
| 26 | खाकी टेप-नोटा चिटकविणेसाठी कागदी - सेलो/ तत्सम-30 नग | 60.00 | **5.00** | 100.00 | 19.00 | 250.0 0 | 33.33 | 95.00 | 30.00 | 45.0 0 | - |
| 27 | स्टॅम्प पॅड लहान- निळा - 11 cm x 7 cm - कॅमल/ तत्सम-150 नग | 27.00 | 38.00 | 38.00 | **23.00** | 43.00 | 26.67 | 48.00 | 29.00 | 45.0 0 | 39.50 |
| 28 | स्टॅम्प पॅड लहान- लाल - 11 cm x 7 cm - कॅमल/तत्सम 5 नग | 30.00 | 32.00 | 38.00 | **23.00** | 43.00 | 26.67 | 48.00 | 30.00 | 45.0 0 | 39.50 |
| 29 | आखिव कागद - दस्ते - ओसवाल/ जागृती/ तत्सम, Full Size 200 दस्ते | 20.00 | 25.00 | 205.00 | **14.00** | 21.00 | 196.6 7 | 215.0 0 | 168.0 0 | 14.0 0 | 25.00 |
| 30 | स्टॅम्प पॅड - लाल मोठा - 15.7 cm x 9.6cm- 2 नग | 60.00 | 50.00 | 59.00 | 58.75 | 66.00 | **47.20** | 61.00 | 55.00 | 72.0 0 | 70.00 |
| 31 | स्टेटमेंट साईज झेरॉक्स पेपर- ( A/3 ) - जे.के/ रजत/ स्पॅक्ट्रो/ तत्सम, 80 GSM 100 रिम | **305.0 0** | 315.00 | 420.00 | 385.0 0 | 460.0 0 | 336.0 0 | 315.0 0 | 346.0 0 | 499. 00 | 356.0 0 |
| 32 | झेरॉक्स पेपर लिगल- १३ x ०८ ( F/S ) - जे.के/ रजत/ स्पॅक्ट्रो/ तत्सम, 80 GSM 12000 रिम | **179.0 0** | 187.00 | 290.00 | 263.0 0 | 237.0 0 | 199.1 1 | 220.0 0 | 210.0 0 | 299. 00 | 196.0 0 |
| 33 | झेरॉक्स पेपर छोटे- ११ x ०८ ( A/4 ) - जे.के/ रजत/ स्पॅक्ट्रो/ तत्सम, 80 GSM 7200 रिम | **149.9 0** | 152.00 | 210.00 | 245.0 0 | 213.0 0 | 155.5 6 | 160.0 0 | 174.0 0 | 249. 00 | 176.0 0 |
| 34 | रजिस्टर ४ क्वायर - ओसवाल/ जागृती/ तत्सम, Full Size 100 नग | 110.0 0 | 264.00 | 142.00 | 139.0 0 | **86.00** | 115.3 8 | 200.0 0 | 135.0 0 | 171. 00 | 124.0 0 |
| 35 | रजिस्टर ३ क्वायर - ओसवाल/ जागृती/ तत्सम, Full Size 230 नग | 82.00 | 198.00 | 106.50 | 102.0 0 | **65.00** | 86.53 | 150.0 0 | 102.0 0 | 126. 00 | 93.00 |
| 36 | रजिस्टर २ क्वायर - ओसवाल/ जागृती/ तत्सम, Full Size 500 नग | 55.00 | 138.00 | 71.00 | 70.00 | **45.00** | 57.69 | 100.0 0 | 68.00 | 90.0 0 | 62.00 |
| 37 | रजिस्टर १ क्वायर - ओसवाल/ जागृती/ तत्सम, Full Size 500 नग | 28.00 | 71.00 | 35.50 | 34.00 | **26.00** | 28.84 | 60.00 | 34.00 | 45.0 0 | 34.50 |
| 38 | टपाल बुक - स्टॅंडर्ड/ तत्सम, 100 Pages 200 नग | 200.0 0 | 100.00 | 99.00 | **33.95** | 90.00 | 78.67 | 80.00 | 110.0 0 | 250. 00 | - |
| 39 | कॉन्फरन्स पॅड - सुंदरम/ तत्सम, 10 Pages-300 नग | 7.00 | 6.00 | 8.00 | **4.50** | 8.00 | 6.21 | 8.10 | 7.00 | 18.0 0 | 6.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 40 | हजेरी मस्टर महिना दोन क्वायर - ओसवाल/ सनी/ तत्सम- 200 नग | 165.00 | 160.00 | 104.00 | **79.00** | 130.00 | 62.93 | 121.00 | 106.00 | 144.00 | - |
| 41 | साधी स्प्रिंग फाईल - रजत / क्लासिक/ तत्सम- 1100 नग | 10.50 | 14.00 | 12.90 | **8.00** | 15.00 | 10.49 | 12.50 | 20.00 | 18.00 | 20.00 |
| 42 | लेस फाईल - रजत / ज्योती/ तत्सम 10 नग | 20.00 | 175.00 | 30.00 | 45.00 | 26.00 | **10.49** | 18.50 | 20.00 | 27.00 | 18.00 |
| 43 | बॉक्स फाईल - प्राईम/ ज्योति/ मॅक्स/तत्सम 1300 नग | 48.00 | 62.00 | 52.00 | 53.00 | 55.00 | **19.67** | 58.50 | 55.00 | 63.00 | 55.00 |
| 44 | सन दोरा बंडल - व्हिनस/ तत्सम, पेपर पुरवणीसाठी, Net 400 Gram 50 बंडल | 45.00 | 60.00 | 50.00 | 88.90 | 41.00 | 118.00 | 60.00 | **35.00** | 99.00 | 60.00 |
| 45 | टु फ्लॅप पॅड - तत्सम-200 नग | 14.00 | 165.00 | 16.50 | **12.50** | 15.00 | 17.04 | 32.00 | 18.00 | 27.00 | 17.00 |
| 46 | फोर फ्लॅप पॅड – तत्सम- 300 नग | **16.00** | 35.00 | 28.50 | 23.58 | 36.00 | 26.22 | 38.00 | 24.00 | 54.00 | 24.00 |
| 47 | फुल बंद पॅड - तत्सम- 50 नग | **33.00** | 150.00 | 160.00 | 34.50 | 210.00 | 100.00 | 45.00 | 60.00 | 72.00 | 33.00 |
| 48 | सफेद लेस बंडल - सफेद कॉटन - व्हिनस/ तत्सम (20 Inch) (1 Bundle=100 Nos.) 1000 बंडल | **24.00** | 60.00 | 29.99 | 48.00 | 51.00 | 46.67 | 85.00 | 45.00 | 54.00 | 48.00 |
| 49 | लाल टॅग लहान - लाल कॉटन - व्हिनस/ तत्सम (6 Inch) (1 Bundle=100 Nos.)- 50 बंडल | 30.00 | 25.00 | 22.00 | **4.50** | 15.00 | 116.67 | 85.00 | 12.50 | 45.00 | 23.00 |
| 50 | डिंक बाटली लहान - कॅमल/ तत्सम, 300 ML 100 नग | 57.00 | 60.00 | 128.80 | **24.00** | 65.00 | 35.56 | 52.50 | 53.00 | 45.00 | 63.00 |
| 51 | मार्कर पेन - कॅमलीन/ सेलो/लक्सर/तत्सम 300 नग | 12.50 | 15.00 | 14.00 | **12.00** | 18.00 | 14.44 | 15.50 | 13.00 | 22.50 | 13.75 |
| 52 | हायलायटर पेन - कॅमलीन/ लक्सर/ तत्सम- 250 नग | 12.50 | 15.00 | 13.50 | **12.00** | 20.00 | 13.69 | 18.50 | 13.00 | 22.50 | 12.00 |
| 53 | सिडी मार्कर पेन - कॅमलीन / लक्सर / तत्सम- 20 नग | 8.50 | 10.00 | 8.50 | **6.50** | 10.00 | 7.78 | 12.50 | 8.00 | 11.70 | 7.50 |
| 54 | व्हाईटनर पेन - कॅमलीन/ तत्सम 500 नग | 14.85 | 18.00 | 16.50 | **14.00** | 23.00 | 18.67 | 24.20 | 17.50 | 33.30 | 17.50 |
| 55 | स्टॅप्लर पीन मोठी २३/१७ - कांगारु/ कॅमलीन/ तत्सम 50 पॅकेट | **32.50** | 38.00 | 38.64 | 36.00 | 41.00 | 33.28 | 44.00 | 36.00 | 48.60 | 36.75 |
| 56 | प्लास्टिक ट्रे - प्लॅस्टो/ मिलन/ जोयो, (Size 5"x12"x27") 50 नग | 450.00 | **75.00** | 155.00 | 95.00 | 415.00 | 295.00 | 225.00 | 125.00 | 369.00 | - |
| 57 | रबर बॅण्ड - नायलॉन, दिड इंची - लिरा/तत्सम (1 पॅकेट = 1 Kg) 250 पॅकेट | 325.00 | 425.00 | 233.00 | 395.00 | 380.00 | **186.67** | 480.00 | 226.00 | 630.00 | 370.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 58 | रबर बॅण्ड - नायलॉन, चार इंची लिरा/ तत्सम (1 पॅकेट = 1 Kg) 70 पॅकेट | 325.00 | 425.00 | 233.00 | 395.00 | 380.00 | **186.67** | 490.00 | 226.00 | 630.00 | 370.00 |
| 59 | फाईल फ्लॅग - म्युझीक५५५/ तत्सम (Size 25mm x 76mm x 150mm) (1" x 3") -100 नग | 20.00 | 16.00 | **13.00** | 17.00 | 20.00 | 26.22 | 25.00 | 14.00 | 36.00 | 19.00 |
| 60 | कलर खडु - ही चॉक / कोरस / तत्सम-800 बॉक्स | 45.00 | 65.00 | 62.00 | 48.65 | 60.00 | 52.44 | 65.00 | **35.00** | 54.00 | 35.00 |
| 61 | पेन्सिल सेल - AA निप्पो/डयुरो/ एव्हरेडी / तत्सम 400 नग | 7.00 | 12.00 | 11.25 | **5.00** | 9.00 | 11.11 | 16.00 | 7.00 | 15.00 | 12.50 |
| 62 | पांढरे खडु - ही चॉक/ कोरस/ तत्सम- 1500 बॉक्स | 31.00 | 50.00 | 42.00 | 33.50 | 42.00 | 55.07 | 56.00 | **26.00** | 45.00 | 54.00 |
| 63 | लेजर पेपर हिरवा ११ x ८ (A/4) जे.के/ रजत/ स्पॅक्ट्रो बिल्ट/तत्सम 70 gsm- 70 रिम | **220.00** | 230.00 | 280.00 | 230.00 | 240.00 | 255.56 | 279.00 | 290.00 | 351.00 | 240.00 |
| 64 | लेजर पेपर हिरवा १३ x ८ ( F/S ) - जे.के/ रजत / स्पॅक्ट्रो/ बिल्ट/ तत्सम 70 gsm 70 रिम | **250.00** | 260.00 | 290.00 | 257.45 | 252.00 | 280.00 | 375.00 | 290.00 | 423.00 | 280.00 |
| 65 | लेजर पेपर हिरवा स्टेटमेंट ( A/3 ) - जे.के/ रजत / स्पॅक्ट्रो/ बिल्ट/ तत्सम 70 gsm 10 रिम | 550.00 | **370.00** | 875.00 | 387.15 | 555.00 | 672.00 | 636.00 | 600.00 | 999.00 | 500.00 |
| 66 | स्टेप्लर पीन - २३/१० - कांगारु/ तत्सम- 240 पॅकेट | 25.00 | 30.00 | 29.50 | **24.50** | 36.00 | 25.37 | 34.50 | 27.50 | 36.00 | 29.00 |
| 67 | स्टेप्लर पीन - २३/१२ - कांगारु/ तत्सम- 240 पॅकेट | **27.00** | 32.00 | 31.38 | 29.00 | 38.00 | 27.02 | 38.50 | 29.50 | 38.70 | 30.00 |
| 68 | स्टेप्लर पीन - २३/१५ - कांगारु/ तत्सम- 240 पॅकेट | **29.00** | 35.00 | 34.50 | 33.85 | 40.00 | 29.71 | 49.50 | 32.00 | 45.00 | 35.00 |
| 69 | स्टॅम्प पॅड मोठा निळा - 15.7 cm x 9.6 cm कॅमलीन/ तत्सम- 40 नग | 56.00 | 56.00 | 59.00 | 55.00 | 65.00 | 62.23 | 84.00 | **54.00** | 72.00 | 65.00 |
| 70 | इंक बॉटल - निळी - 25 ml - कॅमल/ तत्सम- 300 नग | 18.00 | 25.00 | 19.50 | **14.00** | 20.00 | 17.78 | 21.50 | 17.50 | 22.50 | 18.50 |
| 71 | लाकडी टोचा - त्रिशुल/ तत्सम 30 नग | **12.00** | **12.00** | 23.00 | 20.00 | 15.00 | 15.73 | 12.50 | 18.00 | 18.00 | 18.00 |
| 72 | लेबल स्टिकर 100 mm x 35 mm, (16 Stickers = 1 Sheet) White Continuous नवजित/ तत्सम 40000 शीट | 4.00 | 6.00 | 2.45 | **2.00** | 2.50 | 2.49 | 4.30 | 2.80 | 3.33 | 2.65 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 73 | व्हॉउचर पेस्टींग फाईल- (आतील बाजुने ८० सीट पेस्टिंगसाठी) रजत/ ज्योती/ तत्सम- 200 नग | 80.00 | 250.00 | 52.00 | **24.00** | 63.00 | 68.44 | 73.00 | 65.00 | 63.00 | 38.00 |
| 74 | पॅड शाई बॉटल लाल - 25 ml - कॅमल/ तत्सम 5 नग | 19.00 | 20.00 | 19.50 | **14.65** | 22.00 | 18.89 | 25.60 | 20.00 | 22.50 | 18.00 |
| 75 | नंबरींग मशिन - BOM 45-6 बंबालिओ/ तत्सम 3 नग | 480.00 | 825.00 | 550.00 | 900.00 | 600.00 | 590.00 | 650.00 | **442.00** | 999.00 | 460.00 |
| 76 | पेपर वेट - Glass मोडा/ तत्सम 10 नग | 80.00 | 25.00 | 26.00 | 25.00 | 30.00 | 26.22 | **20.00** | 25.00 | 36.00 | 30.00 |
| 77 | आलेख कागद मोठे - A4 Size जागृती/ तत्सम 1000 नग | **0.60** | 2.00 | 0.75 | 0.70 | 0.65 | 52.44 | 2.25 | 0.75 | 0.99 | 0.80 |

ब) संगणक स्टेशनरी –

| Tender Sr.No. | Description of Work / Item(s) | Shrinath General Stores | CLASSIC STATIONERS, CO. | kabir enterprises | DEVISH ENTERPRISES | Bahuchar Traders | Saisons technocom Private limited | SHRI SHIVSHAKTI ENGG. | BAJAJ GENERALS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पेन ड्राईव्ह ३२ जी. बी. - सोनी/ सॅमसंग/ ट्रान्ससेड -50 नग | 695 | 770 | 1,010 | 808 | 802 | 666.66 | 1,299 | 695.00 |
| 2 | ब्लॅंक सीडी विथ केस - सोनी/ मोझर बिअर/ तत्सम - 300 नग | 30 | 36.50 | 11.50 | - | - | 24.01 | 68 | 15.25 |
| 3 | ब्लॅंक डी.व्ही.डी.आर विथ केस - सोनी/ मोझर बिअर/ तत्सम 150 नग | 36 | 42.40 | 20 | - | - | 28.24 | 72 | 23.00 |
| 4 | टोनर एच पी Q२६१२A - एच .पी.ओरिजनल/ तत्सम- 70 नग | 3,395 | 4,150 | 5,875 | 2,123 | 702 | 4,261.11 | 2,150 | 738.00 |
| 5 | रिको मेक झेरॉक्स मशिन टोनर-१२३० D – रिको- 10 नग | 2,800 | 2,684.40 | 3,250 | 1,179 | 707 | 1,966.67 | 4,700 | 680.00 |
| 6 | प्रिंट काट्रेज मॉ.नं.५०५४ Edp Code ८४२००१ – रिको- 10 नग | 6,500 | 8,743.80 | 35,790 | 10,030 | 9,204 | 5,637.78 | 3,520 | - |
| 7 | डेव्हलोपर मॉ.नं.५०५४ Edp Code -Di-११७९६४० – रिको 2 नग | 7,350 | 8,044 | 5,130 | - | - | 5,513.22 | 29,990.00 | - |
| 8 | ड्रम मॉ.नं.५०४०Edp Code - Di -९७९५१०- रिको 2 नग | 9,030 | 10,431.20 | 59,400 | - | - | 7,346.16 | 799.00 | - |
| 9 | SMPS - i-ball / इंटेक्स/ तत्सम- 20 नग | 2,000 | 867 | 690 | 1,174 | 1,168 | 675.22 | 1,279.00 | 650.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | युएसबी किबोर्ड - लॉजिटेक/ डेल/ तत्सम- 50 नग | 545 | 495 | 555 | 561 | 555 | 533.33 | 698.00 | 440.00 |
| 11 | सिमॉस बॅटरी - सोनी/ बलराम/ तत्सम- 20 नग | 30 | 35 | 18 | 24 | 21 | 65.56 | 32.00 | 12.00 |
| 12 | पी.सी.आर रोलर १२A टोनर करिता - तत्सम- 50 नग | 195 | 65 | 97 | 218 | 212 | 35.40 | 152.00 | 72.00 |
| 13 | टुल किट - टपारिया/ तत्सम- 2 नग | 595 | 1,950 | 1,250 | - | - | 1,511.97 | 4,390.00 | - |
| 14 | नेट प्रोटेक्टर ॲन्टी व्हायरस पॅक - एन पी 60 पॅकेट | 480 | 599 | 497 | 589 | 584 | 544.11 | 1,299.00 | 510.00 |
| 15 | ड्रम रिको MP२५०१L – रिको 10 नग | 4,105 | 5,292.30 | 8,783 | - | - | 3,966.11 | 23,620.0 0 | 850.00 |
| 16 | डेव्हलोपर – रिको 10 नग | 3,933 | 4,295.20 | 5,760 | - | - | 3,769.44 | 5,360.00 | - |
| 17 | रिको टोनर MP २५०१S – रिको 45 नग | 3,255 | 2,752.20 | 6,395 | 1,415 | 974 | 1,966.67 | 2,179.00 | 780.00 |
| 18 | एच.पी लेजरजेट टोनर - ८८ A - एच .पी. ओरिजनल/ तत्सम – 40 नग | 3,385 | 3,590 | 3,050 | 2,005 | 702 | 4,195.56 | 5,346.00 | 710.00 |
| 19 | माउस युएसबी - लॉजिटेक/ डेल/ तत्सम- 50 नग | 260 | 245 | 317 | 266 | 260 | 177.79 | 790.00 | 280.00 |
| 20 | एच.पी लेजरजेट टोनर - ३६ A - एच .पी. ओरिजनल/ तत्सम- 25 नग | 3,895 | 4,770 | 3,540 | 2,123 | 702 | 4,982.22 | 12,512.0 0 | 710.00 |
| 21 | ड्रम फॉर Q २६१२ A टोनर करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 100 नग | 390 | 99 | 75 | 266 | 236 | 52.44 | 390.00 | 110.00 |
| 22 | टोनर पावडर Q २६१२ A टोनर करिता -१४० ग्रॅम पॅक - टोनर/ तत्सम 160 पॅकेट | 260 | 110 | 175 | 502 | 472 | 89.16 | 470.00 | 110.00 |
| 23 | वायफर ब्लेड २६१२ A करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 195 | 65 | 72 | 147 | 118 | 23.60 | 178.00 | 112.00 |
| 24 | डॉक्टर ब्लेड Q२६१२ A करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 195 | 65 | 75 | 147 | 118 | 22.29 | 278.00 | 112.00 |
| 25 | टोनर पॉवडर ३६ Aकरिता ८० ग्रॅम पॅक - टोनर/ तत्सम 80 पॅकेट | 200 | 85 | 90 | 384 | 354 | 78.67 | 448.00 | 97.00 |
| 26 | ड्रम ३६/ ८८ A टोनर करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 260 | 110 | 95 | 384 | 354 | 55.07 | 413.00 | 110.00 |
| 27 | पी .सी. आर. रोलर ३६ A करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 260 | 75 | 72 | 218 | 212 | 39.33 | 212.00 | 95.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28 | वायफर ब्लेड Q३६ A करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 260 | 58 | 75 | 183 | 177 | 26.22 | 2,616.00 | 95.00 |
| 29 | डॉक्टर ब्लेड ३६ A करिता - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 50 नग | 260 | 58 | 75 | 183 | 177 | 23.60 | 277.00 | 98.00 |
| 30 | टेफलॉन फॉर HP १०२० लेजरजेट - आय.एस.आय. मार्क/ तत्सम- 10 नग | 390 | 175 | 243 | 973 | 944 | 78.67 | 583.00 | 450.00 |
| 31 | टेफलॉन फॉर HP १००७ लेजरजेट - आय.एस.आय. मार्क/ तत्सम 10 नग | 640 | 175 | 284 | 973 | 944 | 78.67 | 683.00 | 430.00 |
| 32 | रिबन केक फॉर इप्सॉन LQ ३१० - पायोनियर/ तत्सम 300 नग | 235 | 22 | 35 | - | - | 13.11 | 720.00 | 33.00 |
| 33 | रिबन काट्रेज फॉर इप्सॉन LQ ३१० - इप्सॉन/ तत्सम 200 नग | 235 | 135 | 180 | - | - | 209.78 | 1,224.00 | 102.00 |
| 34 | १२ व्होल्ट बॅटरी ७ AH बॅटरी - एक्साईड/ तत्सम 50 नग | 1,200 | 25 | 1,687 | - | - | 824.89 | 2,944.00 | 850.00 |
| 35 | वायरलेस कि-बोर्ड माउस - लॉजिटेक/ डेल / तत्सम - 2 नग | 1,365 | 1,275 | 1,300 | 1,528 | 1,522 | 1,166.67 | 7,358.00 | 1,200.00 |
| 36 | हार्ड डिस्क २ टीबी सी - सीगेट/ सोनी/ तत्सम- 5 नग | 6,400 | 5,849 | 5,577 | 6,283 | 6,254 | 5,572.22 | 18,726.0 0 | 5,100.00 |
| 37 | स्प्रे WD-40 - डब्ल्यु डी- 25 नग | 260 | 399 | 235 | - | - | 150.78 | 295.00 | 95.00 |
| 38 | Ofc Splicing Waterproof Ecnloser 24 Core 2 Way in /2 Way Out - आय.एस. आय. मार्क / तत्सम 5 नग | 15,00 0 | 2,375 | 6,790 | - | - | 1,311.11 | 21,440.0 0 | - |
| 39 | Ofc Splicing Waterproof Ecnloser 48 Core 2 Way in /2 Way Out - आय.एस. आय. मार्क / तत्सम 5 नग | 15,00 0 | 3,575 | 6,790 | - | - | 1,704.44 | 27,160.0 0 | - |
| 40 | Ofc Splicing Waterproof Ecnloser 6 Core 1 Way in /1 Way Out - आय.एस. आय. मार्क / तत्सम 5 नग | 15,00 0 | 975 | 6,790 | - | - | 786.67 | 12,579.0 0 | - |
| 41 | Ofc Splicing Waterproof Ecnloser 12 Core 2 Way in /2 Way Out - आय.एस. आय. मार्क / तत्सम 5 नग | 15,00 0 | 1,499 | 6,900 | - | - | 1,048.89 | 13,900.0 0 | - |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 42 | Web camera plug and play USB 30 Mp or above लॉजिटेक/ इंटेक्स/ तत्सम- 20 नग | 1,045 | 999 | 1,190 | - | - | 988.89 | 2,120.00 | - |
| 43 | ड्रम ब्लॅक- D- १९७९५१० – रिको 3 नग | 9,030 | 10,431.20 | 180 | - | - | 7,346.16 | 2,020.00 | - |
| 44 | डेव्हलोपर ब्लॅक - D- १९७९६४० – रिको- 3 नग | 7,350 | 7,746.70 | 5,952 | - | - | 5,709.89 | 31,440.00 | - |
| 45 | प्रिंट काट्रेज MP-३५५४ S Edp Code - ८४२१६६/ ८४१९९५ – रिको 10 नग | 5,500 | 7,363.50 | 3,781 | 7,700 | 7,670 | 5,586.64 | 26,323.00 | 3,800.00 |

तरी उपरोक्त "अ" व "ब" Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागाकरीता कार्यालयीन व संगणक स्टेशनरी सहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असे साहित्य खरेदी करणेकामी संबंधीतांना विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०८ **विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाकरीता वार्षिक साहित्य खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाकरीता वार्षिक साहित्य खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०४.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.२२५ अन्वये रक्कम रु.१,९२,३९,२०५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाकरीता एकूण खरेदी करावयाचे ४८५ Items पैकी २६७ Items ची खरेदी टप्प्याटप्प्याने झालेली आहे. ७५ Items खरेदी न करण्याचे ठरले आहे. तर उर्वरीत १४३ Items साठी पाचव्यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. यामध्ये खालीलप्रमाणे पाच ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मे.मनिषा एंटरप्रायझेस, बीड
२. मे. एक्सल ट्रेडींग, कंपनी, मुंबई
३. मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक
४. मे.इर्मजन्सी इले.सिक्युरिटी इंडिया.प्रा.लि., मुंबई
५. मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगाव

सदर ५ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१२.०३.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये पाचही निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ५ निविदाधारकांचे ई-निविदेचे Commercial Bid दिनांक १९.०३.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

सदर ऑनलाईन प्राप्त न्युनतम दरधारकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work / Item(s) | Manisha Enterprises | EXCEL TRADING COMPANY | Asian Sales Corporation | Emergency Electronic Security India Pvt Ltd | JADHAV ELECTRICALS |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | SINGLE PHASE ENERGY METER, Size-230 VOLT,5-20AMP,Company- L&T,Type-EM-101 B – 50 NOS. | **690.00** | 1170.00 | 1105.00 | 1055.52 | 950.00 |
| 2.00 | SPOTLIGHT BULB, Size - 60 WATT, Company -PHILIPS, Type –SPOTLINE- 100 NOS. | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 3.00 | BATTERY ( DRY ), Size - 12 VOLT, 25 PLATE, Company - SF/ EXIDE, Type - PBX – 1800, HEAVY DUTY- 36 NOS. | 0.00 | 0.00 | **15900.00** | 16035.16 | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4.00 | ELECTRONIC BALLAST,<br>Size -28 W / T-5,Company - EBN, Type - EBN-128 T-5- 150 NOS. | 0.00 | 378.00 | **179.00** | 239.89 | 442.20 |
| 5.00 | BULB,<br>Size - 25 WATT, Company - PHILIPS, Type- B.C.- 50 NOS. | 25.00 | 27.00 | 13.00 | **11.02** | 16.00 |
| 6.00 | THREE PHASE ENERGY METER BASE MOUNTED, Size - 15-100 A EM301B, Company - L&T, Type - WM 301 B C8D10- 12 NOS. | 0.00 | 4842.00 | 4900.00 | 4827.04 | **4380.00** |
| 7.00 | P.V.C. WIRE R-25, Y-25, B-25,BLACK-75,GREEN -50, Size-4 SQ.MM., Company-FINOLEX/POLYCAB,Type-FR 200 BUNDLE | 0.00 | 2700.00 | **2418.00** | 2843.67 | 2823.00 |
| 8.00 | METAL HALIDE LAMP FITTING WITH CHOKE & LAMP, Size - 250 WATT, Company - PHILIPS,Type - MWF 330-SK /250 (SYM)- 50 NOS. | 0.00 | **4500.00** | 5088.00 | 4732.97 | 4867.50 |
| 9.00 | METAL HALIDE LAMP FITTING WITH CHOKE & LAMP, Size - 400 WATT, Company - PHILIPS, Type - MWF 330-SK /400 (SYM)- 50 NOS. | 0.00 | **4500.00** | 5352.00 | 4966.37 | 4997.30 |
| 10.00 | CFL,-<br>Size-50 WATT,Company -PHILIPS/ ORPAT/ANCHOR, Type – TWISTER<br>500 NOS. | 0.00 | 540.00 | 625.00 | 557.58 | **437.00** |
| 11.00 | CFL,<br>Size-70 WATT,Company-PHILIPS/ ORPAT/ANCHOR,Type – TWISTER<br>500 NOS. | **415.00** | 702.00 | 730.00 | 593.89 | 574.00 |
| 12.00 | CHOKE<br>Size - 150 W, Company - WIPRO,<br>Type - WBS/H 56150 150 W HP SV/MHL<br>50 NOS. | 0.00 | 1305.00 | 1218.00 | **1037.36** | 0.00 |
| 13.00 | ELECTRONIC CHOKE,<br>Size - IZ8 1 X 36/ 240W,Company - OSARAM,Type – Fighter<br>600 NOS. | 0.00 | 144.00 | **115.00** | 129.67 | 0.00 |
| 14.00 | DISTRIBUTION BOARD,<br>Size- 4 WAY,3Q RATED, CUREENT-100A, 240/415 V,TPN DOUBLE DOOR DB, Company - SIEMENS ,<br>Type - TPN -DB-4WAY, 8GB 3147-1RC<br>3 NOS. | 0.00 | 6102.00 | 0.00 | **5801.45** | 7224.00 |
| 15.00 | PEDESTAL FAN,<br>Size - 750 MM,Company-CROMPTON,Type-AC750PED – 1<br>50 NOS. | **2850.00** | 9000.00 | 8745.00 | 7851.54 | 0.00 |
| 16.00 | EXHAUST FAN,<br>Size - 15 CM SWEEP, Company - CROMPTON, Type - HEAVY DUTY<br>50 NOS. | 3570.00 | 3600.00 | **1850.00** | 3213.23 | 0.00 |
| 17.00 | FAN REGULATOR,<br>Size - 100 WATT, Company - ANCHOR / PENTA, Type - WHITE / 38660-<br>100 NOS. | 0.00 | 180.00 | 175.00 | **164.68** | 0.00 |
| 18.00 | HRC MAIN SWITCH WITH BOTH CABLE END BOXES,<br>Size- 250 AMP, Company - L & T- 5 NOS. | 0.00 | 15300.00 | 13237.00 | **11998.40** | 16990.00 |
| 19.00 | THREE PHASE ENERGY METER BASE MOUNTED IN SHEET METAL ENCLOSURE WITH C.T.OF 100/5A HAVE TAPPING SYSTEM ON C.T.O,50,100<br>Size - 100AMP, Company - L&T, Type - ER 300 P- 6 NOS. | 0.00 | 4500.00 | **4240.00** | 18478.02 | 0.00 |
| 20.00 | TUBE FITTING WITH TUBE BARS TL-5, Size - 1 X28 W, Company - PHILIPS,Type-TCH 204 WHITE-<br>500 NOS. | 0.00 | 558.00 | 0.00 | **427.91** | 535.00 |
| 21.00 | TUBE BARS TL-5, 28 W,<br>Company - PHILIPS, Type - ESSENTIAL WHITE- 1500 NOS. | 0.00 | **81.00** | 88.00 | 97.25 | 88.30 |
| 22.00 | TUBE BARS TL-5, 14 W,<br>Company - PHILIPS, Type - ESSENTIAL WHITE- 500 NOS. | 0.00 | **81.00** | 87.00 | 95.96 | 84.60 |
| 23.00 | SLEEKER STRIP TYPE DECORATIVE T5 TUBE FITTING,<br>Size - CG SLIMGOLD, Company - CROMPTON GREAVES,<br>Type - 1X28 W T5 T5SG28EB – 48 NOS. | 0.00 | 603.00 | 0.00 | **343.63** | 0.00 |
| 24.00 | ELECTRONIC CHOKE,<br>Size - 1 X TL36 W/40W, Company – PHILIPS, Type - EBE (SLIM) 136<br>30 NOS. | 0.00 | 153.00 | **133.00** | 149.12 | 153.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 25.00 | UPS/INVERTER WITH SF BATTERY, Size-1400VA, Company - SUMAC, Type - HEAVY DUTY- 10 NOS. | 0.00 | 0.00 | 0.00 | **29855.30** | 0.00 |
| 26.00 | BULK HEAD FITTING WITH CHEQUERED GLASS COVER AND MS GRILL,Size-GB 020/6630,Company-GANPATI/K LITE/PHILIPS, Type - MAX 18 W- 2500 NOS. | 0.00 | **162.00** | 235.00 | 225.63 | 0.00 |
| 27.00 | C.F.L, Size -11 WATT,Company - CROMPTON/PHILIPS,Type- PLAIN 2500 NOS. | 110.00 | 108.00 | 92.50 | **90.77** | 134.00 |
| 28.00 | PVC WINDING PAPER, Size - 7 NO,Company-GARWARE,Type - GOOD QUALITY- 2 KG | 0.00 | 0.00 | 270.00 | **175.05** | 0.00 |
| 29.00 | TIN COPPER WIRE RYB, Size - 23X60, Company – DIAMOND 3 BUNDLE | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 30.00 | SUNMICA FOLDING BOARD WITH FULL BRASS HINGES AND 6 MM PLYWOOD, Size - 6" X 8" Company - WHITE SUNMICA,Type -HEAVY QUALITY 25 NOS. | 0.00 | 0.00 | 650.00 | **77.80** | 0.00 |
| 31.00 | SUNMICA FOLDING BOARD WITH FULL BRASS HINGES AND 6 MM PLYWOOD, Size - 8" X 10" , Company - WHITE SUNMICA, Type - HEAVY QUALITY 25 NOS. | 0.00 | 0.00 | 750.00 | **90.77** | 0.00 |
| 32.00 | CONTACTOR, Size - ML-2, Company - L&T, Type - 240 V Coil- 10 NOS. | 0.00 | 4050.00 | 4100.00 | 4188.35 | **3830.00** |
| 33.00 | TONG TESTER/CLAMP METER, Size - 750V A.C./1000V D.C., Company - KUSAM MECO, Type - DT 2250- 6 NOS. | 0.00 | **2340.00** | 2440.00 | 2824.22 | 3050.00 |
| 34.00 | CABLE / 3 CORE FLEXIBLE, Size - 1.5 SQ.MM., Company - POLY CAB/FINOLEX,Type - 3 CORE 16 BUNDLE | 0.00 | 4050.00 | 3922.00 | 3756.55 | **3745.00** |
| 35.00 | IGNITOR, Size -70/150/400W,Company-CROMPTON,Type-IGN 21MH- 50 NOS. | 0.00 | 180.00 | 110.00 | **97.25** | 0.00 |
| 36.00 | D.P.SWITCH WIT KEY RING, Size - 32 A, Company - ROMA, Type – 21770- 500 NOS. | 0.00 | 288.00 | 267.00 | **265.82** | 306.00 |
| 37.00 | KEY RING TAG ONLY, Size - 32 A, Company - ROMA, Type – 20868- 1000 NOS. | 0.00 | 63.00 | 53.70 | **51.87** | 62.00 |
| 38.00 | MULTY SOCKET, Size -20 A, Company - ROMA, Type - 30828- 800 NOS. | 0.00 | 126.00 | 125.00 | **115.41** | 142.00 |
| 39.00 | METAL HALIDE LAMP, Size - 150W MHL (E), Company - WIPRO,Type - LAMP CAP-E 27- 200 NOS. | 0.00 | 801.00 | 851.00 | **713.19** | 0.00 |
| 40.00 | ELECTRONIC IGNITOR, Size-70 TO 400 W,Company-PHILIPS, Type-WEH 2400 – 400 NOS. | 0.00 | 0.00 | 193.00 | **168.57** | 0.00 |
| 41.00 | CFL (CAP ES-40), Size - 85 W, Company -BAJAJ, Type - ECOLUX- 300 NOS. | **520.00** | 1044.00 | 0.00 | 726.15 | 0.00 |
| 42.00 | BALLAST FOR P.L TUBE, Size - 11 W, Company - PHILIPS, Type - CS 993- 500 NOS. | 0.00 | 135.00 | **118.00** | 136.15 | 0.00 |
| 43.00 | CFL TUBE, Size - 35 W, Company - CROMPTON, Type - 4 U- 600 NOS. | **45.00** | 270.00 | 255.00 | 101.14 | 0.00 |
| 44.00 | CFL TUBE, Size - 9 W, Company - CROMPTON, Type - 2 U- 100 NOS. | 0.00 | 108.00 | **92.00** | 98.55 | 0.00 |
| 45.00 | MCCB- 4 POLE Size-100A, Company - L&T /SCHNEIDER,Type -DH-100/IS 13947-2 10 NOS. | 0.00 | 6840.00 | 6383.00 | 6624.86 | **6010.00** |
| 46.00 | RCCB, Size-10 A/300 MA,Company-LEGRAND,Type-602133- 50 NOS. | 0.00 | 3006.00 | 29700.00 | **2874.79** | 0.00 |
| 47.00 | RCCB, Size-32 A/100 MA,Company-LEGRAND,Type-603305- 30 NOS. | 0.00 | 1260.00 | 28760.00 | **1198.15** | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 48.00 | MCCB- 4 POLE, 63 KA<br>Size-250 A/TPN,Company-SIEMENS,Type-3 VT – 4 NOS. | 0.00 | 19080.00 | 26500.00 | **16762.48** | 21715.00 |
| 49.00 | MCCB- 4 POLE, 63 KA<br>Size -400 A/TPN, Company - SIEMENS, Type -3 VT – 3 NOS. | 0.00 | 26001.00 | 34500.00 | **23644.09** | 28600.00 |
| 50.00 | MCCB- 4 POLE, 63KA<br>Size - 630 A, Company - SIEMENS, Type - 3 VT – 4 NOS. | 0.00 | 30060.00 | 39500.00 | **26361.98** | 31600.00 |
| 51.00 | MCCB- 4 POLE, 63KA<br>Size - 100 A, Company - SIEMENS,Type - 3 VT – 5 NOS. | 0.00 | 13005.00 | 17250.00 | 10153.19 | **8690.00** |
| 52.00 | 8 GB SIEMENS BOARD,<br>Size - 20 A, Company - SIEMENS, Type - 8 GB 0501RC – 50 NOS. | 0.00 | 900.00 | 934.00 | 833.78 | **820.00** |
| 53.00 | CHOKE,<br>Size-40W,Company-CROMPTON,Type-POLYSTER – 120 NOS. | 0.00 | 144.00 | **113.00** | 114.11 | 0.00 |
| 54.00 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX,<br>Size-6 WAY,Company-ANCHOR/ROMA, Type – WHITE – 100 NOS. | 0.00 | 126.00 | 115.00 | **112.81** | 0.00 |
| 55.00 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX,<br>Size-8 WAY,Company-ANCHOR/ROMA,Type-WHITE<br>100 NOS. | 0.00 | 162.00 | 151.00 | **146.53** | 0.00 |
| 56.00 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX,<br>size-12 WAY,Company-ANCHOR/ROMA,Type-WHITE- 75 NOS. | 0.00 | 207.00 | 194.00 | **186.73** | 0.00 |
| 57.00 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX,<br>Size-18 WAY,Company - ANCHOR/ROMA, Type - WHITE | 0.00 | 261.00 | **230.00** | 242.48 | 0.00 |
| 58.00 | HEXA BLADE,<br>Size - 12"X1/2",Company - MIRANDA,Type - HIGH SPEED-<br>100 NOS. | **36.00** | 45.00 | 45.00 | 44.09 | 0.00 |
| 59.00 | FAN SPEED CONTROLLER,<br>Size - 450 W, Company - ANCHOR/ROMA,Type - SWITCH TYPE<br>100 NOS. | 0.00 | 252.00 | 175.00 | **171.16** | 0.00 |
| 60.00 | EXAUST FAN- HEAVY DUTY<br>Size - 12", Company - CROMPTON GREVES – 50 NOS. | 0.00 | 3006.00 | **1650.00** | 2650.46 | 0.00 |
| 61.00 | SIEMENS D.B.BOX,<br>Size - 6 WAY, Company - SIEMENS,Type - 8 GB 32102R C06 – 25 NOS. | 0.00 | 1260.00 | 1650.00 | 1180.00 | **1160.00** |
| 62.00 | CEILING FAN,<br>Size - 1200 MM, Company - CROMPTON,<br>Type - WHITE HIGH SPEED- 120 NOS. | **1100.00** | 2250.00 | 1425.00 | 1636.44 | 0.00 |
| 63.00 | CONTACTOR,<br>Size - 3 TF - 34 00 - 0W, Company – SIEMENS – 5 NOS. | 0.00 | 2070.00 | 2150.00 | **1990.44** | 0.00 |
| 64.00 | WALL FAN,<br>Size - 450MM, Company - ALMONARD / CROMTON,Type - GOOD QULITY<br>10 NOS. | **2850.00** | 5805.00 | 5650.00 | 5071.41 | 0.00 |
| 65.00 | WALL FAN,<br>Size - 650MM, Company - ALMONARD / CROMTON,Type - GOOD QULITY<br>10 NOS. | 0.00 | 7380.00 | 7100.00 | **6396.64** | 0.00 |
| 66.00 | FLAYBAN TUBE BAR,<br>Size - 20 W, Company - CROMPTON / PHILIPS,Type - GOOD QULITY-<br>100 NOS. | 0.00 | **45.00** | 138.00 | 233.41 | 0.00 |
| 67.00 | LED FLOOD LIGHT,<br>Size - 40 W, Company -KARVIN<br>2 NOS. | 0.00 | 3600.00 | 2453.00 | **1550.77** | 0.00 |
| 68.00 | LED FLOOD LIGHT,<br>Size - 80 W, Company -KARVIN<br>5 NOS. | 0.00 | 5400.00 | 3600.00 | **3101.54** | 0.00 |
| 69.00 | C.F.L. LAMP,<br>Size-18/20WATT,Company - ORPAT,Type – STRAIGHT<br>500 NOS. | 0.00 | 171.00 | **127.00** | 147.82 | 0.00 |
| 70.00 | AVR,<br>Size - OUT PUT 6A DC 95V DC IN PUT 415 V AC POWER 240 V, Company - SANLAC, Type - 95 SP 6 – 8 NOS. | 0.00 | 0.00 | 11198.00 | **9725.27** | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 71.00 | ALLEN KEY,<br>Size - SET, Company - GOOD QUALITY, Type - ' T ' - 2 SET | 0.00 | 720.00 | 590.00 | **587.41** | 0.00 |
| 72.00 | BOX SPANNER SET,<br>Size- SET (8" TO 32") Company- TAPARIYA, Design 185529 , Type-BOX<br>2 SET | 0.00 | 4050.00 | 3672.00 | **3319.56** | 0.00 |
| 73.00 | HAMMER DRILL BIT,<br>Size - SET (ALL SIZE), Company - STANDARD,Type - PIN TYPE- 3 SET | 0.00 | 0.00 | **3100.00** | 3121.16 | 0.00 |
| 74.00 | HAMMERING DRILL MACHINE,<br>Size - 26 MM DRILL, Company - HORSE POWER,Type -HAMMER – 1 NOS. | 0.00 | 10800.00 | **4400.00** | 8947.25 | 0.00 |
| 75.00 | CLAMP METER,<br>Size - MASTEK, Company - ORPAT/GOOD QUALITY,Type - CLAMP<br>4 NOS. | **1200.00** | 1305.00 | 2250.00 | 2824.22 | 3050.00 |
| 76.00 | COIL SENSOR FOR A/C P.C.B.,<br>Company - GOOD QUALITY- 50 NOS. | 225.00 | 0.00 | 450.00 | **97.25** | 0.00 |
| 77.00 | AIR SENSOR FOR A/C P.C.B.,<br>Company - GOOD QUALITY- 50 NOS. | 225.00 | 0.00 | 850.00 | **103.74** | 0.00 |
| 78.00 | PLIER SET,<br>Size - ALL TYPE, Company – TAPARIA<br>4 SET | 0.00 | 720.00 | 1500.00 | **491.45** | 0.00 |
| 79.00 | P.C.B.CAPACITOR,<br>Size - 1, 1.5, 2, 2.5 MFD, Company - GOOD QUALITY,Type – RUNNING<br>25 NOS. (Each 5) | 115.00 | 135.00 | **70.00** | 176.35 | 0.00 |
| 80.00 | MANIFOLD GAUGE,<br>Size -0 TO 500 PSIG & 30 TO 150 PSIG, Company - BEST QUALITY, Type – DUIL- 4 NOS. | 1200.00 | 0.00 | 4050.00 | **1167.03** | 0.00 |
| 81.00 | REFRIGERATION GAS CHARGING HOSE PIPE,<br>Size -1/4' X 1/4'-2500 PSIG,Company - HEAVY DUTY – 25 NOS. | **225.00** | 0.00 | 490.00 | 389.01 | 0.00 |
| 82.00 | COPPER PIPE WITH INSULATION,<br>Size - 5/8", Company - STANDARD,<br>200 MTR. | 340.00 | 261.00 | **210.00** | 453.85 | 0.00 |
| 83.00 | COPPER PIPE WITH INSULATION,<br>Size - 1/2", Company - STANDARD,<br>200 MTR | 300.00 | 216.00 | **180.00** | 363.08 | 0.00 |
| 84.00 | BREAZING FLUX,<br>Size - POWDER, Company - STANDARD,Type - COPPER BREZING<br>10 NOS. | **50.00** | 0.00 | 762.00 | 51.87 | 0.00 |
| 85.00 | SPLIT A.C. COD.FAN MOTOR,<br>Size - 2 TON UNIT, Company - VOLTAS / BLUESTAR, Type - SINGLE SPEED<br>30 NOS. | **2400.00** | 0.00 | 5500.00 | 3047.25 | 0.00 |
| 86.00 | REMOTE CONTORL SPLIT A.C.,<br>Company - VOLTAS / BLUE STAR, Type - SPRING – 100 SET | 1200.00 | 0.00 | 1900.00 | **1102.20** | 0.00 |
| 87.00 | SPLIT A.C. COD.FAN,<br>Size - ALL SIZE, Company - VOLTAS / BLUE STAR, Type – EXHAUST<br>25 NOS. | **570.00** | 0.00 | 6500.00 | 1231.87 | 0.00 |
| 88.00 | 3 PHASE CONTACTOR WITH RELAY,<br>Size - RELAY RANGE 4-63 A, Company - SIEMENS, Type - 3 TF 43, 3 TF-42 | 0.00 | 4050.00 | **3218.00** | 16435.71 | 0.00 |
| 89.00 | 3 PHASE CONTACTOR WITH RELAY,<br>Size - RELAY RANGE 8-12.5 A,<br>Company - SIEMENS,<br>Type - 3 TF 43, 3 TF-42<br>5 NOS. (Each 10) | 0.00 | 4050.00 | **3500.00** | 16435.71 | 0.00 |
| 90.00 | 3 PHASE CONTACTOR WITH RELAY,<br>Size - RELAY RANGE63 - 10A, Company - SIEMENS, Type - 3 TF 43, 3 TF-42<br>5 NOS. (Each 10) | 0.00 | 4050.00 | **3600.00** | 16435.71 | 0.00 |
| 91.00 | 3 PHASE CONTACTOR WITH RELAY,<br>Size - RELAY RANGE 10-14.5A,<br>Company - SIEMENS,<br>Type - 3 TF 43, 3 TF-42<br>5 NOS. (Each 10) | 4400.00 | 4500.00 | **3600.00** | 17505.49 | 0.00 |
| 92.00 | DIGITAL THERMOSTAT SUBZIRO,<br>Size - SINGLE COMP., Company - STANDARD,Type - SUB ZERO<br>5 NOS. | 1200.00 | 1350.00 | 1450.00 | **1017.91** | 0.00 |
| 93.00 | DIGITAL THERMOSTAT SUBZIRO,<br>Size - DUBLE COMP., Company - STANDARD,Type - SUB ZERO<br>5 NOS. (Each 10) | **1300.00** | 1890.00 | 1450.00 | 1880.22 | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 94.00 | SINGLE PHASE CONTACTOR, Company - STANDARD, Type - DOUBLE POLE – 25 5 NOS. | 440.00 | **405.00** | 0.00 | 3000.57 | 0.00 |
| 95.00 | MAINFOLD GAUGE (N2 EO2), Size - 2 IN ONE, Company - STANDARD,Type – PRESSURE 4 NOS. | 1500.00 | 0.00 | 4800.00 | **648.35** | 0.00 |
| 96.00 | AHU BLOWER MOTER, Size -1400 RPM, 3 PHASE, Company - STANDARD, Type -INDUCTION - 2 NOS. | **3100.00** | 0.00 | 46000.00 | 0.00 | 0.00 |
| 97.00 | WATER COOLER COMPRESSOR WITH RELAY & O.L.P., Size - KCJ-344, Company -EMERSON, Type - REC. 10 NOS. | **9000.00** | 0.00 | 15500.00 | 9725.27 | 0.00 |
| 98.00 | WATER COOLER FAN MOTOR WITH BLADE, Size-UNIT WISE,Company - VOLTAS,Type – EXHAUST- 10 NOS. | 1850.00 | 0.00 | 4200.00 | **1556.04** | 0.00 |
| 99.00 | REFRIGERATOR COMPRESSOR WITH RELAY & O.L.P., Size - 1/6 & 1/8 HP, Company - GODREJ,Type – RECIPROCATING 2 NOS. | **3000.00** | 0.00 | 12500.00 | 5575.82 | 0.00 |
| 100.00 | ASSEMBELD REFRIGERATOR COMPRESSOR WITH RELAY & O.L.P., Size- KCJ-423,Company - EMERSON,Type –EXHAUST- 2 NOS. | 14500.00 | 0.00 | 22500.00 | **12967.03** | 0.00 |
| 101.00 | ASSEMBELD REFRIGERATOR FAN MOTOR WITH BLADE, Size-UNIT WISE SINGLE PHASE,Company- STANDARD, Type - EXHAUST- 2 NOS. | **1850.00** | 0.00 | 22500.00 | 8428.57 | 0.00 |
| 102.00 | COMPRESSOR HERMATIC, Size-CR 30 K6 M,Company- EMERSON,Type - REC.- 2 NOS. | 12300.00 | 0.00 | 21500.00 | **11021.98** | 0.00 |
| 103.00 | COLD STORAGE COMPRESSOR, Size - 5 TON (3 PHASE), Company - EMERSON, Type-REC.- 1 NOS. | 0.00 | 0.00 | 48500.00 | **32028.57** | 0.00 |
| 104.00 | REFRIGERANT R-407 C, Size - R-407C, Company – STANDARD- 100 KG | 750.00 | 0.00 | 960.00 | **583.52** | 0.00 |
| 105.00 | THERMOSTATIC EXPANSION VALUE, Size -5 TON, Company - STANDARD,Type - THARMOSTATIC 5 NOS. | 0.00 | 0.00 | 5200.00 | **3241.76** | 0.00 |
| 106.00 | REFRIGERATOR EVAP.MOTOR, Size - MINI WISE SINGLE PHASE, Company - STANDARD, Type – EXHAUST – 5 NOS. | **550.00** | 0.00 | 2900.00 | 0.00 | 0.00 |
| 107.00 | M.S.SQUARE PIPE, Size-35 X 35 X 5 MM,Company- TATA/JINDAL/ZENITH,Type – GOOD 1000 FT | 0.00 | 135.00 | 418.00 | **51.35** | 0.00 |
| 108.00 | SQUARE RECTANGLE PIPE, Size-50 X 25 X 2 MM,Company- TATA/JINDAL/ZENITH, Type - I.S.I 1000 FT | 0.00 | 50.40 | 43.00 | **41.03** | 0.00 |
| 109.00 | M.S.FLAT, Size-25 X 5 MM, Company - TATA/JINDAL/ZENITH, Type - I.S.I 500 KGS | 0.00 | 54.00 | 53.00 | **51.61** | 0.00 |
| 110.00 | RED OXIDE, Size -4 LTR-PACK,Company- ASIAN/UTSAV,Type - I.S.I 40 LITRE | 0.00 | 185.00 | **169.00** | 173.76 | 0.00 |
| 111.00 | WELDING CABLE, Size-800 CON, Company-ARCAM/ESAB, Type - I.S.I.- 30 MTR. | 0.00 | 975.00 | 960.00 | **178.95** | 0.00 |
| 112.00 | THINNER, Size-4 LTR - PACK,Company - ASIAN / NEROLACK. Type - I.S.I -100 LTR. | 0.00 | 135.00 | 192.00 | **123.19** | 0.00 |
| 113.00 | G.I. WIRE, Size-16 SWG,Company-HEAVY DUTY,Type-G.I.16 SWG – 100 KG | 0.00 | 0.00 | 106.00 | **94.66** | 0.00 |
| 114.00 | GRINDER WHEEL, Size -100X16X6 MM, Company - KPT/NKK/TAILINS,Type - I.S.I -200 NOS. | 58.00 | **36.00** | 38.50 | 36.31 | 0.00 |
| 115.00 | M.S.DRILL BIT ( HIGH SPEED ), Size - 2,3,4,5,6,7,8,9,10, 11, & 12 MM, Company - JHALANI, Type - HEAVY DUTY- 10 SET | 0.00 | 0.00 | 1260.00 | **1073.67** | 0.00 |
| 116.00 | GAS CUTTING NOZZLE, Size-Mar-64, Company-ESAB, Type - BRASS/HEAVY DUTY- 10 NOS. | 0.00 | 675.00 | 685.00 | **657.43** | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 117.00 | M.S. SQUARE PIPE,<br>Size-40 X 40 X 3MM,Company-TATA/JINDAL/ZENITH,<br>Type - MILDSTEEL I.S.I. – 500 FT | 0.00 | 72.00 | 72.00 | **66.65** | 0.00 |
| 118.00 | M.S. SQUARE BAR,<br>Size - 10 MM, Company - TATA / JINDAL/ ZENITH, Type - I.S.I. – 200 KG | 0.00 | 54.00 | 56.00 | **51.61** | 0.00 |
| 119.00 | MOVING WHEEL,<br>Size - 200 MM X 50 MM (WIDTH), Company-CASTOR/REXELLO, Type-WITH BRACKET -150 NOS. | 0.00 | 837.00 | 1050.00 | **832.70** | 0.00 |
| 120.00 | FIXED WHEEL,<br>Size - 200 MM X 50 MM (WIDTH), Company-CASTOR/REXELLO,Type - WITH BRACKET -100 NOS. | 0.00 | **693.00** | 860.00 | 696.26 | 0.00 |
| 121.00 | MOVING WHEEL,<br>Size-160 MM X 40 MM (WIDTH), Company - CASTOR / REXELLO, Type - WITH BRACKET - 100 NOS. | 0.00 | **477.00** | 598.00 | 490.90 | 0.00 |
| 122.00 | FIXED WHEEL,<br>Size-160 MM X 40 MM (WIDTH), Company-CASTOR / REXELLO, Type - WITH BRACKET- 60 NOS. | 0.00 | 432.00 | 539.00 | **404.57** | 0.00 |
| 123.00 | M.S. FLAT,<br>Size - 25X3MM, Company - TATA / JINDAL/ ZENITH, Type - I.S.I. – 200 KG | 0.00 | 54.00 | 56.00 | **52.91** | 0.00 |
| 124.00 | M.S.SQUARE PIPE,<br>Size - 25X25X3MM, Company - TATA/JINDAL/ZENITH, Type - I.S.I.<br>500 FT | 0.00 | 49.50 | 46.60 | **37.82** | 0.00 |
| 125.00 | M.S.SHEET,<br>Size-8'X4'X18 GUGE,Company-TATA/JINDAL/ZENITH, Type - I.S.I.<br>20 NOS. | 0.00 | 2070.00 | 2240.00 | **2015.08** | 0.00 |
| 126.00 | M.S.WELDING ROD,<br>Size - 3.20MM /3.15MM, Company - L&T / ESSAB, Type - GENERAL PURPOSE – 75 BOX (3 PACKET) | 0.00 | 1440.00 | **999.00** | 1945.05 | 0.00 |
| 127.00 | OXYGEN GAS REGULATOR,<br>Size - DOUBLE STAGE, Company - ESAB,Type - HEAVY DUTY – 2 NOS. | 0.00 | 5580.00 | 5401.00 | **4662.95** | 0.00 |
| 128.00 | ACETYLENE GAS REGULATOR,<br>Size - DOUBLE STAGE, Company - ESAB,Type - HEAVY DUTY – 2 NOS. | 0.00 | 5580.00 | 5401.00 | **4662.95** | 0.00 |
| 129.00 | GAS CUTTING TORCH,<br>Size-CUTOGEN,Company - ESAB,Type-HEAVY DUTY – 2 NOS. | 0.00 | 6300.00 | 6100.00 | **5032.51** | 0.00 |
| 130.00 | CUTTING WHEELS,<br>Size - 355 X 3 X 25.4 MM, Company - NORTON,Type - I.S.I.- 300 NOS. | 468.00 | **135.00** | 145.00 | 136.15 | 0.00 |
| 131.00 | GRINDING MACHINE,<br>Size - TV/NO.1000 / MIN, Company - BLACK DECKER,<br>Type - (700 W) C-970 (250V)- 2 NOS. | 0.00 | 2250.00 | 3100.00 | **2139.56** | 0.00 |
| 132.00 | WELDING MACHINE,<br>Size - 5-150AMP 1PH,DC, Company - LORCH / UNITECH, Type - H150<br>1 NOS. | 0.00 | 0.00 | 96500.00 | **48626.37** | 0.00 |
| 133.00 | WELDING MACHINE,<br>Size - 10-150 AMP 1 PH, DC, Company - KEMPPI, Type - MINARC 150- 1 KG | 0.00 | 0.00 | 122000.00 | **36196.18** | 0.00 |
| 134.00 | WELDING SCREEN,<br>Company - ESAB, Type - GENERAL PURPOSE- 10 NOS. | 0.00 | 747.00 | **495.00** | 714.48 | 0.00 |
| 135.00 | M.S.ANGLE,<br>Size-40 X 40 X 3MM, Company-TATA/JINDAL/ZENITH, Type -I.S.I.<br>200 KGS | 0.00 | 54.00 | 55.00 | **52.13** | 0.00 |
| 136.00 | M.S.FLAT,<br>Size-35 X 5MM,Company-TATA/JINDAL/ZENITH,Type-I.S.I.<br>200 KGS | 0.00 | 54.00 | 55.00 | **51.61** | 0.00 |
| 137.00 | WELDING MACHINE,<br>Size - 18 KVA (10 TO 400A) 415V / 3Ø, Company - ARC-TEC, Type - RT 400IY<br>1 NOS | 0.00 | 0.00 | 552000.00 | **54461.54** | 0.00 |
| 138.00 | SLADGE HAMMER,<br>Size - 2 KG, Type – TAPARIA – 2 NOS. | 0.00 | 504.00 | 682.00 | **464.22** | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 139.00 | M.S.SQUARE PIPE,<br>Size -25 X 25 X 18 GAUAGE,Company-TATA/JINDAL/ZENITH,<br>Type – GOOD - 2000 FT | 0.00 | 31.50 | **18.60** | 21.62 | 0.00 |
| 140.00 | M.S.SQUARE PIPE,<br>Size-20 X 20 X 18 GAUAGE,Company-TATA/JINDAL/ZENITH,<br>Type – GOOD – 2000 FT | 0.00 | 20.70 | **16.50** | 18.41 | 0.00 |
| 141.00 | TELEPHONE SOCKET WITH SAFETY SHUTTER WITH SURFACE MODULAR BOX,<br>Company - ROMA, Type - ONY WAY<br>100 NOS. | 0.00 | 171.00 | 120.00 | **119.30** | 0.00 |
| 142.00 | TELEPHONE COIL CORD – 500 NOS. | 0.00 | 27.00 | **26.00** | 38.90 | 0.00 |
| 143.00 | TELEPHONE LINE CORD -500 NOS. | 65.00 | **15.30** | 24.00 | 38.90 | 0.00 |

सदर विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे साहित्याची खरेदी टप्प्याटप्प्याने खरेदी करुन सदर उर्वरीत १४३ Items साठी पाचव्यांदा ई-निविदा प्रकिया राबविण्यात आलेली आहे.

उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील अ.नं.२ व २९ Items साठी दर प्राप्त झालेले नाहीत.

तरी वरील दोन Itemsवगळता उर्वरीत १४१ Items साठी गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाकरीता वार्षिक साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०९ **साईधर्मशाळा विभागाकरीता प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे साईधर्मशाळा विभागाकरीता प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह- सेट,<br>बेडशीट – 60"x90" उशीकव्हर – 18"x27" |
| ०२ | मागणी | ५,००० सेट |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १५.०१.२०१८ ते २५.०१.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | -- |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक - १५.०१.२०१८<br>टेक्निकल बीड – ०९.०२.२०१८<br>कमर्शियल बीड – १२.०३.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | २ निविदाधारकांनी भरलेली आहे. तर २ निविदाधारकांना NSIC अन्वये सवलत आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | **मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर** | **२६२.५०** | L1 |
| २ | मे.तिरुपती हॅण्डलुम ॲण्ड फर्निशिंग, मालेगाव | ३०१.०० | L2 |
| ३ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | ३०९.६० | L3 |
| ४ | मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती, दिल्ली | ३२५.५० | L4 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | | १ | २०१७-१८<br>(सदर बेडशीटचे दर हे GST पुर्वीचे आहेत.) | १०,३०० नग | १९७/- |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – | | | | |

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| मागील वर्षी साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थानासाठी खरेदी करण्यात आलेली आहे. | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | रू.१९७/- |
| १७ | मागील पुरवठादार | मे.बांठिया एंटरप्रायजेस, पुणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रू.२६२.५० प्रती सेट |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रू.३५०/- प्रती सेट मार्केट रेट (रू.२६२.५० प्रती सेट निविदा दर) | |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | रु.१९७/- | रु.२६२.५० | रु.६५.५० | २५ % + |

२४. संक्षिप्त टीप– साईधर्मशाळा विभागाचे मागणीप्रमाणे ५००० सेट (पाच हजार नग बेडशीट + उशीकव्हर) मागणीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी विभागाने दिलेले टेक्निकल स्पेसिफिकेशन देण्यात आले होते.

**टेक्निकल स्पेसिफिकेशन – सोबत जोडल्याप्रमाणे.**

सदर ई-निविदेमध्ये ४ निविदाधारकांनी भाग घेतला होता याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. १२.०३.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर यांचे दर न्युनतम आहेत. तसेच मागील वर्षी खरेदी केलेल्या बेडशीट उशीकव्हरचे दर हे GST पुर्वीचे आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तावित खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. सभेसमोर चर्चेअंती त्यांनी बेडशीट उशीकव्हरसह साठी प्रती सेट रु.२५०/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागाकरीता प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदी करणेकामी मे.सृष्टी रिप्रोग्रेन इंडस्ट्रिज, सिन्नर यांचे प्रती सेट रु.२५०/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१० **कॅन्टीन विभागाकरीता स्टेनलेस स्टील पातेले खरेदी ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता स्टेनलेस स्टील टी जार व स्टेनलेस स्टील पातेले खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती.यामध्येस्टेनलेस स्टील टी जार व स्टेनलेस स्टील पातेले असे दोन BOQ करण्यात आले होते. यामध्ये खालीलप्रमाणे पाचई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मिरा स्टील, ठाणे
२. अंभोरे ब्रदर्स, कोपरगाव
३. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर
४. नवनितलाल ॲन्ड ब्रदर्स, नाशिक

५. युनियन ट्रेडींग नाशिक

वरील ५ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.११.०१.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. हे सर्व ५निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ५निविदाधारकांचे निविदेचे Commercial Bid दिनांक १७.०१.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता दि.२२.०१.२०१८ रोजीचे उपसमितीचे सभेपुढे सादर केला असता यावर सविस्तर चर्चा होऊन स्टेनलेस टी जार साठी अ.न १ साठी मे. अंभोरे ब्रदर्स, कोपरगाव यांना तर अ.नं.२ ते ५ साठी मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.सदर निर्णय दि.०२.०२.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कायम झालेला आहे. याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे चालू आहे.

तसेच स्टेनलेस स्टील पातेल्यासाठी तीन निविदाधारकांनी प्रती किलोचे दर दिलेले होते तर दोन निविदाधारकांनी नगाचे दर दिलेले होते. निविदेमध्ये सदर पातेल्यांचे वजन हे अंदाजे दिलेले होते. अंदाजे वजनानुसार नगाचे दर हे किलोमध्ये रुपांतरीत करुन तक्ता दि.२२.०१.२०१८ रोजीचे उपसमितीचे सभेत सादर केला होता. परंतु चर्चेदरम्यान स्टेनलेस स्टील पातेले खरेदीकामी निविदाधारकांनी दिलेले दर किती किलोच्या पातेल्यासाठी दिले आहेत, याची त्यांचेकडून मागणी करण्यात यावी व त्यासह स्टेनलेस स्टील पातेले खरेदीकामीचा प्रस्ताव पुढील उपसमितीसमोर सादर करणेत यावा. असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/५७९७/२०१८ दि.२९.०१.२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे पाचही निविदाधारकांना ते पुरविणार असलेले पातेल्यांचे वजनाची मागणी करण्यात आलेली होती. सदर पाचही निविदाधारकांनी वजनांचे ई-मेल केलेले आहेत. यामध्ये मे. युनियन ट्रेडींग, नाशिक यांनी ६२-६३ अशा पध्दतीने वजन दिल्यामुळे त्यांचे दर सरासरी घेऊन खालीलप्रमाणे वजन व दरांचा तक्ता सादर केला आहे.

| अ नं. | पातेल्यांचा तपशिल | निविदेतील अंदाजे वजन | **अंभोरेब्रदर्स, कोपरगाव** | | **मिरास्टील, ठाणे** | | **नवनितलाल ॲन्ड ब्रदर्स, नाशिक** | | **युनियन ट्रेडींग, नाशिक** | | **सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निविदेतील दर प्रती किलो रु. | ई-मेलव्दारे दिलेले Exact वजन | निविदेतील दर प्रती किलो रु. | ई-मेलव्दारे दिलेले Exact वजन | निविदेतील दर प्रती किलो रु. | ई-मेलव्दारे दिलेले Exact वजन | निविदेती ल दर प्रती किलो रु. | ई-मेलव्दारे दिलेले Exact वजन | निविदेतील दर प्रती किलो रु. | ई-मेलव्दारे दिलेले Exact वजन |
| १ | **स्टेनलेस स्टील पातेले झाकणासह**(सेलमस्टील ३०४ ग्रेड, ८-% निकेल धातू असलेले)२०० लिटर क्षमतेचे, सपाट बुडाचापत्रा ६ mm , बाजूचा पत्रा ३ mm जाडीचा, साईज - ३२"x१६" | ६५ किलो | ५११.०० | ६५ किलो | ४४६.१५ | ६५ किलो | ४५८.०० | ५९ किलो | ६५२.०० | ६२.५० किलो | ४३७.१४ | ६३ किलो |
| **निविदेतील दर व वजनानुसार प्रती नगाचे दर** | | | **रु. ३३,२१५.००** | | **२८,९९९.७५** | | **२७,०२२.००** | | **४०,७५०.००** | | **२७,५३९.८२** | |
| २ | **स्टेनलेस स्टील पातेले**(सेलम स्टील ३०४ ग्रेड, ८-% निकेल धातू असलेले)१५० लिटर क्षमतेचे,सपाट बुडाचा पत्रा ६ mm , बाजूचा पत्रा ३ mm जाडीचा साईज -३०"x१६" | ५६ किलो | ५११.०० | ५६ किलो | ४४६.४२ | ५६ किलो | ४५८.०० | ५५किलो | ६५२.०० | ५३किलो | ४३४.७५ | ५४.९०किलो |
| **निविदेतील दर व वजनानुसार प्रती नगाचे दर** | | | **२८,६१६.००** | | **२४,९९९.५२** | | **२५,१९०.००** | | **३४,५५६.००** | | **२३,८६७.७७** | |
| ३ | **स्टेनलेस स्टील पातेले**(सेलम स्टील ३०४ ग्रेड, ८-% निकेल धातू असलेले)१०० लिटर क्षमतेचे, सपाट बुडाचा पत्रा ६ mm , बाजूचा पत्रा ३ mm जाडीचा, साईज -२७"x१५" | ४५ किलो | ५११.०० | ४५ किलो | ४५१.११ | ४५ किलो | ४५८.०० | ४२किलो | ६५२.०० | ४३किलो | ४३७.१४ | ४४.१०किलो |
| **निविदेतील दर व वजनानुसार प्रती नगाचे दर** | | | २२,९९५.०० | | २०,२९९.९५ | | १९,२३६.०० | | २८,०३६.०० | | १९,२७७.८७ | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **स्टेनलेस स्टीलपातेले** (सेलम स्टील ३०४ ग्रेड, ८-% निकेल धातू असलेले)२५ लिटर क्षमतेचे, सपाट बुडाचा पत्रा ६ mm , बाजूचा पत्रा ३ mm जाडीचा, साईज १८"x१४" | २४ किलो | ५११.०० | २४किलो | ४४०.०० | २४ किलो | ४५८.०० | २३ किलो | ६५२.०० | २१ किलो | ४३४.४४ | २४.३०किलो |
| **निविदेतील दर व वजनानुसार प्रती नगाचे दर** | | | १२,२६४.०० | | १०,५६०.०० | | १०,५३४.०० | | १३,६९२.०० | | १०,५५६.८९ | |
| ५ | **स्टेनलेस स्टील पातेले**(सेलम स्टील३०४ ग्रेड, ८-% निकेल धातू असलेले)१०लिटर क्षमतेचे, जाड बुडाचे साईज - १३"x१०" | १३ किलो | ५११.०० | १३ किलो | ४५०.०० | १३ किलो | ४५८.०० | १२ किलो | ६५२.०० | ११.५० किलो | ४३७.१४ | १२.६०किलो |
| **निविदेतील दर व वजनानुसार प्रती नगाचे दर** | | | ६,६४३.०० | | ५,८५०.०० | | ५,४९६.०० | | ७,४९८.०० | | ५,५०७.९६ | |

वरील तुलनात्मक तक्त्यातील निविदेतील दर व मेलव्दारे मागविलेले वजन विचारात घेता मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे पाचही पातेल्यांसाठीचे दर न्युनतम आहेत. तसेच निविदेतील त्यांनी भरलेले दर व संस्थानने निविदेत नमुद केलेले अंदाजे वजन यांचा विचार केला तरीही मे. सोमनाथ गंगाधर रासने यांचे दर न्युनतम येत आहेत. मे. सोमनाथ गंगाधर रासने यांचे निविदेतील वजन व दर आणि ई-मेलव्दारे मागविलेले वजन व त्यानुसार निविदेतील दर विचारात घेऊन सदर दोन्हीही दरांचा तक्ता खालीलप्रमाणे सादर केला आहे.

**मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दरांचा तक्ता खालीलप्रमाणे -**

| अ.नं | निविदेतील वजन | निविदेतील दर | ई-मेलव्दारे दिलेले वजन | ई-मेलव्दारे दिलेले वजनानुसार दर | दर प्रती नग | मागणी | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ६५ किलो | ४२३.६९ | ६३ किलो | ४३७.१४ | २७,५३९.८२ | १० | २,७५,३९८.२० |
| २ | ५६ किलो | ४२६.२१ | ५४.९०० किलो | ४३४.७५ | २३,८६७.७७ | ०६ | १,४३,२०६.६२ |
| ३ | ४५ किलो | ४२८.४० | ४४.१०० किलो | ४३७.१४ | १९,२७७.८७ | ०५ | ९६,३८९.३५ |
| ४ | २४ किलो | ४३९.८७ | २४.३०० किलो | ४३४.४४ | १०,५५६.८९ | ०३ | ३१,६७०.६७ |
| ५ | १३ किलो | ४२३.६९ | १२.६०० किलो | ४३७.१४ | ५,५०७.९६ | ०३ | १६,५२३.८८ |
| **एकूण खर्च रक्कम रुपये -** | | | | | | | **५,६३,१८८.७२** |

वर सविस्तर नमूद केल्याप्रमाणे मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दोन्हीही पध्दतीने दर न्यूनतम येत आहेत. त्यामुळे खरेदी नियमावलीस अनुसरुन त्यांना चर्चा-वाटाघाटीसाठी बोलवावे लागेल असे वाटते.

तरी मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांना चर्चा-वाटाघाटीसाठी बोलवून न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामीचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाकरीता प्रस्तावित स्टेनलेस स्टील पातेले खरेदी करणेकामी मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे उपरोक्त तक्त्यामधील कॉलम नं.५ मध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

११ **श्री साई प्रसादालयाचे माऊंटेड गॅस प्लॅन्टकरीता जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस मीटर खरेदीकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

श्री साई प्रसादालयातील माऊंटेड गॅस प्लॅन्टची सुरक्षिततेच्या कारणास्तव तसेच विना व्यत्यय गॅस प्लॅन्ट कार्यान्वित राहणेसाठी जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणा-या अपेक्षित रुपये ११,५३,३९६/- मात्रचे खर्चास दिनांक २०.८.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं. ७२८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार याकामी ई-निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा तिसरी वेळेस अपलोड करण्याची मुदत दिनांक २२/०१/२०१८ ते ३०/०१/२०१८ पर्यंत देण्यात आली होती. मात्र या मुदतीत एकच निविदा प्राप्त झाली आहे. निविदा प्रक्रियेसाठी कमीत कमी तीन निविदेची गरज असल्याने, आणखी निविदा मागविणेसाठी निविदा मसुदा अपलोड करण्यास दि. ५/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेत आली.

सदर मुदतीत खालीलप्रमाणे दोन ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| Sr. No. | Name of Tenderer | Remark |
|---|---|---|
| 1. | M/s. Globe Gas Equipments Industry Pvt. Ltd., Mumbai | Disqualified |
| 2. | M/s. Kelvin Energy Solution, Mumbai | Qualified |

सदरच्या ई-निविदा मा. खरेदी समिती दि. १२/०२/२०१८ रोजी उघडण्यात आल्या आहेत. उघडण्यात आलेल्या ई-निविदामध्ये M/s. Kelvin Energy Solution, Mumbai यांची एकमेव निविदा पात्र झाली..

शासन निर्णय भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग -४ दि. १ डिसेंबर २०१६ चे खरेदी नियमावली ४.४.३.१. नुसार तीन वेळेस फेर ई-निविदा तसेच तिस-यादा दोन वेळेस मुदतवाढ देवूनही २ पुरवठाधारकांनीच निविदा भरली आहे. त्यापैकी एक तांत्रिकदृष्या अपात्र होत आहे. मात्र कामाची वेळेवर पुर्तता होणे आवश्यक असल्याने एकच पात्र निविदाधारकांची कर्मर्शियल बीड उघडणेस आले असुन दराचा तपशिल खालीलप्रमाणे...

**अ) नवीन खरेदी...**

| अ.नं. | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | Vapporizer CCOE Approved | 02 .00 Set. | 320896.00 | 641792.00 |
| 02 | Flow meter- Micro Motion | 01.00 Set | 770000.00 | 770000.00 |
| | Total in Figures | | | **1411792.00** |

**ब) जुने - बाय बॅक**

| अ.नं. | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | Vapporizer 250 Kg | 02 .00 Set. | 30000.00 | 60000.00 |
| 02 | Vapporizer 100 Kg | 01.00 Set | 20000.00 | 20000.00 |
| | Total in Figures | | | **80000.00** |

एकूण किमंत अ-१ वजा ब = 13,31,792/- ( 1411792.00 – 80,000.00 = 13,31,792.00 )

उपरोक्त अर्थिक बीड मध्ये मे. केलव्हीन एनर्जी, सोल्युशन, मुंबई यांनी रक्कम रु. १३,३१,७९२/- दर दिलेला आहे.

तरी श्री साई प्रसादालयाचे माऊंटेड गॅस प्लॅन्टकरीता जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदीकामी मे. केलव्हीन एनर्जी, सोल्युशन, मुंबई यांचे रु. १३,३१,७९२/- दर मंजूर रक्कमेपेक्षा (रु.११,५३,३९६/- + टॅक्स) रक्कम रु. १,७८,३९६/- इतकी जास्त असलेने खरेदी नियमावली महाराष्ट्र शासन भाखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग III /उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार ३.१.२.१ अन्वये उचित कार्यवाही होणेकामी मे. केलव्हिन एनर्जी सोल्युशन, मुंबई यांचे सोबत दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे. केलव्हीन एनर्जी, सोल्युशन, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेसमोर चर्चेअंती त्यांनी नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटरसाठी दिलेल्या रु.१४,११,७९२/- मात्र निम्नतम दरावर १५% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे माऊंटेड गॅस प्लॅन्टकरीता नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदी करणेकामी मे.केलव्हीन एनर्जी, सोल्युशन, मुंबई यांचे रु.१२,००,०२३/- मात्र अंतीम दर स्विकारणेत यावेत व त्यामधून जुने व्हेपोरायझर बायबॅकची रु.८०,०००/- मात्र रक्कम वजा करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१२ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय इमारत तसेच साईआश्रम भक्तनिवास परिसरातील प्रवेशव्दारा समोरील जागेत चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | १) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय इमारत परिसरातील प्रवेशव्दारासमोरील जागेत चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करणे.<br>२) श्री साईआश्रम भक्तनिवास परिसरातील प्रवेशव्दारासमोरील जागेत चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करणे. |
| ०२ | प्रशासकिय मान्यता | मेकॅनिकल विभागाकडील दि. ३०/०१/२०१८ रोजीची मंजुर टिपणी अन्वये.. |
| ०३ | अंदाजे खर्च | रक्कम रु. ४,७४,५३०/- |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | १) श्री साईआश्रम भक्तनिवासस्थानयांचेकडील दिनांक 28/१२/2017 रोजीचे पत्रान्वये साईआश्रम भक्तनिवासस्थानचे मुख्य प्रवेशव्दारासमोरील (नगर-मनमाड रोड लगतचे) संरक्षण भिंतीची उंची कमी असल्याने बाहेरील व्यक्ती आतमध्ये प्रवेश करतात. तसेच भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुहे सदर ठिकाणी चेनलींक जाळीचे कंम्पाऊंड करुन मिळणेबाबत कळविले होते.<br>२) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि. १२/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी महाविद्यालयाचे इमारतीचे बाजुने बॅरीगेटस् लावुन कंम्पाऊंड करण्यात आले होते. परंतु मंदिर परिसरात वापरण्यासाठी संरक्षण विभागाने सदरचे बॅरिगेटस् नेल्याने विद्यार्थ्यांचे सुरक्षतेसाठी कसल्याही प्रकारचे कंम्पाऊंड राहिलेले नाही. तसेच महाविद्यालयाचे इमारतीला लागुन इतर इमारतीमध्ये भक्तांना राहणेसाठी सुविधा दिली जाते. त्यामुळे तेथील पुढील बाजुने जाळीचे कंम्पाऊंड करुन देणेबाबत कळविले आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशील | महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेत आली होती. ई-निविदा भरण्याची मुदत दि. २२/०२/२०१८ ते २८/०२/२०१८ अखेर होती. |
| | a) कामाची मुदत | ३० दिवस |
| | b) तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक/वेळ | ०२/०३/२०१८ सकाळी ११ वाजता ( शक्य असल्यास ) |
| | c) प्राप्त ई-निविदा | ०३ |
| | d) प्राप्त निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय- जमा केले आहे. |
| | e) सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले ( स्कॅन ) कागदपत्रे जमा केले आहेत का ? | होय- Paid |

**तांत्रिक दृष्ट्या पात्र निविदाधारकांचा तपशील...**

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | ४,९१,३१०/- |
| ०२ | सुपर फॅब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी | ४,२३,५५०/- |
| ०३ | पी. एस. टेंबुर्णीकर, औरगांबाद | ५,४६,०८९/- |
| ०६ | निम्नत्तम दरधारकांचा तपशील | |
| | १) नांव | सुपर फेब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी |

| | | |
|---|---|---|
| | २) दरपत्रकातील एकूण दर | ४,२३,५५०/- |
| | ३) अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा कमी/जास्त दर | - ८.९२ % |

उपरोक्त तपशीलानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय इमारत तसेच साईआश्रम भक्तनिवास परिसरातील प्रवेशव्दारासमोरील जागेत चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करणेकामी मे. सुपर फेब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी यांचे दर रक्कम रुपये- ४,२३,५५०/- निम्मनतम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेकरीता प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय इमारत तसेच साईआश्रम भक्तनिवास परिसरातील प्रवेशव्दारासमोरील जागेत चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करणेकामी मे. सुपर फेब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी यांचे एकत्रित रु.४,२३,५५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१३ **साईआश्रम भक्तनिवास येथील V.R.V. एसी यंत्रणेचे कॉपर पॉईपींगवर लोखंडी जिना, टप्पा तयार करुन बसविणे तसेच संरक्षण विभागाकरीता मुव्हेबल स्टे.स्टील बॅरीकेडस् तयार करणे या दोन्ही कामी उघडण्यात आलेल्या प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी चर्चा/वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | **१) साईआश्रम भक्तनिवास येथील V.R.V. ए.सी. यंत्रणेचे कॉपर पाईपींगवर लोखंडी जिना टप्पा तयार करुन बसविणे तसेच<br>२) संरक्षण विभागाकरीता मुव्हेबल स्टे. स्टील बॅरीकेडस् तयार करणे.** |
| ०२ | प्रशासकिय मान्यता | १) मेकॅनिकल विभागाकडील दि.२०/०१/२०१८ रोजीची मंजुर टिपणी अन्वये..<br>२) मेकॅनिकल विभागाकडील दि.०५/१२/२०१ रोजीची मंजुर टिपणी अन्वये.. |
| ०३ | अंदाजे खर्च | एकत्रित रक्कम रु ५,१६,६००/- |
| ०४ | प्रस्तावातील थोडक्यात माहिती . | १) श्री साईआश्रम भक्तभनिवासस्थाबन येथील A,B, C या तीन इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकूण ३८४ रुम करीता डायकीन कंपनीचे V.R.V. (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून कार्यान्वित करुन दिलेली आहे.<br>उपरोक्त ए.सी. यंत्रणेचे ४८ आऊटडोअर इमारतीचे दोन्ही बाजुचे मधील जागेत बसविणेत आलेले असुन त्यारची पाईपलाईन डक्ट मधून रुममध्ये नेलेली आहे. या ४८ डक्टतमध्येर सफाई कर्मचा-यांना साफ सफाई करीता उतरावे लागते. डक्टचे आतिल बाजु साधारण ३ फुट खोल असल्यासने डक्टमध्ये उतरतेवेळी कर्मचा-यांचा पाय कॉपर पाईपवर पडत असल्याने पाईप क्रॅक होऊन गॅस लिकेज होतो. परिणामी सदरचे पाईप लाईनवर जोडलेल्या १२ रुम मधील ए.सी. कुलींग होत नाही. सदरचा प्रकार वारंवार होत असल्यामने कॉपर पाईपवर सुरक्षिततेकरीता लोखंडी जिना टप्पा जयार करणे आवश्यपक आहे.<br>२) संरक्षण अधिकारी संरक्षण विभाग यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षे कालावधी मध्ये गर्दीचे नियोजनकामी मंदीर परिसरात वेळोवेळी बॅरीगेटींग करावी लागते. सध्या श्री साई प्रसादालय परिसरातील दर्शनरांग तोडल्यामुळे दर्शन रांग बाहेर रोडवर/ फुटपाथवर बॅरी गेटींग करून लावावी लागते. याकामी संरक्षण विभागाकडील उपलब्धी असलेले लोखंडी बॅरीगेट्स वापरणेत येतात, सदरचे बॅरीकेट्स कमी पडत असलेने नवीन २० नग स्टोनलेस स्टीलचे, २० नग मुव्हेबल (चाके असलेले) बॅरीगेट्स बनवुन मिळणेबाबत कळविले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ०५ | ई निविदा तपशील- | महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेत आली होती. ई-निविदा भरण्याची मुदत दि. २२/०२/२०१८ ते २८/०२/२०१८ अखेर होती. |
| | a) कामाची मुदत | ३० दिवस |
| | b) तांत्रिंक निविदा उघडण्याची दिनांक/ वेळ | ०२/०३/२०१८ सकाळी ११ वाजता (शक्य असल्यास) |
| | c) प्राप्त ई निविदा- | ०३ |
| | d) प्राप्त निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय- जमा केले आहे. |
| | e) सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले (स्कॅन) कागदपत्रे जमा केले आहेत का? | होय -Paid |

तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांचा तपशील...

**१) साईआश्रम भक्तनिवास येथील V.R.V. ए.सी. यंत्रणेचे कॉपर पाईपींगवर लोखंडी जिना टप्पा तयार करुन बसविणेकरीता..**

| अ .नं. | निविदाधारकांचे नांव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | ३,२७,२००/- |
| ०२ | सुपर फॅब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी | २,४५,४००/- |
| ०३ | पी. एस. टेंबुर्णीकर, औरगांबाद | ४,००,८२०/- |

**२) संरक्षण विभागाकरीता मुव्हेबल स्टे. स्टील बॅरीकेडस् तयार करणे.**

| अ .नं. | निविदाधारकांचे नांव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | २,१६,६००/- |
| ०२ | सुपर फॅब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी | २,०८,२००/- |
| ०३ | पी. एस. टेंबुर्णीकर, औरगांबाद | २,५१,४००/- |

उपरोक्त तपशीलानुसार

१) साईआश्रम भक्तनिवास येथील V.R.V. ए.सी. यंत्रणेचे कॉपर पाईपींगवर लोखंडी जिना टप्पा तयार करुन बसविणेकरीता मे.सुपर फेब्रीकेशन ॲण्डन फर्निचर्स, साकुरी यांचे दर रक्कयम रुपये- ४,२३,५५०/- निम्मिनतम आहेत. तसेच

२) संरक्षण विभागाकरीता मुव्हेबल स्टेन. स्टील बॅरीकेडस् तयार करणेकामी मे.सुपर फेब्रीकेशन ॲण्डि फर्निचर्स, साकुरी यांचे दर रक्कम रुपये- २,०८,२००/- निम्नतम असुन त्यांचेशी प्राप्तं दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेकरीता प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णायार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील V.R.V. ए.सी. यंत्रणेचे कॉपर पाईपींगवर लोखंडी जिना टप्पा तयार करुन बसविणे व संरक्षण विभागाकरीता मुव्हेबल स्टेन. स्टील बॅरीकेडस् तयार करणेकामी मे. सुपर फेब्रीकेशन ॲण्डि फर्निचर्स, साकुरी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१४ **श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी.विभागाकरीता २-डी इको मशिन खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाने दि. २८/०३/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग 2-डी इको मशिनची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले मशिन हे खराब झाल्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे. त्यांचेकडे असलेले 2-डी इको मशिन हे सन २००६ मध्ये रु.४०,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते व त्यानंतर सन २००९ मध्ये TEE Probe हे रु.२० लाख इतक्या किंमतीस

खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनवर आतापर्यंत ५०००० रुग्णांच्या तपासण्या झालेल्या आहेत. तसेच M/s. Philips India Limited, Mumbai यांनी त्यांचे पत्रान्वये मशिनचे CMC व 2-डी इको यांचे Spare Parts उपलब्ध होऊ शकत नाही असे कळविलेले आहे. सदर मशिनचा वापर हा पेशंटच्या ह्दयाचे ठोके व्यवस्थित आहे किंवा नाही याचे निदान करण्यासाठी होतो, त्यामुळे सदर मशिन खरेदी करणे गरजेचे आहे.

सदरचे 2-डी इको मशिन खरेदीकामी M/s. Philips India Limited, Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.१६/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या दरानुसार अंदाजे रक्कम रु.६९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाकरीता 2-D Echo Machine with Probe एक नग विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६९,००,०००/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख मात्र) चे खर्चास तसेच जुने मशिन बायबॅक करणेपुर्वी शासनाची पुर्वमान्यता घेणेस व मा.उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास दि.२०/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१०१५ अन्वये मान्यता मिळालेली असून उपरोक्त प्रस्तावास दि.१७/०७/२०१५ रोजीचे आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी दि.०४/११/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२०/१२/२०१६ पासुन ई-निविदा मागविण्यात येऊन Online ई-निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०५/०१/२०१७ अशी ठेवण्यात आली होती, तसेच दि.२१/१२/२०१६ रोजी १९ पुरवठाधारक/ अधिकृत विक्रेते यांना निविदा भरणेकामी जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. परंतु त्यास अनुसरुन Online एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

तथापि, शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.३० ऑक्टोबर २०१५ – प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील– निविदा कालावधीस मुदतवाढ– अन्वये खरेदीकामी एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदरचे खरेदीकामी दि.०६/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये ई-निविदेस दि.१२/०१/२०१७ पर्यंत एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती, तसेच दि.०९/०१/२०१७ रोजी पुन्हा १९ पुरवठाधारक/ अधिकृत विक्रेते यांना निविदेस मुदतवाढ दिलेली असून निविदा भरणेकामी अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे दि.१३/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१९/०१/२०१७ पर्यंत दुस-यांदा ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु त्यास अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त झाली नाही, म्हणजेच जाहिरातीस अनुसरुन सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाली व तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.३०/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०८/०४/२०१७ पासुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येऊन निविदा upload करण्याची अंतिम तारीख दि.२२/०४/२०१७ पर्यंत ठेवण्यात आली होती. तसेच २२ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना ई-मेल अन्वये जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते, परंतु त्यास अनुसरुन ऑनलाईन एकही निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे शासन निर्णयानुसार मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु तरीदेखील एकही ऑनलाईन निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.१६/०५/२०१७ रोजीचे टिपणीन्वये तिस-यांदा ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. सदरहू ऑनलाईन ई-निविदा दि.२४/०७/२०१७ ते दि.१०/०८/२०१७ या कालावधीत मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ०१ ई - निविदा प्राप्त झाली होती, त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे टिप्पणीन्वये प्रथम एक आठवडयाची म्हणजे दि.१४/०८/२०१७ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१५/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनुसरुन एक ऑनलाईन निविदा प्राप्त झाली होती, अशा प्रकारे एकुण दोन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

प्राप्त झालेल्या ऑनलाईन दोन ई-निविदा दि.३१/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन बायोमेडीकल विभाग यांचेकडे तपासणीकामी पाठविण्यात आला होता. त्यावर बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागाने Technical

दोन्हीही पुरवठाधारक पात्र आहे असे सांगितले, त्यानुसार पात्र दोन्हीही निविदाधारकांच्या कमर्शियल ई-निविदा उघडून मिळणेबाबत दि.०२/११/२०१७ रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव वैद्यकिय संचालक यांचेकडे पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावावर वैद्यकिय संचालक यांनी बायोमेडीकल विभागाचा अभिप्राय घ्यावा असे सांगितले, त्यानुसार बायोमेडीकल विभागाने पुरवठाधारकांकडून ई-मेल व्दारे काही तांत्रिक बाबींचा खुलासा मागवून त्यानंतर दि.१४/१२/२०१७ रोजी खरेदी विभागाकडे पाठविलेला आहे व दोन्हीही निविदाधारक पात्र असलेबाबत कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | Philips India Limited, Mumbai |
| 02 | Wipro GE Healthcare Pvt Ltd., Pune |

वरीलप्रमाणे 2-D Echo Machine खरेदीकामी तिस-यांदा मागविलेल्या ई-निविदेस अनुसरुन पात्र ०२ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.११/०१/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description of Work / Item(s) | No.of Qty. | Philips India Limited, Mumbai | Wipro GE Healthcare Pvt Ltd., |
|---|---|---|---|---|
| | | | Rate per in Rs. | Rate per in Rs. |
| 1.00 | 2-D Echo Machine Against Buyback of Old 2-D Echo Machine | 1 | 1,04,00,000.00 | 75,00,000.00 |
| | Buyback Value | 1 | 1,00,000.00 | 1,00,000.00 |
| | Net Cost in Rs. | | 1,03,00,000.00 | 74,00,000.00 |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Wipro GE Healthcare Pvt Ltd.,Pune यांचे दर निम्नत्तम येत असूप त्यांनी मशिनची मुळ किंमत व बायबॅक किंमत दिलेली असून कस्टम डयुटीबाबत त्यांचेकडून ई-मेल द्वारे विवरण घेण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description of Items | Qty. | M/s.Wipro GE Healthcare Pvt.Ltd., Pune | |
|---|---|---|---|---|
| | | | Unit Price incl. all Taxes | Total Price |
| 1. | Echo Cardiology System<br>Latest Generation, fully digital Echo cardiology system with digital beam former and with the software & Hardware to perform advanced cardiac (Adult, Pediatric, Neonatal Transesophageal) with 5 years warranty with all accessories & cables. | 1 No. | US$ 89846.15<br>(1 US$ = Rs.65/-) | 5840000.00 |
| | System must Includes following: | | | |
| 1 | Broadband Phased Array Transducer for Adult Cardiac imaging (2-4 MHz) | 1 No. | | |
| | Broadband Phased Array Transducer for Pediatric cardiac imaging (3-8MHz) | 1 No. | | |
| | Broadband Phased Array Transducer for Neonatal cardiac imaging (3-12MHz) | 1 No. | | |
| | Broadband Phased Array Sector TEE Transducer for Adult cardiac imaging (2-4MHz) | 1 No. | | |
| | Broadband Phased Array Sector TEE Transducer | 1 No. | | |

| Sr. No. | Description of Items | Qty. | M/s.Wipro GE Healthcare Pvt.Ltd., Pune | |
|---|---|---|---|---|
| | for Pediatric cardiac imaging (3-8MHz) | | | |
| 2 | Online UPS with 30 min backup of a reputed brand as per requirement of machine. | 1 No. | 160000.00 | 160000.00 |
| 3 | Data Management software with Workstation having required Hardware with License for uninterrupted working of Echo Machine with PC (if required) Composite Video Cables, S-Video Cables, Foot switch, Remote Switch if any. | 1 No. | | |
| 4 | B/W thermal Printer | 1 No. | | |
| 5 | Inkjet colour Printer | 1 No. | | |
| 6 | Antistatic long life cover for whole machine | | | |
| 7 | Cost of consumables (or items not included in warranty or CMC) should be given | | | |
| 8 | AMC Cost- After end of warranty period, AMC should be 1 % of basic cost plus service tax at actual. It should be fixed for next 5 years | | | |
| 9 | After end of warranty period, CMC should be Max. 5% of basic cost plus service tax at actual. It should be fixed for next 5 years | | | |
| | Total in Rs. - | | | 6900000.00 |
| | GST - | | | 900000.00 |
| | Custom Duty - | | | 600000.00 |
| | Total Amt.in Rs. | | | 7500000.00 |
| | Buyback Value of Old 2D Echo Machine - | | | 100000.00 |
| | Net Cost of New Machine in Rs. | | | 7400000.00 |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s.Wipro GE Healthcare Pvt Ltd.,Pune यांचे सर्व ॲक्सेसरीजसह पुर्णांकित मुळ दर रक्कम रु.७५,००,०००/- हे निम्नत्तम येत असून त्यांनी जुन्या मशिनची Buyback Value रु.१,००,०००/- इतकी देऊ केलेली असून सदर जुन्या मशिनची रक्कम वजा जाता त्यांचेकडून नविन मशिन खरेदी केल्यास रक्कम रु.७४,००,०००/- (अक्षरी रु. चौ-याहत्तर लाख मात्र) इतका खर्च येईल. तसेच सदरचे मशिन आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करावा लागणार आहे.

तरी M/s.Wipro GE Healthcare Pvt Ltd., Pune यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.७४,००,०००/- (अक्षरी रु. चौ-याहत्तर लाख मात्र) चे खर्चास तसेच सदरचे मशिन आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करणेस मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावित खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s.Wipro GE Healthcare Pvt Ltd., Pune यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. सभेसमोर चर्चेअंती त्यांनी २-डी इको मशिनसाठी एकत्रित रु.७३,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी.विभागाकरीता २-डी इको मशिन खरेदी करणेकामी M/s.Wipro GE Healthcare Pvt Ltd., Pune यांचे एकत्रित रु.७३,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत यावे व या अंतीम दरामधून कस्टम डयुटीची रु.६,००,०००/- मात्र रक्कम वजा करणेत येऊन, उर्वरित रकमेमध्ये त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा व सदरहू मशिनची कस्टम डयुटी रक्कम संस्थानमार्फत भरणेत यावी.**

तसेच यापुढे जे साहित्य खरेदी केल्यानंतर त्याची कस्टम डयुटी भरणे अनिवार्य आहे, अशा साहित्यांची कस्टम डयुटी सदरहू साहित्य ताब्यात घेतेवेळेस संस्थानमार्फत भरणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ओ.टी. व वॉर्डकरीता सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी पुरवठाधारकांबरोबर चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२०३ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर व वॉर्ड विभागाकरीता लागणा-या सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१,४०,००,६२९/- चे खर्चास मान्यता घेणेकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यास अनुसरुन सदरचे खरेदीकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन नं.८७०४/२०१४ दि.२६/०९/२०१४ अन्वये रु.१,४०,००,६२९/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या उपरोक्त खरेदीमधील एकुण ३५३ इन्स्ट्रुमेंटपैकी २८९ इन्स्ट्रुमेंटसाठी ०७ निविदाधारकांना पुरवठा आदेश देण्यात येऊन उर्वरीत ६४ इन्स्ट्रुमेंटकरीता पुन्हा फेर ई-निविदा मागविण्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/११/२०१६ निर्णय क्र.७५६ (१) अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानूसार पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन ०१ ई - निविदा प्राप्त झालेल्या होती. सदर खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई निविदेस दि. १०/०८/२०१७ रोजीचे टिप्पणीन्वये एक आठवड्याची म्हणजे दि. १४/०८/२०१७ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात येऊन देखील //Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai यांची एकमेव ई निविदा प्राप्त झालेली होती. सदर ०१ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.३०/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला होता. सदर तांत्रीक बाबींचा तुलनात्मक तक्ता बघता असे निदर्शनास आले की Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai यांनी एकूण ६४ Instrument पैकी फक्त दोनच Instrument करीता Technical Specification दिलेले आहे. त्यामुळे उर्वरीत ६२ Instrument खरेदीकामी चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यास दि. ०३/११/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी दोन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०२ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर दोनही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

त्यानुसार दोनही निविदा पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. RescareMedisys India Pvt Ltd., Mumbai |
| 02 | M/s. Visionary Healthcare, Ahamadabad |

वरीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी पात्र असलेल्या ०२ ऑनलाईन कमर्शिअल निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| SCHEDULE OF WORK / ITEM(S) | | | | |
|---|---|---|---|---|
| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | RESCARE MEDISYS INDIA PVT LTD | |
| | | | Rate | Amount |
| 1.00 | Invasive Instruments C.V.T.S O.T. 1 & 2 | | | |
| 2.00 | MITRAL RETRACTOR SYSTEM | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2.01 | MICS Intracostalretractor body only | 1 | 249605.00 | 249605.00 |
| 2.02 | Blades (pair) f. MRP-1 40 x 35 mm | 1 | 92682.00 | 92682.00 |
| 2.03 | Blades (pair) f. MRP-1 60 x 35 mm | 1 | 96798.00 | 96798.00 |
| 2.04 | Ball joint adapter (D8) for MRR-2/MRP-1 | 1 | 96798.00 | 96798.00 |
| 2.05 | Ball joint adapter (D4) with distance elevator for MRN-3 | 1 | 96798.00 | 96798.00 |
| 2.06 | Transthoracic atrial retractor - blade guide, 220mm | 1 | 33181.00 | 33181.00 |
| 2.07 | Atrium bracket for MRN-3 45x30mm | 1 | 66237.00 | 66237.00 |
| 2.08 | Atrium bracket for MRN-3 45x45mm | 1 | 69356.00 | 69356.00 |
| 2.09 | Guiding clamp for atrial blade and retainer | 1 | 70852.00 | 70852.00 |
| 3.00 | MICS LONG INSTRUMENTS | | | |
| 3.01 | CERAMO handle for cranial instruments, straight,110mm | 1 | 22578.00 | 22578.00 |
| 3.02 | MICS Suture hook, 1,6 x 350 mm compliant with ABB-1 | 1 | 16216.00 | 16216.00 |
| 4.00 | MIDCAB RETRACTOR SYSTEM | | | |
| 4.01 | THOREXPO retractor arc side parts (pair) | 1 | 59002.00 | 59002.00 |
| 4.02 | THOREXPO retractor arc middle part, 580 x 660 mm | 1 | 79959.00 | 79959.00 |
| 4.03 | THOREXPO coupling rider | 1 | 263576.00 | 263576.00 |
| 4.04 | THOREXPO blade guide turning and swinging 300 mm | 1 | 81954.00 | 81954.00 |
| 4.05 | VENTREXPO abdominal spatula 100 x 50 mm | 1 | 29189.00 | 29189.00 |
| 4.06 | IMA blade 30 x 7 mm 90 x 15 x 70 mm | 1 | 25821.00 | 25821.00 |
| 4.07 | IMA blade 30 x 7 mm 130 x 15 x 70 mm | 1 | 25821.00 | 25821.00 |
| 4.09 | IMA blade 30 x 7 mm 70 x 15 x 70 mm | 1 | 25821.00 | 25821.00 |
| | | Total in Rs | | 1502244.00 |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Visionary Healthcare | |
|---|---|---|---|---|
| 3.03 | HCR MIC non-traum. clamp (2x3 t) cvd. 2.8 x 70 / 290 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.04 | CERAMO HCR needle holder cvd. 3 x 10 / 340 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.05 | CERAMO HCR non-traum. forceps str. 2.8 x 15 / 350 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.06 | CERAMO HCR valve scissors double-action, bl/bl cvd. 350mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.07 | CERAMO HCR knot pusher 25° angl., 340 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.08 | CERAMO TC HCR needle holder straight 3 x 10 / 340 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.09 | CERAMO HCR Clip applying forc. f. Horizon clips small, 340 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 3.10 | CERAMO HCR micro non-traum. forceps, str. 1.2 x 15 / 290mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| 4.08 | CERAMO RONDO micro needleh. with lock, 1.5 x 250 mm | 1 | 105000.00 | 105000.00 |
| | | | Total in Rs. | 945000.00 |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Rescare Medisys India Pvt.Ltd., Mumbai यांना १९ item करीता रक्कम रू.१५०२२४४/- इतक्या रक्कमेचा व M/s.Visionary Healthcare, Ahmedabad यांना ९ item करीता रक्कम रू. ९४५०००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश जात असून उर्वरीत १६ item करीता फेर ई-निविदा मागवाव्या लागणार आहे.

तरी १६ item करीता फेर ई-निविदा मागविणेस तसेच पुरवठा आदेश जात असलेल्या M/s. Rescare Medisys India Pvt.Ltd., Mumbai व M/s. Visionary Healthcare, Ahmedabad यांचेबरोबर चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास व सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**आजचे उपसमिती सभेसमोर प्रस्तावित ई-निविदा प्रक्रियेमधील पुरवठाधारक M/s. Rescare Medisys India Pvt.Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी सांगितले की, उपरोक्त साहित्य एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे आयटमवाईज खरेदी करता येणार नाही. त्यासाठी एकत्रित खरेदी करावी लागेल व त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या दरांवर ५% सुट देऊ केली. परंतु तुलनात्मक तक्त्यामधील एकत्रित दरांचे अवलोकन करता M/s. Visionary Healthcare, Ahmedabad यांचे एकत्रित रु.९,४५,०००/- मात्र दर निम्नतम असल्याचे दिसून आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ओ.टी. व वॉर्डकरीता सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक M/s. Visionary Healthcare, Ahmedabad यांचे साहित्यांबाबत, प्रत्यक्ष वापर करणाऱ्या डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यानंतर कोणते साहित्य खरेदी करावयाचे याबाबत अंतीम निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना असे ठरले की, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ओ.टी. व वॉर्डकरीता सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेकामी आयटमवाईज ई-निविदांची मागणी केली होती. मात्र निम्नतम दरधारकाने काही साहित्याचे दर नमूद केलेले नाही. त्यामुळे सदर दरधारकाचा दर, एकत्रित दर निश्चित करण्यासाठी ग्राहय धरता येणार नाही. याकरीता सदरहू ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी एकत्रित किटसाठी ई-निविदांची मागणी करणेत यावी.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१६ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Imported Operation Table With Accessories खरेदी करणेकामी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागात मेंदूच्या व मणक्याच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर विभागात दोन Operation Table असून त्यापैकी ऑपरेशन थिएटरमध्ये एक Maquet (Imported) तर दुसरा Janak (Indian) कंपनीचा आहे. दोन्ही Operation Table हे सध्या व्यवस्थित कार्यान्वित आहेत. त्यापैकी Indian Operation Table वर जनरल शस्त्रक्रिया करण्यात येतात, परंतू मेंदूच्या व मणक्याच्या काही गुंतागुंतीच्या (Complicated) शस्त्रक्रिया असल्यास उपलब्ध एका Imported Operation Table वर शस्त्रक्रिया करण्यात येतात. परंतु, त्यांना Janak (Indian) टेबलच्या ऐवजी अजून एक Imported Table पाहिजे जेणेकरुन दोन्ही सर्जन यांना Imported Table वर मेंदूच्या व मणक्याच्याशस्त्रक्रिया करता येऊ शकेल. त्यामुळे अजून एक नग Imported Operation Table ची न्यूरो ऑपरेशन थिएटरविभागाने दि.१३/०९/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.२९/१२/२०१४) चे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे. ज्यामध्ये रुग्णांची शस्त्रक्रिया करतेवेळी Operation Table वर रुग्णांना वेगवेगळया बाजूने (Different Position During Surgery)करता येऊन सुलभ प्रकारे शस्त्रक्रिया करता येऊ शकतील. Janak (Indian) कंपनीचा Operation Table हा सदर Operation Theatre मध्ये Standby म्हणून एकच वापरता येईल. नविन Imported Operation Table with Accessories सह खरेदीकामी अंदाजे रु.३५,००,०००/- (अक्षरी रु – पस्तीस लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१८/०२/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.६४ अन्वये सदर Imported Operation Table with Accessories खरेदीकामी मा. उच्च न्यायलयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यास तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.३५,००,०००/- (अक्षरी रु – पस्तीस लाख मात्र) चे खर्चास व विहित पध्दतीने ई– निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार दि.१८/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये विधी विभागास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेबाबत कळविण्यात आलेले होते, त्यानूसार सिव्हील अर्ज क्र.८३३५ दि.२४/०७/२०१५ अन्वये सदर खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना - पुणे, सामना – औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती.तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date | Received Place |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Austin HealthCare, Pune | 29/01/2016 | Shirdi Office |
| 2 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 30/01/2016 | Mumbai Office |
| 3 | M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai | 29/01/2016 | Mumbai Office |
| 4 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 29/01/2016 | Mumbai Office |

वरीलप्रमाणे खरेदीकामी वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात येऊन त्यावर संबंधित वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे. सदरहू प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Austin Health Care, Pune यांनी निविदेमध्ये Indian कंपनीचे Specification दिलेले आहे व आपणास Imported कंपनीचा ऑपरेशन टेबल पाहीजे असल्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येऊन पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा. रुग्णालय उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला होता.

| अ.नं. | निविदा धारकांचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | M/s. EsbeeDynamed Pvt. Ltd., Mumbai. | २३,९५,३५०/- |
| २ | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | २४,८०,०००/- |
| ३ | M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai | ३८,६०,०००/- |

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Imported OperationTable with Accessories खरेदीकामी M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.२३,९५,३५०/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले असून निम्नतम दरधारक M/s. EsbeeDynamed Pvt. Ltd., Mumbai यांना दराबाबत चर्चा करणेसाठी उपसमिती समोर बोलविण्यात यावे अशी उपसमितीची शिफारस दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्य करण्यात आली. परंतू M/s. EsbeeDynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे Technical Specification मध्ये न्यूरो विभागातील ऑपरेशन करीता टेबलला लागणारे Accessories नसल्यामुळे सदर टेबल खरेदी करुन काही उपयोग होऊ शकत नाही त्यामुळे पुरवठा धारकांना सदर Accessories देणगी स्वरुपात देणेबाबत विनंती केली असता त्यांनी त्यापैकी फक्त Head Clamp देणेबाबत ई मेल पत्राद्वारे कळविलेले होते.

M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांनी दिलेली रक्कम रु.२३,९५,३५०/- इतकी असून त्यामधून कस्टम ड्यूटी वजा करुन आपणास रक्कम अदा करण्यात येईल असे कळविलेले होते. परंतू M/s. Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai यांनी आम्ही दिलेले दर हे कस्टम ड्यूटी सोडून दिलेले आहे. त्यामुळे सदर Imported OperationTable with Accessories खरेदीकामी दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास दि.२३/१२/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी ०५ ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर खरेदीकामी प्राप्त ०५ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला असून प्राप्त सर्व निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. |
| 02 | M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai |

| | |
|---|---|
| 03 | M/s. Formachem Enterprises, Pune |
| 04 | M/s. Pinnacle Biomed Pvt.Ltd. |
| 05 | M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon |

वरीलप्रमाणे Imported OperationTable with Accessories खरेदीकामी दुस-यांदा मागविलेल्या ई-निविदेस अनुसरुन पात्र ०५ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description of Work / Item(s) | Imported Operation Table With Accessories & Consumables As Per Technical Specification With 5 Years Warranty For Neuro Operation Theatre – Qty. 01 No. |
|---|---|---|
| 1 | Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon | 2102760.00 |
| 2 | Formachem Enterprises, Pune | 2985400.00 |
| 3 | South India Surgical Co. Ltd., Chennai | 5849244.66 |
| 4 | Pinnacle Biomed Pvt.Ltd., Mumbai | 7902500.00 |
| 5 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. | 95784121.47 |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांचे रु.२१,०२,७६०/- हे दर निम्नत्तम येत असून त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description of Items | Qty. | M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon | |
|---|---|---|---|---|
| | | | Unit Price incl. all Taxes | Total Price |
| 1. | Imported Operation Table With Accessories & Consumables As Per Technical Specification With 5 Years Warranty For Neuro Operation Theatre | 1 No. | 1782000.00 | 1782000.00 |
| | GST - | | | 320760.00 |
| | Net Cost in Rs. | | | 2102760.00 |

वरीलप्रमाणे तक्त्यानुसार M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांचे दर हे सर्व ॲक्सेसरीजसह निम्नत्तम येत असून त्यांनी Imported Operation Table ची मुळ किंमत रु.१७,८२,०००/- इतकी दिलेली असून त्यावर GST रु.३,२०,७५०/- इतकी रक्कम दिलेली असून टेबलची एकुण किंमत रु.२१,०२,७६०/- इतकी होत आहे, तसेच M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांनी निविदेमध्ये कस्टम डयुटीची रक्कम नमुद केलेली नसल्यामुळे संस्थानला कस्टम डयुटी वेगळी अदा करावी लागणार आहे. तसेच सदरहू टेबल आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करावा लागणार आहे.

तथापि दि.०७/०३/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२०७ अन्वये वैद्यकिय संचालक यांनी माहिती दिली की, नविन खरेदी करण्यात आलेले Cathlab मशिनची कस्टम डयुटी माफ करणेसाठी रुग्णालय विभागामार्फत प्रयत्न करणेत येत आहेत, परंतु कस्टम्स विभागाचे नियम पाहता, १००% मोफत असणा-या रुग्णालयांसाठीच कस्टम डयुटी माफ करण्यात येते. यावर चर्चा होऊन, नविन कॅथलॅब मशिनची कस्टम डयुटी भरणेत येऊन, सदरहू मशिन्स संस्थानचे ताब्यात घेण्यात यावे, असे ठरले व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे नविन साहित्य खरेदी करतेवेळी कस्टम डयुटी भरणेत येऊन, साहित्य ताब्यात घेण्यात यावे व त्यानंतर कस्टम डयुटी माफ होणेकरीता प्रयत्न करणते यावे, अशा सुचना दिल्या आहेत.

तरी M/s. Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.२१,०२,७६०/- (अक्षरी रु. एकवीस लाख दोन हजार सातशे साठ मात्र) चे खर्चास तसेच सदर Imported Operation Table आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करणेस

तसेच कस्टम डयुटी अदा करुन टेबल ताब्यात घेणेस व त्यावेळेस असलेली कस्टम डयुटी भरणेस मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी प्र.वैद्यकिय संचालक यांनी माहिती दिली की, प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांनी बनावट कागदपत्रे सादर केलेली आहेत, असा आरोप एका पुरवठाधारकाने केलेला आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Imported Operation Table With Accessories खरेदीकामी निम्नतम दर प्राप्त झालेले पुरवठाधारक Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांचेविषयीच्या तक्रारीची शहानिशा करुन सदरहू प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना असे ठरले की, Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांचेविषयीच्या तक्रारीची शहानिशा केली असता, तक्रार खरी असलेचे निदर्शनास आले. यावरुन Mysource Innoventures Pvt.Ltd., Gurgaon यांनी खोटी कागदपत्रे सादर करुन संस्थानची दिशाभूल केलेली असल्यामुळे त्यांची अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करणेत यावा व प्रस्तावितकामी फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१७ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वार्ड/ विभागाने हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. सदर खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी M/s. Sai Enterprises, Shrirampur यांनी दिलेल्या कोटेशन नुसार विविध वार्ड/ विभागासाठी हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी अंदाजे ७,३१,५४४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.७,३१,५४४/-(अक्षरी रुपये सात लाख एकतीस हजार पाचशे चव्वेचाळीस मात्र) चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०७/२०१७ निर्णय क्र.६४० अन्वये मान्यता मिळलेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी ०६ ऑनलाईन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०६ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि. १९/०३/२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यातील Lowest प्रमाणे Supplier चा विविध Item करिता तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr.No | Name of Supplier | Description of Work / Item(s) | No.of Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **M/s. S COMFORT SEATING SYSTEM** | Revolving chair full back rest with side arm with wheel | 25 | 3658.00 | 91450.00 |
| | | 5 Seater chair | 10 | 5310.00 | 53100.00 |
| | | Trolley for Defibrillator Machine | 2 | 4720.00 | 9440.00 |
| | | Plastic Stool | 50 | 236.00 | 11800.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **165790.00** |
| 2 | **M/s. SHREE IMPEX** | Bed side Locker | 17 | 2440.00 | 41480.00 |
| | | Fowler bed (Hydraulic) | 5 | 9000.00 | 45000.00 |
| | | Personal Locker (1*6) | 4 | 7350.00 | 29400.00 |
| | | Office Table with Drawer | 13 | 4543.00 | 59059.00 |
| | | Dressing Trolley | 6 | 4770.00 | 28620.00 |
| | | Cupboards | 6 | 9350.00 | 56100.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **259659.00** |
| 3 | **M/s. Aurangabad iron industries** | Plastic chair | 17 | 499.00 | 8483.00 |
| | | Wheel Chair | 1 | 5150.00 | 5150.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **13633.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | **M/s. Midmark (India) Private Limited** | Cardiac Table | 4 | 2429.00 | 9716.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **9716.00** |
| 5 | **Neat Wind Industries Limited** | E.C.G. machine Trolley | 6 | 3600.00 | 21600.00 |
| | | Crash cart trolley with alkon box | 2 | 16000.00 | 32000.00 |
| | | Dressing drum (big) | 3 | 2600.00 | 7800.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **61400.00** |

तरी वरील प्रमाणे पुरवठा आदेश जात असलेल्या ०५ पुरवठा धारकांशी चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देणेस तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्तनम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१८ **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरीता इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेकामी पुरवठाधारकाबरोबर चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

दि.३०/०३/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२८३ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता आवश्यक असलेले इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१३,२३,९४७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती तसेच उपरोक्त खरेदीची रक्कम रु.१० लाखपेक्षा जास्त मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.६८५०/२०१५ अन्वये दि.१७/०७/२०१५ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३०/०१/२०१६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यास अनूसरुन तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त झालेल्या तीन सिलबंद तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात येऊन त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला व सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली होती, परंतु वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s.Saitrons Medical Equipments, Loni यांनी निविदेसोबत अनामत रक्कम दिलेली नव्हती, तेंव्हा त्यांना अनामत रक्कमेबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली असता त्यांनी अनामत रक्कम भरण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र झाल्यामुळे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा पात्र होत असल्यामुळे, दि.०२/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविणेस मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.०६/०९/२०१६ ते दि.२१/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती. तसेच दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली होती. त्यामुळे दि.२५/१०/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा ई-निविदा दि.१६/०३/२०१७ अखेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन एकही ऑनलाईन ई-निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१४/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये शासन नियमवलीनुसार प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.२७/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनुसरुन एक ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त झालेली ०१ तांत्रिक ई-निविदा दि. ०४/०८/२०१७ रोजी मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आलेली आहे. सदर निविदेमध्ये निविदाधारकाने Annual Turnover आपण ई-निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे न दिल्यामुळे सदर निविदा अपात्र ठरविण्यात आली होती, त्यामुळे Instrument खरेदीकामी चौथ्यांदा फेर ई-निविदा मागविण्यास दि.०९/०८/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळलेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी ०२ ऑनलाईन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०२ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर दोनही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला असून दोन्हीही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Pinnacle Biomed, Mumbai |
| 02 | M/s. Farmachem Enterprises, Pune |

वरीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी पात्र असलेल्या ०२ ऑनलाईन कमर्शिअल निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sl.No | Description of Work / Item(s) | PINNACLE BIOMED PVT LTD | | Farmachem Enterprises | |
|---|---|---|---|---|---|
| | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1 | Bone Cutter (Lions Jaw) double action 2 Nos | 3367.00 | 6734.00 | 64931.00 | 129862.00 |
| 2 | Bone Nibbler 2 Nos | 2639.00 | 5278.00 | 64931.00 | 129862.00 |
| 3 | Rib Raspater 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 10384.00 | 20768.00 |
| 4 | Adson Tooth Forcep 6” 4 Nos | 255.00 | 1020.00 | 2847.00 | 11388.00 |
| 5 | Adson Plain Forcep 7” 4 Nos | 291.00 | 1164.00 | 4076.00 | 16304.00 |
| 6 | Fine Needle Holder 4 Nos | 437.00 | 1748.00 | 15213.00 | 60852.00 |
| 7 | Mixter Forcep Small 4 Nos | 328.00 | 1312.00 | 8574.00 | 34296.00 |
| 8 | Mixter Forcep Medium 4 Nos | 364.00 | 1456.00 | 9686.00 | 38744.00 |
| 9 | Mixter Forcep Large 4 Nos | 437.00 | 1748.00 | 9175.00 | 36700.00 |
| 10 | Fine Dissecting Scissor 6” 4 Nos | 328.00 | 1312.00 | 18443.00 | 73772.00 |
| 11 | Fine Dissecting Scissor 9” 4 Nos | 437.00 | 1748.00 | 25188.00 | 100752.00 |
| 12 | Bone Finer 2 Nos | 1274.00 | 2548.00 | 8777.00 | 17554.00 |
| 13 | Varicose Vein Stripper- 8 Nos | 819.00 | 6552.00 | 31461.00 | 251688.00 |
| 14 | Tooth Forcep 6” – 10 Nos | 218.00 | 2180.00 | 1630.00 | 16300.00 |
| 15 | Tooth Forcep 7” – 10 Nos | 273.00 | 2730.00 | 1810.00 | 18100.00 |
| 16 | Tooth Forcep 8” - 10 Nos | 309.00 | 3090.00 | 2016.00 | 20160.00 |
| 17 | Fine Needle Holder 6” - 4 Nos | 364.00 | 1456.00 | 12701.00 | 50804.00 |
| 18 | Fine Needle Holder 7” - 4 Nos | 437.00 | 1748.00 | 15322.00 | 61288.00 |
| 19 | Fine Needle Holder 8” - 4 Nos | 473.00 | 1892.00 | 17355.00 | 69420.00 |
| 20 | Loins Bone Nibbler Double Action -2 Nos | 3367.00 | 6734.00 | 64931.00 | 129862.00 |
| 21 | Hand Instruments Suction Cannula 10 mm -1 Nos | 728.00 | 728.00 | 8113.00 | 8113.00 |
| 22 | Hand Instruments Suction Cannula 5 mm -1 Nos | 692.00 | 692.00 | 9661.00 | 9661.00 |
| 23 | Hand Instruments Suction Cannula 3 mm - 1 Nos | 692.00 | 692.00 | 26029.00 | 26029.00 |
| 24 | Knel Graper 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 0.00 | 0.00 |
| 25 | Knel Graper 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 0.00 | 0.00 |
| 26 | Babcock 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 50395.00 | 100790.00 |
| 27 | Babcock 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 99700.00 | 199400.00 |
| 28 | Allies Forcep 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 46040.00 | 92080.00 |
| 29 | Allies Forcep 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 0.00 | 0.00 |
| 30 | Biopolar 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 81907.00 | 163814.00 |
| 31 | Biopolar 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 0.00 | 0.00 |
| 32 | Scissor 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 51638.00 | 103276.00 |
| 33 | Scissor 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 99700.00 | 199400.00 |
| 34 | Duckbell 5mm - 2 Nos | 4368.00 | 8736.00 | 40440.00 | 80880.00 |
| 35 | Duckbell 3mm - 2 Nos | 4004.00 | 8008.00 | 99700.00 | 199400.00 |
| 36 | Needle Holder (R) - 1 Nos | 6916.00 | 6916.00 | 52666.00 | 52666.00 |
| 37 | Needle Holder (L) - 1 Nos | 6916.00 | 6916.00 | 52666.00 | 52666.00 |
| 38 | Trocars (Sharp) 12mm -- 4 Nos | 5096.00 | 20384.00 | 34850.00 | 139400.00 |
| 39 | Trocars (Sharp) 10mm -- 4 Nos | 4732.00 | 18928.00 | 20188.00 | 80752.00 |
| 40 | Trocars (Sharp) 5mm - 6 Nos | 4368.00 | 26208.00 | 18769.00 | 112614.00 |
| 41 | Trocars (Sharp) 3mm - 4 Nos | 4004.00 | 16016.00 | 24497.00 | 97988.00 |
| 42 | Trocars (Sharp) Blunt -2 Nos | 4004.00 | 8008.00 | 24497.00 | 48994.00 |
| 43 | Reducer Tube or Cap 5-12 -4 Nos | 1092.00 | 4368.00 | 7271.00 | 29084.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 44 | Reducer Tube or Cap 10-5 -4 Nos | 1092.00 | 4368.00 | 3254.00 | 13016.00 |
| 45 | Reducer Tube or cap 10-3/5-3 -2 Nos | 1092.00 | 2184.00 | 0.00 | 0.00 |
| 46 | Laproscopic Maryland 5mm -2 Nos | 4368.00 | 8736.00 | 39880.00 | 79760.00 |
| 47 | Laproscopic Maryland 3mm -2 Nos | 4004.00 | 8008.00 | 99700.00 | 199400.00 |
| 48 | Laproscopic Hook 5mm -1 Nos | 4368.00 | 4368.00 | 17260.00 | 17260.00 |
| 49 | Laproscopic Hook 3mm -1 Nos | 4004.00 | 4004.00 | 0.00 | 0.00 |
| 50 | Vere's Needle -2 Nos | 2184.00 | 4368.00 | 6646.00 | 13292.00 |
| 51 | Clot Forceps -2 Nos | 6916.00 | 13832.00 | 0.00 | 0.00 |
| 52 | Triproance Forceps -2 Nos | 7644.00 | 15288.00 | 0.00 | 0.00 |
| 53 | Stone Removal Forceps -4 Nos | 7644.00 | 30576.00 | 0.00 | 0.00 |
| | | | **367238.00** | | **3408211** |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Pinnacle Biomed, Mumbai यांचे निम्नत्तम दर प्राप्त झालेले असून इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी रक्कम रु.३,६७,२३८/- (अक्षरी रु.तीन लाख सदुसष्ठ हजार दोनशे अडवतीस मात्र) इतका खर्च येईल.

तरी M/s. Pinnacle Biomed, Mumbai यांचेबरोबर चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास व सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**प्रस्तावित खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Pinnacle Biomed, Mumbai हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. प्राप्त निम्नतम दर व इतर पुरवठाधारकांचे दर यामध्ये खुपच तफावत असलेबाबत उपसमितीचे त्यांचेबरोबर चर्चा केली व चांगल्या प्रतीच्या साहित्याचा पुरवठा करणेच्या त्यांना सुचना केल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरीता इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेकामी M/s. Pinnacle Biomed, Mumbai यांचे एकत्रित रु.३,६७,२३८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१९ **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल E.N.T. O.T. करीता ENT Micro Debrider System खरेदी करणेकामी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

दि.२३/०५/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३२२ अन्वये १ नग E.N.T Micro Debrider System विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.२०,७३,३७५/- चे खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणेस व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळालेली होती त्यानूसार सिव्हील अप्लीकेशन नं.६८४६ दि.१७/०७/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३०/०१/२०१६ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त झालेली नसल्यामुळे दि.१७/०५/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०९/२०१६ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनुसरुन एकच ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाली होती.

दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन देखील एकच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.०६/१०/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.१६/०३/२०१७ अखेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन एकच ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे दि.१४/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये शासन नियमावलीनुसार प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.२७/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास

अनुसरुन एक ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेली आहे, अशा एकुण ०२ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01 | Unique Endoservices, Pune | 28/03/2017 |
| 02 | Pridex Medicare Pvt.Ltd., Pune | 15/03/2017 |

वरीलप्रमाणे प्राप्त ०२ ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा दि.१९/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊनसदर ०२ कमर्शियल ई-निविदा दि.०४/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांचे दर निम्नतम येत होते. परंतू Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांनी कस्टम ड्यूटीच्या रक्कमेत अडचणी निर्माण झाल्यामुळे याकामी चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यास दि.२३/१२/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरून उपरोक्त खरेदीकामी दोन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या असून प्राप्त ०२ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर दोनही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून दोन्हीही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | Unique Endoservices, Pune |
| 02 | Pridex Medicare Pvt.Ltd., Pune |

वरीलप्रमाणे E.N.T Micro Debrider System खरेदीकामी चौथ्यांदा मागविलेल्या ई-निविदेस अनुसरुन पात्र ०२ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description of Work / Item(s) | E.N.T. Micro Debrider System With Accessories & Consumables As Per Technical Specification With 5 Years Warranty For E.N.T. Operation Theatre For Shri Sainath Hospital, Shirdi – Qty. 01 No. |
|---|---|---|
| 1 | Unique Endoservices, Pune | 2128000.00 |
| 2 | Pridex Medicare Pvt.Ltd., Pune | 2103667.60 |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांचे रु.२१,०३,६६७.६० हे दर निम्नतम येत असून त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. no. | Description of Items | Qty. | Pridex Medicare Pvt.Ltd., Pune | |
|---|---|---|---|---|
| | | | **Unit Price incl. all Taxes** | **Total Price** |
| 1. | E.N.T. Micro Debrider System With Accessories & Consumables As Per Technical Specification With 5 Years Warranty For E.N.T. Operation Theatre For Shri Sainath Hospital, Shirdi. | 1 No. | Euro 22500 (1 Euro = Rs.79.9114) | 1798006.50 |
| | | GST | Euro 2700 (1 Euro = Rs.79.9114) | 215760.78 |
| | | | Total Cost in Rs. | 2013767.28 |
| | Custom Duty | | Euro 1125 (1 Euro = Rs.79.9114) | 89900.32 |
| | | | Net Cost in Rs. | 2103667.60 |

वरीलप्रमाणे तक्त्यानुसार M/s. Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांचे दर हे सर्व ॲक्सेसरीजसह निम्नत्तम येत असून त्यांनी E.N.T Micro Debrider System ची मुळ किंमत रु.१७,९८,००६.५० इतकी दिलेली असून त्यावर GST रु.२,१५,७६०.७८ इतकी रक्कम दिलेली असून सिस्टम खरेदीकामी एकुण रक्कम रु.२०,१३,७६७/- इतका खर्च येणार आहे व कस्टम डयुटीची रक्कम रु.८९,९००/- संस्थानला वेगळी अदा करावी लागणार आहे त्याकरीता E.N.T Micro Debrider System आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून कस्टम डयुटीच्या रक्कमेमध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करावा लागणार आहे.

तथापि दि.०७/०३/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२०७ अन्वये वैद्यकिय संचालक यांनी माहिती दिली की, नविन खरेदी करण्यात आलेले Cathlab मशिनची कस्टम डयुटी माफ करणेसाठी रुग्णालय विभागामार्फत प्रयत्न करणेत येत आहेत, परंतु कस्टम्स विभागाचे नियम पाहता, १००% मोफत असणा-या रुग्णालयांसाठीच कस्टम डयुटी माफ करण्यात येते. यावर चर्चा होऊन, नविन कॅथलॅब मशिनची कस्टम डयुटी भरणेत येऊन, सदरहू मशिन्स संस्थानचे ताब्यात घेण्यात यावे, असे ठरले व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे नविन साहित्य खरेदी करतेवेळी कस्टम डयुटी भरणेत येऊन, साहित्य ताब्यात घेण्यात यावे व त्यानंतर कस्टम डयुटी माफ होणेकरीता प्रयत्न करणते यावे, अशा सुचना दिल्या आहेत.

तरी Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांचेबरोबर चर्चा / वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.२०,१३,७६७/- (अक्षरी रु. वीस लाख तेरा हजार सातशे सदुसष्ठ मात्र) चे खर्चास तसेच सदर E.N.T Micro Debrider System आयात करणेकामी वित्त विभागामार्फत L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करणेस तसेच कस्टम डयुटी अदा करुन E.N.T. Micro Debrider System ताब्यात घेणेस व त्यावेळेस असलेली कस्टम डयुटी भरणेस मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावितकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी एकत्रित दरावर २% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल E.N.T. O.T. करीता ENT Micro Debrider System खरेदी करणेकामी Pridex Medicare Pvt.Ltd., Pune यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या मुळ दरावर २% सुट स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच याकामीची कस्टम डयुटी संस्थानमार्फत भरणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२० **श्री साईनाथ रुग्णालयातील General Operation Theater विभागाकरीता Fully Automated Horizontal Autoclave Machine खरेदी कामी पुरवठा धारकाबरोबर चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील General Operation Theater यांचे मागणीप्रमाणे जुने २ ऑटोक्लेव्ह मशिन Buyback करुन नविन २ नग ऑटोक्लेव्ह मशिन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदेव्दारे खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,३६,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.४०२ अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१२/१२/२०१६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन तीन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.त्यास अनसुरुन प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 13/12/2016 |
| 2 | M/s. Periclave, Mumbai | 13/12/2016 |
| 3 | M/s. Steri Techno Fab, Ahmedabad | 09/12/2016 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.२०/०३/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात

आला होता व त्यावर श्री साईनाथ रुग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटर विभागातील इनचार्ज सिस्टर व वैद्यकिय अधिक्षिका यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

"साईनाथ हॉस्पिटल जनरल ओ.टी.मध्ये सध्या असलेले Nat Steel कंपनीचे Autoclave सन २००८ पासून वापरात असून व्यवस्थित चालु Condition मध्ये आहे. कुठलीही तक्रार नाही Result पण चांगला आहे."

परंतु M/s. Austin HealthCare, Pune यांना दि.२३/०५/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४१४ अन्वये संस्थानच्या खरेदी प्रक्रियेमधील काळया यादीत टाकण्यात आलेले आहे, त्यामुळे प्राप्त निविदांमधील M/s. Austin HealthCare, Pune यांची निविदा रद्द झाल्यामुळे उपरोक्त खरेदीकामी कमर्शियल दोनच निविदा पात्र होत आहेत व तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत कमी तीन निविदाधारकांचे दर प्राप्त होणे आवश्यक असल्यामुळे वरील ई-निविदा रद्द करुन उपरोक्त खरेदीकामी दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास दि.१८/०७/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळलेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी ०३ ऑनलाईन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर खरेदीकामी प्राप्त ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला असूनप्राप्त तीनही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Periclave, Mumbai |
| 02 | M/s. Pinnacle Biomed Pvt.Ltd., |
| 03 | M/s. Shree Enterprises, Nagpur |

वरीलप्रमाणे ऑटोक्लेव्ह मशिन खरेदीकामी पात्र असलेल्या ०३ ऑनलाईन कमर्शिअल निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे-

| Sl. No | Description of Work / Item(s) | Shree Enterprises, Nagpur | | PINNACLE BIOMED PVT LTD | | PERICLAVE, Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1 | Fully Automated Horizontal Autoclave Machine with 5 years warranty Against Buyback of old 2 Nos.Horizontal Autoclave Machine as per technical specification of Shri Sainath Hospital, Shirdi -2 Nos | 1396000/- | 2792000/- | 1296666/- | 2593332/- | 1038400/- | 2076800/- |
| 2 | Buyback value of old Horizontal Autoclave Machine -2 Nos | 20000/- | 40000/- | 35000/- | 70000/- | 20000/- | 40000/- |
| | **Total Amt.in Rs.** | | **2832000/-** | | **2663332/-** | | **2116800/-** |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Periclave, Mumbai यांचे दर रक्कम रु.२०७६८००/- हे निम्नत्तम येत असून त्यांनी जुन्या मशिनची Buyback Value रु.४०,०००/- इतकी देऊ केलेली असून सदर जुन्या मशिनची रक्कम वजा जाता रक्कम रु. २०,३६,८००/- (अक्षरी रु.वीस लाख छत्तीस हजार आठशे मात्र) इतका खर्च येईल.

तरी M/s. Periclave, Mumbai यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील General Operation Theater विभागामधील जुने ०२ नग Fully Automated Horizontal Autoclave Machine बायबॅक करुन नवीन ०२ नग मशिन खरेदी करणेकामी M/s. Periclave, Mumbai यांचे एकत्रित रु.२०,३६,८००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२१ **श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU/GICU व साईनाथ रुग्णालयातील Opthal Ward/ Genral O.T. या विभागाकरीता Video Laryngoscope With Blade खरेदीकामी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयातील विभागांकरीता ०६ Set Video Laryngoscope With Blade विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. १२,६८,०१६.०० (अक्षरी रू. बारा लाख अडुसष्ट हजार सोळा मात्र) चे खर्चास दि. २५/०२/२०१७, निर्णय क्र. १३७ (१७) अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना ई- मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. ऑनलाईन निविदा विक्रीची मुदत दि. २४/०७/२०१७ ते दि. १०/०८/२०१७ अशी ठेवण्यात आलेली होती. सदर निविदेस अनुसरुन सदर निविदेस अनूसरुन ०३ ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई निविदेस दि. १०/०८/२०१७ रोजीचे टिप्पणीन्वये एक आठवड्याची म्हणजे दि. १४/०८/२०१७ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आलेली होती.त्यानुसार प्राप्त झालेल्या खालील ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.३०/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

सदर तांत्रीक बाबींचा तुलनात्मक तक्ता बघता असे निदर्शनास आले की Care Mediquip, Mumbai यांनी अनामत रक्कम व निविदा किंमत ही ऑनलाईन न देता डी.डी. स्कॅन करुन अपलोड केलेले आहे परंतू त्यांनी डी.डी. रुग्णालये खरेदी विभागाकडे जमा केलेले नाहीत तसेच त्यांनी Technical Specification अपलोड करतांनी Video Laryngoscope With Blade ऐवजीVideo Laryngoscope & Flexible Intubation Video Endoscope With Monitor चे Technical Specification अपलोड करुन दिलेले आहे. त्यामुळे Care Mediquip, Mumbai यांची निविदा अपात्र ठरविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा ई-निविदा मागविण्यास दि.०३/११/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळलेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार सदर खरेदीकामी ०२ ऑनलाईन ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या आहेत.परंतू खरेदीकामी कमीत कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे दि.२८/०२/२०१८ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.०६/०३/२०१८ पर्यंत पहिल्यांदामुदतवाढ देण्यात होती त्यानूसार सदर खरेदीकामी ०१ ऑनलाईन ई निविदा प्राप्त झालेली आहेत अशा एकूण ०३ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर खरेदीकामी प्राप्त ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ चे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला असून प्राप्त तीनही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Amrit Surgical Co., Pune |
| 02 | M/s. Care Mediquip, SilvassaVapi |
| 03 | M/s. Shree Enterprises, Pune |

तरी वरीलप्रमाणे पात्र ०3Online कमर्शियल ई-निविदा दि. १९/०३/२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Description | Care Mediquip, Salvasa | | Shree enterprises, Pune | | Amrit Surgical Company, Pune | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate | Total Amt. in Rs. | Rate | Total Amt. in Rs. | Rate | Total Amt. in Rs. |
| | VIDEO LARYNGOSCOPE WITH REUSABLE BLADES & ACCESSORIES & 5 YEARS WARRANTY AS PER TECHNICAL SPECIFICATION FOR SHRI SAIBABA & SAINATH HOSPITAL, SHIRDI. | 2666666.00 | 15999996.00 | 146720.00 | 880320.00 | 176064.00 | 1056384.00 |
| Total Amt. in Rs. | | | 15999996.00 | | 880320.00 | | 1056384.00 |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Shree Enterprises, Pune यांचे दर निम्नतम येत असून त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु. ८८०३२०/- इतका खर्च येणार आहे.

तरी M/s. Shree Enterprises, Pune यांचेबरोबर चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देणेस तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Shree Enterprises, Pune यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेसमोर चर्चेअंती त्यांनी एकत्रित दरावर रु.१०,०००/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU/GICU व साईनाथ रुग्णालयातील Opthal Ward/ Genral O.T. या विभागाकरीता Video Laryngoscope With Blade खरेदीकामी M/s. Shree Enterprises, Pune यांचे एकत्रित रु.८,७०,३२०/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२२ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे Oxygen, Nitrous, Carbon खरेदी करणेकामी पुरवठाधारकाबरोबर चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल करीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीस व याकामी येणा-या सर्वसमावेशक एकूण रक्कम रू. ६५,१५,२५०/- इतक्या खर्चास दि.२३/०५/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४१६ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई- निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२५/१०/२०१७ रोजीचे मंजुर टिप्पणीअन्वये दि. १०/११/२०१७ पासून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या व Online ई-निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/११/२०१७ ठेवण्यात आलेली होती.तसेच पुरवठाधारकांचे शंका निरसन करण्यासाठी दि. १३/११/२०१७ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आलेली होती. परंतु त्यास अनुसरून दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उदयोग- ४ दि.१ डिसेंबर२०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील– निविदा कालावधीस मुदतवाढ –

“निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन ई-निविदा असणे आवश्यक आहे. जर निविदा चौकशीला कमी प्रतीसाद, म्हणजे ३ पेक्षा कमी ई-निविदा मिळाले तर निविदा उघडण्याच्या कालावधीस प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ दयावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील ३ पेक्षा कमी ई-निविदा मिळाल्या तर दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात यावी. तथापि, त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये. अंतिमतः खरेदी अधिका-याने निविदेमधील विविध अटी आणि कामाच्या व्याप्तीचा फेरविचार करुन, पुन्हा निविदा प्रक्रिया सुरु करावी. पुन्हा निविदा मागविल्यानंतर देखील निविदेला ३ पेक्षा कमी प्रतीसाद मिळाला तर,

खरेदी अधिकारी ज्या निविदाकाराने (एल-१ निविदाकार) निविदा दाखल केली असेल त्या निविदाकाराची, निविदेमध्ये उल्लेख केलेल्या मुल्यांकन निकषाच्या अधीन राहून, निवड करुन त्या निविदाकाराबरोबर करार करेल'', अशी तरतुद आहे.

वरीलप्रमाणे निर्णयानुसार उपरोक्त खरेदीचे ई-निविदेकामी पहिल्यांदा एक आठवडयाची म्हणजे दि.०१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता मिळालेली होती.त्यास अनुसरून एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा एक आठवडयाची म्हणजे दि.०८/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती तरीदेखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही म्हणजेच एकुण दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि. २१/११/२०१७ रोजीचे मंजुर टिप्पणीअन्वये पुन्हा दि. ०८/०२/२०१८ पासून फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून Online ई-निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत २६/०२/२०१८ ठेवण्यात आलेली होती. परंतु सदर खरेदीकामी एकच निविदा प्राप्तझालेल्या आहेत त्यामुळे जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदरचे खरेदीकामी ई-निविदेस एक आठवडयाची म्हणजे दि.०६/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती तरीदेखील निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१३/०३/२०१८पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती त्यास अनुसरून ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहे. प्राप्त झालेल्या ०२ निविदा दि. १९/०३/२०१८ रोजीच्या मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून सदर निविदांमधील बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून प्राप्त दोन्हीही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 1 | M/s. Balaji Trading Co., Sangamner |
| 2 | M/s. Sagar Gas, Aurangabad |

वरीलप्रमाणे ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी पात्र असलेल्या ०२ ऑनलाईन कमर्शिअल निविदा दि. १९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Units | M/s. Balaji Trading Co., Sangamner | | M/s. Sagar Gas, Aurangabad | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1 | Oxygen Gas | 123875 .00 | Cubic | 32.14 | 3981342.50 | 40.32 | 4994640.00 |
| 2 | Nitrous | 10149895.00 | Litre | 029 | 2943469.55 | 0.34 | 3450964.30 |
| 3 | Carbon Dioxide | 3000.00 | Cubic | 128.57 | 385710.00 | 70.00 | 210000.00 |
| | Total Amt. in Rs. | | | | 7310522.05 | | **8655604.30** |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Balaji Trading Co., Sangamner यांचे अ.नं. १ व २ करीता दर निम्नत्तम येत असून अ.नं. ३ करीता त्यांनी दि. २०/०३/२०१८ रोजी ई-मेलव्दारे Carbon Dioxide मोफत देणेबाबत कळविले आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी रक्कम रु.६९,२४,८१२./- इतका खर्च येणार आहे.

तरी M/s. Balaji Trading Co., Sangamner यांचेबरोबर चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता पुढील पाच वर्षाकरीता आवश्यक असणारा Oxygen, Nitrous, Carbon गॅस खरेदी करणेकामी M/s. Balaji Trading Co., Sangamner यांचे एकत्रित रु.६९,२४,८१२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२३ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालया करीता सन २०१७-१८ या वर्षाच्या खरेदीतील दर प्राप्त न झालेल्या औषधे/ सर्जिकल साहित्य (Part "A" & "B") खरेदी करणेकामी पुरवठाधारकाबरोबर चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीकामी दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावास अनुसरुन दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०३/२०१७ ते दि.१५/०४/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या, तसेच शासन नियमानुसार दि.२४/०४/२०१७ पर्यंत पहिल्यांदा व दि.०१/०५/२०१७ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात येऊन तांत्रिक सिलबंद निविदा (Hard Copy) दि.०५/०५/२०१७ पर्यंत स्विकारण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या १४८ तांत्रिक सिलबंद व ऑनलाईन निविदा दि.११/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करुन वित्त विभाग व अंतर्गत लेखापरिक्षण विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून पात्र १०० ऑनलाईन कमर्शिअल ई– निविदा दि.०७/०६/२०१७ रोजी खरेदी समिती सभेपुढे पुरवठाधारकांचे समक्ष उघण्यात येऊन PART “A” व “B” एकुण ३०३६ आयटम पैकी ७५३ आयटमकरीता एकुण ५१ पुरवठाधारकांना दि.२५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले असून उर्वरीत २२८३ आयटमकरीता दि.१४/०७/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आली. त्यानुसार दि.२४/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या, त्यास अनुसरुन १४१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या, परंतु जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली त्यास अनुसरुन एकुण १६१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

प्राप्त झालेल्या १६१ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडून ई-निविदेतील तांत्रिक बाबी वित्त विभागामार्फत तपासून घेण्यात आलेल्या असून प्राप्त तांत्रिक बाबींचे तक्त्यानुसार एकुण ४३ पार्टपैकी पार्ट नं.१९ करीता एकुण ०७ निविदाधारकांपैकी ०३ निविदाधारक तांत्रिक बाबी प्रमाणित असल्यामुळे त्यांच्या कमर्शियल बाबींच्यानिविदा दि.०६/०९/२०१७ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असूनउर्वरीत ४२ पार्टमधील आयटमकरीता फेर ई-निविदा मागविण्याकामी दि.२९/०९/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११/१०/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे / सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असुनत्यास अनुसरुन प्राप्त (पार्ट A व B मिळून) एकुण १०७ Online ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. दि.०३.११.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष तांत्रीक ई-निविदा उघडण्यात येऊन पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड दि.०९.११.२०१७ रोजी उघडण्यात येऊन दि.१४/११/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीलनिर्णय क्र. १००५(०१) अन्वये- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे / सर्जिकल साहित्य / On Consignment साहित्य (Part “A”व“B”) खरेदीकामी निम्तनम दराने पुरवठा आदेश देण्यात आहे.

परंतु ज्या औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी दर प्राप्त झालेले नाहीत व त्यांची प्रत्येकी किंमत रु.३ लाखापेक्षा कमी आहे अशी औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रकांची मागणी करण्यास व ज्या औषधे/ सर्जिकल साहित्याची एकुण किमंत प्रत्येकी रु.३ लाखापेक्षा जास्त आहे ते खरेदी करणेकामी विहित पद्धतीने ई-निविदा मागविण्यास दि.२२/१२/२०१७ रोजीचे टिपणीन्वये ६०४ औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन (दरपत्रक) मागविण्यास तसेच ९७ औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यास तसेच उपरोक्त खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे प्रसिध्दी विभागामार्फत पुणे, मुंबई, नाशिक, नागपुर, औरंगाबाद, बैंगलोर, हैद्राबाद, दिल्ली, पंजाब, अहमदाबाद या शहरामधील वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२०/०२/२०१८ अखेर ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेले होते. परंतु ब-याच निविदाधारकांनी दुरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे, त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदर ई-निविदेस दि.२०/०२/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये ऑनलाईन ई-निविदेस दि.२७/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती.त्यास अनुसरुन Part “A” करीता १० ऑनलाईन ई-निविदा व Part“B” करीता ३ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या एकुण १३ ऑनलाईन ई-निविदा दि.१२/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समिती समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता वित्त विभागाकडून तपासून घेण्यात आलेला असून Part "A" करीता पात्र १० पैकी ०९ निविदाधारक पात्र आहेत तर Part"B" करीता तीनही निविदाधारक पात्र असून अशा एकुण १२ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदादि.१९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले असून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर तुलनात्मक तक्यातील निम्नतम दरानुसार खालील पुरवठाधारकांना पुरवठा आदेश जात आहे.

PART - A - Hospital Medicines Surgicals

| Sr. No. | Name of Supplier | Total Amt in RS. |
|---|---|---|
| 1 | M/s. B L Lifesciences Pvt Ltd., New Delhi | 8447152.00 |
| 2 | M/s. Boston Scientific India Pvt Ltd., Mumbai | 872233.60 |
| 3 | M/s. ContacareOphthalmics& Diagnostics, Dabhasa (Vododara - Gujarat) | 665280.00 |
| 4 | M/s. Critical Care Systems, Pune | 315000.00 |
| 5 | M/s. Getwell Distributors, Nashik | 1961080.00 |
| 6 | M/s. India Medtronic Pvt. Ltd., Mumbau | 360000.00 |
| 7 | M/s. Konark Remedies, Akola | 1693250.00 |
| 8 | M/s. Liberty Pharma, Nashik | 3209113.00 |
| 9 | M/s. Surgilink, Shrirampur | 3770960.00 |
| | Total Amt in Rs. | 21294068.60 |

PART - B - Balloon, Ortho, Neuro Surgery Implant Etc. On Consignment Basis

| Sr. No. | Name of Supplier |
|---|---|
| 1 | M/s. Boston Scientific India Pvt Ltd., Mumbai |
| 2 | M/s. Critical Care Systems, Pune |
| 3 | M/s. Human Touch Technologies, Pune |

Part "A" करीता पात्र ०९ पुरवठाधारकांशी तर Part"B" करीता ०३ पुरवठाधारकांशी चर्चा/ वाटाघाटीकरुन पुरवठा आदेश देण्याची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्वत सादर.

**प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले असता, M/s. B L Lifesciences Pvt Ltd., New Delhi, M/s. Liberty Pharma, Nashik व M/s. Surgilink, Shrirampur यांचे प्रतिनिधी सभेसमोर उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी, त्यांना मिळणाऱ्या पुरवठा आदेशावरील मुळ रकमेमध्ये अनुक्रमे २%, ३% व १% अशी सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालया करीता सन २०१७-१८ या वर्षाच्या खरेदीतील दर प्राप्त न झालेल्या औषधे/ सर्जिकल साहित्य (Part "A" & "B") खरेदी करणेकामी M/s. B L Lifesciences Pvt Ltd., New Delhi यांच्या एकत्रित रकमेवर २%, M/s. Liberty Pharma, Nashik यांच्या एकत्रित रकमेवर ३% व M/s. Surgilink, Shrirampur यांच्या एकत्रित रकमेवर १% सुट स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच जे पुरवठाधारक चर्चेसाठी उपस्थित नव्हते, त्यांचे ई-निविदेमधील मुळ दर स्विकारणेत येऊन, त्यांनाही पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२४ **श्रींचे समकालीन साईभक्त/संत यांचे फोटो लावणेबाबत नियमावली निश्चित होणेबाबत.**

श्रीसाईबाबांचे हयातीमध्ये अनेक साईभक्तांनी श्रींची नि:सीम सेवा केली आहे. याबाबतचे पुरावे संस्थान प्रकाशीत श्रीसाईसच्चरित या ग्रंथामध्ये अढळुन येतात. श्रींचे समकालीन त्यांची सेवा केलेल्या एकूण ५३ भक्तांचे फोटो फार पुर्वीपासुन समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावण्यात आलेले आहेत. सध्याच्या काळामध्ये श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार वाढल्यामुळे अनेक श्रींचे समकालीन साईभक्त यांचे वंशज त्यांचे पुर्वजांच्या

श्रीसाईसच्चरिताचा दाखला दाखवुन अशाच पद्धतीने फोटो समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावणेबाबत आग्रह धरत आहेत. याबाबतचे काही अर्ज मंदिर विभागाकडे उपलब्ध आहेत. परंतु, सध्या समाधी मंदिर सभामंडपामध्ये फोटो लावणेची जागा अपुरी असल्याने व यापुर्वी मा.पद्मश्री.सदाशिवराव गोरक्षकर, संस्थान म्युझियम सल्लागार यांनीही असे कळविले होते की, समाधी मंदिरात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना या फोटोंबाबत माहिती अढळत नसल्याने येथुन पुढे नवीन फोटो लावू नये असे सूचित केले होते. तसेच याकरीता श्रींचे साईसच्चरित ग्रंथामध्ये उल्लेख असलेले सर्व फोटोंची आर्ट गॅलरी तयार करण्यात यावी व त्याठिकाणी सर्व फोटोंसह श्रीसाईबाबांशी आलेल्या प्रसंगचित्रासह माहिती विविध भाषांमध्ये देऊन आर्ट गॅलरी तयार करण्यात यावी ज्यामुळे भक्तांना भक्तांचा संदर्भ लक्षात येईल अशी सूचना केली होती. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०५, निर्णय क्र.८१४ नुसार याबाबत सविस्तर विषय ठेवण्यात आलेला होता. त्यावेळी चर्चा होऊन, संस्थानमार्फत मंदिर परिसरामध्ये योग्य ठिकाणी आर्ट गॅलरी तयार करुन प्रस्तावात नमूद केलेले श्रीसाईबाबांचे समकालीन संत व साईभक्त यांचे फोटो श्रीसाईसच्चरितामधील सविस्तर माहिती तसेच प्रसंगचित्रासह लावणेत यावे, असे ठरले. ठरावानुसार मंदिर विभागाचे दि.२७/१२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार याबाबत बांधकाम विभागास ठरावाची प्रत पुढील कार्यवाहीकरीता देण्यात आलेली आहे. त्याबाबत बांधकाम विभागामार्फत योग्य ती कार्यवाही चालू आहे.

आता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ चे सभेत श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे औचित्य साधुन असे साईभक्त ज्यांनी यापुर्वी आपले पुर्वजांचा फोटो समाधी मंदिरामध्ये लावणेबाबतचा विषय ठेवण्यात आला होता. सदर सभेमध्ये त्यावर निर्णय क्र.५६० नुसार यावर सविस्तर चर्चा  होऊन, प्रथमत: उपसमिती सभेसमोर म्युझियम हॉल येथील दर्शनीय भागात श्रींचे समकालीन साईभक्त/ संत यांचे फोटो लावणेकामीची नियमावली तयार करणेत यावी व त्या नियमावलीनुसारश्रींचे श्रींचे समकालीन साईभक्त/ संत यांचे फोटो लावणेकामीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले आहे.

**प्रस्ताव**:- श्रींचे म्युझियम हॉल येथील दर्शनीय भागात अथवा नव्याने तयार होणा-या आर्ट गॅलरी येथे श्रींचे समकालीन देवतांचे, संतांचे व साईभक्त यांचे फोटो लावणेबाबत नियमावली निश्चित होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय**:- श्रींचे म्युझियम हॉल येथील दर्शनीय भागात अथवा नव्याने तयार होणा-या आर्ट गॅलरी येथे श्रींचे समकालीन देवतांचे, संतांचे व साईभक्त यांचे फोटो लावणेकामी खालीलप्रमाणे नियमावली असावी, असे मत आहे. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

| अ.क्र | नियमावली तपशील |
|---|---|
| ०१ | फक्त संस्थान प्रकाशित ओवीबद्ध श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख असलेले देव, संत व साईभक्त यांचेच फोटो समाधी मंदिर किंवा म्युझियम हॉल येथे लावणेत यावेत. इतर साईभक्तांचे फोटो लावणेत येऊ नये. |
| ०२ | श्रीसाईबाबांचे सानिध्यात असलेले व समकालीन असलेले साईभक्तांचेच फोटो लावणेत यावे इतरांचे लावु नये. |
| ०३ | ज्या साईभक्तांचे फोटो लावायचे आहेत त्यांचा श्रीसाईबाबांशी प्रत्यक्ष संबंध आलेला असावा. |
| ०४ | श्रीसाईसच्चरिताचे प्रस्तावना व उपोद्धात यामध्ये असलेले व्यक्ती व ज्या व्यक्तींचा श्रीसाईसच्चरितातील ओवीबद्ध अध्यायामध्ये उल्लेख नाही. अशा व्यक्ती/साईभक्तांचा फोटो लावू नये. |
| ०५ | श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर अनुभव असलेले व श्रीसाईसच्चरिताचे व्यतिरीक्त कोणत्याही ग्रंथामध्ये उल्लेख असल्यास अशा देवांचे, संतांचे व साईभक्तांचे फोटो लावू नये. |
| ०६ | ओवीबद्ध श्रीसाईसच्चरितात उल्लेख असलेले सर्व देवांचे, संतांचे व साईभक्तांचे या सर्वांची विभागणी करुन फोटो स्वतंत्र लावण्यात यावे. त्यांचा श्रीसाईबाबांशी आलेला प्रसंग, ग्रंथाच्या ओवी, इ. प्रसंगचित्रासह स्वतंत्र म्युझियम तयार झाल्यानंतर एकाच ठिकाणी लावण्यात यावे. |

उपरोक्त नियमावलीनुसार खालीलप्रमाणे फोटो लावणेसंबंधी निर्णय होणेस मान्यता असावी.

१ सध्या समाधी मंदिर व म्युझियम हॉल येथे लावलेल्या देवांचे, संताचे व साईभक्तांचे फोटो लावलेले आहेत. त्यामध्ये ज्यांचा उल्लेख ओवीबद्ध श्रीसाईसच्चरिताचे अध्यायामध्ये उल्लेख आढळुन येत नाही त्यांचे फोटो ठेवावे किंवा काढुन टाकावे? याबाबत निर्णय व्हावा.

२. त्याचप्रमाणे सदर नियमावली निश्चित झाल्यानंतर फोटो लावणेसंबंधी साईभक्तांचे मागणी असल्यास संबंधीतांचा नियमावलीप्रमाणे संस्थान प्रकाशित ओवीबद्ध श्रीसाईसच्चरितामध्ये देव, संत व साईभक्त यांचा उल्लेख तपासुन त्यांचे अर्जाची मंदिर विभागामार्फत शाहनिशा करुन मा.व्यवस्थापन समितीची आवश्यक ती मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करणेस मान्यता असावी.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्रींचे समकालीन देव, संत व भक्त यांचे फोटो लावणेकामीची नियमावली होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समकालीन साईभक्त/ संत यांचे फोटो लावणेची नियमावली निश्चित करणे ही बाब धोरणात्मक असून, त्यावर व्यवस्थापन समिती सभेमध्ये सर्व सदस्यांसोबत चर्चा होणे आवश्यक आहे, त्यामुळे उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**मात्र श्रींच्या समकालीन सर्व भक्तांचे फोटो मंदिरात व मंदिर परिसरामध्ये लावण्यात आले आहेत. त्यामुळे आता पुन्हा त्याबाबत विचार करण्याची आवश्यकता नाही. यास्तव सदर विषय आता बंद करावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

२५ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारसी करणेत आल्या.**

(१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक/ परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१२८ अन्वये बाहययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र.१२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक/ परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०३** **श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेसंबंधी देशातील विविध राज्ये, शहरे व आयोजक इ. बाबीं निश्चित करणेसाठी दि.१७.०३.३०१८ रोजी झालेल्या पादुका दर्शन सोहळा समितीचे इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यांमध्ये श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा याकार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले अर्ज हे पादुका दर्शन सोहळयाच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर सादर करावेत व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रूपरेषा ठरवून त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरलेले आहे.

त्यानुसार श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रमाचे आयोजन होणेसाठी शनिवार, दि.१७/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे श्री साईनिवास अतिथीगृह येथे बैठक पार पडलेली असून, या बैठकीस खालीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे मा. विश्वस्त व अधिकारी/कर्मचारी तसेच शिर्डी ग्रामस्थ उपस्थित होते.

१) मा.श्री. बिपीनदादा कोल्हे, अध्यक्ष, पादुका अर्ज छाननी समिती
२) मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी .
३) मा.ॲड. श्री. मोहन जयकर, सदस्य, पादुका अर्ज छाननी समिती.
४) मा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य, पादुका अर्ज छाननी समिती.
५) मा.श्रीमती, रुबल अग्रवाल, भा.प्र.से, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी तथा सदस्य पादुका दर्शन छाननी समिती.
६) मा.श्री. मनोज घोडे पाटील, उपजिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
७) श्री.एस.व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी

८) श्री.यु.पी. गोंदकर, प्रशासकीय अधिकारी
९) श्री.बी.बी. घोरपडे, मुख्य लेखाधिकारी तथा प्र. प्रशासकीय अधिकारी
१०) श्री.ए.आर. औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी
११) श्री.राजतिलक बागवे, प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष
१२) श्री.अतुल कुंभकर्ण, लिपिक-टंकलेखक, शताब्दी कक्ष

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी संपूर्ण माहिती सादर केलेले अर्जधारकांना पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर चर्चेसाठी बोलविणेत आलेले होते. त्यानुसार उपस्थित आयोजक व त्यांचे प्रतिनिधी तसेच शिर्डी ग्रामस्थ यांची नोंद घेण्यात आली असून, त्याचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविलेला आहे.

| अ.नं. | शहर | मंदिर / ट्रस्टचे नांव | प्रतिनिधीचे नांव | बैठकीस उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| मध्यप्रदेश | | | | |
| ०१. | भोपाळ | शिर्डी साईधाम धमार्थं संस्था | --- | **गैरहजर** |
| ०२. | इंन्दोर | श्री इंदौर शहर साईभक्त सेवा समिती | --- | **गैरहजर** |
| ०३. | रतलाम | श्री साईसेवा समिती ट्रस्ट | श्री. संदीप कोळबंकर | हजर |
| ०४. | हारदा | श्री साईधमा सिरली | --- | **गैरहजर** |
| ०५. | इंन्दोर | देवी अहिल्या साई सोशल भक्त समिती | श्री. महेश अग्रवाल | हजर |
| ०६. | बालाघाट | श्री शिवसाई ट्रस्ट | श्री. अनिल त्रिपाठी | हजर |
| उत्तर प्रदेश | | | | |
| ०७. | लखनौ | साई आश्रम ट्रस्ट | ------ | **गैरहजर** |
| ०८. | गाझियाबाद | नगर निगम साईमंदिर सेवा ट्रस्ट | ------ | **गैरहजर** |
| ०९. | लखनौ | श्री. पंकज ओहरी | श्री. पंकज ओहरी | हजर |
| १०. | लखनौ | नुर ई साई ट्रस्ट | श्री. मनिष श्रीवास्तव (प्रस्ताव मागे घेत असलेबाबत समक्ष सांगितले) | हजर |
| ११. | अलिगढ | साई सेवा संस्थान मंदिर | ------ | **गैरहजर** |
| १२. | लखनौ | अव्हीका ग्रुप लि. | श्री. मनिष श्रीवास्तव | हजर |
| १३. | आग्रा | साईधाम मंदिर | डॉ. अशोक रैना | हजर |
| कर्नाटक | | | | |
| १४. | मंगलोर | श्री शिर्डी साईबाबा मंदिर | श्री. विश्वास कुमार दास | हजर |
| १५. | उडपी | शिर्डी साईबाबा मंदिर | श्री. शशी नाईक | हजर |
| दादरा नगर हेवली | | | | |
| १६. | नरोली | ओम श्री साईराम सेवा ट्रस्ट | श्री. परमार | हजर |
| १७. | दमन | डॉ. रमनीलाल मेडीकल रिलीफ ॲण्ड रिसर्च ट्रस्ट | श्री. राजेंद्र भुजबळ | हजर |
| राजस्थान | | | | |
| १८. | जयपूर | श्री शिर्डी साईनाथ विकास समिती | ------ | **गैरहजर** |
| १९. | भिलवाडा | शिव साई मंदिर | श्री. रमेश पाटील | हजर |
| आंध्रप्रदेश | | | | |
| २०. | अक्कमपेठ, नेल्लोर | श्री शिर्डी साई भगवान मंदिरम कमिटी, नेल्लोर | ------ | **गैरहजर** |
| २१. | नरसापूर वे.गो | साई चॅरीटेबल ट्रस्ट, नरसापूर | श्री. रुद्रा नागेश बी | हजर |
| २२. | नेल्लोर | श्री शिर्डी साई चॅरीटेबल ट्रस्ट, नैलोर | श्री. के. श्रीनिवासुलू रेड्डी | हजर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | ॲगलूर जि.कृ | श्री शिर्डी साई सेवा संगम | ------ | **गैरहजर** |
| २४. | मदनापल्ली | श्री शिर्डी साईबाबा मंदिर ट्रस्ट | श्री.एन.बाबू. नायडू | हजर |
| २५. | काशिबुगा, | श्री शिर्डी साईबाबा ध्यान मंदिर, काशीबुगा | श्री. जी.जे.एस रेड्डी | हजर |
| २६. | मैलावरम,कृष्णा | श्री शिर्डी साईबाबा मंदिर | श्री. व्ही. बालाजी प्रसाद | हजर |
| २७. | मदनापल्ली | श्री साईबाबा टेंम्पल ट्रस्ट | ------ | **गैरहजर** |
| तेलंगना | | | | |
| २८. | मेठापल्ली | शिर्डी साईबाबा संस्थान ट्रस्ट | ------ | **गैरहजर** |
| २९. | मेहेबुबनगर | शिर्डी साईबाबा मंदिर | श्रीमती जी पदमजा | हजर |
| ३०. | हैदाबाद | साईबाबा संस्थान मंदिर | ------ | **गैरहजर** |
| ३१. | बागंबरपेठ | श्री शिर्डी साईबाबा संस्थान | श्री. पी.व्ही. साई | हजर |
| ३२. | हैदाबाद | श्री. डी.जे. टेलिव्हीजन प्रा.लि. (गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी आरती) | श्री. श्रीनिवास राव | हजर |
| ३३. | हैदाबाद | श्री शिर्डी साईबाबा संस्थान ट्रस्ट, दिलसुखनगर | श्री. के.लिंगय्या | हजर |
| दिल्ली | | | | |
| ३५. | दिल्ली | श्री साई प्रेरणा ट्रस्ट, प्रतिमपुरा | श्री. शिवांक मैनागी | **गैरहजर** |
| ३६. | दिल्ली | श्री सदगुरू साईनाथ मित्र मंडळ | श्री. रितेश गुप्ता/श्री राहूल गुप्ता | हजर |
| अंदमान व निकोबार | | | | |
| ३७. | पोर्ट ब्लोअर | अंदमान साई सेवा समिती | श्री. साईबाबा चेगंट्टी | हजर |
| ओरीसा | | | | |
| ३८. | भुवनेश्वर | श्री साई सेवा ट्रस्ट | श्री. ज्ञानेंद्र सेनापती | हजर |
| ३९. | नवरंगपुरा | श्री साई सेवा ट्रस्ट | ------ | **गैरहजर** |
| झारखंड | | | | |
| ४०. | जमशेदपुर | श्री साईपरिवार विश्व सेवा संस्थान | श्री. कौशिक | हजर |
| ४१. | रांची | श्री साईधाम सेवा ट्रस्ट | श्री. प्रसन्न कुमार | हजर |
| महाराष्ट्र | | | | |
| ४२. | पुणे | श्री. साईगंगा प्रतिष्ठान | श्री. राजेंद्र जाधव | हजर |
| ४३. | कल्याण | श्री. संत राम मारूती समाधी संस्थान | श्री. शिरीष गडकरी | हजर |

तसेच या बैठकीमध्ये पश्चिम बंगाल, केरळ, पंजाब व हरियाणा या राज्यांचे आयोजक /प्रतिनिधी गैरहजर होते. तसेच या बैठकीत शिर्डी येथील खालीलप्रमाणे ग्रामस्थ उपस्थित होते.

| अ.नं. | शिर्डी ग्रामस्थांचे नांव | अ.नं. | शिर्डी ग्रामस्थांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. कैलासबापू कोते. पा. | ०६. | मा. श्री. कमलाकर कोते. पा. |
| २. | मा. श्री. विजय कोते. पा. | ०७ | मा. श्री. नितीन कोते. पा. |
| ३. | मा. श्री. निलेश कोते. पा. | ०८. | मा. श्री. राहुल गोंदकर. पा. |
| ४. | मा. श्री. शिवाजी गोंदकर. पा. | ०९. | मा. श्री. अमित शेळके.पा. |
| ५. | मा. श्री. सुनिल बारहाते.पा. | | |

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये माहे-ऑगस्ट महिन्यामध्ये शिर्डी येथे श्री गंगागिरी महाराज सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष व सदरहू सप्ताह हा दुर्मिळ योगा-योग आहे. श्री साईबाबा व श्री गंगागीर महाराज हे समकालीन संत होते. सप्ताह कालावधीमध्ये लाखो भाविक, गोर-गरिब, शेतकरी, वारकरी, हे सप्ताहाचे ठिकाणी भेट देतात या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये श्रींचे पादुका ह्या भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी विनंती सर्व शिर्डी ग्रामस्थांनी मा. पादुका अर्ज छाननी समितीचे बैठकीत केली. तसेच समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी महाराष्ट्रातील पुणे व

कल्याण येथील आयोजकांना बैठकीस उपस्थित राहणेसाठी सांगितले होते त्याप्रमाणे तेथील आलेल्या आयोजकांशी ही चर्चा करण्यात आली.

मा.पादुका दर्शन छाननी समिती अध्यक्ष व सदस्य यांनी विविध राज्यातील उपस्थित प्रस्तावधारक/ आयोजकांशी विविध मुद्यांवर चर्चा करून खालीलप्रमाणे **निर्णय** घेतलेले आहेत.

**प्रस्तावः- अ)** श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये शिर्डी येथे आयोजीत करण्यात येणा-या श्री गंगागीर महाराज यांचे १७१ व्या सप्ताहात दि. १६/०८/२०१८ ते दि.२३/०८/२०१८ या कालावधीमध्ये शिर्डी येथील कार्यक्रमांचे ठिकाणी श्रींचे पादुका भाविकांचे दर्शनार्थ ठेवण्यात याव्यात.

**ब)** मा. पादुका दर्शन छाननी समितीने आयोजकांनी पाठविलेल्या प्रस्तावाची छाननी तथा आयोजकांशी चर्चा करुन खालीलप्रमाणे प्रस्ताव अंतिम करण्यात आले :

| अ.नं. | राज्य | शहर | आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव | मा. छाननी समिती मार्फत निश्चित करण्यात आलेली दिनांक व महिना | कि.मी. | प्रवासाचे साधन |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल-२०१८ | | | | | | |
| ०१. | महाराष्ट्र | पुणे | साईगंगा प्रतिष्ठाण, शनिवार पेठ | दि. १५ एप्रिल, २०१८ रात्रौ | १८४ | साईरथ |
| ०२. | दमण | * दमण | डॉ. रमनीलाल मेडीकल ट्रस्ट | दि. २६ एप्रिल, २०१८ | २७१ | साईरथ |
| * दमण येथील ट्रस्टचे मुख्य आयोजक उपस्थित नव्हते, त्यांचे शिर्डी येथील प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामुळे दमण येथील मुख्य आयोजकांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांची मा. व्यवस्थापन समितीचे पुढील बैठकीपूर्वी समक्ष भेट घेणेबाबत व तपशिलवार प्रस्ताव सादर करणेबाबत सांगण्यात आले. प्रस्ताव सादर केल्यानंतर पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले. | | | | | | |
| मे-२०१८ | | | | | | |
| ०१. | मध्यप्रदेश | रतलाम | श्री. साईसेवा समिती ट्रस्ट, रतलाम | दि.०३ मे, २०१८ ते संध्या दि.०४ मे, २०१८ (संध्या इंदौर कडे रवाना ) | ४८२ | साईरथ |
| ०२. | | इंदौर | देवी अहिल्या साई सोशल भक्त समिती | दि.०५ मे, २०१८ ते ०६ मे, २०१८ पर्यंत | रतलामपासुन १३७ | साईरथ |
| ०३. | तेलंगना | हैदाबाद दिलसूखनगर | श्री. शिर्डी साईबाबा संस्थान ट्रस्ट | दि.१२ मे,२०१८ ते १३ मे, २०१८ पर्यंत | ५९९ | साईरथ |
| ०४. | | हैदाबाद | डी.जे. टेलिव्हीजन ॲण्ड मार्केटींग लि. श्री. साई श्रीनिवास | दि.१४ मे, २०१८ पादुका दर्शन व ०१ लाख भक्तांकरवी साई धूपारती | -- | साईरथ |
| ०५. | कर्नाटक | मंगलौर | श्री शिर्डी साईबाबा मंदिर, मंगलौर | दि.२३ मे, २०१८ ते २४ मे, २०१८ दु. ४.०० वाजेपर्यंत (त्यानंतर उडपीकडे रवाना) | ९४१ | विमान / साईरथ |
| ०६. | | उडपी | शिर्डी साईबाबा मंदिर कोडवरू , उडपी | दि.२४ मे, संध्याकाळ ते दि.२५ मे, २०१८ पर्यंत | मंगलोर पासून ५६ | विमान / साईरथ |
| उपरोक्त मंगलोर व उडपी येथील आयोजकांनी पादुका व त्यासोबत येणारे मा. विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी यांची जाणे येण्याची सोय विमानाव्दारे करण्यात येईल, असे समितीपुढे सांगितले आहे. | | | | | | |
| जून-२०१८ | | | | | | |
| अ.नं. | राज्य | शहर | आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव | मा. छाननी समिती मार्फत निश्चित करण्यात आलेली दिनांक व महिना | कि.मी. | प्रवासाचे साधन |
| ०१. | उत्तर प्रदेश | लखनौ | श्री. पंकज ओहरी | दि.०२/०६/२०१८ ते दि. ०३/०६/२०१८ | १२६८ | विमान / साईरथ |
| उपरोक्त लखनौ येथील आयोजकांनी पादुका व त्यासोबत येणारे मा. विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी यांची जाणे येण्याची सोय विमानाव्दारे करण्यात येईल, असे समितीपुढे सांगितले आहे. | | | | | | |
| ०२. | झारखंड | रांची | श्री साईधाम सेवा ट्रस्ट | दि. ०९/०६/२०१८ ते १०/०६/२०१८ | १४७९ | विमान / रेल्वे/ साईरथ |
| ०३. | उत्तर प्रदेश | आग्रा | साईधाम मंदिर | दि.२८/०६/२०१८ दुपार पासून ते दि. २९/०६/२०१८पर्यंत | दिल्ली पासून २१४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **जुलै-२०१८** | | | | | | |
| ०१. | दिल्ली | दिल्ली | श्री सदगुरू साईनाथ मित्र मंडळ | दि.३०/०६/२०१८ दुपार पासून ते ०१/०७/२०१८ पर्यंत | १२६० | विमान |
| उपरोक्त दिल्ली येथील आयोजकांनी पादुका व त्यासोबत येणारे मा. विश्‍वस्त, अधिकारी व कर्मचारी यांची जाणे येण्याची सोय विमानाव्दारे करण्यात येईल, असे समितीपुढे सांगितले आहे. | | | | | | |
| **ऑगस्ट-२०१८** | | | | | | |
| ०१. | महाराष्ट्र | शिर्डी | श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्त व्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ | दि.१६/०८/२०१८ ते २३/०८/२०१८ श्री गंगागीर महाराज सप्ताह कालावधी | -- | --- |
| **सप्टेंबर-२०१८** | | | | | | |
| ०१. | आंध्रप्रदेश | ** नेल्लोर | श्री. शिर्डी साई चॅरेटेबल ट्रस्ट | दि.१५ ते १६/०९/२०१८<br>किंवा<br>दि. २२ ते २३/०९/१८<br>किंवा<br>२९ ते ३०/०९/१८ | १०५९ | विमान / रेल्वे / साईरथ |
| ०२. | अंदमान निकोबार | ** अंदमान निकोबार | शिव साई मंदिर | दि. २४ ते ३०/०९/२०१८<br>किंवा<br>दि. ०१ ते ०६/१०/२०१८ या कालावधीत | नैलौर ते चैन्नई १७६<br>चैन्नई ते अंदमान १३५५ | साईरथ<br><br>विमान |
| ** उपरोक्त दोन्ही ठिकाणी पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी शताब्दी वर्षातील संस्थानमार्फत आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम व तेथील हवामान याची माहिती घेऊन पादुका दर्शन सोहळयाची तारीख निश्चित करणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार देण्यात आले. | | | | | | |

क) खालील प्रस्तावधारकांशी चर्चा करण्यात येऊन, तेथील पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रम देणेबाबत व त्यांच्या तारखा निश्चित करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना देण्यात आले.

| **अ.नं.** | **राज्य** | **शहर** | **आयोजक/ ट्रस्टचे / मंदिराचे नांव** |
|---|---|---|---|
| ०१. | राजस्थान | भिलवाडा | शिव साई मंदिर |

**ड) इतर शिफारसी-**

१) मा. श्री मोहन जयकर यांनी ३० ते ३१ जुलै २०१८ मध्ये लंडन येथे श्रींचे **मुळ पादुका** घेऊन जाणेबाबत सूचना केली आहे. तथापि याबाबत आयोजकांकडून कार्यक्रमाचे ठिकाण, प्रवास खर्च, परवानग्या व इत्यादी माहिती उपलब्ध झालेला नाही. तसेच याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदेशातील पादुका दर्शन सोहळयासाठी चांदीचे पादुका उपलब्ध करून देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीत यापूर्वी निर्णय झालेला आहे. तसेच विदेशात श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करावयाचे झाल्यास महाराष्ट्र शासनाची परवानगी घ्यावी लागेल असे सांगितले.

२) महाराष्ट्र राज्यातील इतर तसेच मुंबई, कल्याण येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करावयाचे झाल्यास सर्व आयोजकांना पुढील बैठकीत समक्ष बोलवून एकत्रित मोठया कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

३) जयपुर येथील इतर आयोजकांना पुढील बैठकीत बोलविण्यात यावे. तसेच राजस्थान येथील श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजनाबाबतचे सर्व अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.

४) श्रींचे पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवासादरम्यान नाष्टा, भोजन, निवासव्यवस्था, इंधन खर्च व इतर अनुषंगिक खर्च संस्थानमार्फत करावा. तसेच छाननी समितीने श्रींचे पादुका दौरा निश्चित केलेनंतर त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये.

शताब्दी निमित्त हैद्राबाद येथे एक लाख साईभक्ताकरवी बाबांची शेजारती एका सुरात गाण्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बुकात होणेसाठी आयोजित कार्यक्रमास श्रींचे पादुका दर्शनसाठी उपलब्ध करणेबाबत डि.जे. टेलीव्हीजन आणि मार्केटींग प्रा. लि. हैद्राबाद यांचे प्रस्ताव आला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/११/२०१७ रोजीचे बैठकीत 'श्रींचे पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु त्यांच्या कार्यक्रमाचे स्वरुप याकामी त्यांना संस्थानचा काय सहयोग अपेक्षित आहे, याच्या तपशीलासह त्यांना पुढील सभेसमोर सादरीकरणासाठी बोलविणे यावे' असा निर्णय झालेला आहे.

त्या अनुषंगाने आजचे समितीचे बैठकीत संबंधीत आयोजकांना बोलाविणेत आले असता, त्यांना 'शेजारती' ऐवजी 'धुपारती' चे वेळेस सदरहु कार्यक्रम आयोजित करणेबाबत सांगण्यात आले आहे व त्यास त्यांनी संमती दर्शविली आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** पादुका अर्ज छाननी समितीचे दि.१७/०३/२०१८ रोजीचे बैठकीचे इतिवृत्तातील निर्णयाची अंमलबजावणी करणेस हरकत नाही. मा. पादुका अर्ज छाननी समितीने उपरोक्त तपशिलात निश्चित केलेल्या दौ-यामध्ये नविन प्रस्तावांचा समावेश करण्यात येऊ नये. तथापि मा. पादुका अर्ज छाननी समितीने निश्चित केलेल्या पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणांची पूर्व पहाणी दौ-यामध्ये अथवा प्रत्यक्ष दौ-यामध्ये आयोजकांबाबत अथवा आयोजनाबद्दल प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणांमुळे दौऱ्याची तारीख बदलावयाची गरज भासल्यास दौरा रद्द करण्याचे किंवा तारखांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावे.

तसेच विदेशातील पादुका दर्शन सोहळयासाठी चांदीचे पादुका उपलब्ध करून देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीत यापूर्वी निर्णय झालेला आहे. विदेशात श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करावयाचे झाल्यास महाराष्ट्र शासनाची परवानगी घ्यावी लागेल.

तरी मा. पादुका दर्शन छाननी समितीच्या दि. १७/०३/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तातील शिफारसी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.२२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेसंबंधी देशातील विविध राज्ये, शहरे व आयोजक इ.बाबीं निश्चित करणेसाठी दि.१७.०३.२०१८ रोजी झालेल्या पादुका दर्शन सोहळा समितीच्या उपरोक्त इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील शिफारशीप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली व पादुका दर्शन सोहळा समितीच्या उपरोक्त बैठकीमध्ये मान्यता दिलेल्या दमण येथील डॉ. रमनीलाल मेडीकल ट्रस्ट यांना दि.२६ एप्रिल, २०१८ रोजी पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच दिनांक २५.०४.२०१८ रोजी श्री.विशाल तांडेल, दमण व लखनौ येथील अव्हीका ग्रुप लि. यांनाही पादुका द्याव्यात.**

**त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ मध्ये पादुका दर्शन सोहळयासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात, असे ठरलेले आहे. त्याप्रमाणे विदेशातील पादुका दर्शन सोहळयासाठी चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात व विदेशातील पादुका दर्शन सोहळयासाठी शासनाची पुर्व मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०४** **सौ.श्रध्दा चंद्रशेखर शुक्ल यांचा दि.३०.०४.२०१८ ते दि.०१.०५.२०१८ या कालावधीत १५० नारदीय कीर्तनकारांचा देवर्षी नारद जयंती उत्सव संस्थानमार्फत साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले आहे.

२) मा व्यवस्थापन समितीचे दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ९४४ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"-------------- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम विनामुल्य सादर करणा-या निमंत्रीत कलाकारांची चहा –पाणी – निवास भोजन व दर्शन व्यवस्था संस्थानतर्फे मोफत करण्यात यावी, असे ठरले आहे.

**प्रस्तावः-** सौ. श्रध्दा चंद्रशेखर शुक्ल, (पुर्वाश्रमीची मंदा नारायण देशपांडे) यांनी दि. २२/११/२०१७ रोजीचे पत्राव्दारे,"साईबाबांचे परमभक्त असलेल्या कै. माधवराव उर्फ शामा देशपांडे तसेच कै. उध्दवराव देशपांडे यांची नात या नात्याने, श्री साईबाबांच्या पुण्यतिथी महोत्सवात दि. १ मे २०१८ रोजी येणारा नारद जयंती उत्सव साई चरणी व्हावा अशी आम्हा महाराष्ट्रातील नारदीय कीर्तनकारांची अतीव इच्छा असून सदर उत्सव हा महाराष्ट्रातील विविध तिर्थश्रेत्री संपन्न झालेला आहे. उत्सवाचे स्वरुप दोन दिवसांचे असून, उत्सवात सकाळी पालखी, नारदीय कीर्तने, प्रवचन व परिसंवाद, स्तवनमंजिरी वाचन असा कार्यक्रम आखला जातो. तरी आपणांस या पत्राद्वारे विनंती करण्यात येते की, महाराष्ट्रातील आम्हां अंदाजे १२५ ते १५० नारदीय कीर्तनकारांना दि. २९ एप्रिल २०१८ रात्रौ ०९ नंतर ते दि. ०१ मे २०१८ सायंकाळी ०७ वाजेपर्यंत आपल्या संस्थानची निवास तथा भोजन व्यवस्था व कार्यक्रमासाठी सभागृह नि:शुल्क स्वरुपात मिळावे, ही साई चरणी प्रार्थना, असे कळविले असून सदर पत्रात (कीर्तनकारांची व्यवस्था ६ हॉल मध्ये व्हावी व कार्यक्रम साईचरणी व्हावा.) उत्सवात ३० ते ३५ कीर्तनकार साईबाबांसमोर कीर्तन हजेरी व परिसंवादात सहभागी होणार असल्याचे नमूद केले आहे.

| **उत्सवातील कार्यक्रम** | | |
|---|---|---|
| सोमवार<br>दि.३०.०४.२०१८ | स.१० वा. | नगर प्रदक्षिणा देवर्षी नारदांच्या प्रतिमेसह |
| | स.११ वा. | दीप प्रज्वलन, उद्घाटन सोहळा |
| | दु. १ ते २ वा. | मंगलाचरणाचे कीर्तन |
| | दु. ३ वा. | नवोदित कीर्तनकारांसाठी परिसंवाद |
| | दु. ४ ते ६ वा व ७ ते ८.३० | मान्यवरांची कीर्तने |
| | रात्रौ ९ वा. | भोजन, विश्रांती |
| मंगळवार<br>दि.०१.०५.२०१८ | स. ६ ते ७ वा. | साईबबांचे दर्शन |
| | स. ७ ते ८ वा | चहा, नाश्ता |
| | स. ८ ते ११.३० | मान्यवरांची कीर्तने |
| | दु. १२ ते १ वा. | भोजन |
| | द. २.३० वा. | उत्सवाचा समारोप सोहळा |

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

सौ. श्रध्दा चंद्रशेखर शुक्ल,यांनी त्यांचे प्रस्तावात दरवर्षी नारद जयंती उत्सव महाराष्ट्रातील विविध तिर्थश्रेत्री संपन्न होत असतो. यावर्षी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने शिर्डीमध्ये श्री साईबाबांच्या पुण्यतिथी महोत्सवात दि.१ मे २०१८ रोजी येणारा नारद जयंती उत्सव साई चरणी व्हावा साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** संस्थानमार्फत साज-या केल्या जाणा-या उत्सवांमध्ये नारदिय किर्तनाची परंपरा अगदी सुरुवातीपासून चालत आलेली आहे. नारदिय पध्दतीने किर्तन करण्याचा उपदेश श्री साईबाबांनी दासगणू महाराजांना केला होता. त्याची हकिगत श्री गो. र. दाभोळकर कृत श्री साईसच्चरित या ग्रथांच्या अध्याय क्रं. १५ मध्ये आलेली आहे. (ओवी क्रं. १८ ते ३६ च्या दरम्यान) त्यांनतर दासगणू महाराज साईबाबांनी दाखविलेल्या मार्गानुसार नारदिय पध्दतीने किर्तन करु लागले त्यास अनुसरुन संस्थानमध्ये आजही नारदीय किर्तनाची परंपरा सुरु आहे. तसेच शताब्दी वर्षात धार्मिक कार्यक्रमातंर्गत सदरचा नारद जयंती उत्सव कार्यक्रम आयोजित केल्यास निरनिराळया किर्तनकारांच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक, ऐतिहासीक, पौराणिक विषंयावर साईभक्त व शिर्डी ग्रामंस्थासाठी प्रबोधन होऊ शकेल.

सौ. श्रध्दा चंद्रशेखर शुक्ल, यांनी सादर केलेल्या प्रस्तावात फक्त निवास (०६ हॉल), भोजन व कार्यक्रमासाठी सभागृह निशुल्क स्वरुपात मिळणेबाबत विनंती केली आहे. परंतु कोणत्याही प्रकारच्या मानधनाची अपेक्षा केलेली नाही. तथापी सदर कार्यक्रमासाठी सर्वसाधारणपणे खालील खर्च अपेक्षित आहे.

अ) **मागणी केलेल्या बाबींचा खर्च-**

| | | |
|---|---|---|
| (१) निवास- | साईआश्रम धर्मशाळा -०६ हॉल | |
| १५० व्यक्ती X रु २०/- (सेवा आकार) X २ दिवस = | | रु. ६,०००/- |
| (२) भोजन- | सध्या मोफत प्रसादभोजन सुरु असल्याने भोजनखर्च होणार नाही. | रु. ०/- |
| (३) चहा- | १५० व्यक्ती X२ (दिवसातून दोनदा) X रु.२/-X २ दिवस = | रु. १,२००/- |
| (४) नाश्ता- | १५० व्यक्ती X रु.५/-X २ दिवस = | रु. १,५००/- |
| (५) सभागृह - | श्री साईबाबा संस्थान शताब्दी मंडप | रु. ०/- |
| | | रु. ८,७००/- |

तथापी मा व्यवस्थापन समितीचे दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ९४४ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम विनामुल्य सादर करणा-या निमंत्रीत कलाकारांची चहा –पाणी – निवास भोजन व दर्शन व्यवस्था संस्थानतर्फे मोफत करण्यात यावी, असे ठरले आहे.

ब) **तारीख व वेळेची उपलब्धतता-** शताब्दी कक्षामार्फत नियोजित केलेल्या कार्यक्रमांच्या वेळापत्रकात अर्जदाराने दिलेल्या तारखांना दुसरा कुठलाही कार्यक्रम आयोजित केलेला नाही.

तरी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) दि. ३० एप्रिल २०१८ ते दि. ०१ मे २०१८ या कालावधीत नारद जयंती उत्सव आयोजीत करणेबाबत.

२) नारद जयंती उत्सवासाठी येणा-या महाराष्ट्रातील अंदाजे १२५ ते १५० नारदीय कीर्तनकारांची दि. २९ एप्रिल २०१८ दि. ०१ मे २०१८ या कालावधीत संस्थानमार्फत निवास तथा भोजन व्यवस्था नि:शुल्क करणेबाबत.

३) सदरचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात आयोजित करणेबाबत.

सदर कार्यक्रमाचे बैठक व्यवस्थेसाठी फायबर खुर्च्या, आदि व्यवस्था संस्थानचे संबंधीत विभागाकडून उपलब्ध करुन देता येईल.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.२२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.१६ ऑगष्ट ते दि.२३ ऑगष्ट, २०१८ या कालावधीत योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२. अधिनियमाचे कमल २१ मधील पोटकलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**शासन निर्णय-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव –**

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आले होते. त्यात महंत काशिकानंद महाराज, श्री.कैलासबापू कोते आणि इतर शिर्डी ग्रामस्थ यांचे विनंतीप्रमाणे व मा.विश्वस्त श्री.सचिन तांबे यांचे शिफारसीवरुन ऑगस्ट २०१८ मध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचा समावेश करण्यात आला होता. सदरहू वेळापत्रकाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"...समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे."*

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६५४ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामधील धार्मिक कार्यक्रमांमध्ये प. पू. गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे व या सप्ताहासाठी देहू, आळंदी, पंढरपूर अशा ठिकाणच्या वारकरी सांप्रदायांनाही बोलविणेत यावे, असे ठरले.

३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ७५० खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"--------- माहे ऑगष्ट २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज सप्ताहासाठी आवश्यक असलेल्याजागेची निश्चिती शिर्डी ग्रामस्थांनी करावी व त्या जागेची लेव्हल करुन मंडप उभारणी, प्रसादाची आमटी तयार करणे, उपवासाच्यादिवशी खिचडीची व्यवस्था करणे ही कामे संस्थानमार्फत करणेत यावी अथवा या सप्ताहासाठी संस्थानमार्फत ठराविक रक्कम देण्यात यावी. यासाठी समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिर्डी ग्रामस्थांशी चर्चा करुन, यासाठीचा खर्च व संस्थानचा सहयोग याबाबत समितीस अवगत करावेव सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी,असे ठरले आहे.

**प्रस्तावना-** श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांनी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेशित केलेल्या दि.१८/०३/२०१८ रोजीच्या पत्रांमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे औचित्य साधून आपण योगीराज गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनासाठी अनुकूलता दर्शवली याबद्दल मनःपुर्वक धन्यवाद. शताब्दी वर्षातील सर्वात भव्यदिव्य कार्यक्रम अशी या सप्ताहाची देश विदेशात ख्याती व्हावी म्हणून आम्ही शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील लोक प्रयत्नशील असणार आहेत. असे नमूद करुन त्यामध्ये

**<u>क्रं. ०१ चे पत्रात</u>** (आवक नं.०२५५८६/दि.१९/०३/२०१८)-

आपण सप्ताहासाठी मंजूर केलेल्या निधीतून प्रचार- प्रसार साहित्य छपाई, स्वागत कमानी उभारणे आणि ऐनवेळी कराव्या लागणा-या व्यवस्था याचेही नियोजन करावे लागणार आहे. याबाबतची कार्यवाही पुढील महिन्यात सुरु होईल कृपया आपल्या निधी विनियोगाच्या नियोजनात या गोष्टीची नोंद असू द्यावी. (सोबत पत्राची प्रत)

**क्रं. ०२ चे पत्रात** (आवक नं.०२५५८७/दि.१९/०३/२०१८)–

आपणाशी यापूर्वी झालेल्या चर्चेनुसार सप्ताहासाठी संस्थानच्या प्रसादालयाच्या बाजूला असलेली शेती महामंडळाची जागा लागणार आहे. कृपया संबंधीत विभागाला याबाबत सूचना देऊन सदर जागा लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी. (सोबत पत्राची प्रत)

**क्रं. ०३ चे पत्रात** (आवक नं.०२५५८८/दि.१९/०३/२०१८)–

आपणाशी यापूर्वी झालेल्या चर्चेनुसार सप्ताहासाठी निश्चित केलेल्या निधीला लवकरात लवकर मंजुरी द्यावी.(सोबत पत्राची प्रत)

**क्रं. ०४ चे पत्रात** (आवक नं.०२५५८९/दि.१९/०३/२०१८)–

सदर सप्ताहासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.

१. सप्ताह परिसरात सुमारे ५०० नळाच्या तोट्या लावून त्याव्दारे पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध करुन देणे.

२. संस्थानच्या सुरक्षा विभागाशी चर्चा करुन सुमारे १०० एकर परिसरात आलेल्या भाविकांसाठी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करुन देणे आणि त्याचे सप्ताह कालावधीत नियोजन करुन देणे.

३. सप्ताहात महाप्रसादासाठी लागणारा किराणा, भाजीपाला खरेदीबाबतची टेंडर प्रक्रिया आपल्या यंत्रणेमार्फत राबविणे आणि हा खर्च आपण मंजूर केलेल्या निधीतून करणे.

४. या संपूर्ण परिसरात दिवसभर स्वच्छता करणे, जागेवरील कचरा उचलणे आणि त्याची विल्हेवाट लावणे याबाबतचे नियोजन करुन देणे. या व्यवस्थेत सप्ताहात नेहमी सुंदराबाईची टोळी यानावाने परिचित असलेल्या समूहाला समाविष्ट करुन घेणे व त्यांच्या ठरलेल्या रु.२/- लाख मानधनाची व्यवस्था करणे.

५. ३५ Walky-talky उपलब्ध करुन द्यावेत.

६. देशभरातील साई भक्त मंडळांना संपर्क करुन सप्ताहाच्या काळात जेवणाच्या पंक्तीमध्ये वाढण्यासाठी तसेच इतर सेवा करण्यासाठी आमंत्रीत करणे.

७. सप्ताह परिसरात ३० फिरते शौचालय उपलब्ध करुन देणे.

८. सप्ताहात म्हणजेच १६ ऑगष्ट ते २३ ऑगष्ट याकाळात साईबाबांच्या पादुका सप्ताहाच्या मंडपात भक्तांना दर्शनासाठी ठेवाव्यात.

९. सप्ताहाच्या काळात जेवणाच्या पंक्तीमध्ये वाढण्यासाठी दररोज ४०० महिला/पुरुष पगारी कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेत.

१०. सप्ताहाच्या मंडप व्यवस्थेसाठी निधी उपलब्ध करुन दयावा.

११. सप्ताहासाठी जेवण बनविणा-या आचा-याच्या निधीची व्यवस्था करावी.

कृपया संबंधित विभागाला याबाबत सूचना देऊन सदर व्यवस्था लवकरात लवकर पूर्ण करुन द्याव्यात हि विनंती, असे कळविलेले आहे.(सोबत पत्राची प्रत)

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत आहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वार्षिक वेळापत्रक तयार करणेत आले असून सदर वेळापत्रकात अखंड हरिनाम सत्पाह आयोजनाचा समावेश केला आहे. सदर सप्ताहाच्याआयोजनाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या सभांमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामधील धार्मिक कार्यक्रमांमध्ये प. पू. गंगागिरजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे व या सप्ताहासाठी देहू, आळंदी, पंढरपूर अशा ठिकाणच्या वारकरी सांप्रदायांनाही बोलविणेत यावेतसेच माहे ऑगष्ट २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज सप्ताहासाठी आवश्यक असलेल्याजागेची निश्चिती शिर्डी ग्रामस्थांनी करावी व त्या जागेची लेव्हल करुन मंडप उभारणी, प्रसादाची आमटी तयार करणे, उपवासाच्या दिवशी खिचडीची व्यवस्था करणे ही कामे संस्थानमार्फत करणेत यावी अथवा या सप्ताहासाठी संस्थानमार्फत ठराविक रक्कम देण्यात यावी. यासाठी

समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिर्डी ग्रामस्थांशी चर्चा करुन, यासाठीचा खर्च व संस्थानचा सहयोग याबाबत समितीस अवगत करावेव सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी,असे ठरले आहे.

याबाबत मा. विश्वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे सो. यांना मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत दि.१९/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये विनंती करणेत आली आहे. तथापी अद्यापपर्यंत त्यांचे स्तरावरुन इकडील कार्यालयास कोणताही तपशील अथवा प्रस्ताव प्राप्त नाही.

**विभागाचा अभिप्राय-** अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनाबाबत श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांचे दि.१८/०३/२०१८ रोजीच्या उपरोक्त संदर्भिय विविध पत्रांतील मागणीनुसार कार्यवाही करावयाची झाल्यास संस्थानचे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ याकामासाठी वापरावे लागेल. त्यामुळे संस्थानच्या दैनंदिन कामकाजावर याचा परिणाम होऊ शकतो. तसेच सदरचा सप्ताह हा ग्रामस्थांचे सहभागाने आयोजित करावयाचे ठरले आहे. तथापी आयोजन समितीने सर्व जबाबदारी ही संस्थानला दिली आहे तसेच या सप्ताहाचे आयोजनाकरीता येणारे अंदाजपत्रक देखील नमूद केलेले नाही. याशिवाय सदर सप्ताहाच्या आयोजनाच्या खालील बाबींची पुर्तता करणेकामी संस्थानकडे आवश्यक सक्षम यंत्रणा व मनुष्यबळ नाही. त्यामुळे सदर सप्ताहासाठी द्यावयाची रक्कम निश्चित करुन त्यांचे नोंदणीकृत अखंड हरिनाम सप्ताह समितीला देऊन सप्ताहाचे आयोजन व इतर अनुषंगिक सर्व बाबींचे व्यवस्थापन सदर समितीकडून करणे उचित होईलव संस्थानचा सहभाग हा फक्त ठराविक निधी वर्ग करणेपुरता असावा.

तथापी उपरोक्त संदर्भिय विविध पत्रांतील खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनाबाबतची आवश्यक ती सर्व कार्यवाही योगिराज सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती, शिर्डी अथवा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या दोघांपैकी कोणी करावी याबाबत निर्णय होणेबाबत.

२. अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनासाठी संस्थान प्रसादालयाच्या बाजूस असलेली महाराष्ट्र राज्य शेतीमहामंडळाची पुरेशी जागा उपलब्ध करुन देणेबाबत. (सदर जागा सप्ताहासाठी अनुकूल करणेसाठी या जागेवरील काटेरी झाडे –झुडपे काढणे, जागेच्या सपाटीकरणासह मुरुमीकरणतसेच आवश्यक रस्त्यांची कामेसंस्थानला करावी लागतील याबाबींची पुर्तता करणेसाठी जमिन ताब्यात घेतलेपासून ते सप्ताहाचे समाप्तीपर्यंत सदर जमिनीचा भाडेपट्टा संस्थानला भरावा लागेल.)

३. अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनासाठी संस्थानमार्फत आवश्यक स्टेज व मंडपांची उभारणी करणे <u>किंवा</u> त्यांचे मागणीप्रमाणे आवश्यक निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

४. अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनासाठी त्यांनी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे आवश्यक निधी उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे. <u>किंवा</u> अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनासाठी प्रचार-प्रसार साहित्य, स्वागत कमानी, आवश्यक पाणीपुरवठा, स्वच्छता, ३५-Walky-Talky, ३० फिरते शौचालय, आदि अनुषंगिक साहित्य व ऐनवेळी लागणारे आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध करुन देणेबाबत तसेच सप्ताहात महाप्रसादासाठी लागणारा किराणा, भाजीपाला, टेंडर प्रक्रिया करुन खरेदी करुन देणे.

५. अखंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वीतेसाठी सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता नियोजन, पंक्तीमध्ये जेवण वाढण्यासाठी दररोज ४०० महिला/पुरुष पगारी कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत.

६. अखंड हरिनाम सप्ताह कालावधीत श्री साईबाबांच्या पादुका सप्ताहाच्या मंडपात भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेबाबत.

७. सप्ताहासाठी जेवण बनविणा-या आचा-यांचा निधी संस्थानने देणेबाबत तसेच प्रत्येक सप्ताहात स्वच्छतेचे काम पाहणारी श्रीमती सुदंराबाई यांच्या टोळीस रु. ०२/- लक्ष मानधन देणेबाबत.

८. सप्ताहाचे काळात जेवणाच्या पंक्तीमध्ये वाढण्यासाठी देशभरातील साईभक्त मंडळाना सेवा करणेसाठी आमंत्रीत करणे.

तरी योगीराज सदगुरु श्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनासाठी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून मोठ-मोठया देणग्या प्राप्त होत असतात, याकरीता अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांचे उपरोक्त पत्रातील व यानंतरही प्राप्त होणाऱ्या पत्रामधील मागण्या अमान्य करणेत आल्या. तसेच सदरहू सप्ताहासाठी संस्थानमार्फत रु.७५,००,०००/- लाख मात्र खर्चाची रक्कम छाननी**

समिती व शासन मान्यतेने सप्ताह समितीस देण्यात यावी. संस्थानचा सहभाग केवळ सदर निधी देणेपुरताच मर्यादित राहील.

तसेच योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांच्या दर्शनासाठी सदरहू ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने, श्रींच्या पादुकांसाठी स्वतंत्र वेगळे स्टेज तयार करणेत यावे व पादुकांजवळ संस्थानच्या दक्षिणा पेटया ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सप्ताह समितीमध्ये सर्व व्यवस्थापन समिती सदस्यांचा समावेश करणेबाबत अध्यक्ष, सप्ताह समिती यांना कळविणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधून जाणाऱ्या अहमदनगर- मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर व दक्षिण बाजुस तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी उभारणेसाठी जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन देणेकामी येणाऱ्या वाढीव रु.२७,५४,३४३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद**:- अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-

१. मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने शिर्डीकडे येणारे सर्व रस्ते /महामार्गांवर आकर्षक महाव्दारांची उभारणी करणेत यावी. यासाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्यास विचारणा करणेत यावी. ते महाव्दार उभारणी करुन देण्यास तयार असतील तर त्यासाठीचा खर्च सार्वजनिक बांधकाम खात्यास देण्यात यावा अथवा त्यांचेकडून NOC घेवुन, संस्थानमार्फत महाव्दारांची उभारणी करणेत यावी, असे ठरले."

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डीशहरामधून जाणा-या अहमदनगर– मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजूस शिर्डी बायपास रस्त्याजवळ व दक्षिण बाजूस शिर्डी शिवालगत स्वागत कमानी उभारणेसाठी जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना संस्थानतर्फे रक्कम रु.९९,८६,२५२/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेत यावा. तत्पुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतूदी अन्वये राज्यशासनाचे पूर्व मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर– मनमाड राष्ट्रीय महामार्गावर (NH-160) स्वागत कमानी उभारणीकामीयेणाऱ्याअंदाजे रक्कम रु.१.४० कोटी मात्रचे खर्चास व सदरहू निधी संस्थानमार्फत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देणेकरीता तसेच त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदी अन्वये राज्य शासनाचे पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना**:- श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होतआहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. शताब्दी वर्षाचे कृती आराखड्यात संस्थानमार्फत प्रथम प्राधान्य क्रमाने उपलब्ध करावयाच्या सोयीसुविधांमध्ये शिर्डीशहरामधून

जाणा-या अहमदनगर– मनमाड (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावरशिर्डी शहराच्या उत्तरेस शासकिय विश्रामगृहाजवळ अथवा नवीन बायपास रोडजवळ तसेच शिर्डी शहराच्या दक्षिणेसशिर्डी शिवाजवळ स्वागत कमानी उभारणे प्रस्तावित आहे.

याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६१ अन्वये अहमदनगर- मनमाड राष्ट्रीय महामार्गावर स्वागत कमानी उभारणेकामी जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना संस्थानतर्फे रक्कम रु.९९,८६,२५२/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेत यावा व त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतूदी अन्वये राज्यशासनाचे पूर्व मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते.

याकामी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांची मान्यता घेणेकामी संस्थानचे जा.क्र.२४६०/२०१७ दि.०४/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्याविषयाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाने सदरहू रस्त्यावर स्वागत कमान उभारणेसाठी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग ०९ यांचा ना हरकत दाखला प्राप्त करुन घेणेबाबत कळविले होते. त्यानुसार संबंधीत विभागाचा दि.२८/११/२०१७ रोजी ना- हरकत दाखला प्राप्त करुन घेण्यात आला असून सदरहू दाखला विधी व न्याय विभाग यांना संस्थानचे दि.०४/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.

सदरहू प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे तपासणीकरीता गेला असता त्यांनी या प्रकल्पाचे आराखडे व अंदाजपत्रकात काही बदल/सुधारणा सुचविल्या असून याबाबत विधी व न्याय विभागाने दि.१५/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. सदरहू बदल करणेसाठी कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प, (सां.बा.) अहमदनगर यांना संस्थानचे दि.२०/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सा.बां., मंत्रालय, मुंबई यांनी सुचविल्याप्रमाणे स्वागत कमानी उभारणेचे आराखडयांमध्ये आवश्यक बदल करणेकामी कामी अंदाजे रक्कम रु.१.४० कोटी मात्रचे अपेक्षीत खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील नि. क्र. ५० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प,(सां.बा.) अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२३/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्तावित स्वागत कमान उभारणेसाठी सुधारीत रक्कम रु.१,६७,५४,३४३/- मात्रचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

**प्रस्ताव**:- जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर – मनमाड राष्ट्रीय महामार्गावर (NH-160) स्वागत कमानी उभारणीकरीता येणा-या अंदाजे रक्कम रु.१,६७,५४,३४३/- मात्रचे सुधारीत खर्चापैकी वाढीव रक्कम रु.२७,५४,३४३/- मात्रचे खर्चास व सदरहू निधी संस्थानमार्फत कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देणेकरीता तसेच त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतुदी अन्वये राज्य शासनाचे पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर- मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर व दक्षिण बाजुस तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी उभारणेसाठी संस्थानतर्फे सुधारित रक्कम रु.१,६७,५४,३४३/- मात्र निधी महाराष्ट्र शासनाच्या पुर्व परवानगीने जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.०७ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्त शिर्डी-कनकुरी –डोऱ्हाळे या रस्त्याचे (इजिमा-९) कि.मी.०/०० ते ६.०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या निधीच्या वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.८,१०,२०४/- मात्रला मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ पोट कलम २ (१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वतव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधिन राहून भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा यांसारख्या पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविणेसाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल. अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थाप समितीचे सभेतील निर्णयः-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७९ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*“... यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्ताने शिर्डी परीसरातील कोण - कोणते रस्ते विकसीत करावयाचे हे समिती ठरविल व समितीने निश्चित केलेले रस्ते संस्थान स्वत: विकसीत करेल. याकरीता सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले.”*

*२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.९४९ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.*

*“... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत रस्त्यांपैकी शिर्डी– कनकुरी –डो-हाळे या रस्त्यावर साईभक्तांची ये- जा राहते. याकरीता शिर्डी – कनकुरी – डो-हाळे या रस्ता ( इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.३ कोटी मात्र निधी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले व उर्वरीत रस्त्यांबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.*

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. या शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार करुन नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर कृती आराखडा अंतिम करुन केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१मार्च, २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये कृती आराखडयासमान्यता मिळालेली आहे.

सदरहू कृती आराखडयामध्ये शिर्डी परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर व जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील संस्थान व महाराष्ट्र शासन निधितुन प्रस्तावित व द्वितिय प्राधान्य गटातील केंद्र सरकारचे निधीतुन प्रस्तावीत किंमतीचा घोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कार्यकारी विभागाचे नांव | प्रथम प्राधान्य गट ( रु. कोटीत) | द्वितिय प्राधान्य गट (रु. कोटीत) | एकूण (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर | ३४.५१ | ५३८.७० | ५७३.२१ |
| ०२ | जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर | ५६.८० | २२०.५० | २७७.३० |

उपरोक्त निधी मागणी करणारा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे पूर्वतयारीकरीता संस्थान, शिर्डी नगरपंचायत व सर्व शासकीय विभागांचे संबंधित अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीत उत्सव काळात साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने शिर्डी येथे होणा-या गर्दीचा विचार करता शिर्डी परिसरातील रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सुचना केलेल्या आहेत.तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी आपत्ती व्यवस्थापन नियोजनाकरीता घेतलेल्या बैठकीत शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असलेने, गर्दीचे नियोजनाकरीता रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सूचना केल्या आहे.

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्र.प्रशा/५२५९/२०१७ दि.०१/०९/२०१७ पत्रान्वये खालील रस्त्यांचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने संस्थान मार्फत याकामी रक्कम रु.२४ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन मिळावा जेणेकरुन सदरची कामे वेळत पूर्ण करता येतील असे कळविले होते.

उपरोक्तप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेरयांनी सादर केलेल्या वरील रस्त्यांचे दुरुस्तीचे कामासाठी संस्थानकडून निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.०८/०९/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले होते.

**तदनंतर** मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता यांनी मा. मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना अग्रेषित केलेल्या दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्रात श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आपत्कालीन परिस्थितीमध्ये खालील पर्यायी रस्त्यांची सुधारणा होणेबाबतरक्कम रु. २७ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली होती.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेत सा.बां. विभाग संगमनेर यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.९४९ अन्वये प्रस्तावीत रस्त्यांपैकी शिर्डी– कनकुरी– डो-हाळे हा रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.३ कोटी मात्र निधी महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले.

वरील निर्णयानुसार शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी सदरहू रस्त्याचे तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रक व नकाशे घेणेकामी जा.नं.४९८४/२०१७ दि.२०/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना कळविणेत आले होते. यावर उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग राहाता यांनी दि.१७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरहू रस्त्याच्या कामाची रक्कम रु.३,०८,१०,२०४/- मात्रचे तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रक सादर केले आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे विषयांकीत कामी मा.व्यवस्थापन समितीने रु.३ कोटी मात्रचे खर्चास मान्यता दिलेली होती. तथापी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी त्यांचे दि.१७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.३,०८,१०,२०४/- मात्रचे सुधारीत तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रक सादर केले आहे. मा.व्यवस्थापन समितीने दिलेल्या मान्यतेपेक्षा सदरहू खर्च रु.८,१०,२०४/- मात्र इतका जास्त कळविला आहे. तरी निधी वर्ग करणेस शासन मान्यता घेणेकरीता वर नमूद वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.८,१०,२०४/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या सुधारित रु.३,०८,१०,२०४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.०८ **मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा संस्थानचे गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण (लांबी २.०० कि.मी.अंदाजित रक्कम रु.५७,०७,६६०/-) करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुद**– अधिनियमाचे कलम " १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा –अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमांन्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील. (२) विशेषकरुन आणि पोट कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेला बाधा न आणता समिती –(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेचे मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याचा प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील " अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय** –

१) दि.२७/०४/२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३६० खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, विषयांकीत रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३६,२९,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरहू रस्ता ज्यांच्या आखत्यारीत आहे त्यांची परवानगी घेऊन प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा असे ठरले."

२) दि.०८/०१/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.११ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन , मौजे निमगांव-को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा गट नं. २२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण कोणामार्फत करुन घ्यायचे. याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर फेरप्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले."

**प्रस्तावना**– वर नमुद निर्णयानुसार विषयांकीत रस्त्याचे काम संस्थान निधीतून करणेसाठी मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांना जा.नं.१३७३/२०१३ दि.२४/०७/२०१३ चे पत्रान्वये परवानगीची मागणी करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी जा.क्र./ ना.पा.वि./प्र.शा.-२/७३१०/२०१३, दि.२४/०९/२०१३ चे पत्रान्वये विषयांकीत रस्त्याचे कामास एकूण सहा अटिंचे अधिन राहून ना हरकत दाखला दिलेला आहे. मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडील वर नमूद ना हरकत दाखल्यातील अट क्र.०५ खालीलप्रमाणे आहे. –

"सदर काम जलसंपदा विभागामार्फत या विभागाकडून संस्थान निधीतून डिपॉझीट ठेव तत्वावर करण्यात येईल. यासाठीचा निधी संस्थानने या विभागाकडे वर्ग करावा. "

सदर अट क्र.५ अन्वये नियोजित कामाचे प्लॅन व एस्टिमेट विभागीय कार्यालयास सादर करावे असे उपविभागीय अधिकारी, गोदावरी उजवा तट कालवा, राहाता यांनी जा.क्र.३०६७/२०१३ दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये संस्थानला कळविले होते.

वरील विषयांकीत काम जलसंपदा विभागामार्फत नाशिक पाटबंधारे विभागाकडून ठेव अंशदान (डिपॉझीट) तत्वावर करावयाचे झाल्यास त्यासाठीचा निधी संस्थानतर्फे सदर विभागाकडे वर्ग करावा लागेल. तथापी यापूर्वी सन २००९ मध्ये सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम संस्थान निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेमार्फत करणेत आलेले आहे. रस्ते बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग हा शासनाचा तज्ञ व सक्षम विभाग आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे नियोजीत काम हे सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जलसंपदा विभाग यांचेमार्फत करावयाचे किंवा थेट संस्थानमार्फत करावयाचे याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याने, सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करणेत आला होता.

दि.०८/०१/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.११ अन्वये विषयांकीत कामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर फेरप्रस्ताव सभेपूढे सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार संस्थानचे विधी विभागामार्फत सदर प्रस्तावास मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे न्यायालयात सिव्हील अर्ज दाखल करणेकामी संस्थानचे ॲड.संजय चौकीदार यांना विधी विभागाकडील जा.नं.११६६/२०१४ दि.२०/०४/२०१४ व जा.नं.२३४३/२०१४दि.१२/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दि.२८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा.व्यवस्थापन समितीची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठीत केलेल्या मा.त्रिसदस्य समितीचा कार्यकाल संपुष्टात आलेला आहे.

नव्याने गठीत झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२, निर्णय क्र.५५६ अन्वये मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हिल अर्ज मागे (withdraw) घेणेबाबत निर्णय संमत झालेला आहे. सदरहू निर्णयानूसार संस्थान विधी विभाग यांनी त्यांचे जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२१५८/२०१६, दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्राने सदरहू सिव्हिल ॲप्लीकेशन मा.उच्च न्यायालयातून मागे घेण्यात (withdraw) आले असल्याचे कळविले आहे.

**प्रस्ताव**– प्रस्तावित नगर मनमाड ते गोदावरी उजवा कालवा संस्थानचे गट नं. २२१ व २४५ लगतचा चर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संस्थान निधीतून सन २००९ साली पूर्ण करणेत आलेला आहे. सदर रस्त्यावरुन परीसरात सुरु असलेल्या बांधकामाकरीता वीट, वाळू, खडी व मुरुमाचे तसेच पाण्याचे टॅंकर इ.जड वाहतूक सतत सुरु असल्याने काही भागात रस्ता खलेला असून जागोजागी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. संस्थानचे गट नं.१७२ मधील साई धर्मशाळेकडे जाणेकरीता सदरचे चर रस्त्यापासुन अंतर्गत रस्ता असल्याने साई धर्मशाळेकडे जाणेसाठीही चर रस्त्याचा वापर होतो. मौजे निमगांव (को) गट नं.१६९ मध्ये संस्थानची कर्मचारी निवासस्थाने असून त्यालगत संस्थान कर्मचा-यांची हौसिंग सोसायटी आहे. याठिकाणी जाण्या-येण्याकरीता सदर रस्त्याचा वापर होतो. तसेच मौजे निमगांव को-हाळे गट नं.२१८, २२१ व २४५ मधील संस्थान मालकीच्या

जमिनी या रस्त्यालगत आहेत. त्यामुळे सदर रस्त्याचा वापर संस्थानकरीता मोठया प्रमाणात होणार असल्याने, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

यासाठी सदर रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेकामी मुरुम फिलिंग, एम.पी.एम. व कारपेटसह सिलकोट अशा प्रकारची कामे करावी लागतील. याकामी एसएसआर २०१७-२०१८ मधील दरसुचीचे अंदाजपत्रकानुसार रु.५७,०७,६६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. विषयांकीत रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेसाठी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुदीस अनुसरुन शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.

१) सदरील काम नाशिक पाटबंधारे विभागाकडून करावयाचे किंवा संस्थानमार्फत करावयाचे याबाबत निर्णय होणेस विनंती.

२) उपरोक्त काम जलसंपदा विभागामार्फत नाशिक पाटबंधारे विभागाकडून ठेव अंशदान (डिपॉझीट) तत्वावर करावयाचे झाल्यास त्यासाठीचा निधी संस्थानतर्फे सदर विभागाकडे वर्ग करावा लागेल.

३) मौजे निमगांव-को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा संस्थानचे गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या (लांबी २ कि. मी. व रुंदी ३.७०मी.) रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेसाठी रु. ५७,०७,६६०/- मात्र अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

तरी सदरचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणेस मान्यता मिळणेसाठी तसेच उपरोक्त १), २) व ३) चे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा संस्थानचे गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन संस्थानमार्फत करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस व येणाऱ्या अंदाजे रु.५७,०७,६६०/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

विषय नं.०९ **मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेविषयी ॲड रमेश सोनी यांचे प्राप्त झालेले अभिप्रायाबाबत चर्चा होऊन पुढील कार्यवाहीची रुपरेषा निश्चित करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मौजे निमागांव को-हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी." असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयाबाबत मा. उच्च न्यायालयास अवगत करावे लागणार आहे.

मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी दि.१९/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

This is with reference to the captioned Agreement executed between us in respect of the proposed Saibaba Multimedia Theme Park, our letter dated 3rd March 2017 addressed to your Trust regarding termination of the said Agreement and your letter dated 11thApril 2017 in this regard.

As mentioned earlier, the Shri Saibaba Sansthan Trust (Trust) has failed inter alia to make payments due to us under the Agreement from a period as long as November 2012, amounting to a failure by the Trust in complying with their obligations under the Agreement. Moreover, even after having been notified of its default, the Trust failed to remedy its default and / or breach in the manner provided in the Agreement.

Without prejudice to the above, the alleged impediment for non-payment of our dues, cited in your letter dated 11th April 2017 and not admitted by us, was never notified to us promptly at the appropriate time. In fact, the Trust should clearly have been aware of any such alleged deficiency and/ or defects in its authority and/ or powers and/ or capacity at the time of engaging our services under the Agreement and consequently has also committed breach of warranty given under the Agreement.

In light of the above and particularly the Trust's failure to remedy its long-standing default, the Agreement stands terminated by virtue of the provision of Clause 25.2 of the Agreement reproduced herein below:

"Termination of the Agreement:

25.2 If either party fail to comply with the obligations set out in this Agreement and fails to remedy that failure within 20 Business Days of receiving written notice from the other party to do so, the party not failing to comply with its obligations under this Agreement may suspend Works or terminate this Agreement by written notice to the other party without prejudice to any other rights of action or remedies it may have under this Agreement."

Without prejudice to the above, Laservision Limited reserves all its rights, claims, demands and/ or remedies in law that may be available to them against the Trust and nothing contained herein above should be deemed a waiver thereof.

लेजर व्हिजन लि., यांचेशी दि.१२/०५/२०११ रोजी केलेल्या करारामधील अट क्र.३१- Mediation Followed by Arbitration (International)मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

31.1 A party claiming that a dispute has arisen must give written notice to the other parties within 10 business Days specifying the nature of the dispute.

31.2 On receipt of the notice specified, the parties to the dispute must within 30 Businesss Days of receipt must seek to resolve the dispute.

31.3 In the event of a dispute between Laservision and the Trust, the parties agree to first make every attempt to settle the matter by mediation. An independent and impartial mediator will be selected by agreement of both parties.

31.4 For the purpose of this Agreement and to avoid any misunderstanding between the parties, the parties agree to equally share all costs relating to the assistance provided by an independent mediator.

31.5 The language to be used in the arbitration, if it was to occur, will be English.

31.6 If the parties are unable to resolve the dispute through mediation then the matter may proceed to Arbitration.

31.7 In the occurrence of arbitration, for the avoidance of doubt, the High Court of Mumbai will be considered to have unilateral jurisdiction.

मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवरनिर्णय घेणेबाबत तसेचत्यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत सदरहू सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

निर्णय क्र.९५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील तज्ञ वकिलामार्फत याबाबत सल्ला मागविणेत यावा, असे ठरले.

निर्णय क्र.९५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेपुर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲडरमेश सोनी यांना चर्चेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णय क्र.९५६ अन्वये संस्थान ॲड. पॅनलवरील ॲड. संजय चौकीदार यांना या प्रकरणाची सुरुवातीपासूनची माहिती असल्याने याकामी त्यांचा सल्ला मागविणेस तसेच निर्णय क्र. ९५७ अन्वये ठरलेप्रमाणे ॲड. चौकीदार व सललागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी यांना उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी आमंत्रीत करणेकामीमा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.७६ (१४) खालीलप्रमाणे झालेला आहे.

*".. उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत, संस्थान ॲड.पॅनलवरील ॲड.संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी हे उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे मे.लेजरव्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेविषयी ॲडसंजय चौकीदार व अँडरमेश सोनी यांचेकडून सध्या लेखी स्वरुपात मार्गदर्शन मागविणेत यावे. यथावकाश त्यांचे सोयीनुसार, त्यांना स्थानिक उपसमिती समोर चर्चेसाठी आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

वरील निर्णयानुसार ॲड. संजय चौकीदार व ॲड. रमेश सोनी यांना दि.२१/०२/२०१८ रोजी पत्र देऊन, त्यांचेकडून मार्गदर्शन मागविणेत आले. ॲड. संजय चौकीदार यांचे मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहेत.तसेच ॲड. रमेश सोनी यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांचे मार्गदर्शन सादर केले असून, त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

"...On the basis of the estimate which may be made as per clause 13, damages can be claimed from the contractor/Laservision along with refund of amount with interest. A proper notice claiming damages for unilateral termination has to be issued. The said notice would be obviously disputed by the contractor and at that stage it would be proper to invoke arbitration agreement for resolving the said dispute as per the agreement and the amount of damages and refund can be claimed in such an arbitration by the Sansthan. I feel that the Sansthan should take initiative immediately by issuing a notice to the contractor Laservision seeking damages for committing gross breach of contract due to the unilateral termination of the contract."

वरील प्रमाणे ॲड. रमेश सोनी यांनी सादर केलेले मार्गदर्शनानुसार मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशन करणेबाबत नमूद केले आहे. तरी मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे प्रकरणात चर्चा होऊन पुढील कार्यवाहीची रुपरेषा निश्चित करणेसाठी मा.व्यवस्थापन समिती समोर सादर.

निर्णय क्र.२३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड. रमेश सोनी यानी केलेल्या मार्गदर्शनानुसार मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेत यावी. यासाठी कायदेतज्ञ समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली ख्यातनाम विधीज्ञामार्फत नोटीस द्यावी, असे ठरले व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.१० **श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूकडील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्स्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईनाथ रुग्णालय हे (२०० रुम) जुनी धर्मशाळा येथे सन २००३ मध्ये स्थलांतरीत करण्यात आली आहे. श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालया कॅन्टीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. वैदयकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत कळविले आहे. सदर ठिकाणी ड्रनेज लाईन असून पावसाळयामध्ये याठिकाणी पाण्याचे डबके तयार होतात त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढतो याकरीता, सदर ठिकाणी भर टाकून पेव्हींग ब्लॉक बसवुन मिळावेत तसेच त्यापुढील परिसरात पार्किंग असल्यामुळे तेथे डांबरीकरण/ पेव्हींग ब्लॉक/ कॉंक्रीटीकरण व चेनलिंक जाळी बसवुन मिळणेबाबत इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्तावः-** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे उत्तर व पुर्व बाजू कडील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे व चेनलिंक फेनसिंग करणेकामी महाराष्ट्र राज्य दरसुची २०१७ -२०१८ नुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मटेरीयलचा तपशिल | अंदाजे अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ०१ | पेव्हिंग ब्लॉक (६० एम.एम.जाड) बसविणे. | ११,७०,४९२/- |
| ०२ | एम.एस.गेट सह चेनलिंग फेन्सिंग करणे. | २,०४,३८६/- |
| | एकूण - | १३,७४,८७८/- |
| | अधिक ५%कंटेनजन्सी - | ६८,७४४/- |
| | एकूण रुपये - | १४,४३,६२२/- |
| | अधिक १८% GST | २,५९,८५२/- |
| | **एकूण पूर्णांकीत रुपये-** | **१७,०३,४७४/-** |

**मागणी:** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पूर्व व उत्तर बाजूकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच चेनलिंक फन्सिंग करणेकामी वरीलप्रमाणे रु.१७,०३,४७४/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २० टक्के रक्कम कपात करुन B-2 म्हणजे Item Rate पध्दतीने यापुढे निविदा मागविणेत याव्यात असे ठरले. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कमेतून २० टक्के रक्कम कपात करुन विषयांकित कामासाठी रु.१३,६२,७७९/- मात्र या रक्कमेची ई निविदा मागविता येईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पूर्व व उत्तर बाजूकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच चेनलिंक फेन्सिंग करणेकामी येणारे रु.१३,६२,७७९/- मात्रचे खर्चास व सदरचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने ई निविदा मागविणेस निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.२३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पूर्व व उत्तर बाजूकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच चेनलिंक फेन्सिंग करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,६२,७७९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता देण्यात आली.**

**तसेच ज्या ठिकाणी अग्निशमन वाहने ठेवण्यात येतात, त्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याच्या कामाचा, सदर कामात समावेश करण्यास व त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.११ **श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास बसविण्यात आलेले जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन शिट बसविणेकामी येणाऱ्या रु.४१,३२,९५४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये साईभक्तांकरीता प्रसाद भोजन दि.०८/०१/२००९ पासून उपलब्ध करुन देणेत येत आहे. श्री साई प्रसादालय येथे दररोज सरासरी ४०,००० भक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेत असतात. सदरहू हॉलची उत्तर दक्षिण लांबी ३६७ फुट इतकी असून, पुर्व पश्चिम रुंदी १२१ फुट आहे. म्हणजेच ४४,४०४ चौ. फुट एवढा मोठा हॉल आहे. त्याकरीता भोजन हॉलमध्ये भरपूर प्रमाणात सुर्यप्रकाश व हवा खेळती राहावी याकरीता व्हेंटीलेटरसह पॉलीकोर्बोनेट शिट व कौलासह डोम आहेत. श्री साई प्रसादालयातील एकूण २३ डोमपैकी ०४ डोमची दुरुस्ती यापुर्वी करण्यात आलेली आहे. उर्वरीत १९ डोमचे पॉलीकोर्बोनेट शिट खराब झालेले असल्यामुळे पावसाळयात त्यामधून पाण्याची गळती होते. तसेच हवेसाठी मोकळया ठेवलेले व्हेटींलेटरमधून पावसाचे पाणी येते. इकडील विभागामार्फत कौलारु छताची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. श्री साई प्रसादालयातील पॉलीकोर्बोनेट डोमचे शिट बदलणे कामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता सदरहू सभेतील निर्णय क्र.३९५ खालीलप्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईप्रसादालयइमारतीचेछतासअसलेल्याडोमचेनुतणीकरण करणेसाठी बाजारामध्ये नवीन आकर्षक वॉटरप्रुफ डोम आलेले आहेत, त्याचा अभ्यास करुन, ते बसविणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा.*

*तसेच श्री साईप्रसादालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खुपच अतिक्रमण झालेले आहे, ते काढणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे, त्याचबरोबर प्रसादालयासाठी पर्यायी रस्ता तयार करता येईल का, याची माहिती घेऊन, सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले."*

त्यानूसार सदरहू कामी खालील पर्यांचा विचार करता येईल.

अ) श्री साई प्रसादालयाचे डोमचे खराब झालेले पॉलिकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी टेन्साईल फॅब्रीक बसविणे.

याकामी सध्याचे डोमच्या स्ट्रक्चरमध्ये बदल करुन त्यावर टेन्साईल फॅब्रीक बसवावे लागेल. त्यासाठी रु.५००/- प्र.चौ.फुट याप्रमाणे ८७,८०,१६०/- मात्र खर्च येईल. तसेच त्यामुळे प्रसादालयातील भोजन हॉलमध्ये पुरेशा प्रमाणात प्रकाश येणार नाही.

ब) श्री साई प्रसादालयाचे डोमचे खराब झालेले पॉलिकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी फायबर ग्लास बसविणे.

याकामी १६ एम एम जाड, ट्रीपल लेयरफायबर ग्लास शिट बसवावे लागेल. त्यासाठी अंदाजे रु.१५०/- प्र.चौ. फुट प्रमाणे रु.२६,३४,०४८/- मात्र खर्च येईल.फायबर ग्लास शिटला तडा गेल्यास दुरुस्ती खर्चीक आहे, अतीउष्ण वातावरणासाठी योग्य नाही. फायबर ग्लास दिसण्यास आकर्षक नाही तसेच काही दिवसानंतर वातावरणामुळे धुसर होते.

क) श्री साई प्रसादालयाचे डोमचे खराब झालेले पॉलिकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी मल्टीवॉल पॉलिकार्बोनेट शिट बसविणे.

सदर ठिकाणी जुने पॉलिकार्बोनेट शिट काढूनत्याऐवजी मल्टीवॉल पॉलिकार्बोनेट शिट बसविणेकामी सध्याच्या स्ट्रक्चरमध्ये विशेष बदल करावे लागणार नाहीत. तसेच पॉलीकार्बोनेट शिटला कंपनीमार्फत १० वर्षाची वॉरटी आहे. तसेच फायबर ग्लास पेक्षा पॉलीकार्बोनेट शिटची मजबुती जास्त आहे. त्यानुसार सदर ठिकाणी मल्टीवॉल पॉलिकार्बोनेट शिट बसविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | डोमची संख्या | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.** | **मुख्य व व्ही.आय.पी. डायनिंग हॉलवरील १० डोम** | | | | | |
| १ | स्ट्रक्चरल स्टिल वर्क | १० | ०.४५ | मे.टन | ४८,२५५.०० | २,१७,१४७.५० |
| २ | १० एम एम जाडीचे पॉलीकोर्बोनेट शिट बसविणे | १० | १०८.०० | चौ.मी. | २,३०१.०० | २४,८५,०८०.०० |
| ३ | कलर कोटेड शिट -०.५० एमएम टी.सी.टी | १० | २१.२४ | र.मी. | ७५६.०० | १,६०,५७४.४० |
| | **एकूण रुपये** | | | | | **२८,६२,८०२.००** |
| **ब.** | **प्रसादालय वेटींग रांग व सर्व्हीस पॅसेसमधील डोम** | | | | | |
| १ | १० एम एम जाडीचे पॉलीकोर्बोनेट शिट बसविणे प्रतिक्षा रांग -०७ डोम, सर्व्हीस पॅसेज -०२ डोम | | ५५२.०० | चौ.मी. | २३०१.०० | १२,७०,१५२.०० |
| | **एकूण रुपये** | | | | | **१४,३५,२००.००** |
| | **एकूण अ + ब रक्कम रुपये** | | | | | **४१,३२,९५४.००** |

**प्रस्ताव:** उपरोक्त पर्याय विचारात घेता श्री साई प्रसादालयइमारतीचेछतास असलेले जुने पॉलीकार्बोनेट शिट बदलून त्याऐवजी नवीन मल्टीवॉल पॉलीकार्बोनेट शिट टाकणे योग्य होईल असे इकडील विभागाचे मत आहे. तरी श्री साई प्रसादालय इमारतीचे छताचे पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन मल्टीवॉल पॉलीकार्बोनेट शिट टाकणेकामी येणारे रक्कम रु.४१,३२,९५४/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीच्या छतावरील जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन शिट बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.४१,३२,९५४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी प्रसादालयातील विशेष अतिथींसाठी राखीव असलेल्या अभ्यागत कक्ष व भोजनकक्षाचे नुतनीकरण व फेररचना करण्यास व त्यासाठी आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राऊंड येथे स्टेज व त्यावरील शेडचे उभारणीबाबतचा निर्णय निरस्त करणे.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१), अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग), अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कमल २१ मधील पोटकलम १ (ख) अन्वये रुढी परंपरानुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७६ खालीलप्रमाणे झालेला आहे.

“..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राउंड येथे स्टेज व त्यावरील शेडचे उभारणी करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे कालावधीत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत करावयाचे धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राऊंड येथे एम. एस. स्ट्रक्चरमध्ये ४०’x३२’ मापाचे स्टेज प्लॅटफॉर्म व त्यावर पत्राशेडचे काम करणेसाठी उपरोक्त निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सदरहू निर्णयानंतर साईनगर ग्राऊंडवर मा. राष्ट्रपती महोदय यांचे हस्ते दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी शताब्दी सोहळा ध्वजारोहन कार्यक्रम उद्घाटन सोहळा व दि.२३/१२/२०१७ रोजी मा. उपराष्ट्रपती यांचे हस्ते देश-विदेशातील साई मंदिरांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी या जागेवर मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करणेत आली होती. त्यामुळे सदरचे ठिकाणी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमासाठी स्टेज व शेडची उभारणी करता आली नाही.

**प्रस्ताव:** शताब्दी कालावधीत आयोजित धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिर परिसराचे पूर्वेकडील जागेत उभारणेत आलेले टेन्साईल फॅब्रीक शेडमध्ये करणेत येत आहेत. तसेच साई आश्रम भक्तनिवास परिसरात टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणीचे काम सुरु करणेत आलेले आहे. त्यामुळे साईनगर ग्राऊंडवर वरीलप्रमाणे स्टेज व शेड उभारणीची आवश्यकता नाही असे मत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राऊंड येथे स्टेज व त्यावरील शेडचे उभारणीबाबतचा दिनांक ०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७६ निरस्त करणेत आला.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.१३ एप्रिल-२०१८ महिन्यासाठी किराणामाल व इतर अनुशंगीक साहित्य आणि भाजीपाला सन २०१७-१८ या वर्षाच्या पुरवठादारांकडून खरेदी करण्यास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- संस्थान सन २०१७-१८ साठी खरेदी करीत असलेले किराणामाल व अनुशंगिक साहित्य खरेदी व भाजीपाला खरेदीचे पुरवठाधारकांचे पुरवठा आदेशाची मुदत ३१ मार्च, २०१८ रोजी संपत आहे. संस्थानची सन २०१८-१९ ची खरेदी प्रक्रिया चालु आहे.

याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे –

**अ) किराणामाल व इतर अनुशंगिक साहित्य खरेदी –**

संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांकरीता सन २०१८-१९ या वर्षासाठी किराणामाल व इतर अनुशंगीक साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी भांडार विभागाने मा.व्यवस्थापन

समितीची दिनांक ०२.०२.२०१८ चे सभेत मान्यता घेऊन हा प्रस्ताव दि.०९.०२.२०१८ रोजी खरेदी विभागाकडे पाठविला होता. सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.८८नुसार ई-निविदा पध्दतीने खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.५०,०२,००,०००/- (अक्षरी रु. पन्नास कोटी दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती.

सदर किराणामाल व अनुशंगिक साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया प्रस्ताव दिनांक १५.०२.२०१८ रोजी सादर करुन दिनांक २८.०२.२०१८ ते २२.०३.२०१८ हा ई-निविदा कालावधी ठेवलेला आहे. तसेच नमुने सादर करणेकामी दिनांक २३.०३.२०१८ ते २६.०३.२०१८ हा कालावधी ठेवलेला आहे. यानंतर तांत्रिक निविदा उघडणे, पात्र निविदाधारकांचे नमुने तज्ञ समितीकडुन निवडणे, कमर्शियल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी होणे व त्यानंतर अंतिम निर्णय होऊन पुरवठा आदेश देणे, करारनामा करणे व प्रत्यक्ष पुरवठा होणे याकामी अंदाजे १ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे एप्रिल-२०१८ या महिन्यासाठी अगर सन २०१८-१९ ची निविदा प्रक्रिया अंतिम होणेपर्यंत प्रसादालय, मंदिर, कॅन्टीन व लाडु निर्मिती या विभागांसाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्याची खरेदी मागील सन २०१७-१८ च्या पुरवठाधारकांकडून करणे गरजेचे आहे.

**ब) भाजीपाला खरेदी –**

संस्थानचे प्रसादालय विभागाकरीता सन २०१८-१९ या वर्षाकरीता भाजीपाला खरेदीकामी प्रसादालय विभागाकडून प्रस्ताव दिनांक ०५.०२.२०१८ रोजी खरेदी विभागास प्राप्त झाला होता. याबाबत खरेदी विभागाकडून ई-निविदा प्रस्ताव तयार करुन दिनांक ०७.०२.२०१८ रोजी सादर करुन दिनांक २८.०२.२०१८ ते १८.०३.२०१८ हा कालावधी ठेवलेला होता. मुदतीअखेर सदर २०१८-१९ चे चार टप्प्यांसाठी प्रत्येकी ८ ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. आता तांत्रिक निविदा उघडणे, कमर्शियल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी होणे व त्यानंतर अंतिम निर्णय होऊन पुरवठा आदेश देणे, करारनामा करणे व प्रत्यक्ष पुरवठा होणे याकामी अंदाजे १ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे एप्रिल-२०१८ या महिन्यासाठी अगर सन २०१८-१९ ची निविदा प्रक्रिया अंतिम होणेपर्यंत प्रसादालय विभागासाठी भाजीपाला खरेदी मागील सन २०१७-१८ (जानेवारी-२०१८ ते मार्च-२०१८) च्या पुरवठाधारकांकडून करावी लागेल.

तरी

अ) एप्रिल-२०१८ या महिन्यासाठी अगर सन २०१८-१९ ची निविदा प्रक्रिया अंतिम होणेपर्यंत प्रसादालय, मंदिर, कॅन्टीन व लाडु निर्मिती या विभागांसाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्याची खरेदी मागील सन २०१७-१८ च्या पुरवठाधारकांकडून भांडार विभागाचे मागणीनुसार करणेस,

आ) एप्रिल-२०१८ या महिन्यासाठी अगर सन २०१८-१९ ची निविदा प्रक्रिया अंतिम होणेपर्यंत प्रसादालय विभागासाठी भाजीपाला प्रसादालयाचे मागणीनुसार मागील सन २०१७-१८ (जानेवारी-२०१८ ते मार्च-२०१८) च्या पुरवठाधारकांकडून खरेदी करणेस,

वरील "अ" व "आ"प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.२३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील तूप खरेदीच्या व्यवहाराबाबत श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणे.**

**प्रस्ताव-** मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी दि.१ मार्च २०१८ चे पत्रान्वये मा.श्री.सदाशिव लोखंडे साहेब, लोकसभा सदस्य व मा.पै.श्री.रावसाहेब सदाराम खेवरे यांच्या मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेसीत केलेल्या पत्राच्या प्रती पाठविल्या आहेत. सदर दोन्हीही पत्रात संस्थानमार्फत तूप खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी सी.आय.डी मार्फत करण्याची विनंती केलेली आहे.

सदर दोन्हीही पत्रात उपस्थित केलेले मुद्दे खालीलप्रमाणे-

"श्री साईबाबा संस्थानच्या लाडू प्रसादासाठी लागणा-या तूप खरेदीचा ठेका हरियाणातील अंबाला येथील 'स्मृती प्रॉडक्ट्स' या कंपनीस मागील एक वर्षापासून दिलेला होता. परंतु आणखी ३ महिन्यांसाठी २,८०० क्विंटल तुपाचा रू.११,०८,८०,०००/- (अक्षरी रू.अकरा कोटी आठ लाख ऐंशी हजार फक्त) चा वाढीव ठेका देण्यात यावा अशी मागणी संबंधित ठेकेदाराने साईबाबा संस्थानच्या दि.०८.१२.२०१७ रोजीच्या मिटींगमध्ये केली व तसा आग्रह धरला असता त्यास व्यवस्थापन मंडळाने कारण विचारले. त्यावर संबंधित ठेकेदाराने संस्थानच्या एका वरिष्ठ अधिका-यास रू.५० लाख व एका विद्यमान विश्वस्तांस रू.१० लाख रक्कम दिल्याचा

गौप्यस्फोट केला. त्यावर संबंधित विश्वस्त व ठेकेदाराची बाचाबाची झाली. सदर प्रकरणाची आपणाकडे सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने निवेदनाव्दारे माझ्याकडे करण्यात आली.

सदर प्रकरणाची चर्चा वा-यासारखी शिर्डी परिसरात तथा जिल्हा व जिल्ह्याबाहेर पसरून उलटसुलट चर्चेस सुरूवात झाली. यामुळे देश-विदेशातून येणा-या व मोठी देणगी देणा-या साई भक्तांमध्ये संभ्रमाचे तथा अविश्वासाचे वातावरण निर्माण होत आहे. साईबाबा समाधी शताब्दी वर्ष असल्यामुळे मोठया प्रमाणात भक्तगण शिर्डीत येत आहेत. व त्यांच्यातही याबाबत चर्चा होत असल्यामुळे संस्थानची मोठया प्रमाणात बदनामी होत आहे. तरी संबंधित गैरव्यवहाराची चर्चा कोठेतरी थांबली पाहिजे व साई भक्तांसमोर सत्य बाहेर आले पाहिजे व होत असलेल्या बदनामीला कोठेतरी पुर्णविराम मिळावा म्हणून सदर प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावीही विनंती."

वरील तक्रारीनुसार मा.कार्यासन अधिकारी यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा वस्तुनिष्ठ अहवाल व श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास तात्काळ सादर करण्याची विनंती केली आहे. यावर सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश आहेत.

संस्थानने मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचेकडून खरेदी केलेल्या शुध्द तूप खरेदीच्या प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे:-

संस्थानने जुन ते सप्टेंबर-२०१७, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१७ व जानेवारी ते मार्च-२०१८ या कालावधीसाठी तीन टप्प्यांमध्ये तुपाचे अंदाजित परिमाणासाठी निविदा काढल्या होत्या. यामध्ये संस्थान आवश्यकतेप्रमाणे तुप खरेदी करील, अशी अट होती.

या तीनही टप्प्यांमध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचे प्रती किलो रु.३९६/- हे दर न्युनतम होते. म्हणून मा.व्यवस्थापन समितीने दिनांक २५.०७.२०१७ चे सभेतील निर्णयानुसार मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी पुरवठा आदेश दिला होता. यामध्ये त्यांनी पुरविलेल्या तुपाचे परिक्षण करण्यात येऊन पुढील कालावधीसाठीच्या पुरवठा आदेशाबाबत निर्णय घेण्याचे ठरले होते.

पुरवठा आदेश दिल्यानंतर मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी तुपाचा पुरवठा सुरु केला. यामध्ये त्यांनी पुरविलेले तुपाचे बॅच नं.५३ चे ३ सॅम्पल व ६८ चे २ सॅम्पल चे Central Food Technological Research Institute, Mysore या केंद्र शासनाच्या लॅबचे रिपोर्टमधील Test of Rancidity – Positive (As per FSSAI Norms – Negative) आली होती. तसेच तुपाचे बॅच नं.५३ व ५८ च्या प्रत्येकी १ सॅम्पलचे BRR Test Report Reading अनुक्रमे ३९.२ व ३९.५ (As per FSSAI Norms 40-43) असे आले होते. त्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. याचा त्यांनी खुलासा केला होता.

दरम्यान संस्थानच्या भांडार विभागामार्फत हे लॅब रिपोर्ट्स मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ चे सभेत सादर केले असता मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचेकडून तुप खरेदी करण्याचे थांबवून, पुढील कालावधीसाठी दरपत्रके व ई-निविदा मागविणेचे ठरले होते. तसेच मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचा ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश करण्याचे व संस्थानला तूप खरेदीसाठी जादा येणारा वाढीव खर्च तसेच मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचेकडील जमा असलेल्या अनामत रकमेतून वसुल करण्याचे ठरले होते. दरम्यान तसेच मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचा तीन महिन्यांचा तुप पुरवठा कालावधी सुध्दा दिनांक २६.१०.२०१७ रोजी संपुष्ठात आला होता.

तथापि मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीस संदर्भात दिनांक १४.११.२०१७ च्या सभेसमोर खुलासा करणेची संधी देण्यात आली होती. याचा त्यांनी लेखी खुलासा व संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत पुर्ववत पुरवठा आदेश मिळण्याची समक्ष विनंती केली होती. तथापि सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीत समावेश करण्याची अट शिथील करून यापुढील गाईचे तूप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी असा निर्णय घेतला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे १,५०० क्विंटल तूप खरेदीसाठी दरपत्रके मागविलेले होते. यामध्ये निम्नतम दरधारक मे.व्हीएसपी कार्पोरेशन, उमरगांव जि.वलसाड गुजरात यांचेकडून १२०० क्विंटल व महाराष्ट्र राज्यातील मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित,

कोपरगाव यांचेकडून ३०० क्विंटल तुप खरेदी करण्यात आले होते. तसेच नव्याने एक वर्षासाठी ई-निविदा मागविणेत आलेल्या होत्या.

सदर नवीन ई-निविदा प्रक्रियेत मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना सहभाग घेण्याची संधी देण्यात आली होती. परंतु तांत्रिक निविदेमध्ये आर्थिक बाबीबाबतची उचित कागदपत्रे ऑनलाईन सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरले होते. त्यानंतर त्यांनी दिनांक २६.१२.२०१७ रोजी संस्थानविरुद्ध अंबाला (हरियाणा) न्यायालयात अनाधिकारे पुरवठा आदेश रद्द केला व संस्थानला तुप पुरवठा करणेचा त्यांचा आदेश कायम करणेबाबत व संस्थानच्या तुपाचे नवीन ई-निविदा प्रक्रियेस स्थगिती मिळावी, याबाबत दावा क्र.३६२७/२०१७ दाखल केला आहे. परंतु तसेच मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना मनाईहुकुम मिळालेला नाही. सदर बाब न्यायप्रविष्ट असून दावा न्यायालयात प्रलंबित आहे. व संस्थान विधी सल्लागार मार्फत उचित कार्यवाही चालू आहे.

सन २०१८ साठी नव्याने करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, जि.हरिव्दार यांना ३ महिन्यांसाठी २८०० क्विंटल तुप पुरविणेकामी प्रती किलो रु.३११.५० पैसे या दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून दि.२२.०३.२०१८ अखेर २०५४.९७ क्विंटल तुपाचा पुरवठा झाला आहे. यामध्ये तुपाचे दर कमी होऊन प्रती क्विंटल रु.८,४५०/- मात्र संस्थानचा आर्थिक फायदा होत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता यामध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही. तसेच सदर तक्रार वगळता याबाबत इतर कोणतीही तक्रार संस्थानकडे प्राप्त झालेली नाही.

तरी मा.कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांचे दि.०१.०३.२०१८ चे पत्रानुसार उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने संस्थान व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास कळविणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती नमूद करुन, तुप खरेदीमध्ये गैरप्रकार घडलेला नाही, असा व्यवस्थापन समितीचा अभिप्राय शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच यावेळी दिनांक ०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०२(०१) मध्ये ठरलेनुसार एनडीआरआय** (National Deiry Reserch Institute, Karnal, Hariyana) **या केंद्र शासनाच्या संस्थेकडून सन- २०१८ साठी गाईचे तुपाचा पुरवठा करणारे मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस् प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार यांच्या प्लॅन्टची तपासणी केल्याचा अहवाल सभेसमोर सादर करणेत आला. सदरहू अहवाल सकारात्मक असल्यामुळे उर्वरित कालावधीच्या तुपाचा तिमाहीनिहाय पुरवठा आदेश हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस् प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार यांना देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

विषय नं.१५ **शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन करणेबाबतचा प्रस्ताव निरस्त करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम 2004 मधील तरतूद- 14 (2) (घ) मधील भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक-** महाराष्ट्र शासनाने हरित आच्छादन दिवसेंदिवस कमी होत असल्याने ते वाढविण्यासाठी 50 कोटी वृक्ष लागवड करणेबाबतचा महत्वकांक्षी संकल्प हाती घेतलेला आहे. याकरीता दर वर्षी दि.1 जुलै ते 7 जुलै असे सन 2017 ते 2019 पर्यंत वृक्षलागवड करावयाची आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत वृक्षारोपन करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. दि.25/07/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिति सभेतील निर्णय क्रं.531 अन्वये, शिर्डी शहरात व शिर्डीत येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला झाडे लावणेस तसेच ई निवीदा शासनाचे वेबसाईटवर प्रसिध्द करुन विविध कामाचे दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.38,32,000/- (अडवतीस लाख बत्तीस हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच शिर्डी शहरात व शिर्डीत येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला झाडे लावायची असल्याने संबंधीत प्रस्तावास महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविणेत यावा असे ठरलेले आहे. महाराष्ट्र शासनाचा वनमहोत्सव कार्यक्रम दि.1जूलै ते 7 जुलै अशा ह्या तीन वर्षाकरीता आहे. त्यामध्ये सर्व सामाजीक वनीकरण विभाग, सार्वजनीक बांधकाम विभाग (PWD), वन विभाग, स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, शाळा, नगरपालीका, खाजगी कारखाने या सर्वांना रोपे लावण्याचे उद्दीष्ठ शासनाने ठरवुन दिलेले आहे.

शिर्डी शहरात व शिर्डी परिसरातुन शिर्डीत येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेकामी किती झाडे लावता येतील व झाडे लावण्यास परवानगी मिळणेबाबत शिर्डी नगरपंचायत ,सार्वजनिक बांधकाम विभाग,

जिल्हा परिषद सा.बा. उत्तर विभाग-अहमदनगर व सा.बा.विभाग-संगमनेर यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/ 3689/2017 अन्वये पत्र पाठविणेत आले होते परंतु कुठल्याही प्रकारची माहीती प्राप्त न झाल्याने पुन्हा शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेकामी जा.न.एसएसएसटी/वशी- बगीचा5835/ 2018 दि.30/1/2018 रोजीचे पत्रानुसार शिर्डी नगरपंचायत यांना शासनाच्या शतकोटी वृक्षलागवड योजनेअंतर्गत वृक्षलागवडीचे उददीष्ट व केलेल्या झाडांच्या लागवडीबाबत माहीती मागविली असता जा.क्र.नप/टे-2 /898 दि.9/2/2018 रोजीच्या पत्रानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी शहरातील विविध सामाजिक संघटनांनी शिर्डी शहरात मोठया प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे. यामध्ये हॉटेल सन एन सॅन्ड रोड, 18.00 मीटर रिंग रोड, साई आश्रम शेजारील 24.00मी रोड,लुटे वस्ती ते गणेश बंधारा रोड, नांदुर्खी रोड, कनकुरी रोड,

बाहयवळण रस्ता इ. ठिकाणी जवळजवळ 7000 ते 8000 वृक्ष लागवड झालेली असुन लागवड केलेली सर्व झाडे व्यवस्थित वाढत आहेत. तसेच शिर्डी नगरपंचायतद्वारे अमृत अभियान अंतर्गत ग्रीन स्पेस प्रकल्पात पुन्हा नव्याने 10000 वृक्ष लागवडीचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत हददीतील वृक्षांना पाणी देणेकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत ट्रॅक्टर टँकर उपलब्ध करुन दयावे अशी विनंती केलेली आहे. त्यासाठी लागणारे पाणी शिर्डी नगरपंचायत एस.टी.पी.प्रकल्प येथुन नगरपंचायतद्वारे मोफत उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले आहे.

**मागणी-** जा.क्र.नप/टे-2 /898 दि.9/2/2018 रोजीच्या पत्रानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी शहरातील विविध सामाजिक संघटनांनी शिर्डी शहरात मोठया प्रमाणात वृक्षारोपण केलेले असुन जवळजवळ 7000 ते 8000 वृक्ष लागवड झालेली असुन लागवड केलेली सर्व झाडे व्यवस्थित वाढत आहेत. तसेच शिर्डी नगरपंचायतद्वारे अमृत अभियान अंतर्गत ग्रीन स्पेस प्रकल्पात पुन्हा नव्याने 10000 वृक्ष लागवडीचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत हददीतील वृक्षांना पाणी देणेकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत कायमस्वरुपी ट्रॅक्टर टँकर उपलब्ध करुन दयावे अशी विनंती केलेली असल्याने तसेच महाराष्ट्र शासनाचा वनमहोत्सव कार्यक्रम दि.1 जूलै ते 7 जुलै अशा ह्या तीन वर्षाकरीता आहे. त्यामध्ये सर्व सामाजीक वनीकरण विभाग, सार्वजनीक बांधकाम विभाग (PWD), वन विभाग, स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, शाळा, नगरपालीका, खाजगी कारखाने या सर्वांना रोपे लावण्याचे उद्दीष्ठ शासनाने ठरवुन दिलेले आहे. त्यामुळे प्रत्येकाने त्यांचेवर जबाबदारी असल्यामुळे ते प्रत्येक खर्च करीत आहे. त्यामुळे संस्थानमार्फत शिर्डी शहरात व रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपनासाठी जागा शिल्लक नसल्याने फक्त संस्थानच्या परिसरात/हद्दीत झाडे लावता येतील व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे मागणीनुसार वृक्षसंगोपणासाठी पाणी देणेकरिता एक स्वतंत्र ट्रॅक्टर टँकर कायमस्वरुपी उपलब्ध करुन देता येईल.तसेच यापुर्वीही शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला झाडे लावणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत आलेला होता परंतु महाराष्ट्र शासनाचे क्रं.सासंवि-1016/ 1057/ प्र.क.08/का.16 दि.1 जुन 2016 रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,2004 मध्ये वृक्षारोपणाच्या प्रयोजनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची तरतुद नसल्याने शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला झाडे लावणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेमुळे 25/7/2017 रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.10 व निर्णय क्रं 531 नुसार शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेकामी रु.38,32,000/-(अडतीस लाख बत्तीस हजार) मात्र खर्चाच्या प्रस्तावावरील पुढील कार्यवाही रदद करता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थिक विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय-** जा.क्र.नप/टे-2 /898 दि.9/2/2018 रोजीच्या पत्रानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेमार्फत तसेच शहरातील विविध सामाजिक संघटनांनी शिर्डी शहरात7000 ते 8000 वृक्ष लागवड केलेली असुन अमृत अभियान अंतर्गत ग्रीन स्पेस प्रकल्पात पुन्हा नव्याने 10000 वृक्ष लागवडीचे काम लवकरच सुरु करणार असल्यामुळ े संस्थानमार्फत फक्त संस्थान परिसर/ हददीत वृक्षारोपण करणेस तसेच शिर्डी नगरपंचायत हददीतील वृक्षांना पाणी देणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत ट्रॅक्टर टँकर कायमस्वरुपी उपलब्ध करुन देणेस, तसेच यापुर्वीही शिर्डी व शहरातील रस्त्यांच्या कडेला झाडे लावणेबाबतचा महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत आलेला प्रस्ताव क्र. सासंवि-1016/1057/प्र.क्र.08/.16 आ.नं 4056 दि. 7 जुन 2016 रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये अमान्य झाल्यामुळे तसेच शिर्डी, न.पं शिर्डी हे शिर्डी शहरात वृक्षारोपण करणार असल्याने दि.25/7/2017 रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.10 व

निर्णय क्रं. 531 नुसार शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेकामी रु.38,32,000/- (अडतीस लाख बत्तीस हजार) मात्र खर्चाच्या मान्यतेचा प्रस्ताव निरस्त होणेकामी निर्णयार्थ सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेबाबतचा दिनांक २५.०७.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.५३१ निरस्त करणेत आला.**

**तसेच शिर्डी नगरपंचायत हददीमध्ये सध्या लावलेल्या व लावणेत येणाऱ्या वृक्षांना पाणी देणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार भाडोत्री टँकर उपलब्ध करुन देण्यात यावा व पर्यावरण हिताच्या दृष्टीने शिर्डी व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांचे मार्गदर्शनाखाली प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.१६ **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मसुद्यास मंजुरी मिळणेबाबत व निळवंडे धरणातुन शिर्डी पर्यंत प्रस्तावित पाईपलाईन योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त सात गावांचा आणि राहाता नगरपंचायतीचा समावेश करणेबाबत.**

प्रस्ताव- मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडुन जा.क्रं.मुअ/ ना/ मजीप्रा/ चिशा/ १५९/२०१८, दि.२५/०१/२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/ का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे)– अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देणेत आली.

दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन सदरहू योजनेची निकड विचारात घेता ही योजना तातडीने कार्यान्वित होणेसाठी निविदा तयार करणेसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/ वशी/पाणी पुरवठा/६०१७/२०१८, दि.०८/०२/२०१८ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

सदरहू प्रस्तावित योजनेबाबत मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे क्र.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.७ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे पत्र प्राप्त झालेले होते. सदरहू पत्रात नमुद केलेनुसार श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे दि.११/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये निळवंडे धरणाचा उद्भव धरुन प्रस्तावित असलेल्या पाणी पुरवठा योजनेला सुधारित प्रशासकिय मान्यता देतांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच शिर्डी नगरपंचायत व शिर्डी लगतच्या खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, वाळकी, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु. या दुष्काळग्रस्त गावांच्या समावेश करणेची विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी "उक्त सात गांवे व राहाता नगरपंचायत यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अभिप्राय घ्यावेत व स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा" असे शासन आदेश प्राप्त झाले आहेत. सदर निदेशानुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात यावा असे कळविलेले होते.

मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे क्र.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.७ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, वाळकी, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु. ही सात गांवे व राहाता नगरपंचायत यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अभिप्राय घेणेसाठी मा.मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ ६०१६/२०१८, दि.०८/०२/२०१८ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या तयारीसाठी गठीत करण्यात आलेल्या कृती आराखडा समितीची चौथी बैठक मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.०१/०२/२०१८ रोजी पार पडली. सदरहू बैठकिचे इतिवृत्तात याविषयी देण्यात आलेले निर्देशानुसार पुढील कार्यवाही होणेसाठी मा.मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ ६७६८/ २०१८, दि.१७/०३/२०१८ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कामकाजासंदर्भात वर्षा, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे शासकिय निवासस्थान येथे दि.०१/०२/२०१८ रोजी २:०० वाजता मा.विरोधी पक्ष नेते व इतर यांची बैठक मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकिच्या इतिवृत्तात नमुद निर्दशास अनुसरुन कार्यवाही होणेसाठी याबाबत ०७ दिवसाचे आत सविस्तर अहवाल सादर करणेसाठी मा.मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ ६७७१/ २०१८, दि.१७/०३/२०१८ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

**प्रस्ताव:-** प्रस्तुत प्रकरणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे जा.क्रं./ मुअ/ नाशिक/तांशा-३/४४६/२०१८, दि.१७/०३/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असून उपरोक्त संदर्भिय दि.१७/०३/२०१८ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार मंजुर योजनेतील दैनंदिन पाणी मागणीत मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील (विरोधी पक्ष नेता विधानसभा, महाराष्ट्र विधानसभा) यांनी त्यांचे दि.११/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये मागणी केल्याप्रमाणे सदर ७ गावांची (खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, वाळकी, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु.) पाणी मागणी विचारात घेतली असता मंजूर योजनेस नव्याने प्रशासकिय मान्यता घेणेची गरज भासणार नाही मात्र याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीची मान्यता घेऊन तसा ठराव घेणे आवश्यक असेल. तथापि राहाता शहराचा या योजनेत समावेश करावयाचा झाल्यास निळवंडे धरणातून येणारी पाईपलाईनमध्ये बदल करणे आवश्यक असून नव्याने प्रस्ताव करावा लागेल.

**अ)** सात गावांचा समावेश प्रस्तावित योजनेत (मंजुर योजनेस नव्याने प्रशासकिय मान्यता मान्यता घेणेची गरज नाही) करावयाचा असल्यास सदर कामाचे कार्यव्ययी अंदाजपत्रके करुन त्या आधारे निविदा प्रपत्रे तयार करणे आवश्यक आहे. याकरीता एक महिन्याचा कालावधी लागेल.

**ब)** वरीलप्रमाणे ७ गावांसह राहाता शहराच्या उर्वरीत पाणी मागणीचा वरील योजनेत समावेश करावयाचा असल्यास संपूर्ण योजना नव्याने संकल्पन करुन तयार करणे आवश्यक असून, याकरीता दोन महिन्याचा कालावधी लागेल. त्यानंतर योजनेस नव्याने प्रशासकिय मान्यता घ्यावी लागेल. असे नमुद आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग विभागाकडील दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन सदरहू प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेची निकड विचारात घेता ही योजना तातडीने कार्यान्वित होणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून प्रस्तावित श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेची निविदा मसुदा प्रत प्राप्त झालेली आहे. सदरहू निविदा मसुदा प्रत सोबत सादर आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, याविषयी खालीलप्रमाणे निर्णय होणे गरजेचे आहे.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून प्राप्त सोबत जोडलेल्या निविदा मसुदा मान्य होणेस विनंती आहे. जेणेकरुन त्वरीत निविदा प्रसिध्द करता येतील.

२) ७ गावांचा (खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, वाळकी, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु.) समावेश प्रस्तावित योजनेत (मंजुर योजनेस नव्याने प्रशासकिय मान्यता मान्यता घेणेची गरज नाही) करावयाचा असल्यास सदर कामाचे कार्यव्ययी अंदाजपत्रके करुन त्या आधारे निविदा प्रपत्रे तयार करणे.

३) ७ गावांसह राहाता शहराच्या उर्वरीत पाणी मागणीचा वरील योजनेत समावेश करुन संपूर्ण योजना नव्याने संकल्पन करुन तयार करणे व त्यानंतर योजनेस नव्याने प्रशासकिय मान्यता घेणे.

तरी याविषयी योग्य तो आदेश व निर्णय होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर.

निर्णय क्र.२३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मसुद्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. तसेच या प्रस्तावित पाईपलाईन योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त सात गावांचा समावेश केल्यास या योजनेस सुधारित**

**प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल व त्यास बराचसा कालावधी लागेल, याकरीता दुष्काळग्रस्त सात गावांचा या योजनेत समावेश करणेचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

**मात्र राहाता नगर परिषदेचा समावेश करावाचा झाल्यास संपूर्ण योजनेचा आराखडा व alignment बदलावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **दर्शनरांग व्यवस्थापन अंतर्गत कार्यान्वित करणेत आलेल्या मोफत दर्शन पास (Time Base) कार्यप्रणाली आधारप्रणालीशी जोडणे (लिंक करणे) बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१)भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५८०

प्रास्ताविक:- साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणे संदर्भात दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८० नुसार जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/२४६५/२०१६ ने दि.१७ ऑगष्ट, २०१६ रोजी मे. त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि., तिरुपती यांना कार्यादेश देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे मे. त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम प्रा.लि., तिरुपती यांनी सदरची कार्यप्रणाली दि.१२.१२.२०१६ रोजी कार्यान्वीत केलेली आहे.

सद्यस्थितीत कार्यप्रणालीमध्ये साईभक्तांचे बोटाचे ठसे व फोटो इ. घेऊन त्यांना दर्शन पास वितरीत केले जातात. संस्थानमार्फत राबविणेत येणारे विविध धर्मिक, सामाजिक उपक्रम तसेच वेळोवेळी करावयाचे आवाहन साईभक्तांपर्यंत पोहचविणेकामी संस्थानकडे साईभक्तांची माहिती असणे आवश्यक आहे. दर्शनपास कार्यप्रणाली हि Unique Identification Authority of India (UIDAI) यांचे मार्फत कार्यान्वीत करणेत आलेल्या आधार प्रणालीशी जोडल्यास साईभक्तांच्या माहितीची पडताळणी तसेच माहिती संस्थानला उपलब्ध होऊ शकते.

सबब, दर्शनपास कार्यप्रणाली हि Unique Identification Authority of India (UIDAI) यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेल्या आधार प्रणालीशी जोडणेकरीता करावयाचे कार्यवाहीबाबत,UIDAI यांचेमार्फत नेमण्यात आलेल्या NSDL e-Governance Infrastructure Ltd.(NSDL e-Gov) यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी संदर्भीय ई-मेलद्वारे याबाबत सविस्तर माहिती व नोंदणीकामी आवश्यक दस्ताऐवजांचे मसुदे सादर केलेले आहेत.

उपरोक्त प्राप्त माहितीनुसार संस्थानने Sub Authenticaiton User Agency (Sub AUA) किंवा Authenticaiton User Agency AUA म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला फक्त साईभक्तांचे माहितीचे पडताळणी “Yes/No” या स्वरुपात करणेची सुविधा उपलब्ध होणार आहे. संस्थानला साईभक्तांच्या सहमतीने साईभक्तांची माहिती उदा. नांव, पत्ता, मोबाईल नं. इ. प्राप्त करावयाची असल्यास संस्थानला Authenticaiton User Agency (AUA) व KYC Authenticaiton User Agency (KAUA) म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. NSDL e-Gov यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार Sub AUA, AUA व KAUA म्हणूननोंदणी केल्यास उपलब्ध होणारी सुविधा व याकामी येणारा खर्च यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे.

| Sr. No | Requesting Entity | Investment | Services |
|---|---|---|---|
| 01 | Sub AUA | 1. Annual License fee of 1 (One) Lakh<br>2. Transaction Charges0.20 per trn.or 2,000+ Taxes whichever is higher (monthly) | 1. Only Authentication “Yes/No”<br>2. e-KYC Services cannot be availed |
| 02 | AUA | 1. Bank Guarantee of 25 Lakhs for 10 years<br>2. Rs. 5 Laks for 3 Months for testing on pre-production.<br>3. License fee of 20 Lakhs for 2 years | 1. An entity may avail the e-KYC services by registering as a KUA, though as mandated by UIDAI has to register as an AUA.<br>2. e-KYC Information shared by UIDAI-Name, Address, Date of |

| Sr. No | Requesting Entity | Investment | Services |
|---|---|---|---|
| | | 4. Transaction Charges 1.00 per trn + Taxes | Birth, Gender, Photograph, Mobile Number &Emai ID (If avable) |
| 03 | KAUA | No Additional charges. | After some successful transaction UIDAI register requsting entity as KAUA |

नमुद केलेप्रमाणे दर्शनपास प्रणालीशी UIDAI यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेली आधार प्रणाली लिंक करणेकामी पुढीलप्रमाणे पर्याय उपलब्ध असून, निवडलेल्या पर्यायानुसार त्यापुढे दिलेल्या सुविधा संस्थानला उपलब्ध होऊ शकतात.

अ. Sub AUA -म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला फक्त साईभक्तांची पडताळणीची सुविधा त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे “Yes/No” या स्वरुपात प्राप्त होईल. याकामी नमुद केलेप्रमाणे वार्षीक परवाना फी रुपये १ लाख मात्र व पडताळणीकामी रुपये ०.२० (२० पैसे) प्रति साईभक्त एवढा खर्च येणार आहे. या सुविधेअंतर्गत साईभक्तांची माहिती संस्थानला उपलब्ध होणार नाही.

आ. AUA व KAUA- म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला साईभक्तांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, फोटो व ई-मेल आयडी (उपलब्ध असल्यास) इ. माहिती त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे प्राप्त होऊ शकते. याकामी संस्थानला नमुद केलेप्रमाणे २५ लाख रुपये बॅंक गॅरंटी १० वर्षाकरीता, रुपये ५ लाख कार्यप्रणाली तपासणीकरीता (३ महिन्यांकरीता), २० लाख रुपये परवाना फी दोन वर्षाकरीता तसेच साईभक्तांची माहिती उपलब्ध करणेकामी रुपये ०१/- प्रती साईभक्त इतका खर्च येणार आहे.

दर्शनपास कार्यप्रणाली UIDAI यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेल्या आधार प्रणालीशी जोडणेकामी पर्याय“अ” व “आ” मध्ये नमुद केलेप्रमाणे, याकामी येणारा अपेक्षीत खर्च व त्याअंतर्गत उपलब्ध होणा-या सुविधा यांचा प्रस्ताव पुढील निर्णयार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दर्शनरांग पास कार्यप्रणाली UIDAIयांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेल्या आधार प्रणालीशी जोडणी करणेकामी प्राप्त झालेल्या माहितीनुसार उपलब्ध पर्याय व त्याअंतर्गत उपलब्ध सुविधा तसेच याकामी येणारा खर्च पुढीलप्रमाणे आहे.

अ. Sub AUA - म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला फक्त साईभक्तांची पडताळणीची सुविधा त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे “Yes/No” या स्वरुपात प्राप्त होईल. याकामी नमुद केलेप्रमाणे वार्षीक परवाना फी रुपये १ लाख मात्र व पडताळणीकामी रुपये ०.२० (२० पैसे) प्रति साईभक्त एवढा खर्च येणार आहे. या सुविधेअंतर्गत साईभक्तांची माहिती संस्थानला उपलब्ध होणार नाही.

आ. AUA व KAUA- म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला साईभक्तांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, फोटो व ई-मेल आयडी (उपलब्ध असल्यास) इ. माहिती त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे प्राप्त होऊ शकते. याकामी संस्थानला नमुद केलेप्रमाणे २५ लाख रुपये बॅंक गॅरंटी १० वर्षाकरीता, रुपये ५ लाख कार्यप्रणाली तपासणीकरीता (३ महिन्यांकरीता), २० लाख रुपये परवाना फी दोन वर्षाकरीता तसेच माहिती साईभक्तांची माहिती उपलब्ध करणेकामी रुपये ०१/- प्रती साईभक्त इतका खर्च येणार आहे.

दर्शनरांग पास प्रणाली आधार प्रणालीशी जोडणेकामी पर्याय“अ” व “आ” मध्ये नमुद केलेप्रमाणे, याकामी येणारा अपेक्षीत खर्च व त्याअंतर्गत उपलब्ध होणा-या सुविधा यांचा प्रस्ताव पुढील निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- नमुद केलेप्रमाणे दर्शनरांग पास कार्यप्रणाली UIDAIयांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेल्या आधार प्रणालीशी जोडणी करणेकामी प्राप्त झालेल्या माहितीनुसार उपलब्ध पर्याय व त्याअंतर्गत उपलब्ध सुविधा तसेच याकामी येणारा खर्च पुढीलप्रमाणे आहे.

अ. Sub AUA - म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला फक्त साईभक्तांची पडताळणीची सुविधा त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे “Yes/No” या स्वरुपात प्राप्त होईल. याकामी नमुद केलेप्रमाणे

वार्षीक परवाना फी रुपये १ लाख मात्र व पडताळणीकामी रुपये ०.२० (२० पैसे) प्रति साईभक्त एवढा खर्च येणार आहे. या सुविधेअंतर्गत साईभक्तांची माहिती संस्थानला उपलब्ध होणार नाही.

आ. AUA व KAUA- म्हणून नोंदणी केल्यास संस्थानला साईभक्तांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, फोटो व ई-मेल आयडी (उपलब्ध असल्यास) इ. माहिती त्यांचे आधार नंबर व बोटाचे ठसे याआधारे प्राप्त होऊ शकते. याकामी संस्थानला नमुद केलेप्रमाणे २५ लाख रुपये बँक गॅरंटी १० वर्षाकरीता, रुपये ५ लाख कार्यप्रणाली तपासणीकरीता (३ महिन्यांकरीता), २० लाख रुपये परवाना फी दोन वर्षाकरीता तसेच माहिती साईभक्तांची माहिती उपलब्ध करणेकामी रुपये ०१/- प्रती साईभक्त इतका खर्च येणार आहे.

दर्शनरांग पास प्रणाली आधार प्रणालीशी जोडणेकामी पर्याय "अ" व "आ" मध्ये नमुद केलेप्रमाणे, याकामी येणारा अपेक्षीत खर्च व त्याअंतर्गत उपलब्ध होणा-या सुविधा यांचा प्रस्ताव पुढील निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.२४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शनरांग व्यवस्थापन अंतर्गत कार्यान्वित करणेत आलेल्या मोफत दर्शन पास (Time Base) कार्यप्रणाली आधारप्रणालीशी जोडणे (लिंक करणे) कामी खुप मोठया प्रमाणावर खर्च येत असल्यामुळे, तसेच प्रणालीची सक्ती करण्याबाबतचा मुद्दा सध्या मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.१८ **"साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" साठी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्फत प्रकल्प देखभालीचे कामकाज पुर्वीच्या कार्यादेशाप्रमाणे चालू ठेवणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९.
२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२
३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३२
४. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५५९
५. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८

प्रास्ताविक:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. साईटेक प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नोलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आलेला आहे.

सबब, साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालीसाठी प्रचलीत पद्धतीने नविन कंपनीची नेमणूक करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी,मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२ अन्वये, M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांची एक वर्ष कालावधीसाठी जा.नं.एसएसएसटी/ आयटी/२५७५/२०१६ दि.२३.०८.२०१६ अन्वये "कन्सल्टंट" म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३२ अन्वये साईटेक प्रकल्प देखभालीचा मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आल्याने, याकामी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत त्यांनी सादर केलेल्या प्रतिमाह रक्कम रुपये १४,४४,०००/- + कर मात्र प्रस्तावाप्रमाणे प्रकल्प देखभालीचे कामकाज मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत चालू ठेवणेकामी मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१४१५/२०१७ दि.१६ जुन, २०१७ रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे.

मे.के.पी.एम.जी., मुंबई यांना दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांनी निविदा प्रक्रिया राबविणेकामी कार्यवाही करुन ई-निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक निविदेचा मसुदा संस्थानला सादर केलेला होता. त्यानुसार "साईटेक प्रकल्प-२" साठी ई-निविदा मुतदवाढीसह दि.२०.०३.२०१७ ते दि.२४.०७.२०१७ या कालावधीत प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदरचे कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत आवश्यक निविदा प्राप्तझालेल्या नसल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ अन्वये, साईटेक प्रकल्प

टप्पा-२ निविदेविषयी माहिती तंत्र संचालनालय यांचे मार्गदर्शनानुसार मे.केपीएमजी यांनी प्रकल्प अहवाल व निविदेच्या मसुदेमध्ये आवश्यक सुधारणा तथा दुरुस्ती करून त्याची तपशिलवार माहिती तसेच ओरॅकल ईआरपी व इतर कार्यप्रणाली यांची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर केलेली आहे. ई-निविदा प्रक्रियेविषयी चर्चा करणेकरीता मे.केपीएमजी यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०३.२०१८ रोजीचे सभेमध्ये बोलविणेत आलेले होते. यावेळी सविस्तर चर्चेअंती मे.केपीएमजी यांना प्रकल्प अहवालामध्ये असलेल्या त्रुटी दुरूस्त करुन सुधारीत प्रकल्प अहवाल व निविदा मसुदा लवकरात लवकर सादर करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ अन्वये, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास, सदरहू कार्यप्रणाली सुरू ठेवणेसाठी नविन कंपनीची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असेही निर्देश देणेत आलेले आहेत. सदर निर्देशानुसार इकडील विभागाचे दि.२३.०१.२०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये सदरकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार सदरची ई-निविदा दि.०२.०२.२०१८ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली आहे. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त निविदांच्या तांत्रिक निविदा मा.खरेदी समितीचे दि.१२.०३.२०१८ रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेले आहेत.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभाल ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यक निविदा उघडून पात्र निविदाधारकास कार्यादेश दिलेनंतर सदरचे निविदाधारकास मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्पाविषयक तांत्रिक व अनुषांगिक ज्ञान प्राप्त करुन घेतलेनंतरच प्रकल्प दुरूस्ती-देखभालीचे कामकाजास प्रत्यक्ष सुरूवात करता येणार आहे. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दुरूस्ती देखभालीसाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांची याकामीची मुदत दि.३०.०४.२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सबब, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रकल्प दुरूस्ती- देखभालीसाठी नेमणूक झालेल्या नविन कंपनीने मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्पविषयक आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊन प्रत्यक्ष देखभालीचे कामकाज दि.०१.०५.२०१८ रोजी सुरू न केल्यास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत कार्यप्रणालींवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत कार्यप्रणाली व अनुषंगिक हार्डवेअर व नेटवर्क प्रणाली सुरळीत सुरू राहावी याकरीता, प्रकल्प देखभालीचे कामकाज दि.०१.०५.२०१८ पासून मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत त्यांना दि.१६.०६.२०१७ रोजी दिलेल्या कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे प्रतिमाह रक्कम रुपये १४,४४,०००/- + कर याप्रमाणे, याकामी नविन कपंनीची नेमणूक होईपर्यंत चालू ठेवणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, साईटेक प्रकल्प दुरूस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत कार्यप्रणाली व अनुषंगिक हार्डवेअर व नेटवर्क प्रणाली सुरळीत सुरू राहावी याकरीता, प्रकल्प देखभालीचे कामकाज दि.०१.०५.२०१८ पासून मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत त्यांना याकामी देणेत आलेल्या कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे प्रतिमाह रक्कम रुपये १४,४४,०००/- + कर याप्रमाणे, चालू ठेवणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक व प्रशासकीय तसेच आर्थिक

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- साईटेक प्रकल्प दुरूस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत कार्यप्रणाली व अनुषंगिक हार्डवेअर व नेटवर्क प्रणाली सुरळीत सुरू राहावी याकरीता, प्रकल्प देखभालीचे कामकाज दि.०१.०५.२०१८ पासून मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत त्यांना याकामी देणेत आलेल्या कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे प्रतिमाह रक्कम रुपये १४,४४,०००/- + कर याप्रमाणे, चालू ठेवणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.२४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साईटेक प्रकल्प टप्पा-१ या प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्तीसाठी काढण्यात आलेल्या ई- निविदा प्रक्रियेमध्ये दोनच निविदाधारक तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्याने, सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.१९ **श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व बाहेरील स्टेज कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेल्या साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.९,३१,८१८+ टॅक्स एवढया खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील** तरतुद:-१) २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मीक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी दि.१३ जुलै,२०१७ रोजी प्राप्त झालेला सुधारीतअधिनियमातील तरतूद क्र.५मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये (तीन) खंड (ख) मधील तरतुद.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:-** १) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२६.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. १७ निर्णय क्र.६६९.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरतीचे आवाजाकरीता मुख्य ध्वनिकक्ष रुममध्ये साऊंड सिस्टीम यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. तसेच स्टेज कार्यक्रमाची साऊंड सिस्टीम यंत्रणा अपुरी पडत असल्याने सदरची यंत्रणा शताब्दी महोत्सवाचे दृष्टीने अद्ययावत करणेकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत (Maha IT Maharashtra) ध्वनिक्षेपण यंत्रणेचा सर्व्हे करण्यात आलेला आहे.त्यानुसार त्यांनी DPR देखील बनविला असून सदर DPR मध्ये करावयाचे आवश्यक त्या बदलाबाबत त्याना ई-मेलव्दारे कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेली ध्वनिक्षेपण विभागाची यंत्रणा सन १९९५ साली खरेदी करुन कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदरहु यंत्रणा ही २२ वर्षापुर्वीची असून ती तांत्रीक दृष्टया कालबाह्य झालेली असल्याने सध्यस्थितीत कार्यान्वित असलेले Audio Amplifier वारंवार बंद पडतात.

तथापी, सदरचे Audio Amplifier हे २२ वर्षापुर्वीपासून वापरात असल्याने त्याचे स्पेअर पार्टस् देखील मार्केटमध्ये ऊपलब्ध होणेस असंख्य अडचणी निर्माण होत असून नादुरुस्त झालेले Audio Amplifier दुरुस्त करणे दिवसेंदिवस अडचणीचे होत आहे. तसेच स्टेज कार्यक्रमाचे Amplifier हे ओव्हरलोड होत आहेत तसेच दैनंदिन वापरामुळे Speakerच्या Tuter Coilव इतर साऊंड सिस्टीम साहित्य खराब झाल्याने नविन खरेदी करणे अत्यंत आवश्यक असल्याने याबाबत दि.०६/०२/२०१८ रोजीचे टिपणी अन्वये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

परंतु, सदर प्रस्तावावरील निर्देशास अनुसरुन मा.उपजिल्हाधिकारी साहेब यांचेशी समक्ष चर्चा केली असता, सदर चर्चेअंती त्यांनी सदर साहित्यामध्ये इतर महत्वाच्या अत्यावश्यक लागणा-या साऊंड सिस्टीम संबधीत साहित्याचा समावेश करुन सदर कामी ई-निविदा प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने सदरचे साहित्य खरेदी करण्यात यावेत, असे चर्चेअंती निर्देश दिले आहेत.

त्यानुसार खालील तपशिलातील नमुद साहित्य अत्यावश्यक असून तातडीने खरेदी करण्याची आवश्यकता आहे.

| Sr.No. | Item Description/ Specification | Model Number | Make | Quantity | Rate | Total Amount Rupees |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Power Amplifier | CMX800VA -230 | QSC | 3Nos | 48,600/- | 1,45,800/- |
| 2 | Mic Stand (Big) | ATS-200 | Ahuja | 10 Nos | 496/- | 4,960/- |
| 3 | Mic Stand (Small) | DGT | Ahuja | 10 Nos | 521/- | 5,210/- |
| 4 | Mic | SM 58A- LC (Without Swith) | Shure/USA | 5Nos | 7,000/- | 35,000/- |
| 5 | Shure gooseneck cordless mic | MX415+MX890base | shure | 2 Nos | 48380/- | 96,760/- |
| 6 | Sennheiser cordless mic | EW 500/ mic 945 G3 | SENNHISER | 2 Nos | 62000/- | 1,24,000/- |
| 7 | Drama (Stage) Condenser Mic | MKE 600 | Sennheiser | 2 Nos | 24,000/- | 48,000/- |
| 8 | Studio master Amp | PA.6.0 KW | Studio master | 1 Nos | 41,610/- | 41610/- |
| 9 | DBX driver 260 | DBX260 | DBX | 1 Nos | 29,170/- | 29,170/- |
| 10 | Amp. Crown | 9000 MAI | Crown | 1 Nos | 1,36,728/- | 1,36,728/- |
| 11 | Amp. Crown | 5000 MAI | Crown | 1 Nos | 1,00,267/- | 1,00,267/- |
| 12 | JBL speaker | PRX 415 m | JBL | 2 Nos | 34,182/- | 68,364/- |
| 13 | JBL Tuter Coil | JBL SRX725 | JBL-USA make | 5 Nos | 7,297/- | 36,485/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | Sehniser wireless mic | XSW65 | sehniser | 2 Nos | 21,258/- | 42,516/- |
| 15 | Audio Distributter | 1 in 08 out MX882 | Behringrer | 2 Nos | 8,474/- | 16,948/- |
| **Total Amount : – In Rupees Nine Lac Thirty One Thousand Eight Hundred Eightin Only +Tax** | | | | | | **9,31,818/-+ Tax** |

**मागणी:-** उपरोक्त विषयास अनुसरुन प्रस्ताविकेत नमुद केलेल्या तपशीलानुसार साऊंड सिस्टीम साहित्य खरेदी करण्याकरीता **विविध पुरवठाधारकांकडुन दरपत्रक मागविले आहे.** त्यातील न्युनत्तम असलेले दर ग्राह्य धरण्यात आलेले असून सदर कामी येणा-याअंदाजे रक्कम रुपये 9,31,818/-+ टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदर साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदीकरणेसमान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल,असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश,तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** तंत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-**उपरोक्त प्रस्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेनुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती तसेच मंदिर व शताब्दी विभागामार्फत स्टेजवरील साई भजन संध्या कार्यक्रमाकरीता अत्यावश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी कामी संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये जाहीरात प्रसिध्द करुन जनसंपर्क विभागामार्फतमुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठीव इंग्रजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दकरणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम 9,31,818/-+ टॅक्स(अक्षरी रक्कम रु.नऊ लाख एकतीस हजार आठशे आठरा मात्र + टॅक्स) चे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर

निर्णय क्र.२४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तावित साहित्य खरेदी करतेवेळी समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

विषय नं.२० **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर धुणे/ इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे, भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/ इस्त्री करुन घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख)"भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी एकूण १५३६ खोल्या कार्यरत असून, या ठिकाणी साईभक्तांना चांगल्या दर्जाची निवासव्यवस्थामिळावी यासाठी मा.व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार येथील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे ही कामे लॉण्ड्रीठेकेदारांकडून आऊटसोर्स पध्दतीने करुन घेतली जात आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय क्र.४९२(०९) अन्वये लॉण्ड्री ठेकेदार मे.साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस,सावळीविहीर यांना जा.नं.एसएसएस/ वशी-साईआश्रम भक्तनिवास/१६७०/२०१७ दि.२९/०६/२०१७ ने दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीकरीता खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**अ) संस्थानचे कपडे**

| अ.नं. | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करांसह |
|---|---|---|
| ०१ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | २.९० |
| ०२ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे. | १.७५ |
| ०३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे. | २.७५ |
| ०४ | चादर धुणे | ४.९० |

ब) भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे.

| पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे. | | | पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे. | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करासह | अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करासह |
| १ | सफारी सुट | १६.०० | १ | सफारी सुट | ८.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | ८.०० | २ | शर्ट/टी शर्ट | ४.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८.०० | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ४.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | ८.०० | ४ | जाकेट/स्वेटर | ४.०० |
| महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे. | | | महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे. | | |
| अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपयेसर्व करासह | अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करासह |
| १ | साडी | २०.०० | १ | साडी | १२.०० |
| २ | ब्लाऊज | ६.०० | २ | ब्लाऊज | ३.०० |
| ३ | टी-शर्ट | ८.०० | ३ | टी-शर्ट | ५.०० |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ८.०० | ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५.०० |
| ५ | पॅन्ट/जीन्स | ८.०० | ५ | पॅन्ट/जीन्स | ५.०० |
| ६ | नाईट सुट | १३.०० | ६ | नाईट सुट | ६.०० |
| ७ | जाकेट/स्वेटर | ८.०० | ७ | जाकेट/स्वेटर | ५.०० |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १०.०० | ८ | पेटीकोट/गाऊन | ३.०० |
| मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे. | | | मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे. | | |
| अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करासह | अ.नं | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रुपये सर्व करासह |
| १ | सफारी सुट | १५.०० | १ | सफारी सुट | ८.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | ८.०० | २ | शर्ट/टी शर्ट | ४.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८.०० | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ४.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | ८.०० | ४ | जाकेट/स्वेटर | ४.०० |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ८.०० | ५ | शॉर्ट पॅन्ट | ४.०० |

**प्रस्तावः-** सन २०१७-१८ श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सुरु असून, साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी वाढत आहे. साईभक्तांना चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता संस्थानचे या विभागातील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे तसेच निवासी साईभक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे ही कामे मे.साईश्रध्दालॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर या लॉण्ड्री ठेकेदाराकडून आऊटसोर्स पध्दतीने करुन घेतली जात आहे. सदर कामाचा कालावधी दि.३०/०६/२०१८ रोजी संपुष्टात येत असून, नव्याने दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे.

अ) स्थानिक लॉण्ड्री दरधारकांकडून सध्याच्या बाजारभावाची चौकशी केली असता, त्यांनी दिलेल्या सर्व करांसह दरांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशील | दरमहा सरासरी लॉण्ड्रीसाठी कपड्यांची संख्या | मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी दिलेले दर रु. | मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ऑण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी दिलेले दर रु. | मे.घरोंदा ड्रायक्लिनर्स, कोपरगाव यांनी दिलेले दर रु. | **सरासरी बाजार भावाचे दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बेडशीट | २७०६८ | ६:५० | ४:५० | ५:०० | **०५:३३** |
| २. | उशी कव्हर | १८९१० | ३:०० | ३:०० | ३:०० | **०३:००** |
| ३. | चादर | ९८६२ | १०:०० | ८:०० | ७:०० | **०८:३३** |
| ४. | टॉवेल | ३६७५ | ४:०० | ३:०० | ४:५० | ०३:८३ |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, संस्थानचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले दर हे आजच्या बाजार भावापेक्षा कमी आहेत.

**ब)** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये माहेजूलै २०१७ ते माहे जानेवारी २०१८ अखेर सहा महिन्यांमध्ये रु.११,८७,३७२/- एवढा खर्च झालेला असून, फेब्रुवारी २०१८ ते जुन २०१८ अखेर या पाच

महिन्यांमध्ये संभाव्य खर्च रु.५,९६,३६०/- इतका होईल. असे एकूण या आर्थिक वर्षात रु.१७,८३,७३२/- खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील पुढील प्रमाणे-

| अ.नं | महिना | बील रक्कम रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | जूलै २०१७ | २,४०,०११/- | २,४०,०११/- |
| २ | ऑगस्ट २०१७ | १,९५,७००/- | १,९५,७००/- |
| ३ | सप्टेंबर २०१७ | १,६७,२०९/- | १,६७,२०९/- |
| ४ | ऑक्टोबर २०१७ | १,५९,८७१/- | १,५९,८७१/- |
| ५ | नोव्हेबर २०१७ | १,९४,०१०/- | १,९४,०१०/- |
| ६ | डिसेंबर २०१७ | १,११,२९९/- | १,११,२९९/- |
| ७ | जानेवारी २०१८ | १,१९,२७२/- | १,१९,२७२/- |
| | | **एकूण झालेला खर्च** | **११,८७,३७२/-** |
| या चालू वर्षातील माहे फेब्रुवारी २०१७ ते जुन २०१८ अखेर होणारा संभाव्य खर्च (माहे जानेवारी २०१८ मध्ये झालेला खर्च रु.१,१९,२७२/- दरमहा खर्च गृहीत धरुन ५ महीन्यांचा अंदाजे संभाव्य खर्च) | | | ५,९६,३६०/- |
| | | **एकूण खर्च** | **१७,८३,७३२/-** |

सन २०१७-१८ या वर्षामध्ये संभाव्य खर्च रु.१७,८३,७३२/- झालेला असून, पुढील सन २०१८-१९ या एक वर्षाकरीता या विभागातील लॉण्ड्री कामासाठी येणा-या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| **२०१७-१८ मधील संभाव्य खर्च** | **पुढील वर्षासाठी होणारा वाढीव खर्च १० %** | **अंदाजे १० % वाढसह एकूण रक्कम रुपये** | **१८ % जी.एस.टी रक्कम रुपये** | **एकूण सन २०१८-१९ वर्षासाठी अंदाजित एकूण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| **१७,८३,७३२** | १,७८,३७३ | १९,६२,१०५ | ३,५३,१७८ | २३,१५,२८३ |

सन २०१८-१९ या वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु.२३,१५,२८३/- (अक्षरी रु.तेवीस लाख पंधरा हजार दोनशे त्र्याऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्रायः-** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा कालावधी दि.३०/०६/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे.साईभक्तांना देण्यात येत असलेल्या सेवा-सुविधांमध्ये अडचण निर्माण होऊ नये, यासाठी दरम्यानच्या कालावधीत खालील प्रमाणे आऊटसोर्स पध्दतीने कपडे लॉण्ड्री करुन घेणेकामी सन २०१८-१९ या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

१) जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

२) सन २०१८-१९ या एक वर्षाकरीता बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व निवासी भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे कामाकरीता रु.२३,१५,२८३/- (अक्षरी रु.तेवीस लाख पंधरा हजार दोनशे त्र्याऐंशी) मात्रचे खर्चास,

उपरोक्त ०१ व ०२ बाबींस मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे निणर्यार्थ सादर.

निर्णय क्र.२४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या वर्षामध्ये साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर धुणे/ इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे, भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/ इस्त्री करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२३,१५,२८३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.२१ **जुन्या जीर्ण २००० नग रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेसची शासनाचे मंजुरी घेऊन वार्षिक उच्चतम दर कराराने विक्री करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १७ चा ४ – विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९.०९.२०१६ रोजी झालेल्या सभेमधील विषय क्रं-०९ व निर्णय क्रं-६४६

**प्रस्तावना**– उपरोक्त निर्णयान्वये विभागासाठी आवश्यक असलेल्या २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टरसह खरेदी करण्यात आल्या आहे. सन-२०११ मध्ये खालीलप्रमाणे २००० नग रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेसची खरेदी करुन साईभक्तांचे वापरात घेण्यात आलेल्या होत्या तपशील खालीलप्रमाणे.

| अ. नं | संगणक कोड | वस्तुचे नाव | नग | दर प्रति नग रु. पै. | एकुण किमंत | असेट टाईप |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MAT-6002 | रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेस | 1997 | 2875.00 | 57,41,375 | FURN |
| 2 | MAT-6004 | रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेस | 03 | 2875.00 | 8,625 | FURN |

वरीलप्रमाणे गादयाचा वापर सुमारे ६ वर्षापासुन सतत होत आहे त्यामुळे गादया खराब झालेल्या आहेत, फाटलेल्या आहेत आता नवीन २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टरसह खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

**विभागाची मागणी-** प्रस्तुतच्या जुन्या निरुपयोगी गादया भक्तांचे सेवेतुन काढुन घेऊन, त्यांचा उपयोग नसल्याने उचित पध्दतीने अभिलेख कक्षामार्फत विकता येतील.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** जुन्या रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेस २००० नगांची दि.३१.०३.२०१७ अखेर घसारा वजा किंमत रु.२३,५९,९५७.६३ पैसे (अक्षरी रुपये तेवीस लाख, एकोणसाठ हजार, नऊशे सत्तावन्न, पेसै त्रेसष्ठ मात्र) इतकी अंतर्गत लेखापरीक्षण विभागाने निश्चित केली आहे.

अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७-४ मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही " असे नमुद असल्याने सदरबाबत महाराष्ट्र शासनाची मंजुरी घ्यावी लागेल तदनंतर नमुदप्रमाणे २००० नग रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेस ची उचित पध्दतीने अभिलेखकक्ष मार्फत विक्री करुन प्राप्त रक्कम संस्थान कोषात जमा करावी लागेल व सदरच्या नोंदी विभागाकडील डेडस्टॉक रजिस्टरमधुन कमी कराव्या लागतील.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या जीर्ण २००० नग रबराईज्ड क्वॉयरफोम मॅट्रेसची शासनाचे मंजुरी घेऊन वार्षिक उच्चतम दर कराराने विक्री करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

विषय नं.२२ **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता ज्युनियर के.जी. वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. शाळेची प्राथमिक विभागाची इ. १ ली ते ७ वी पर्यंत व माध्यमिक विभागाची इ.८ वी ते १० वी पर्यंत नियमानुसार शालेय मान्यता घेण्यात आलेली आहे. सन १९९० पासून शाळा सुरु करण्यात आली तेव्हापासून आपल्या शाळेत पुर्वप्राथमिक विभाग ज्यु. केजी व सि. केजी. वर्गानां प्रवेश देण्यात येत आहेत. शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंधात पुर्व प्राथमिक विभागासाठी एकूण ०८ सहा. शिक्षक पदे मंजूर करुन घेण्यात आलेले आहेत. सन १९९० ते सन २००७ पर्यंत ज्यु. केजीच्या ०३ वर्ग तुकडी कार्यरत होत्या परंतू संस्थानचे प्रशासन व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने त्यांचे अखत्यारीत त्यावेळी निर्णय घेऊन व पालकांचे मागणीनुसार ज्यु. केजी तुकडी संख्येत वाढ केली. सन २०१० ते २०१८ अखेर ज्यु. केजी तुकडी संख्येत वाढ होऊन आजमितीस ज्यु. केजीच्या ०५ व सिनीयर केजीच्या ०५ अशा पुर्व प्राथमिक विभागाच्या एकूण १० वर्ग तुकडी कार्यरत झालेल्या आहेत. केजी चे हेच विद्यार्थीपुढे इयत्ता १ ली साठी प्रविष्ट करुन घेतले जातात व परिणामी पुढील वर्ग तुकडींची नैसर्गिक वाढ होते. आहेत.

**सन १९९० ते २०१८ अखेर ज्यु. केजीचे वर्ग तुकडीवाढी बाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.**

| अ. नं. | सन | ज्यु. केजी कार्यरत तुकडी | ज्यु. केजी कडे वाढ झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी कडे कमी झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी विभाग एकूण कार्यरत तुकडी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९० ते १९९८ | ०२ | --- | -- | ०२ |
| २ | १९९९ ते २००३ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ३ | २००४ ते २००६ | ०२ | --- | ०१ | ०२ |
| ४ | २००६ ते २००७ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ५ | २००८ ते २००९ | ०३ | ०२ | -- | ०५ |
| ६ | २००९ ते २०१० | ०३ | --- | ०२ | ०३ |
| ७ | २०१० ते २०१३ | ०३ | ०३ | -- | ०६ |
| ८ | २०१३ ते २०१८ अखेर | ०५ | -- | ०१ | ०५ |

शाळेच्या शिक्षणाचा दर्जा व इतर शाळेच्या तुलनेत अत्यंत अल्पदरात असलेले शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क विचारात घेता पालकांनी आपल्या शाळेला मोठयाप्रमाणावर पसंती देवून पाल्यांला शाळेत प्रवेश मिळणेसाठी पालकांनी त्यावेळेचे मा. व्यवस्थापन समिती व प्रशासनाकडे पाठपुरावा करुन, प्रसंगी आंदोलने करुन ज्यु. केजी वर्ग तुकडी वाढविण्यास भाग पाडलेले आहे. प्रसंगी मिडीयाचा वापर तसेच राजकीय दबाव आणून ज्यु. केजी चे प्रवेश वेळोवेळी वाढविले आहे. यामुळे सन २०१० पासून सन २०१८ पर्यंत ज्यु. केजी वर्ग तुकडीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते. सन २०१० पासून प्रत्येक शैक्षणिक वर्षात किमान २०० विद्यार्थ्यांना ज्यु. केजी साठी प्रवेश देण्यात आलेले आहेत. केजी वर्गासाठी प्रवेश वाढविले तर तेच विद्यार्थी पुढील वर्गासाठी प्रविष्ठ करावयाचे असल्याने पुढील वर्ग तुकडीत नैसर्गिक वाढ होते. तुकडी वाढ झालेनंतर अध्यापन करणेसाठी शिक्षक भरती करावे लागतात. त्याच धर्तीवर त्यावेळी केजी विभागाचे विद्यार्थी पुढे सालाबाद प्रमाणे वरच्या वर्गात प्रवेशीत करण्यात आले व विद्यार्थी संख्या नुसार शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षक भरती करावी लागली आहे.

संस्थानचा आकृतीबंध हा सन २००९ मध्ये मंजूर करण्यात आला त्यानंतर कुठलाही आकृतीबंधात मंजूरीबाबत वाढ करण्यात आलेली नाही. परंतू नैसर्गिक तुकडी वाढीमुळे वाढलेल्या वर्ग तुकडींना अध्यापन करणेकरीता आवश्यकतेनुसार जाहिरात देवून मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन प्रंसगी खंडपीठाची मान्यता घेऊन सहा. शिक्षक भरती करावी लागली आहे.

सन २००९ मध्ये शाळेकडील आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला असून त्यावेळेची विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या व आजची विद्यार्थी यामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. आजमितीस पुर्व प्राथमिक (केजी विभाग) एकूण विद्यार्थी ४८५ आहे. प्राथमिक विभाग इयता १ ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या १७०१ आहेव इयत्ता ८ वी ते १० वी एकूण विद्यार्थी संख्या ४१४ आहे. शाळेत एकूण २६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकूण ३४ वर्गखोल्यांमध्ये ५४ वर्ग तुकडीचे अध्यापनाचे काम अविरतपणे करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पासून शालेय वेळेत बदल करण्यात येत आलेला आहे. शालेय मान्यतेनुसार प्राथमिक विभाग इ.१ ली ते ७ वी ३५ वर्ग तुकडी सकाळचे सत्रात सकाळी ०७.१५ ते १२.१५ यावेळेत भरविण्यात येत आहेत तर ज्यु. केजी , सिनी. केजी. १० वर्ग व माध्यमिक विभाग ८ वी ते १० वी एकूण ०९ वर्ग तुकडी या दुपारचे वेळेत दुपारी १२.३० ते ०५.३० या वेळेत भरविण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाकडून मंजूरी घेण्यात आलेली आहे.

**मागणीः-** शाळेची आजची विद्यार्थी संख्या व आकृतीबंधात मंजुर असलेली कायम/ कंत्राटी शिक्षक कर्मचारी संख्या ही कमी आहे. शासनाच्या परवानगीशिवाय शिक्षक कर्मचारी भरती करता येत नाही. तसेच कायम/ कंत्राटी व आऊटसोर्स पद्धतीने जरी शिक्षक घ्यावयाचे असतील तरी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय नवीन कर्मचारी भरती करता येत नाहीत. तरी शाळेकडील अपुरे वर्ग शिक्षक विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्यु. केजी करीता प्रवेश देतांना प्रती वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे फक्त १५० प्रवेश देण्यात येऊन फक्त ३ वर्ग तुकडी करण्यात याव्यात व केजी विभागाकडील पात्र असलेले कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना इयत्ता ८ वी ते १०वीचे वर्ग तुकडीला अध्यापन करणेसाठी वापरता येतील. यामुळे माध्यमीक विभागाकडे आवश्यक असलेल्या शिक्षकांची गरज काही प्रमाणात निश्चितच कमी होईल असे वाटते. शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये खालील वेळापत्रकानुसार व नियमावलीनुसार शालेय प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी असे नम्र मत आहे.

**सन २०१८ -१९ ज्यु .के.जी. प्रवेश प्रक्रिया तपशिलवार तक्ता**

| अ.न. | प्रक्रिया सन २०१८ - १९ | तपशिल | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दि.०२ एप्रिल २०१८ ते दि. ११ एप्रिल २०१८ अखेर | प्रवेश अर्ज वाटप व अर्ज स्विकृती | अर्ज वाटपाची वेळ स.१०.३० ते १.३० प्रवेश अर्ज स्विकृती दु. ३.०० ते ५.०० |
| २ | दि.१२ एप्रिल ते १७ एप्रिल २०१८ अखेर | प्राप्त अर्जाची छाननी, प्रवेश पात्र- अपात्र ठरविणे | ----- |
| ३ | दि. २५ एप्रिल २०१८ | लॉटरी पद्धतीने विद्यार्थी निवड करुन यादी जाहिर करणे | स.११.३० वा. |
| ४ | दि.२६ एप्रिल २०१८ ते दि.३० एप्रिल २०१८ अखेर | पालकांनी शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क भरुन पाल्यांचा प्रवेश निश्चित करणे. | स.१०.३० ते १.०० वाजेपर्यंत |
| ५ | दि. ०२ मे २०१८ | रिक्त राहिलेल्या जागांवर त्याच क्षेत्रातील इतरांना लॉटरी पद्धतीने प्रवेश | सकाळी १०.३० वा. |

**उपरोक्त प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींची विचार व्हावा.**

१) सन २०१८ – २०१९ शैक्षणिक वर्षात ज्यु. केजी साठी मर्यादीत १५० प्रवेश देवून फक्त ३ तुकडया करण्यात याव्यात .दि.०२ एप्रिल २०१८ ते दि. ११ एप्रिल २०१८ पर्यत सकाळी १०.३० ते ०१.३० यावेळेत शाळेच्या कार्यालयातून प्रवेश अर्जाचे मोफत वाटप करण्यात यावे व दुपारी ०३.०० ते ०५.०० यावेळेत प्रवेश अर्जांची स्विकृती शाळेच्या कार्यालयात करुन घेण्यात यावी. शालेय व्यवस्थापनात अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन उपरोक्त नमूद केलेले वेळापत्रकानुसारच दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज वाटप व प्रवेश अर्ज स्विकृती करण्यात यावी .

२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी. १ दि.२५ जानेवारी,२०१७ अन्वये या पुढे शाळेत प्रवेश देतांना सर्व शाळांनी ३० सप्टेंबर हा मानिव दिनांक गृहीत धरुन मुलांचे वय निश्चित करण्यात यावे असे ठरले आहे.

**२१ जानेवारी २०१५ चे शासन निर्णयानुसार** प्ले ग्रुप/ नर्सरी ( इयत्ता १ ली पूर्वीचा ३ रा वर्ग) साठी किमान वयोमर्यांदा **३**+अशी असून इयत्ता १ ली साठी किमान वयोमर्यादा **६**+अशी निर्धारीत करण्यात आलेली आहे. उपरोक्त निर्णयाचा आधार घेऊन आपल्या शाळेत ज्यु. केजी प्रवेशासाठी किमान वयोमर्यादा ४+अशी ठेवण्यात आलेली आहे, तसेच कमाल वयोमर्यादाही ४.९ पर्यंत आपण निश्चित केलेली आहे. जेणेकरुन सदर विद्यार्थ्यांचे सिनीयर केजी मध्ये शिक्षण घेतांना वय ५ +होत आहे. ज्यु. केजी करीता पाल्यांचा वयोगट ४.०० ते ४.९ या पर्यत असावा म्हणजे जन्मतारीख (सप्टेंबर २०१४ ते डिसेंबर २०१३) या कालावधीतील असावी.

३) श्री साईबाबा इ.मि.स्कुल शाळेत सन २०१० पर्यंत ज्यु. केजी साठी ३ वर्ग तुकडी साठी प्रवेश देण्यात येत होते. त्यावेळी इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेणेबाबत पालकांचा कल कमी असल्याने प्रवेशासाठी कुठलीही अडचण येत नव्हती. कालांतराने ज्यु.के.जी. प्रवेशासाठी पालकांची वाढती मागणी विचारात घेता मा. व्यवस्थापन समिती व प्रशासनाच्या मान्यतेने सन २०१० पासून ज्यु. केजी साठी २०० प्रवेश देवून ५ वर्गतुकडी कार्यरत करण्यात आलेल्या आहेत. आजमितीस वर्गखोल्यांची व शिक्षक भरतीची अडचण विचारात घेता केवळ १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन ३ वर्ग तुकडी करण्यात याव्यात असे नम्र मत आहे. तसेच गेल्या ५ वर्षाचे कालावधीत शिर्डी गावात व परीसरात इंग्रजी माध्यामाच्या ब-याच शाळा नव्याने झालेल्या असून उर्वरीत पालक आपले पाल्यांचा त्या ठिकाणी प्रवेश घेऊ शकतील. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या सर्वच पालकांचे पाल्यांना प्रवेश द्यावयाचा ठरला तर वर्ग तुकडी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, किमान एकूण ०६ वर्ग तुकडी तरी कार्यरत कराव्या लागतील. तरी प्रवेशाबाबत मर्यादा ठेऊन फक्त १५० प्रवेश देण्यात यावेत.

४) शिर्डी नगर पंचायत हद्दीतील तसेच नगरपंचायत हद्दीचे बाहेरील( राहाता, साकुरी, निघोज, निमगांव, पिंपळवाडी, नांदुर्खी, डो-हाळे, को-हाळे, सावळीविहीर, रुई) इ. गावांतील रहिवाशी पाल्यांना प्रवेश देतेवेळी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका) यांनी प्रमाणित केलेला, तसेचशिरडी गावातील आधारकार्ड, मतदान कार्ड/ नगर पंचायत रहिवासी दाखला/ रेशनकार्ड/ लाईटबील/

भाडेकरु तत्वावर राहत असलेल्या रहिवाशी (खोली मालकाचे लाईट बील प्रत व प्रतिज्ञापत्र) ही कागदपत्र तपासून प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात यावेत.

५) प्रवेश निश्चितकरतांना उपरोक्त सर्व कागदपत्र पडताळणी करणेकामी शालेय प्रशासनातून समिती तयार करण्यात यावी. या समितीने पडताळणी केलेनंतरचा पात्र / अपात्र प्रवेशाबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात यावा. तसेच विदयार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात यावे व जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्यांचा प्रवेश रद्द करण्यात यावा.

६) स्कुलबस सुविधा ही उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना पुरविण्यात येतील परंतू पुरेशा प्रमाणात बसमध्ये सिट उपलब्ध नसतील तर अशावेळी पालकांना स्वतः पाल्यांची शाळेत ने-आण करण्याची सोय करावी लागेल या अटीवर प्रवेश देण्यात यावा.

७) ज्यु. केजी प्रवेश प्रक्रीया सुलभपणे व्हावी याकरीता प्रवेशासाठी आलेले अर्जांची छाननी करणेकामी शाळेकडून शिक्षकांची एक समिती नेमण्यात यावी व सदर समितीने पात्र ठरविलेल्या पाल्यांना प्रवेश देण्यात यावे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– ज्यु.के.जी प्रवेशाबाबत उपरोक्त नियमावलीनुसार प्रक्रिया राबविण्यात आली तर प्रशासनावर रोष राहणार नाही व भविष्यात अडचण येणार नाही.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**– इयत्ता १ ली च्या फक्त ३ वर्ग तुकडींना मान्यता मिळालेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०१८ -१९ मध्ये ज्यु. केजी करीता ०३ वर्ग तुकडीसाठी मर्यादीत एकूण १५० प्रवेश देण्यात यावेत. सदरची प्रक्रीया लॉटरी पद्धतीने नांवे काढून फक्त पात्र ठरलेले विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात यावेत. प्रवेशाच्याजागांसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.लॉटरी पद्धतीने सोडत काढूनसन २०१८-१९ करीता ज्यु. केजी साठी प्रवेश देण्यात यावेत. ज्यु. केजी साठी एकूण १५० प्रवेश देण्यात यावेत यामध्ये १० % संस्थान कर्मचारी पाल्य, ४० % कंत्राटी/ आऊटसोर्स कर्मचारी पाल्य, ३४ % शिरडी नंगरपंचायत हद्दीतील पाल्य व १६ % नगरपंचायत हद्दीचे बाहेरील रहिवाशी पाल्य अशा आरक्षणानुसार एकूण १०० % प्रवेश देण्यात यावेत.

| **तपशिल** | संस्थान कर्मचारी पाल्य | कंत्राटी/आऊटसोर्स कर्मचारी पाल्य | शिरडीनगरपंचायत हद्दीतील रहिवाशी पाल्य | नगरपंचायत हद्दीचे बाहेरील रहिवाशी पाल्य | एकूण प्रवेशाच्या जागा |
|---|---|---|---|---|---|
| ज्यु. केजी प्रवेश जागा | **१५** | **६०** | **५१** | **२४** | **१५०** |

१. उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहीती पालकांना माहीत व्हावी यासाठी शाळेच्या प्रवेशव्दारावर प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकाचा डिजिटल बोर्ड तयार करुन लावता येईल.

२. प्रवेशा बाबतची माहिती पालकांना होणेकामी स्थानिक वर्तमानपत्रात बातमी देता येईल.

३. केजी प्रवेश वेळापत्रकाबाबत संस्थानचे सर्व विभागातील कर्मचा-यांना परिपत्रकाद्वारे कळविता येईल.

४. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पालकांचे पाल्यासाठी एकूण **५१** प्रवेश व नगर पंचायत हद्दीचे बाहेरील रहिवाशी पाल्य (राहाता, साकुरी, निघोज, निमगांव, पिंपळवाडी, नांदुर्खी, डो-हाळे, को-हाळे, सावळीविहीर, रुई) इ. गावांतील रहिवाशांचे **२४** पाल्यांना लॉटरी पद्धतीने प्रवेश दिले जातील, नगर पंचायत हद्दीचे बाहेरील प्रवेश लॉटरीत उपरोक्त परीसरातील सर्व गावांतील अर्जांचा समावेश करुन प्रवेशाबाबतची निवड केली जाईल.

५. संस्थान कायम कर्मचारी एकूण **१५** प्रवेश तसेच कंत्राटी/ आऊटसोर्स कर्मचारी यांनाही लॉटरी पद्धतीनेच एकूण **६०** प्रवेश दिले जातील मात्र या कर्मचा-यांसाठी गावाचे हद्दीबाबतचा नियम कर्मचारी यांना लागू राहणार नाही.

६. रिक्त राहिलेल्या जागांवर त्याच क्षेत्रातील इतरांना लॉटरी पद्धतीने ०२ मे २०१८ रोजी प्रवेश देण्यात येतील.

तरी उपरोक्त नियमावलीनुसार व कालावधीप्रमाणे ज्यु.केजी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता ज्युनियर के.जी. वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी तयार करणेत आलेल्या उपरोक्त नियमावलीचे अवलोकन करुन सदरहू नियमावलीमधील नियम क्र.१,२ व ३ यांना मान्यता देण्यात आली. तसेच इयत्ता १ ली च्या फक्त ३ वर्ग तुकडींना मान्यता मिळालेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्यु. केजी करीता ०३ वर्ग तुकडीसाठी मर्यादीत एकूण १५० प्रवेश देण्यात यावा.**

**उपरोक्त १५० प्रवेशाच्या जागा प्रथम प्राधान्याने संस्थान कायम कर्मचाऱ्यांचे पाल्य व कंत्राटी/ आऊटसोर्स कर्मचाऱ्यांचे पाल्य यांना प्रवेश देण्यात यावा. या कर्मचारी पाल्यांचे प्रवेश अर्ज १५० पेक्षा जास्त असल्यास प्रवेशासाठी लॉटरी पध्दतीचा अवलंब करणेत यावा. तसेच १५० पैकी जागा शिल्लक असल्यास शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पाल्यांच्या अर्जाची लॉटरी पध्दतीचा अवलब करुन प्रवेश देण्यात यावा, त्यानंतरही जागा शिल्लक राहिल्यास नगरपंचायत हद्दीबाहेरील अर्जदारांना लॉटरी पध्दतीने प्रवेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या मान्यवर देणगीदार भक्तांच्या देणगीद्वारे संस्थानला मिळालेल्या महत्वाच्या वस्तू/ मशिनरी व प्रकल्पांबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेमधील निर्णय क्रमांक ९०७ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०५.

**प्रस्ताविक**– श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी जगाच्या व देशाच्या कानाकोप-यातून साईभक्त शिर्डीस येत असतात. यामध्ये अनेक दानशुर व्यक्तींचाही सामावेश असतो. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेमधील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये, "श्री साईबाबा संस्थानला रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) देणगीदार भक्तांची आरतीची व्यवस्था देणगी दिलेल्या दिवशी वा त्यांचे विनंतीनुसार इतर दिवशी एकदाच मोफत करण्यात यावी." असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानला रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) साईभक्तांची जनसंपर्क विभागामार्फत दर्शन/आरतीची व्यवस्था करण्यात येते. तसेच श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या मान्यवरांना साईभक्तांना संस्थानचे श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, साई आश्रम आदि उपक्रम जनसंपर्क अधिकारी यांनी समक्ष जावून दाखविल्याने व संस्थानला आवश्यक असणा-या वस्तू/मशिनरी/प्रकल्प आदिबाबत माहिती देऊन सदर कामाची निकड देणगीदारांना समजावून सांगितल्याने देणगीदार साईभक्तांच्या देणगीतून खालील ठळक प्रकल्प, मशिनरी व वस्तू श्री साईबाबांच्या आशिर्वादाने संस्थानला प्राप्त झाले आहे.

१) महिंद्रा ॲण्ड महिंद्रा ग्रुपचे अध्यक्ष श्री.आनंद महिंद्रा हे श्री साईबाबांचे जुने भक्त आहेत. वर्षातून किमान एकदा तरी ते साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. त्यांचे कंपनीने उत्पादीत केलेल्या प्रत्येक मॉडेलचे पहिले वाहन ते श्री साईबाबा संस्थानला देणगीदाखल देतात. असेच मागील वर्षी श्री.आनंद महिंद्रा साईबाबांच्या दर्शनासाठी आले त्यावेळी त्यांना श्री साईबाबा संस्थानला भेडसावत असलेल्या पाण्याच्या टंचाईबाबत माहिती देवून संस्थानची पाणीसाठवण क्षमता वाढल्यास संस्थानचा पाणीप्रश्न सुटण्यास मदत होईल असे सांगितले असता त्यांनी तातडीने याबाबतचा प्रस्ताव मागितला व त्यास होकारही दिला. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री.आनंद महिंद्रा यांच्या महिंद्रा ॲण्ड महिंद्रा उद्योग समुहाने सुमारे ०२ कोटी रुपये खर्च करुन सदरचा साठवण तलाव पुर्ण करुन दिला आहे. त्यामुळे ४२ दशलक्ष लिटर पाण्याचा साठा झाला असून संस्थानच्या पाणीसाठवण क्षमतेत वाढ झाल्याने पाणीटंचाईचे संकट दूर होण्यास मदत झाली आहे.

२) श्री.सुधिर प्रभु, मुंबई हे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांची दर्शन/आरतीची व्यवस्था करुन त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईप्रसादालय प्रत्यक्ष दाखविले असता त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यावेळी श्री.प्रभु यांची वैद्यकीय संचालक यांचेशी भेट घालवून दिली असता श्री.प्रभु यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी ९९,३२,५५६/- रुपये किंमतीचे इक्वीपमेंट देणगीदाखल दिले असून याव्दारे अत्याधुनिक आय.सी.यु.तयार करण्यात आला आहे. तसेच माहे जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ या एक वर्षाचे कालावधीत देणगीदार साईभक्तांच्या देणगीतून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी रुपये २,३५,५३,९३६/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी पस्तीस लाख त्रेपन्न हजार नऊशे छत्तीस मात्र) इतक्या रकमेचे मेडीकल इक्वीपमेंट व मशिनरी जनसंपर्क विभागाकडून प्राप्त झाल्या असलेबाबत वैद्यकीय संचालक यांचे दिनांक १३.०१.२०१८ चे पत्र सोबत सादर केले आहे.

३) श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी औषधांची तातडीची गरज आहे तेव्हा देणगीदार साईभक्तांच्या मदतीने औषधे उपलब्ध करुन देणेबाबत डॉ.नरोडे यांनी जनसंपर्क अधिकारी यांना सांगितले. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सन २०१६-१७ मध्ये रुपये ३०,८९,७३०/- इतक्या रक्कमेची औषधे/सर्जिकल साहित्य देणगीदार साईभक्तांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेली असून याबाबत श्री साईबाबा हॉस्पिटलचे दिनांक ०१.०२.२०१७ चे पत्र सोबत सादर केले आहे.

४) राजू वेगासना फाऊंडेशनचे श्री.आनंद राजू, हैद्राबाद हे श्रीं साईबाबांचे दर्शनासाठी आले असता त्यांना दर्शन रांगेतील साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आर.ओ.प्लॅन्ट उभारणे आवश्यक असल्याचे सांगून, सदरचे आर.ओ.प्लॅन्ट देणगीदाखल देणेबाबत त्यांना विनंती केली असता त्यांनी ७,१०,०००/- रुपये किंमतीचे १ हजार लिटर क्षमतेचे ०२ नग आर.ओ.प्लॅन्टची उभारणी करुन दिलेली आहे.

५) दिनांक ३० जुलै २०१७ रोजी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या साईपत्रिका संमेलनाचे भोजन, स्टेज, पी.ए.सिस्टीम व इतर अनुषंगीक बाबींचे रुपये १,७१,०००/- रुपयांचे बील आदा करणेबाबत मुंबई येथील देणगीदार श्री.प्रिन्स गोयल व दिपक भतिजा यांना सांगितले असता त्यांनी सदरची रक्कम देणगी दाखल दिलेली आहे.

६) श्री साईबाबा संस्थानला ए 4 साईजच्या पेपरची आवश्यकता असून देणगीदार साईभक्तांच्या मदतीने तातडीने ए 4 पेपर मिळणेबाबत भांडार विभागाने कळविले होते. त्यानुसार ट्रायडंट लिमिटेड, मुंबई या कंपनीचे प्रतिनिधी श्री.सुनिल शहा श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांना श्री साईबाबा संस्थानला झेरॉक्स पेपरची आवश्यकता असलेबाबत सांगितले असता त्यांनी रुपये ५,१४,५००/- किंमतीचे ११x८ (ए 4) साईजचे व रुपये ३,२१,८७८/- किंमतीचे १३x८ साईजचे झेरॉक्स पेपर (रिम) देणगी दिले आहे.

७) साई आश्रम भक्तनिवासस्थान विभागाच्या मागणीनुसार साईआश्रम येथील सर्व खोल्यामध्ये ढेकूण, झुरळे व इतर किटकांचा त्रास होऊ नये यासाठी तातडीची गरज म्हणून देणगी स्वरुपात औषध स्विकारणेबाबत कळविले होते. त्यानुसार दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी मे.रेन्बो फॅबर्ट प्रा.लि, नोएडाचे प्रतिनिधी श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांना साईआश्रम विभागात औषध फवारण करणेसाठी औषधांची गरज असलेबाबत सांगितले असता त्यांनी रुपये १,४५,२००/- फवारणी औषधे देणगी दिले आहे.

८) अहमदाबाद येथील साईभक्त सौ.कविता शहा ह्या श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आल्या असता त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता संस्थानच्या बांधकाम विभागासाठी आवश्यक असलेल्या साहित्याबाबत सांगितले असता त्यांनी रुपये ४८,२१०/- किंमतीचे साहित्य देणगी दिले आहे.

९) श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता बेडशीट व पिलोकव्हरची अत्यंत आवश्यकता असलेबाबत समजल्याने साईभक्त श्री.सुनिल शहा हे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांना श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता आवश्यक असलेले बेडशीट व पिलोकव्हर बाबत सांगितले. त्यांनी दिनांक ०१.१२.२०१७ रोजी ५५२ बेडशीट व पिलोकव्हर देणगी स्वरुपात दिले आहे.

१०) साईआश्रम इमारतीचे बिल्डर श्री.प्रदीप जैन यांना साईआश्रम इमारतीचे पाणीपुरवठयासाठी बसविण्यात आलेले वॉल व इतर साहित्य खराब झाल्याने ते बदलण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याबाबत माहिती सांगितली असता त्यांनी साईआश्रम इमारतीचे प्लंबिंग व अनुषंगीक साहित्यासाठी रुपये १३,०८,६२०/- किंमतीचे साहीत्य देणगीची कार्यवाही चालू आहे.

११) दिनांक २१ जानेवारी २०१८ रोजीचे किडनी स्टोन शिबीराकरीता देणगीदार साईभक्तांकडून मदत मिळणेबाबत श्री साईनाथ रुग्णालयाकडून कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने बेंगलोर येथील साईभक्त श्री.अय्यर हे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांना विनंती केली. त्यांनी या किडनी स्टोन शिबीरासाठी रुपये ०५ लाखाची देणगी दिली आहे.

याशिवाय मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या मोफत भोजन योजनेबाबतची माहिती श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या मान्यवरांना सांगितल्याने श्री साईप्रसादालयात देण्यात येणा-या मोफत प्रसाद भोजन योजनेस साईभक्तांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

तसेच यापुर्वी श्री साईबाबा संस्थानला रुपये ११० कोटीची (साईआश्रम व साईधर्मशाळा प्रकल्प) देणगी देणारे साईभक्त श्री.के.व्ही.रमणी हे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये आले त्यावेळी श्री.रमणी साहेबांना साईबाबा भक्तनिवास्थान येथे साईभक्तांना निवासस्थान घेण्यासाठी रांगेत प्रतिक्षा करतांना दाखविले असता त्यांनी साईभक्तांची निवासाची गैरसोय होऊ नये, त्यांना निवासस्थानाच्या प्रतिक्षेसाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागू नये व साईदर्शनाचा लाभ आनंदाने घेता यावा म्हणून साईआश्रम निवासस्थान व साई धर्मशाळा ही निवासस्थाने श्री साईबाबा संस्थानला देणगी दिलेली आहेत. ज्यावेळी त्यांनी साईआश्रम व साई धर्मशाळा हे प्रकल्प संस्थानच्या सुपुर्द केले त्यावेळी त्यांनी जनसंपर्क अधिकारी यांना दिलेले पत्र पुढीलप्रमाणे-

"We are glad to inform you that we have successfully completed Sai Ashram Package 1 & Package 2 and handed over the same to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi on 24th October 2012, being the most auspicious day of Shri Saibaba's Mahasamadhi, Punya Tithi and Vijaya Dishami day.

On this special occasion, I fondly remember and recall that the idea of creation accommodation for devotees in Shirdi was seeded in my mind by you. I feel that this concept has been given as a command to me, by Shri Saibaba through you.

I am extremely thankful to you for giving this idea and also for your valuable guidance and suggestions during the execution of the emtire Sai Ashram project. Kindly accept my most sincere thanks to you for assisting me at various stages from the concept to the commissioning of the Sai Ashram project."

वरील सर्व प्रकल्प व देणग्या ह्या साईबाबांच्या आशिर्वादाने संस्थानला प्राप्त झालेल्या असून यामध्ये मी तर फक्त निमित्तमात्र आहे.

**मागणी**– श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या मान्यवर देणगीदार भक्तांच्या देणगीव्दारे संस्थानला मिळालेल्या महत्वाच्या वस्तू/मशिनरी व प्रकल्पांबाबतची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेमधील निर्णय क्रमांक ९०७ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ चे निर्णयान्वये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या मान्यवर साईभक्तांना संस्थानचे श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईआश्रम आदि उपक्रम प्रत्यक्षात दाखवून त्या साईभक्तांना संस्थानच्या विविध विभागांकरीता आवश्यक असलेल्या वस्तू/साहित्य/मशिनरी आदिबाबत माहिती सांगून सदरच्या कामाची निकड समजावून सांगितल्याने देणगीदार साईभक्तांनी श्री साईबाबा संस्थानला वरील प्रकल्प/वस्तू/साहित्य/मशिनरी देणगीदाखल दिलेल्या असून सदरची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.२४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मान्यवर देणगीदार भक्तांच्या देणगीद्वारे संस्थानला मिळालेल्या महत्वाच्या वस्तू/ मशिनरी व प्रकल्पांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच सदरहू देणगीदारांना संस्थानमार्फत आभारपत्र देण्यात यावे. तसेच भविष्यातही याप्रकारे देणगी देणाऱ्या देणगीदारांनाही यापुढे आभारपत्र/ प्रशस्तीपत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

विषय नं.२४ **अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणे कामीचे (Tender Document) निविदेच्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-**

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ – खरेदी किंमत रु.३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास नुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८-०९-२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९० नुसार १० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आली असून सदरहू कामासाठी मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. या संदर्भात दिनांक २३-१०-२०१७ व दिनांक १४-११-२०१७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत मिटकॉन यांनी प्रेझेन्टेशन दिलेले आहे.

त्यानुसार याकामाचे सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी सदर कामाचे Tender Document तयार करुन संस्थानकडे पाठविले होते. आहे. मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी पाठविलेले Tender Document मधील सर्व बाबींची तपासणी करुन त्यात करावयाच्या सुधारणासह अभिप्राय देणेबाबत विद्युत विभागामार्फत टिपणी सादर करण्यात आलेली होती. सदर टिपणीवर देण्यात आलेल्या निर्देशानुसार दिनांक ३०-०१-२०१८ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे अध्यक्षतेखाली मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रनिनिधी तसेच संस्थानचे अधिकारी यांची मिटींग आयोजित केलेली होती. सदर मिटींगमध्ये मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी Tender Document मधील काही मुद्दयांमध्ये दुरुस्ती करणेबाबत सुचविण्यात आलेले होते. त्यानुसार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी सदरील Tender Document मधील सुचविलेल्या मुद्दयांमध्ये दुरुस्ती करुन त्याबाबतचा तपशिल सादर केलेला होता.

मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी पाठविलेल्या वरील दुरुस्तीसहीत Tender Document मधील बाबींची तपासणी समितीच्या सदस्यांकडून करुन घेण्यात आलेली आहे.

तसेच दि.१७-०२-२०१८ रोजी मा.अध्यक्ष साहेब यांचे संस्थानमधील कामांच्या आढावाबाबत झालेल्या बैठकीत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी पाठविलेल्या दुरुस्तीसह Tender Document मधील ०२ मुद्दयांवर चर्चा झाली.

त्यानुसार दिनांक ०१-०३-२०१८ रोजी मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांना ई-मेलव्दारे मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या Tender Document मध्ये करणेसाठी कळविणेत आले होते. मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी Tender Document मध्ये दि.०१-०३-२०१८ रोजी ई-मेलव्दारे कळविणेत आलेल्या दुरुस्त्या करुन दि.०३-०३-२०१८ रोजी ई-मेलव्दारे त्याची प्रत संस्थानला पाठविली आहे.

त्यानुसार सादर करण्यात आलेल्या दि.०५-०३-२०१८ चे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार दि.१०-०३-२०१८ रोजी विद्युत विभागामार्फत ई-मेलव्दारे मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांना Tender Document दुरुस्त केलेल्या बाबींचा समावेश करणेकामी कळविणेत आले होते.

मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी Tender Document मध्ये दुरुस्त केलेल्या बाबींचा समावेश केला असून त्यांनी दि.१०-०३-२०१८ अन्वये ई-मेलव्दारे फायनल टेंडर डाक्युमेंट सादर केले आहे. त्यातील दुरुस्तीचा गोषवारा खालीलप्रमाणे.

| Sr.No | Tender Clause | Revised Clause No.& Page No. |
|---|---|---|
| 1 | Bidders Technical Eligibility Criteria | Section III- Bidders Eligibility Criteria, Clause No. 3.1, 3.2, Page No. 41 |
| 2 | The bidder should identify the suitable private flat land minimum 50 Acres having high solar radiation required for installation of the solar power project in any solar potential region in Maharashtra State in India | Section III- Bidders Eligibility Criteria, Clause No. 3.3, Page No. 41 |
| 3 | Contract Performance Bank Guarantee (CPBG) & Contract Performance Guarantee Deposit (CPGD) | Section II – Instructions to Bidder - Clause No. 2.2, Page No. 15 |

| | Bid Evaluation Methodology:- | Section IV- Clause No. 4.1 (a) & (b), Page No. 45 to 49 |
|---|---|---|

१० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी दुरुस्त करुन फायनल ई-निविदा सादर केलेली असून सदर ई-टेंडर डाक्यमेंट दि.१६-०३-२०१८ रोजी मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय व मा.विश्वस्त यांना माहितीस्तव व अवलोकनार्थ ई-मेलव्दारे पाठविण्यात आलेले आहे. तसेच याकामी लागणा-या खर्चास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळणेसाठी पत्रव्यवहार चालू असून मान्यता आल्यानंतर ई-निविदेची कार्यवाही सुरु करावी लागणार आहे. तरी अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेकामी येणा-या रु. ४०/- कोटी इतक्या खर्चास राज्यशासनाची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा ऑनलाईन विक्रीसाठी जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाचे मराठी व इंग्रजीतील आवृत्तीच्या भारतातील प्रमुख वर्तमानपत्रातून प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**मागणी:-** १० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी संस्थानला सादर केलेल्या फायनल Tender Document मसूदयावर चर्चा होऊन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामीचे सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांनी संस्थानला सादर केलेल्या (Tender Document) निविदेच्या मसुद्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच या प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र उर्जा विकास अधिकरण (मेडा), पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस व त्यासाठी त्यांच्या फीसह येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.२५ **सन २०१७-१८ साठी नियुक्त पुर्व लेखापरिक्षक मे.उल्हास बोरसे ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, नाशिक व मे.के.के.एस.एस. ॲण्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांना सन २०१८-१९ साठी मुदतवाढ देणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्तावनाः-** वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी दरवर्षी पुर्व लेखापरीक्षक यांच्या नेमणुका करण्यात येतात. आर्थिक वर्ष सन २०१७-१८ करितापुर्व लेखापरिक्षक म्हणुन संस्थान विभागाकरिता मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक व रुग्णालय विभागाकरीता मे.के.के. एस.एस.ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची नेमणुक करण्यात आलेलीहोती. त्यांची मुदत दि.३१ मार्च, २०१८ रोजी पुर्ण होत आहे. यांची वार्षिक फी प्रत्येकी रु.१,००,०००/- लक्ष प्रत्येकी याप्रमाणे संस्थान व रुग्णालयासाठी एकुण रु.२.०० लक्ष इतकी आहे.

**प्रस्तावः-** लेखाशाखेमध्ये आलेले प्रत्येक बील पुर्व लेखापरिक्षकांच्या तपासणी नंतर आदा करण्यात येते. पुर्व लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आलेल्या संस्थांचे कामकाज समाधानकारक आहे. नेमणुक कालावधीत त्यांचा संस्थान कामाकाजासाठी वेळोवेळी सल्ला घेण्यात आलेला आहे. तसेच पुर्व लेखापरिक्षण कामकाजासाठी त्यांनी संस्थान व रुग्णालय विभागासाठी प्रत्येकी ०१ असे ०२ पुर्ण वेळ कर्मचारी उपलब्ध करुन दिलेला आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त नमुद पुर्व लेखापरिक्षकांना संस्थान कामकाजाचा अनुभव आहे. त्यामुळे नविन पुर्व लेखापरिक्षक नेमणुक करणेपेक्षा यापुर्वीच्या लेखापरिक्षकांना मुदतवाढ देणे अधिक उचित होईल असे नम्र मत आहे. मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक व मे.के.के.एस.एस. ॲन्डअसो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांनी अनुक्रमे संस्थान व रुग्णालये विभागासाठी मागील वर्षाच्या कार्यदेशातील अटी व शर्तीवर पुढील आर्थिक वर्ष २०१८-१९ (दि.०१.०४.२०१८ ते दि.३१.०३.२०१९) साठी, पुर्व लेखापरिक्षक म्हणुन काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे.तरी त्यांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मागील फी

वार्षिक रु.२.०० लक्ष (प्रत्येकी १.०० लक्ष वार्षिक) व मागील अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.२४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ साठी नियुक्त पुर्व लेखापरिक्षक मे.उल्हास बोरसे ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, नाशिक व मे.के.के.एस.एस. ॲण्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांना मुदतवाढ देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सन २०१८-१९ साठी विहीत कार्यपध्दतीने पुर्व लेखापरिक्षकांची नेमणूक करणेत यावी. तसेच नवीन पुर्व लेखापरिक्षकांची नेमणूक होईपर्यंत सध्याचे पुर्व लेखापरिक्षक मे.उल्हास बोरसे ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, नाशिक व मे.के.के.एस.एस. ॲण्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांना आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.२६ **माहे जानेवारी २०१८ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जानेवारी- २०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे–

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| जानेवारी २०१८ | ६६,७२,५४,०४२ | ३९,८९,४०,५७७ |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जानेवारी २०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.२४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी २०१८ मधील जमा-खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.२७ **मुल्यवर्धीत कर (VAT) आर्थिक वर्ष २००९-१० संबंधीत व्हॅट कर निर्धारणाबाबत सद्यस्थिती अवलोकनार्थ.**

प्रस्ताव- मा.सहाय्यक आयुक्त, अहमदनगर यांचेकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ला Maharashtra Value Added Tax Act, 2002 अंतर्गत आर्थिक वर्षे २००९ ते २०१७ या कालाधीतील व्हॅट संबंधित माहिती सादर करण्याची नोटीस दि.१४.३.२०१७ रोजी प्राप्त झाली होती. संस्थानला विक्रिकरातून सवलत असलेबाबतचे नोटीफिकेशन १९९१ साली प्राप्त झाले होते. २००५ साली नव्याने व्हॅट कायदा अस्तित्वात आला व या विभागाकडून संस्थानला व्हॅट कायद्याअंतर्गत नोंदणीकरणेबाबत सुचविले. विक्रीकर कायद्यातील असलेली सवलत नव्यात अस्तित्वात आलेल्या व्हॅट कायद्यात प्राप्त होणेकामी संस्थान कर सल्लागार ए.एल कुलकर्णी कोपरगांव, श्री.शशिकांत कुलकर्णी, नाशिक व हायकोर्ट, मुंबई येथील वरीष्ट ॲडव्होकेट श्री.पी.सी.जोशी यांचेमार्फत कामकाज सुरु होते. सध्या व्हॅट संबंधित प्रकरण ट्रायब्युनल मध्ये न्यायप्रविष्ट आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. दरम्यानच्या कालावधीत विक्रीकर कार्यालयाकडून पत्रव्यवहार बंद झाले होते. नव्याने जीएसटी कायदा अस्तित्वात आल्यानंतर विक्रीकर कार्यालयाकडून दि.१४.३.२०१७ रोजी व्हॅट संबंधित माहितीची मागणी करण्यात आली. बाबत प्रकरण ट्रायब्युनलमध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने व्हॅट कर निर्धारण स्थगित ठेवणेबाबत कळविण्यात आले होते. ॲडव्होकेट श्री.पी.सी.जोशी यांनी ट्रॅायब्युनलमध्ये सुनावणीकामी बोर्डावर येणेबाबत पाठपुरावा केला त्यास अनुसरुन दि.२९.०१.२०१८ व दि.३०.२.२०१८ रोजी सुनावणी झाली व त्यानंतर न्यायाधिशांकडून पुढील तारखा देण्यात आल्या तथापी, त्या तारखांना सुनावणी होऊ शकली नाही. अंतिमतः दि.२३.३.२०१८ ही सुनावणीची तारीख देण्यात आली होती. अहमदनगर व्हॅट कार्यालयाकडून आर्थिक वर्ष २००९-१० व्हॅट कर निर्धारणासंबंधित तात्काळ ट्रायब्युनल निर्णय सादर करावा अन्यथा कर निर्धारण करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. ट्रायब्युनल सुनावणी दि.२३.३.२०१८ रोजी असल्याने कर निर्धारण स्थगित ठेवावे असे पत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने दि.२०.३.२०१८ रोजी पत्र देण्यात आले होते. ट्रॅब्युनलमध्ये दि.२३.३.२०१८ रोजी न्यायाधिश उपस्थित होऊ शकले नाही व पुढील सुनावणीची तारीख दि.२१.६.२०१८ रोजी मिळाली आहे.

अहमदनगर व्हॅट कार्यालयाला ट्रॅब्युनलचा निर्णय प्राप्त झाला नाही तर दि.३१.३.२०१८ अखेर आर्थिक वर्षे २००९-१० चे व्हॅट कर निर्धारण करण्यात येईल असे त्यांनी कळविले आहे. सदर कर निर्धारण आदेश अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे व्हॅट कर डिमांड ऑर्डर होण्याची शक्यता आहे. सध्या व्हॅट कर संबंधित कामकाज करण्यासाठी १९९१ साली विक्रीकरातून सुट मिळणेकरीता कामकाज करणारे संस्थान कर सल्लागार व हायकोर्ट ॲडव्होकेट यांचीच व्हॅट कर, आयुक्त आयुक्त, ट्रॅयब्युनल अपिल करीता मा.व्य.स.निर्णय क्र.५५४/ दि.२१.६.२००९ अन्वये श्री.ए.एल कुलकर्णी, कोपरगांव, श्री.शशिकांत कुलकर्णी, नाशिक व DDQ, ट्रॅब्युनल संबंधित कामकाज करण्याकरीता हायकोर्ट ॲड. श्री.पी.सी.जोशी यांची रु.५०,०००/- मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे. ट्रॅब्यनलमध्ये त्यांचेकडून संस्थानची त्यांना पुर्वीची इतंम्भुत माहिती असल्याने उत्कृष्टपणे बाजू मांडली जात आहे. तथा ट्रॅब्युनल न्याय प्राधिकरणाकडून सुनावणीच्या तारखा पुढे ढकलल्या जातात, व्हॅट कार्यालयाची बाजू मांडणारे ॲडव्होकेट पुढील तारखा मागून घेतात त्यामुळे ट्रॅयब्युलन निर्णय येण्यास विलंब होत आहे. पुर्वी आर्थिक वर्षे २००९-१० चा कर निर्धारण आदेश प्राप्त झाल्यानंतर संस्थान कर सल्लागार व हायकोर्ट ॲडव्होकेट यांचेकडून पुढील युक्तीवाद केला जाईल. न्याय निर्णयानुसार पुढिल कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकारे व्हॅट कर कायद्यासंबंधित आर्थिक वर्षे २००९-१० पासून सध्यस्थिती आहे. सदर बाब अवलोकनार्थ व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्थत मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.२५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुल्यवर्धीत कर (VAT) आर्थिक वर्ष २००९-१० संबंधीत व्हॅट कर निर्धारणाबाबतच्या सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच विक्री कर अधिकारी, अहमदनगर यांनी दि.३१.०३.२०१८ रोजी सन २००९-१० या वर्षाचे व्हॅट आकारणी संदर्भात संस्थान मुद्दल+दंड+व्याज अशी एकूण रु.२४ कोटी रक्कम भरणा करणेबाबबत दिलेल्या नोटिशीचे अवलोकन करण्यात येऊन, यासंदर्भात सर्व आवश्यक कायदेशीर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकिलाव्यतिरिक्त इतर वकिल व सनदि लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य मा.अॅड मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यकतेनुसार नियुक्ती करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.२८ **मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अध्यक्षतेखाली दि.०१.०२.२०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र.१ अन्वये अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नवीन वर्गखोल्या इमारती बांधकामासाठी रक्कम रु.३६ कोटी अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव फेरनिर्णयार्थ सादर.**

प्रस्ताव- अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ३५९९ शाळांमधून सुमारे २,४२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक वाढी बरोबर त्यांच्या शारीरीक, मानसिक व भावनिक विकास होण्याकरिता विविध उपक्रम जिल्हा परिषद शाळांमधून राबविले जातात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शाळांना पायाभुत सुविधा पुरविणे आवश्यक असते. त्यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत. या गरजा जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेच्या उपलब्ध निधीमधून पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि शाळांची व वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता सदरचा निधी अपुरा पडत आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा, समाज मंदीर किंवा सामाजिक संस्थानी देऊ केलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात भरत आहेत. दरवर्षी वादळासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळेही शाळेचे खूप आर्थिक नुकसाना होत असते. तेथेही उपलब्ध निधीतून खर्च करावा लागतो. परिणामी नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी निधी कमी पडतो असे कळविले आहे.

<u>मागणी</u>:- जिल्हा परिषद शाळांना ५०० वर्ग खोल्यांची आवश्यकता असून सन २०१६-१७ च्या डीएसआर नुसार एका खोलीला रक्कम रु.७,२०,०००/- मात्र एवढा, अशी एकूण रु.३६ कोटीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

<u>मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय</u>:- दि. ०८.०९.२०१७ रोजीचे बैठकीतील निर्णय क्रं. ७५६ अन्वये या विषयावर सविस्तर चर्चा होऊन "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि. ०१.ऑक्टोंबर २०१७ पासून प्रारंभ होत आहे. त्या अनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु, सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभुत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून, संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभुमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना उपरोक्त विषयांकित आर्थिक मदत देणे उचित होणार नाही." असा निर्णय झालेला आहे.

**<u>मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्देश:-</u>** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या कामकाजासंदर्भात वर्षा, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शासकीय निवासस्थान येथे दि. ०१ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीतील मुद्दा क्रं. १ खालीप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विषय | बैठकीत घेण्यात आलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर जिल्हयातील नवीन शाळा/ खोली बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत | १.नविन वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांची तालुका निहाय यादी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर करावी.<br>२. तद् नंतर जिल्हाधिकारी, अहमदनगर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची समिती गठीत करण्यात यावी. तसेच समितीची कार्यकक्षा निश्चित करून देण्यात यावी.<br>३. उपरोक्त समितीचे निकष निश्चित करून त्याप्रमाणे शाळांची यादी अंतिम करून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना द्यावी.सदर यादीप्रमाणे संस्थानने अनुदान उपलब्ध करून द्यावे.<br>४. सदर अनुदान टप्प्या– टप्प्याने वितरीत करण्यात यावे<br>५. शाळांचे/ वर्ग खोल्यांचे बांधकाम/उभारणी/दुरूस्ती इ. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात यावी. | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर<br>२. जिल्हा परिषद अहमदनगर<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी |

**विभागाचा अभिप्राय :-**

१) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी ३५९९ शाळा खोल्या बांधकामासाठी रु.३६ कोटी अनुदानाची मागणी केलेली आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीने अनुदान देणेबाबत निर्णय घेतल्यानंतर किती अनुदान मंजूर करण्यात आले त्यानुसार मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्णयानुसार नविन वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांची अंतिम यादी जिल्हापरिषदेकडून (जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समितीने निश्चित केलेनुसार) मागविण्यात येईल. व विधी व न्याय विभागाचे मान्यतेने अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मा. मुख्यमंत्री महोदय, यांचे अध्यक्षतेखाली दि.०१.०२.२०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्रं. १ अन्वये अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना नवीन वर्ग /खोल्या इमारती बांधकामासाठी रक्कम रु.३६ कोटी अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव फेर निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२५१ **मा.मुख्यमंत्री महोदयांकडील बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी, अहमदनगर व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जिल्हयातील एकूण ३५९९ शाळा व १०९२ नवीन खोल्या बांधकाम/ उभारणी/ दुरुस्तीचा रक्कम रु.६८,१६,४०,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर केला आहे.**

**सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नवीन वर्गखोल्या इमारती बांधकामासाठी अनुदान देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. सदरहू अनुदान टप्प्या-टप्प्याने देण्यात यावे, पहिल्या टप्प्यासाठी रु.१० कोटी मात्र अनुदान देण्यात यावे. याकरीता जिल्हाधिकाऱ्यांच्या यादीतून शाळांची निवड स्थानिक उपसमितीने करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२९ जिल्हा रुग्णालय, बीड यांना यंत्रसामुग्री खरेदीकरीता रु.३.२३ कोटी आर्थिक अनुदान मंजूरीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. श्री जयदत्त क्षिरसागर, सदस्य महाराष्ट्र विधानसभा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय, यांना पत्र पाठवून जिल्हा रुग्णालय, बीड यांना यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करणेकामी विनंती केली आहे. सदर विनंतीबाबत ‘‘शिर्डी ट्रस्ट मार्फत करता येईल काय तपासून सादर करावे’’ असे निर्देश प्राप्त झालेबाबतचे व त्यानुसार मा. श्री. जयदत्त क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांच्या विनंतीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून अर्थसहाय्य करता येईल किंवा कसे याबाबत तपासणी करून अहवाल सादर करणेबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं. सासंवि-१०१८/१५/VIP/प्र.क.१७/का.१६ दि. १५.०२.२०१८ चे पत्र. प्राप्त झाले आहे.

सदर पत्रात जिल्हा रुग्णालय, बीड येथे मेडीकल आय. सी. यु, सर्जिकल आय सी यु, प्रस्तुती वार्ड असे एकूण तीन वार्ड सुरू करावयाचे आहेत. तसेच जिल्हा रुग्णालयात अनेक विभागातील यंत्र सामुग्री व साहित्य जुनाट झाल्यामुळे ते बदलून नविन साहित्याची/ यंत्र सामुग्रीची आवश्यकता आहे. तसेच सी. टी. स्कॅन मशिन १० वर्ष वापरल्यामुळे ती जुनाट झाली आहे व ती बंद अवस्थेत आहे. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे यंत्रसामुग्रीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती केली आहे.

| Sr no | Name of Item | Req Qty | Approx Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Hospital cots | 100 | 10500 | 10,50,000/- |
| 2 | Jombo Oxygen cylinder | 30 | 14300 | 4,29,000/- |
| 3 | Suction Machine (ele) | 10 | 12500 | 1,25,000/- |
| 4 | Delivery Table | 10 | 15500 | 1,55,000/- |
| 5 | Bed Side Locker | 100 | 3500 | 35000/- |
| 6 | Pulse Oxymeter | 12 | 4500 | 5,40,000/- |
| 7 | CT Scan Machine | 1 | 3,00,00,000 | 3,00,00,000/- |
| | | | Total | 3,23,34,000/- |

**अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

१) मा. त्रिसदस्यीय समिती सभा दि.२४.०६.२०१५ चे सभेत निर्णय क्र. १७९ अन्वये आरोग्य विभागाच्या शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना रु. ४३.६४ कोटी निधी देणेबाबत निर्णय झालेला आहे, तसेच विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासंवि२०१५ /४१४/प्र.क्र.९०/का.१६ दि. १९ मे २०१६ अन्वये त्यास मान्यता मिळाली आहे. यामध्ये बीड जिल्हयासाठी सीटी स्कॅन मशिन साठी रु. १.८० कोटी अनुदान समावेश आहे.

२) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३०२३ कोटी रुपयांचा कृतीआराखडयास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु निधी प्राप्त नाही त्यामुळे संस्थानचा स्वतःचा निधीही खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्य होणार नाही, असे वाटते.

३) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३०** **शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) यांना (3Tesla) एमआरआय स्कॅनर मशिनसाठी रक्कम रु.१५ कोटी मात्र अनुदान स्वरुपात देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.ना. श्री सुधीर मुनगंटीवार, मंत्री वित्त आणि नियोजन, वने यांनी मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) हे मराठवाडा व खान्देशमधील सर्वात मोठे शासकीय रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न आहे. या रुग्णालयात ११७७ खाटा मंजूर असून गोरगरीब रुग्ण याठिकाणी उपचारासाठी येत असतात. या रुग्णालयामध्ये दररोज १५०० रुग्ण आंतररुग्ण विभागात उपचार घेण्यास दाखल होत असतात. तर ७३०००० इतके बाहय रुग्ण या रुग्णालयात उपचार घेतात. सदर रुग्णालयात येणा-या गोरगरीब रुग्णांच्या तसेच आर्थिक दुर्बल घटकांच्या सोईच्या दृष्टीने नविन अत्याधुनिक पद्धतीच्या ३ टेसला एमआरआय स्कॅनर यंत्राची नितांत आवश्यकता आहे.

दिनांक ०५ फेब्रुवारी २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे जिल्हा वार्षिक नियोजनाची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) साठी एम. आर. आय स्कॅनर मशीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या माध्यमातून खरेदी करण्याच्या सूचना मंत्रीमहोदयांनी दिल्या आहेत.

तरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) या रुग्णालयासाठी ३ टेसला एम. आर. आय. स्कॅनर मशीन खरेदीसाठी रक्कम रु. १५ कोटी निधी श्री साईबाबा संस्थानमार्फत विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत मंजूर करून गोरगरीब रुग्णांना दिलास द्यावा अशी विनंती केलेली आहे.

तसेच मा. सुधीर मुंनगटीवार,अर्थ मंत्री महाराष्ट्र राज्य व मा. ना. डॉ. दिपक सावंत, मंत्री सार्वजनिक कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री यांनी नियोजन समितीच्या बैठकीत सुचविल्याप्रमाणे 3 Tesla MRI मशिनसाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनीही प्रस्ताव सादर केलेला आहे. सोबत फिलीप्स कंपनीचे दरपत्रक जोडलेले आहे.

**अर्थ साहाय्य साठी अधिनियमातील तरतुद :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

अ) राज्यातील जिल्हा रुग्णालयांना सिटी स्कॅन व एक्स रे मशीन खरेदी करणेकामी गत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०६.२०१५ चे सभेत निर्णय क्र.१७९ अन्वये आरोग्य विभागाच्या शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना रु.४३.६४ कोटी निधी देणेबाबत निर्णय झालेला आहे, त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९६२२/२०१६ दाखल झालेले आहे.

आ) सन २०१७-१८ मध्ये आयोजित श्री साईबाबा महासमाधी शताब्दीच्या तयारीकरिता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यात आलेला असून शासनास सादर केलेला आहे. त्यासाठी संस्थानला ३१८०/- कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे, या अनुषंगाने संस्थानकडे असलेला निधीही खर्च होणार आहे.

इ) शासकीय रुग्णालयांना शासनाचे अर्थ संकल्पातून तरतूद उपलब्ध होऊ शकते.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, औरंगाबाद हा दुष्काळी जिल्हा असून, संस्थान रुग्णालयामध्ये तेथून बऱ्याचशा प्रमाणात रुग्ण येत असतात, याकरीता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) यांना 3 Tesla एमआरआय मशिनसाठी रक्कम रु.१५ कोटी मात्र अनुदान शासन मान्यतेने देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३१ **साईभक्त कै.थालुरी केशवराव, खमाम, आंध्रप्रदेश यांचा दर्शन रांगेमध्ये झालेल्या मृत्युमुळे त्यांचे वारसांनी नुकसान भरपाईसाठी केलेल्या मागणीस अनुसरुन विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- एवढे अनुदान मंजूर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री टी.भारत कुमार, यांचे पत्र संस्थानला प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये साईभक्त श्री टी भारत कुमार, यांनी कळविले आहे की, ते व त्यांचे कुटुंब हे श्रींच्या दर्शनासाठी शिर्डीला दि. २५ डिसेंबर,२०१७ रोजी आले होते. दर्शनासाठी ३ नं प्रवेशव्दाराने (अपंगगेट) मंदिरात प्रवेश केल्यानंतर, श्री साईबाबांची आरती असल्याने आम्हालाही त्या ठीकाणी थांबावे लागले. त्याच दरम्याण माझे वडील कै. थालूरी केशवराव यांना खूप मोठया प्रमाणात ह्दयविकाराचा झटका आला व त्यामध्ये त्यांचा साधारणतः दुपारी १२.२० वाजता दर्शन रांगेमध्ये मृत्यु झाला. यासंदर्भात त्यांनी मृत्यु प्रमाणपत्र, दर्शन पास, व सदर साईभक्त अपंग असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. सदर साईभक्ताचा मृत्यु हे मंदिरामध्ये श्री साईबाबा संस्थानच्या दर्शनरांगेमध्ये झाला असल्याने, सदर अर्जदाराने मृत्यु झालेल्या साईभक्तावर अवलंबून असलेल्या त्यांची पत्नी (अर्जदाराची आई) यांना नुकसान भरपाई किंवा विमा संरक्षणाची रक्कम देण्याची विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने, संस्थानच्या संरक्षण विभागाकडे चौकशी/तपासणी केली असता, दि.२५.१२.२०१७ रोजी, दिवसभरातील घडलेल्या घटनाबाबतच्या रजिस्टरमध्ये सदर घटनेची नोंद घेतलेली आहे. तसेच त्यांनी दि.२५.१२.२०१७ रोजी याबाबतचा अहवाल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेकडे सादर केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

शिर्डी येथे, श्री साईबाबांच्या दर्शनार्थ येणा-या भक्तांचे सुरक्षिततेसाठी दरवर्षी संस्थानमार्फत अपघाती व घातपाती विमा राष्टीयकृत विमा कंपनीकंडून उतरविला जातो. यामध्ये सदरहु दुर्दैवी घटना संस्थान मालकीचे सर्व इमारती व त्यांचा परिसर, निवासस्थाने, रुग्णालये व गर्दीच्या काळात फुटपाथवर जिथपर्यंत भक्तांची दर्शन रांग जाईल, तिथपर्यंत तसेच मंदिर परिसर (चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान व त्यांचा परिसरात) पालखी/रथ मिरवणूकीच्या दिवशी शिर्डी गावातील पालखी रोड, श्री रामनवमी उत्सवाच्या वेळेस बाबांच्या स्नानासाठी कावडीने पाणी आणणारे साईभक्त, खंडोबा मंदिर ते साई समाधी मंदिरापर्यंत पालखी घेऊन येणारे साईभक्त असा वर्षात एकूण २५ साईभक्तांकरीता एक वर्षाकरीता कोणत्याही वयाचे स्त्री-पुरुष भक्तांस एखाद्या दुर्घटनेत अपघाती वा घातपाती मृत्यु झाल्यास रक्कम रु.५ लाख, शरीराचा दाने अवयव (हात, पाय किंवा डोळे) कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु.०१ लाख, शरीराचा एक अवयव कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु.५० हजार, जबर जखमी झाल्यास किंवा अपघात झाल्यामुळे होणारा दवाखाना खर्च रु.२५ हजार विमा संरक्षण मिळू शकेल. अशी विमा पॉलीसी संस्थानमार्फत दरवर्षी राष्ट्रीयकृत विमा कंपनीकडून घेण्यात येत असते. त्याच प्रमाणे सन २०१७-१८ याही वर्षी अशा प्रकारची विमा पॉलीसी घेण्यात आलेली आहे.

साईभक्त कै. थालूरी केशवराव, खमाम, आंन्ध्र प्रदेश, यांचा मृत्यु हा घातपाती किंवा अपघाती स्वरुपाचा नसून, त्यांचा मृत्यु हा ह्दय विकाराच्या झटक्याने झाला असलेबाबत, डॉक्टरांनी दिलेल्या प्रमाणपत्रात नमूद केलेले आहे. त्यामुळे त्यांचा क्लेम विमा कंपनीकडे करता येणार नाही.

तथापि, काही दिवसांपुर्वी संस्थान परिसरामध्ये अशाच प्रकारे श्री साईसेवक कै.प्रमोद उपाध्ये, रोहा, रायगड यांचा ह्दय विकाराच्या झटक्याने मृत्यु झाला होता. त्यावर कामगार विभागाने केलेल्या टिपणीस अनुसरुन, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये, सदर साईसेवकाच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई म्हणून संस्थानमार्फत रु. २५०००/- देण्यात आले आहे. त्याच धर्तीवर कै. थालूरी केशवराव, खमाम, यांना एक विशेष बाब म्हणून त्यांच्या कुटुंबास रक्कम रु. २५,०००/- मात्र आर्थिक मदत देता येईल. असे मत आहे. तरी, कै. थालूरी केशवराव, खमाम, आंन्ध्र प्रदेश, यांचा मृत्यु दर्शन रांगेत झालेला असल्याने त्यांना विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- मात्र मदत देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त कै.थालुरी केशवराव, खमाम, आंध्रप्रदेश यांचे वारसांना नुकसान भरपाई म्हणून नाही, परंतु सहानुभूतीने मदत करण्याच्या हेतूने, एक विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- मात्र रक्कम देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३२** **एस.एल.पी. नं.२९८७५/ २०१५ साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वस जोगळेकर व इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर या प्रकरणात वकीलांची रु.१,१०,०००/- मात्र फी अदा करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील कलम १७. (१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्त व्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(च) (२) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्यासंबंधात बचाव करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** –मा. व्यवस्थापन समतीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३२ अन्वये सविस्तर चर्चा होवून, एस.एल. पी. नं. २९८७५/२०१५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने ॲडमीशन स्टेज पर्यंतचे कामकाज पहाणेकामी ॲड. श्री संजय खर्डे यांचे वकीलपत्र देण्यास व त्यांना admission stage व affidavitfiling कामी रु. १,१०,०००/- मात्र फी देण्यात यावी, असे ठरले आहे.

**प्रास्तविक-** मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे कोर्टात एस.एल.पी.नं.२९८७५/२०१५ व एस.एल.पी.नं. २९९६२/ २०१५ हे साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वास जोगळेकर व इतर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर यांचे विरुध्द दाखल केले होते, प्रस्तुतचे एस.एल.पी. हे मौजे शिर्डी येथील स.नं. १४८/१ मधील क्षेत्र ४ हे. ५९ आर. संस्थानकरीता भूसंपादनाची कार्यवाही मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे मार्फत चालू आहे. सदरची भूसंपादनाची कार्यवाही सार्वजनीक

कार्यासाठी नाही, अशा आशयाची मागणी पिटीशनरने एस.एल.पी.नं.२९८७५/२०१५ मध्ये केली होती, तसेच सन २०१३ चा नविन भूसंपादन अॅक्ट मधील सेक्शन ४ नुसार कार्यवाही करण्याबाबत ची मागणी एस.एल.पी.नं. २९९६२/ २०१५ मध्ये केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे वकीलाची नेमणूक करावी लागणार असल्याने अॅडव्होकेट श्री संजय खर्डे यांना मा. व्यवस्थापन समतीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३२ अन्वये एस.एल. पी. नं. २९८७५/२०१५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने अॅडमीशन स्टेज पर्यंतचे कामकाज पहाणेकामी अॅडव्होकेट श्री संजय खर्डे यांना जा.क्र. एसएसएस वशी-विधी/ ५६९४/ २०१५ दि. १४/०१/२०१६ चे पत्राने वकीलपत्र दिले होते, तसेच दि.२६/०४/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीने त्यांना admission stage व affidavitfiling कामी रु. १,१०,०००/- अदा केलेले आहे.

**मागणी-** अॅडव्होकेट श्री संजय खर्डे, यांनी दि.२८/०२/२०१८ रोजीचे पत्राने एस.एल.पी.नं. २९८७५/ २०१५ मध्ये फायनल हिअरिंग ची फी रु. १,१०,०००/- ची मागणी केली आहे, सदरची रक्कम त्यांना अदा करावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** श्री संजय खर्डे, यांनी दोन्ही एस.एल.पी. चे कामकाज फायनल हिअरिंग पर्यंत पाहीलेले आहे, त्यांनी एस.एल.पी.नं. २९९६२/२०१५ मध्ये वकील फी घेतलेली नाही, एस.एल.पी.नं. २९८७५/२०१५ ची फायनल हिअरिंग ची वकील फी रु. १,१०,०००/- अदा करता येईल.

निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री संजय खर्डे, यांचे वकिल फीबाबत या क्षेत्रातील तज्ञ समिती सदस्य अॅड मोहन जयकर यांनी श्री.खर्डे यांचेबरोबर चर्चा करुन अंतीम निर्णय घ्यावा. तसेच संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर तज्ञ वकिलांची नेमणूक करण्यासाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं.३३ **श्री साईप्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोल तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी असलेले अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चैन्नई यांचेकडून त्यांचे कामगारांची थकीत प्राव्हीडंड फंडाची रक्कम व विलंब शुल्काची रक्कम वसूल करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद:- सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचेअधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश वकेलेले विनीयम मधील14 (2घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यकते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणेयाबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना**:- श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी दि.०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ या कालावधीसाठी एकत्रित कामाची दरमहा सर्व करांसहीत (GSTवगैरेसह) रक्कम रु.१८,९८,०००/- (अक्षरी रक्कम रु.अठरा लाख अठ्ठयान्नव हजार मात्र) या मंजूर दराने मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांना कामाचा कार्यादेश देण्यात आलेला होता.

परंतू मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांनी उपरोक्त कामाचे निविदेतील व झालेल्या करारातील अटी/शर्तीचा संबंधीत ठेकेदार यांनी वेळोवेळी भंग केलेला आहे. कामगारांचे पगार वेळेत न करणे, किमान वेतन दराप्रमाणे वेतन न करणे, निविदेतील अटी/शर्तीनूसार कामगार कमी लावणे व स्वच्छतेकामी लागणारे मशिनरी, केमिकल वगैरे इत्यादी साहीत्याचा पुरवठा वेळोवेळी केलेला नसल्यामुळे वारंवार दिल्या जाणा-या सुचना. या सर्व बाबींचा विचार करुन संबंधीत ठेकेदार यांचे कामात सुधारणा न झाल्यामुळे संस्थानचे कायदेविषयक सल्लागार श्री जे.के.गोंदकर यांचे दि.३१/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर सल्ला घेवून, मा.स्थानिक उपसमिती दि.२३/०२/२०१८ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामीचे ठेकेदार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांनी अटी/शर्तीचा भंग केलेला असल्यामुळे, त्यांना याकामी दिलेला कार्यादेश रद्द करणेत यावा व त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करणेत यावा व त्यांची प्रलंबीत बीलेही आदा करणेत येऊ नये.

तसेच श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता, पेस्टकंट्रोलकामी तात्काळ नव्याने ई-निविदा प्रिक्रया राबविणेत यावी व नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत प्रसादालयातील स्वच्छतेअभावी भक्तांची गैरसोय होवू नये, याकरीता प्रसादालयातील उपरोक्त कामे मे.एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी

यांचेकडूनच पुर्वीचे मंजूर दरात व अटी/शर्तीनूसार स्विकृतीपत्र घेवून सबंधीत काम व कामगारांचे थकित वेतन करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आलेली आहे.”

त्यानूसार मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांनी दि.१५/०२/२०१८ रोजी स्विकृती स्विकृती पत्र देऊन पुर्वीचे दरात काम करण्यास तयार असलेबाबत लेखी कळविलेले आहे. उपरोक्त स्विकृती पत्रानूसार श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल तसेच दररोज ५० वाढपी कामगार पुरविणेकामी मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशि/प्रसादा/ ६४९६/२०१८ दि.०७/०३/२०१८ नूसार दि.१/०३/२०१८ रोजीपासून ते दोन महिने अथवा नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

परंतू मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांनी इकडील विभागास पत्र देवून कळविले आहे की, “आम्हास माहे डिसेंबर-२०१७, जानेवारी-२०१८ व फेब्रुवारी-२०१८ या महिण्यातील कर्मचा-यांचे वेतन करण्यास सांगितले आहे. सदर कामाचे टेंडर हे आम्हांस दि.०१ मार्च-२०१८ पासून मिळाले असल्याकारणाने ०१ मार्च-२०१८ पुर्वीच्या (माहे डिसेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८) कर्मचा-यांवरील वेतनावर कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी मालकाचा हिस्सा १३.१५ टक्के व त्यावरील दंडात्मक रक्कमी जी भविष्यनिर्वाह ऑफिसमधून करण्यात येईल ती रक्कम आम्हांस मिळावी.” अशी विनंती करणेत आलेली आहे.

मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांना संबंधीत कामाचा कार्यादेश दिल्यानंतर त्यांनी माहे ऑक्टोबर-२०१७ व नोव्हेंबर-२०१७ या दोन महिन्यांचे वेतन व प्रा.फंड भरलेला आहे. मात्र माहे नोव्हेंबर-१७ चे कागदपत्रांची पुर्तता इकडील कार्यालयास अद्याप पावेतो केलेली नाही. त्यामुळे त्यांचेवर सदरहु महिन्यात रक्कम रु.९४,८००/- एवढया रकमेची दंडात्मक कारवाई करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्यांचे सदर महिन्याचे मजुरी बीलाची रक्कम रु.१८,९८,०००/- वजा दंडाची रक्कम रु.९४,८००/- = रक्कम रु.१८,०३,२००/- आदा करणेची आहेत. तसेच त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रककम रु.११,३८,८००/- एवढी रक्कम संस्थानने जप्त करणेबाबत मा.व्य.समिती सभेमध्ये निर्णय झालेला आहे. अशाप्रकारे मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांची संस्थानकडे माहे नोव्हेंबर-२०१७ चे प्रलंबील बिलाची रककम रु.१८,०३,२००/- + ११,३८,८००/- (जप्त करणेत येत असलेली) = एकूण रक्कम रु.२९,४२,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणतीस लाख बेचाळीस हजार मात्र) एवढी रक्कम संस्थानकडे जमा आहे.

त्यानूसार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे माहे नोव्हेंबर-२०१७ चे प्रलंबित बिलामधून मागील तीन महिन्याचे (माहे डिसेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८) प्राव्हीडंड फंड (१३.१५ टक्के प्रमाणे मालकाचा हिस्सा) व सरकारी विलंब शुल्क मिळून अंदाजे जवळपास रक्कम रु.६,३५,१२६/- (अक्षरी रक्कम रु.सहा लाखी पस्तीस हजार एकशे सहवीस मात्र) एवढी रककम कपात करुन उपरोक्त रक्कम ही मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांना आदा करावी लागणार आहे. असे मत आहे. त्यानूसार सदरचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समिती सभेत सविस्तर चर्चा होवून निर्णय होणे गरजेचे आहे.

**मागणी:-** वरील प्रास्तविकनूसार मे.अपशॉट युटिलिटी सवर्हीसेस, चेन्नई यांची माहे नोव्हेंबर-२०१७ चे प्रलंबील बिलाची रककम रु.१८,९८,०००/- (दंडाची रक्कम रु.९४,८००/- वजा जाता) रु.१८,०३,२००/- + संस्थान खाती जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.११,३८,८००/- (जप्त करणेत येत असलेली) असे मिळून एकूण रु.२९,४२,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणतीस लाख बेचाळीस हजार मात्र) एवढी रक्कम संस्थानकडे जमा आहे.

उपरोक्त सदरहु रकमेमधून संबंधीत कामगारांचे मागील तीन महिन्याचा (माहे डिसेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८) प्राव्हीडंड फंड (मालकाचा हिस्सा १३.१५ टक्के प्रमाणे) + सरकारी विलंब शुल्क मिळून अंदाजे एकूण रक्कम रु.६,३५,१२६/- एवढी रक्कम सदरहु कामाचे स्विकृतीधारक ठेकेदार मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांना आदा करणेबाबत विधी विभाग व कामगार अधिकारी यांचे अभिप्राय घेवून त्यानूसार आदा करुन त्यांचेमार्फत भरता येईल, असे नम्र मत आहे. करीता सदरहु प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय होणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** प्रस्तावित नूसार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे माहे नोव्हेंबर-२०१७ चे प्रलंबित बिलामधून मागील तीन महिन्याचे (माहे डिसेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८) प्राव्हीडंड फंड (१३.१५ टक्के प्रमाणे मालकाचा हिस्सा) व सरकारी विलंब शुल्क मिळून अंदाजे जवळपास

रक्कम रु.६,३५,१२६/- (अक्षरी रक्कम रु.सहा लाखी पस्तीस हजार एकशे सहवीस मात्र) एवढी रककम कपात करुन उपरोक्त रक्कम ही मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांना आदा करावी लागणार आहे, असे मत आहे. करीता सदरहु प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर.

तरी उपरोक्त मागणीनूसार, मे.अपशॉट युटिलिटी सवर्हीसेस, चेन्नई यांची माहे नोव्हेंबर-२०१७ चे प्रलंबील बिलाची रककम रु.१८,९८,०००/- (दंडाची रक्कम रु.९४,८००/- वजा जाता) रु.१८,०३,२००/- + संस्थान खाती जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.११,३८,८००/- (जप्त करणेत येत असलेली) असे मिळून एकूण रु.२९,४२,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणतीस लाख बेचाळीस हजार मात्र) एवढी रक्कम संस्थानकडे जमा आहे. उपरोक्त रकमेमधून संबंधीत कामगारांचे मागील तीन महिन्याचा (माहे डिसेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८) प्राव्हीडंड फंड (मालकाचा हिस्सा १३.१५ टक्के प्रमाणे)+ सरकारी विलंब शुल्क (भविष्यनिर्वाह ऑफिसमधून करण्यात येईल ती रक्कम) मिळून अंदाजे रक्कम रु.६,३५,१२६/- एवढी (अक्षरी रक्कम रु.सहा लाख पस्तीस हजार एकशे सहवीस मात्र) रक्कम सदरहु कामाचे स्विकृतीधारक ठेकेदार मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांना आदा करणेबाबत विधी विभाग व कामगार अधिकारी यांचे अभिप्राय घेवून त्यानूसार आदा करुन त्यांचेमार्फत भरता येईल.

करीता सदरहु प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समिती सभेत सविस्तर चर्चा होवून, सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोल तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामीचे ठेकेदार अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चैन्नई यांचेकडून त्यांचे कामगारांची थकीत प्रॉव्हीडंड फंडाची रक्कम व विलंब शुल्काची रक्कम वसूल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

विषय नं.३४ **नवीन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालयाचे आकृतीबंधाबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेतील निर्णय क.४४४ अन्वये संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करणेत येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृह्द आराखडयात समावेश करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत सन २०१८-१९ करिता नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी तयार करण्यात आलेल्या बह्द आराखडयामध्ये राहाता तालुक्यासाठी ०२ कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे महाविद्यालय सुरु करणेबाबत समावेश करण्यात आलेला आहे. सदरचे Notification जाहिरात क्रमांक ५०/ दि.१२.०९.२०१७ अन्वये विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले होते.

सदर Notification मध्ये असलेल्या धोरणात्मक बाबींवर निर्णय होणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८४६ नुसार "महाविद्यालयाचे नाव श्री साईबाबा कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे ठरविणेत आले. सदर प्रस्तावीत इमारत/जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत याव्यात तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व शासन निर्णय क्र.१५.०९.२०१७ नुसार कार्यवाही करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकारी प्रदान करणेत येऊन, वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा" असे ठरले. तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यामुळे नवीन वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंधास मान्यता मिळणेकामी तसेच सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२८.११.२०१७ रोजी टिपणी सादर केली असता, त्यावरील वरिष्ठांचे मौखिक सुचनेनुसार पुन्हा दि.०६.१२.२०१७ रोजी फेर प्रस्ताव सादर करुन, वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक आकृतीबंधाबाबत मार्गदर्शन मिळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४७६६-६८/ २०१७ दि.११ डिसेंबर, २०१७ अन्वये मा.कुलसचिव, मा.उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) व मा.शिक्षण

संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांना पत्र पाठविण्यात आलेले आहेत. मात्र त्यांचेकडून आजपावेतो कोणत्याही स्वरुपाचा प्रतिसाद मिळालेला नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील संदर्भ क्र.सीए/८७ दि.१८.०१.२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांनी श्री साईबाबा संस्थानमी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय / संस्था सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत सादर केलेल्या अर्ज/प्रस्तावावर विद्यापीठ अधिकार मंडळाने प्राधान्य क्र.०१ शिफारशीनुसार प्रमाणपत्र देऊन महाराष्ट्र शासनास जा.क्र.सीए/२१४५ दि.२९.१२.२०१७ चे पत्राद्वारे मान्यता देणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यामुळे इकडील कार्यालयामार्फत दि.२३.०१.२०१८ रोजीचे टिपणीन्वये नवीन वरिष्ठ महाविद्यालयासाठी पुढील ०५ वर्षांकरिता संभाव्य शिक्षक व शिक्षकेतर पदांबाबत आकृतीबंध मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, याबाबत प्रशासकीय अधिका-यांनी Joint Dir.Higher Education, Pune यांचे कार्यालयात समक्ष जाऊन माहिती घ्यावी व अहवाल सादर करावा, असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार दि.०७.०३.२०१७ रोजी Joint Dir.Higher Education, Pune यांचे कार्यालयात समक्ष जाऊन आकृतीबंधाबाबत मा.डॉ.विजय पा.नारखेडे, Joint Dirrector Higher Education, Pune यांचेशी समक्ष चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

१. वरिष्ठ महाविद्यालयास अंतिम मान्यता मिळाल्यानंतर, अध्यापनाचे विषय अंतिम झाल्यानंतर व विद्यार्थी संख्या या सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर इकडील कार्यालयाकडून शिक्षक सेवक संच निश्चित केला जाईल.
२. प्रथम वर्षी प्राचार्य, ग्रंथपाल व Physical Director ही तीनच पदे कायमस्वरुपी असावीत, इतर सर्व शिक्षकांची पदे ही तासिका तत्वावर मात्र पुर्ण प्रशिक्षीत असावीत. मात्र ज्या विषयांचा Workload पुर्ण होत असेल त्या विषयांकरिता कायम स्वरुपी शिक्षकांची नेमणूक करावी.
३. तसेच उपप्राचार्य व Associate Professor या पदांची तुर्तास आवश्यकता नाही.
४. त्यांना संस्थानची कार्यपद्धती सांगितल्यानंतर म्हणजेच प्रथम आकृतीबंधास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागते व त्यानंतरच पदभरती करता येते हे सांगितले असता, त्यांनी तो तुमचा अंतर्गत विषय आहे, त्यामुळे आकृतीबंध किती मंजुर करावयाचे हे तुम्ही ठरवा, मात्र शिक्षक सेवक संच मान्यतेपेक्षा जादा शिक्षक कार्यरत नसावेत. असे सांगितले.
५. तसेच त्यांनी अधिक माहितीसाठी मा.उपकुलसचिव श्री.अत्रे साहेब यांची भेट घेण्याबाबत सांगितले.

त्यानुसार श्री.अत्रे साहेब उपकुलसचिव, पुणे विद्यापीठ यांचे कार्यालयात जाऊन त्यांची समक्ष भेट घेतली असता, त्यांनी पुढीलप्रमाणे सुचना दिल्या.

१. आकृतीबंध अथवा शिक्षक सेवक संच निश्चितीचे कामकाज हे Joint Director Higher Education, Pune यांचे कार्यालयातून मंजुर होत असतो. त्यामुळे तुम्ही त्यांचे कार्यालयाशी सपर्क करावा.
२. तसेच अजून अंतिम मान्यता मिळणे बाकी आहे. पुढील आठवडयात विद्यापीठामार्फत तज्ञ समिती प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी येणार आहे. त्यांनी पाहणी करुन, दिलेल्या अहवालानंतर अंतिम मान्यता देण्यात येईल, असे सांगितले.
३. सदरची तज्ञ समिती ही शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/माशि-४, दि.१५.०९.२०१७ चे आदेशातील प्रपत्र क प्रमाणे पुर्तता आहे अगर कसे याची पाहणी करणार आहे.
४. त्यानंतर त्यांनी Joint Director Higher Education, Pune यांचे कार्यालयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रथम वर्षी प्राचार्य, ग्रंथपाल व Physical Director ही तीनच पदे कायमस्वरुपी असावीत, इतर सर्व शिक्षकांची पदे ही तासिका तत्वावर मात्र पुर्ण प्रशिक्षीत असावीत. मात्र ज्या विषयांचा Workload पुर्ण होत असेल त्या विषयांकरिता कायम स्वरुपी शिक्षकांची नेमणूक करावी, असे सांगितले.

त्यानंतर श्री.धनराज माने साहेब, शिक्षण संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, पुणे विभाग यांचे कार्यालयात समक्ष भेट दिली असता, ते कार्यालयीन कामानिमित्त मुंबई येथे गेले होते. त्यावेळी त्यांचे कार्यालयातील वरिष्ठ प्रशासन अधिकारी श्री.शिंदे यांची भेट घेतली असता, त्यांनीही Joint Director Higher Education, Pune यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणेच सुचना दिलेल्या आहेत. त्याबरोबरच खालीलप्रमाणे काही सुचना दिल्या आहेत.

१. तासिक तत्वावर नेमणूक करावयाच्या शिक्षकांना प्रति तास (४८ मिनिटे) रु.२५०/- मात्र मानधन राहील.

२. प्रथम वर्षी प्रत्येक शाखेच्या प्रति तुकडीमध्ये किमान ५० विद्यार्थ्यांचे प्रवेश असणे गरजेचे आहे, अन्यथा वरिष्ठ महाविद्यालयास मिळालेली मान्यता रद्द होऊ शकते.

वरील प्रमाणे तीनही कार्यालयाकडून मार्गदर्शन मिळालेले आहे. त्याचे अवलोकन करता Joint Director Higher Education, Pune यांचेकडील शिक्षक सेवक संच मान्यतेनुसार शिक्षकभरती करता येईल. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शासनस्तरावरुन आकृतीबंध निश्चित न करता Joint Director Higher Education, Pune यांचेकडील प्रतिवर्षी संच मान्यतेनुसार आकृतीबंध कायम ठेवता येईल.

तसेच वरिष्ठ महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेनंतर प्रथम वर्षी फक्त प्राचार्य, ग्रंथपाल व Physical Director ही तीनच पदे कायमस्वरुपी व उर्वरीत शिक्षकांची पदे ही Joint Director Higher Education, Pune यांचेकडील मान्यतेनुसार तासिक त्वावर विहित पद्धतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरता येतील. त्यानंतर पुढील वर्षी प्रत्येक विषयांचा Workload तसेच Joint Director Higher Education, Pune यांचेकडील शिक्षक सेवक संच मान्यतेनुसार शिक्षकभरती करता येईल. तसेच शिक्षकेतर कर्मचारी जसे लिपीक, मदतनीस हे इतर विभागातील कर्मचा-यांमधून पुरविता येतील, असे नम्र मत आहे.

तरी वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शासनस्तरावरुन आकृतीबंध निश्चित न करता Joint Director Higher Education, Pune यांचेकडील प्रतिवर्षी संच मान्यतेनुसार आकृतीबंध कायम ठेवणेस मान्यता मिळणेकामी तसेच सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३५ मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेला परिक्षण अहवाल.**

**प्रस्ताव-** **(अ)** सन २०१६ मध्ये संस्थानचे ३९ विभागांमध्ये काम करत असलेल्या कायम, कंत्राटी व आऊटसोर्स कर्मचा-यांचे दैनंदिन कामाचे व त्यांच्या कार्यक्षमतेचे मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) परिक्षण करणेकामी संस्थानचे संकेतस्थळासह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन त्यानुसार प्राप्त झालेल्या सिलंबद व्यावसायिक प्रस्तावांमधील निम्नतम दरधारक मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांची मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६५ अन्वये जा.नं. एसएसएस /साप्रशा-आस्था/१८२३/२०१६ दि.१४ जुलै,२०१६ रोजीचा कार्यादेशाव्दारे रु.९,५१,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख एक्कावन्न हजार) मात्रचे दरावर (सर्व करासह) नेमणूक करणेत आलेली होती. त्यांना कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात केलेनंतर रु.३,००,०००/- व अहवाल सादर केलेनंतर त्यांचे दि.२०/१०/२०१६ रोजीचे लेखी मागणीनुसार व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे तोंडी सुचनेनुसार आस्थापना विभागाच्या दि.०२/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये रु.४,००,०००/- असे एकूण रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) ॲडव्हॉन्स म्हणून अदा करणेत आलेले आहेत. त्यानंतर त्यांना अद्यापपर्यंत उर्वरित रक्कम अदा करणेत आलेली नाही.

**(ब)** मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी उपरोक्त कामाच्या अहवालाच्या प्रती दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर केलेल्या आहेत. सदर अहवालाच्या छायांकित प्रती इकडील विभागामार्फत सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. परिक्षणाअंती मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये संस्थानचे विविध विभागांच्या कर्मचारी संख्ये मध्ये खालील प्रमाणे बदल करणेबाबत सुचविले आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालील प्रमाणे.

| अं. क्र | विभाग | मंजूर आकृतीबंध संख्या | | | सध्याची कर्मचारी संख्या | | | अपेक्षित बदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण | अधिक (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | कमी (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | अधिक (अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाची संख्या) | कमी (अतिरिक्त कर्मचारी कमी करावयाची संख्या) |
| ०१ | जनसंपर्क विभाग | १४ | ०२ | १६ | १४ | १४ | २८ | १२ | ० | ० | ० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | मंदिर विभाग | ७४ | ११ | ८५ | ५६ | २४ | ८० | ३० | ० | ३५ | ० |
| ०३ | विद्युत विभाग | ८३ | ३९ | १२२ | ७१ | ३० | १०१ | ० | ९ | १२ | ० |
| ०४ | कॅन्टिन विभाग | १२० | ४३ | १६३ | ८८ | १०३ | १९१ | ० | १४९ | ० | १७७ |
| ०५ | साईबाबा भक्तनिवासस्थान | १३६ | ०४ | १४० | ११० | ३४ | १४४ | ० | १३४ | ० | १३८ |
| ०६ | साईप्रसाद निवासस्थान | ८३ | २८ | १११ | ४० | २० | ६० | ० | १०५ | ० | ५४ |
| ०७ | व्दारावती निवासस्थान | ३० | ५४ | ८४ | २४ | १० | ३४ | ० | ७८ | ० | २८ |
| ०८ | वाहन विभाग | ५१ | ६८ | ११९ | ४४ | ८४ | १२८ | ० | १०० | ० | १०९ |
| ०९ | ध्वनीक्षेपन आणि टेलिफोन | २६ | १९ | ४५ | १८ | १५ | ३३ | ० | ०१ | ११ | ० |
| १० | पाणी पुरवठा | ७० | १५ | ८५ | ६८ | १८ | ८६ | १० | ० | ९ | ० |
| ११ | संरक्षण विभाग | १९५ | ४३४ | ६२९ | १२९ | ७८५ | ९१४ | २६० | ० | ० | २५ |
| १२ | आरोग्य विभाग | १९३ | ३०२ | ४९५ | १५५ | २२१ | ३७६ | ० | ४८९ | ० | ३७० |
| १३ | मेकॅनिकल विभाग | ४४ | ९० | १३४ | १८ | २७ | ४५ | ० | ६८ | २१ | ० |
| १४ | फायर आणि सेफ्टी | ०२ | ०४ | ०६ | १५ | ०८ | २३ | ३५ | ० | १८ | ० |
| १५ | लेखाशाखा विभाग | ८५ | ०७ | ९२ | ५१ | २५ | ७६ | ०१ | ० | १७ | ० |
| १६ | प्रसादालय विभाग | ३६० | ४१४ | ७७४ | २९२ | ३४१ | ६३३ | ० | ७२३ | ० | ५८२ |
| १७ | प्रसादालय प्रयोगशाळा | ० | ० | ० | ०२ | ० | ०२ | ०९ | ० | ०७ | ० |
| १८ | प्रकाशने | २३ | ०५ | २८ | १६ | १८ | ३४ | ११ | ० | ०५ | ० |
| १९ | सामान्य प्रशासन | ६१ | २१ | ८२ | ३८ | ३६ | ७४ | ० | ०६ | ०२ | ० |
| २० | विधी विभाग | ०४ | ० | ०४ | ०४ | ० | ०४ | ०२ | ० | ०२ | ० |
| २१ | सभाकामकाज विभाग | ०८ | ० | ०८ | ०४ | ० | ०४ | ० | ०१ | ०३ | ० |
| २२ | कामगार विभाग | १० | ० | १० | ०६ | ०२ | ०८ | ०१ | ० | ०३ | ० |
| २३ | खरेदी विभाग | ११ | ०३ | १४ | ०७ | ०४ | ११ | ० | ० | ०३ | ० |
| २४ | भांडार विभाग | १४ | ० | १४ | ०९ | ०५ | १४ | ०१ | ० | ०१ | ० |
| २५ | बांधकाम विभाग | १०२ | २२ | १२४ | ७१ | १३ | ८४ | ० | ४० | ० | ० |
| २६ | बगीचा विभाग | ३९ | ० | ३९ | ४६ | ०९ | ५५ | ० | ३६ | ० | ५२ |
| २७ | दप्तर विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०३ | ०१ | ०४ | ० | ० | ०३ | ० |
| २८ | माहिती तंत्रज्ञान विभाग | १८ | ०३ | २१ | ०५ | १९ | २४ | ०६ | ० | ०३ | ० |
| २९ | मुंबई कार्यालय | १२ | ०५ | १७ | ०४ | ०४ | ०८ | ० | ०६ | ०३ | ० |
| ३० | सी.सी.टि.व्ही | ० | ० | ० | १७ | ०७ | २४ | २५७ | ० | २३३ | ० |
| ३१ | साईआश्रम भक्तनिवास | ० | ० | ० | १२ | ०० | १२ | ०६ | ० | ० | ०६ |
| ३२ | साई धर्मशाळा | ० | ० | ० | ०५ | ० | ०५ | ०६ | ० | ०१ | ० |
| ३३ | लाडू व बर्फी प्रसाद | ० | ० | ० | १२ | ११ | २३ | ०६ | ० | ० | १७ |
| ३४ | मालमत्ता | ० | ० | ० | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ० | ० | ० |
| ३५ | मागसवर्ग | ० | ० | ० | ०३ | ० | ०३ | ०४ | ० | ०१ | ० |
| ३६ | श्री साईबाबा इंग्लिश मेडियम | ४१ | ०६ | ४७ | ४५ | ४० | ८५ | ४७ | ० | ०९ | ० |
| ३७ | आय.टी.आय | ५१ | ० | ५१ | ४१ | ०४ | ४५ | ० | ०१ | ०५ | ० |
| ३८ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | २५ | ०३ | २८ | १९ | ०८ | २७ | ०३ | ० | ०४ | ० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | ३७ | ०८ | ४५ | ३५ | १५ | ५० | ०९ | ० | ०४ | ० |
| ४० | श्री साईनाथ रुग्णालय | ३६२ | ८१ | ४४३ | २२८ | १५३ | ३९१ | २७० | ० | ३२२ | ० |
| ४१ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५१९ | २२५ | ७४४ | २६५ | ३६३ | ६२७ | ३०७ | ० | ४२४ | ० |
| | एकूण | २९०८ | १९१८ | ४८२६ | २०९३ | २४७३ | ४५७५ | १२९८ | १९४८ | ११६१ | १५८५ |

मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालाबाबत दि.२४ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदयांनी पुढील मुद्यांबाबत सविस्तर अहवाल मागविणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

१. अहवालात सादर केलेल्या प्रत्येक विषय / मुद्यांसदर्भात स्तंभ आलेख (Bar Chart)

२. अहवालात सादर केलल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या वैयक्तिक कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart).

उपरोक्त निर्देशानुसार कार्यवाही करणेसाठी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना दि.२७/१२/२०१६ रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार त्यांनी दि.३१/१२/२०१६ रोजी ई-मेलव्दारे स्तंभ आलेख सादर केलेले आहेत. तथापी, मुद्दा क्र.०२ ची माहिती सादर केलेली नाही. याबाबत मे.वैभव प्लेसमेंट्स यांना दि.२५/०४/२०१७, दि.०४/१०/२०१७ रोजी पत्र देणेत आलेले आहे. तसेच वेळोवेळी दुरुध्वनीव्दारे कळविणेत आलेले आहे. तथापी, त्यांचेकडून अहवालात सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart) सादर न करणेत आलेमुळे दि.०६/०२/२०१८ रोजी त्यांना अंतीम पत्र देणेत आलेले होते.

उपरोक्त तक्त्यामधील गोषवा-याचे अवलोकन केल्यानंतर कॅन्टिन विभाग, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, वाहन विभाग, आरोग्य विभाग, प्रसादालय विभाग, सी.सी.टि.व्ही, साईनाथ रुग्णालये व साईबाबा हॉस्पीटल इ. विभागांची मंजूर आकृतीबंधाची संख्या, सध्या कार्यरत कर्मचारी संख्या आणि परिक्षणानंतर कमी करावयाच्या किंवा अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठा विरोधाभास/ तफावत आहे किंवा त्या संख्या न पटणा-या आहेत. त्याबाबत वैभव प्लेसमेंट यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच अहवालामध्ये सादर केलेल्या सध्याचे कार्यरत कर्मचा-यांचा वर्कलोड पुर्णवेळ आहे काय ? याबाबतही स्पष्टीकरण दिलेले नाही. वैभव प्लेसमेंट्स यांनी सादर केलेला अहवाल एकूण १८० पानांचा असून त्यामध्ये अंदाजे ३० ते ४० पाने परिक्षणाचे मूळ विषयाशी संबधीत आहेत. सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केल्यास सदरचा अहवाल विस्तृत स्वरुपात नाही. उदा. एखाद्या विभागात एखाद्या पदनामाच्या कर्मचा-यांची आवश्यकता अतिरिक्त का आहे? किंवा एखाद्या पदनामाच्या कर्मचारी कमी का करावयाचे आहेत? याबाबत परिक्षणावेळी निर्दशनास आलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात अहवाल सादर केलाला नाही. अशा अहवालानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास एखाद्या विभागातील कर्मचारी संख्या कमी करणे अथवा वाढविणेस कुठलाही तंत्रशुध्द आधार शिल्लक राहत नाही. वैभव प्लेसमेंट्स यांचेकडे परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर माहिती (Job Chart) वेळोवेळी दुरुध्वनीव्दारे तसेच चार वेळेस लेखी पत्राव्दारे मागितलेली आहे. तथापी, त्यांनी अद्यापपर्यंत कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचे जॉब चार्ट सादर केलेले नाहीत. याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने सादर करण्यात आलेल्या आहेत अशी इकडील धारणा असून, हि वस्तूस्थिती वैभव प्लेसमेंट्स यांना दि.०६/०२/२०१८ रोजीचे अंतीम पत्रामध्ये कळविणेत आलेली आहे.

**क)** संस्थानचे अंतीम पत्रानंतर मे.वैभव प्लेसमेंट्स, नाशिक यांनी दि.१९/०२/२०१८ रोजीचे पत्र सादर केलेले असून त्यामध्ये संस्थानने मागणी केलेल्या माहितीचा समावेश नाही. संस्थानने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मे.वैभव प्लेसमेंट्स, नाशिक यांनी दि.१९/०२/२०१८ रोजीचे पत्रात खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

१. काही विभागांमधील आम्ही सुचविलेले कर्मचारी पद, संख्या आपणांस पटत नाहीत असे आपण म्हटले आहे. आम्ही आमच्या परिक्षण काळात निरिक्षिकाच्या भुमिकेतून निरिक्षणे करुन, तपासून, अभ्यास करुन, विश्लेषण करुन आमचे मत नोंदविले आहे. त्यासाठी, परिक्षण काळात आपल्या येथे असलेले कामकाज, त्याची व्याप्ती, कर्मचा-यांनी दिलेली लेखी आणि तोंडी माहिती, या सर्वांचा अभ्यास करुन आम्ही सदर मत मांडलेले आहे.

२. सदर अहवाल आम्ही आमच्या चमुमधील विविध क्षेत्रांमधील तज्ञ आणि अनुभवी सल्लगारांच्या मताने तयार केलेला असून तो सविस्तर, विस्तृत, परिपूर्ण, विषयाशी संबधीत तसेच जसा असायला हवा तसाच आहे, अशी आमची खात्री आहे व त्यास विश्‍वस्त मंडळाच्या बैठकीत तो तसा स्विकारला गेला व त्याबद्दल आमचे अभिनंदन केले या घटनेमुळे पुष्टी मिळते असे आमचे मत आहे.

३. अहवालामध्ये आम्ही आपणांस मनुष्यबळ विभाग स्थापन करुन मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्राशी संबधीत अनुभवी आणि जाणकार अधिकारी नेमून एक स्वतंत्र विभाग त्वरीत कार्यान्वित करावा आणि त्यानुसार संस्थानाचे मनुष्यबळ विभागाचे कामकाज करण्यात यावे असे मत मांडलेले होते. सदर मनुष्यबळ व्यवस्थापन विभाग संस्थानामध्ये कोणत्या विभागात किती कर्मचारी असावेत, कोणती पदे असावीत, त्यांची संख्या किती असावी तसेच कर्मचारी भरती, बडतर्फी, पदोन्नती, पदावनती इत्यादी संबधीत बाबी तंत्रशुध्द आधाराने, कुशलतेने, नियमांना धरुन, त्याचप्रमाणे आमच्या अहवालातील विविध सुचना आणि मतांचा यथायोग्य वापर करुन संस्थानला प्रगतीपथावर नेईल असे आमचे मत आहे. या मताचा आपण गांभीर्याने विचार करावा असे वाटते.

४. संस्थानामधील कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाची तपशिलवार माहिती, कामाच्या पध्दती, इत्यादीबाबी या संस्थानाच्या अंतर्गत कामकाजाचा विशेष करुन मनुष्यबळ व्यस्थापन विभागचा भाग आणि कार्ये आहेत. आमच्या परिक्षण कामाची व्याप्ती मनुषबळ व्यवस्थापन कामाकजाचे परिक्षण करुन त्यांसंदर्भात अहवाल देणे इतपत मर्यादित होती.

५. आम्ही सादर केलेल्या अहवालासंबधी कोणाची काय मत अथवा धारणा असावी याबद्दल आमचे काहीही मत नाही, कारण अशा प्रकारच्या अहवालांच्या बाबतीत सर्वच मुद्यांशी / परिक्षणांशी सर्वच जण सहमत होतील असे नाही, ही सार्वत्रिक परिस्थिती आहे. या आमच्या मताशी आपण सहमत व्हाल असे वाटते.

**ड)** मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना संस्थानचे विविध विभागात बदल करावयाच्या कर्मचारी संख्यमध्ये कशाच्या आधारे बदल करावयाचा याबाबतचे स्पष्टीकरण शेवटपर्यंत देता आलेले नाही. त्यांनी पत्रात नमूद केलेप्रमाणे सदरचे अहवालास जर मा.अध्यक्ष, मा.उपध्यक्ष व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी शाबासकी देऊन विश्‍वस्त मंडळाचे बैठकीमध्ये सदर अहवाल पूर्णपणे स्विकारीत असल्याची सहमती दिलेली असती, तर याबाबतची नोंद मा.व्यवस्थापन समिती बैठकीचे इतिवृत्तामध्ये अथवा निर्णयामध्ये येणे आवश्यकत होते किंवा याबाबत मा.वरिष्ठांकडून काही निर्देश प्राप्त होणे आवश्यक होते. तथापी, असे न होता याऊलट मा.अध्यक्ष महोदयांकडून अहवाल सादर केलेनंतर लगेचच दि.२४ नोव्हेंबर, २०१६ रोजी काही मुद्यांबाबत सविस्तर माहिती मागविण्याच्या सुचना प्राप्त झाल्या व त्याची पूर्तता मे.वैभव प्लेसमेंट्स १२ ते १४ महिन्यांपासून करु शकलेले नाहीत.

तसेच त्यांनी पत्राच्या अं.क्र.०३ मध्ये कळविलेनुसार, ‘अहवालामध्ये आम्ही आपणांस एक स्वतंत्र मनुष्यबळ विभाग त्वरीत कार्यान्वित करुन तेथे अनुभवी आणि जाणकार अधिकारी नेमून संस्थानचे मनुष्यबळ विभागाचे कामकाज करण्यात यावे असे मत मांडलेले होते. सदर मनुष्यबळ व्यवस्थापन विभाग संस्थानामध्ये कोणत्या विभागात किती कर्मचारी असावेत, कोणती पदे असावीत, त्यांची संख्या किती असावेत हे आमच्या अहवालातील विविध सुचनाच्या आधारे योग्य रितीने ठरवतील’ असा सल्ला देणेस त्यांना संकोच वाटलेला नाही. तसेच अं.क्र.०४ मध्ये ‘संस्थानामधील कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाची तपशिलवार माहिती, कामाच्या पध्दती, इत्यादीबाबी या संस्थानाच्या अंतर्गत कामकाजाचा विशेष करुन मनुष्यबळ व्यस्थापन विभागचा भाग आणि कार्ये आहेत. आमच्या परिक्षण कामाची व्याप्ती मनुषबळ व्यवस्थापन कामाकजाचे परिक्षण करुन त्यांसंदर्भात अहवाल देणे इतपत मर्यादित होती.’ असे बेजवाबदारपणाने म्हटले आहे .

| अं. क्र | विभाग | मंजूर आकृतीबंध संख्या | | | सध्याची कर्मचारी संख्या | | | अपेक्षित बदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण | अधिक (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | कमी (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | अधिक (अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाची संख्या) | कमी (अतिरिक्त कर्मचारी कमी करावयाची संख्या) |
| ०१ | कॅन्टिन विभाग | १२० | ४३ | १६३ | ८८ | १०३ | १९१ | ० | १४९ | ० | १७७ |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान | १३६ | ०४ | १४० | ११० | ३४ | १४४ | ० | १३४ | ० | १३८ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | साईप्रसाद निवासस्थान | ८३ | २८ | १११ | ४० | २० | ६० | ० | १०५ | ० | ५४ |
| ०४ | व्दारावती निवासस्थान | ३० | ५४ | ८४ | २४ | १० | ३४ | ० | ७८ | ० | २८ |
| ०५ | वाहन विभाग | ५१ | ६८ | ११९ | ४४ | ८४ | १२८ | ० | १०० | ० | १०९ |
| ०६ | आरोग्य विभाग | १९३ | ३०२ | ४९५ | १५५ | २२१ | ३७६ | ० | ४८९ | ० | ३७० |
| ०७ | प्रसादालय विभाग | ३६० | ४१४ | ७७४ | २९२ | ३४१ | ६३३ | ० | ७२३ | ० | ५८२ |
| ०८ | सी.सी.टि.व्ही | ० | ० | ० | १७ | ०७ | २४ | २५७ | ० | २३३ | ० |
| ०९ | श्री साईनाथ रुग्णालय | ३६२ | ८१ | ४४३ | २२८ | १५३ | ३९१ | २७० | ० | ३२२ | ० |
| १० | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५१९ | २२५ | ७४४ | २६५ | ३६३ | ६२७ | ३०७ | ० | ४२४ | ० |

मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालातील उपरोक्त काही विभागांचा गोषवारा तपासल्यास उपरोक्त तक्त्यातील सध्या कार्यरत कर्मचारी संख्या आणि परिक्षणानंतर कमी करावयाच्या किंवा अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठा विरोधाभास / तफावत आहे किंवा त्या संख्या न पटणा-या आहेत. त्याबाबत वैभव प्लेसमेंट यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. उदा. एखाद्या विभागात एखाद्या पदनामाच्या कर्मचा-यांची आवश्यकता अतिरिक्त किंवा कमी का करावयाचे आहेत याची प्रत्यक्ष कर्मचा-यांच्या कार्यस्थळावर जाऊन पहाणी करुन, पहाणीवेळी निर्दशनास आलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात अहवाल सादर केलाला नाही. अशा अहवालानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास एखाद्या विभागातील कर्मचारी संख्या कमी करणे अथवा वाढविणेस कुठलाही तंत्रशुध्द आधार शिल्लक राहत नाही. तसेच त्यांचेकडे प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर माहिती (Job Chart) चार वेळेस लेखी पत्राव्दारे मागीतलेला असतांना देखील त्यांनी १२ ते १४ महिन्यांपासून कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचे जॉब चार्ट सादर केलेले नाहीत. याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने/ अंदाजे सादर करण्यात आलेल्या आहेत हे सिध्द होते. सबब मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेला परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणाबाबत बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये असे मत आहे. तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना विषयांकित कामापोटी जी रक्कम रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून विषयांकित कामापोटी अंतिम करुन जमा नावे करता येईल, असेही मत आहे.

तरी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लि. नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापना संबधी केलेल्या कर्मचारी मनुष्यबळ परिक्षण अहवालाबाबत उपरोक्त परिशिष्ट (ड) मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस अथवा इतर अनुषंगिक यथोच्च कार्यवाही करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवाबाबत विषयात नमूद मुद्दयांच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती मागवावी. तसेच त्यांनाही सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३६** **शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे वाहतुक भत्ता लागू करणेबाबत श्री.सुर्यकांत भोसले व इतर १७ कर्मचाऱ्यांचे एकत्रित मागणी अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१०/०३/२०१८ रोजीचे एकत्रित अर्जाव्दारे श्री.सूर्यकांत भोसले व इतर १७ कर्मचा-यांनी, *"आम्ही श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी येथे राहत असून सदरचे अंतर आमचे कर्तव्यस्थानापासून अडीच किलोमीटर आहे. शासन निर्णयाप्रमाणे कर्तव्यस्थानापासून ०१ कि.मी पेक्षा जास्त अंतरावर राहणा-या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता देय्य आहे. त्याप्रमाणे आम्हालाही वाहतूक भत्ता लागू करणेत यावा."* अशी विनंती केलेली आहे.

मा.केंद्र शासनाने केंद्र शासकीय कर्मचा-यांना दि.०३/१०/१९९७ चे आदेशाने, निवासस्थानापासून कर्तव्यस्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर केलेला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांना दि.१४ डिसेंबर, १९९८

रोजीचे शासन निर्णयान्वये दि.०१ ऑक्टोबर, १९९८ पासून वाहतूक भत्ता लागू केलेला आहे. राज्य शासनाचे दि.१४ डिसेंबर, १९९८ रोजीचे शासन निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२-०३ डिसेंबर २००० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५७ नुसार केवळ शिरडी नगरपंचायतीचे हद्दीबाहेर वास्ताव्यास असलेल्या स्थायी कर्मचा-यांना शासकीय दराने वाहतूक भत्ता लागू केलेला आहे. त्यानुसार जे कर्मचारी शिर्डी नगरपंचायत हद्दीचे बाहेर वास्ताव्यास आहेत अशा कर्मचा-यांना संबधीत गावाचा रहिवाशी दाखला, प्रतिज्ञापत्र, रेशनकार्ड व विजदेयक इ. कागदपत्रांची छायांकित प्रतीसह मागणीअर्ज आवक विभागाकडे दाखल केलेच्या तारखेपासून अनुज्ञेय दराने वाहतूक भत्ता लागू करण्यात येतो.

मा.शासनाचे वित्त विभागाने पारित केलेल्या दि.१४ डिसेंबर, १९९८ रोजीचे शासन निर्णयामध्ये वाहतूक भत्ता लागू करणेबाबत खालील प्रमाणे तरतूदी आहेत.

१. कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान ह्यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

२. ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतूक सुविधा (Government Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय नाही.

उपरोक्त शासन निर्णय पारित झालेपासून आजअखेर वाहतूक भत्ताच्या अनुज्ञेयतेबाबतच्या उपरोक्त तरतूदी कधीही अधिक्रमीत झालेल्या नाहीत किंवा त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेली नाही, सदर तरतूदी अद्यापही लागू आहेत. तथापी, अं.क्र.०१ चे तरतूदीचा निश्चित अर्थबोध होत नसल्यामुळे तसेच वाहतूक भत्ताच्या अनुज्ञेयतेबाबत काही मुद्दे उपस्थित झाल्याने अशा सर्व मुद्यांचे स्पष्टीकरणासाठी, मा.शासनाने दि.०९ मे, २००३ रोजी परिपत्रक पारित करुन वाहतूक भत्याच्या अनुज्ञेयतेबाबत खुलासा सादर केलेला आहे. त्यामधील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

| अं. क्र | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०१ | कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत खाजगी निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांनाही वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ? | अनुज्ञेय आहे. |
| ०२ | कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांस वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ? | कर्तव्यवस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परीसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांस कर्मचा-याचे निवासस्थान आणि कर्तव्यवस्थान यातील अंतर १ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त असले तरीही वाहतूक भत्ता अनुज्ञेय नाही. |

उपरोक्त स्पष्टीकरणानुसार ज्या कर्मचा-यांना संस्थानने निवासस्थान उपलब्ध करुन दिलेले आहे आशांव्यतिरिक्त सर्वच स्थायी कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे वाहतूक भत्ता लागू करणे आवश्यक आहे. तथापी, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२-०३ डिसेंबर २००० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५७ अन्वये केवळ शिरडी नगरपंचायतीचे हद्दीबाहेर वास्तव्यास असलेल्या कर्मचा-यांना शासकीय दराने वाहतूक भत्ता अदा करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने जे कर्मचारी शिर्डी नगरपंचायतीचे हद्दीमध्ये राहतात अशा कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अदा करता येत नाही. त्यामुळे अशा कर्मचा-यांचे वर्षानुवर्षे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, याबाबत पुर्नविचार करुन निर्णय घेता येईल. तथापी, याबाबत काही कर्मचारी सदरचा वाहतूक भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करुन त्याबाबतचा फरक मागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, शिर्डी नगरपंचायत हद्दीमध्ये वास्तव्यास असलेल्या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मंजूरी मिळालेनंतर जसे-जसे कर्मचारी वाहतूक भत्ता मिळणेसाठी आवक विभागाकडे अर्ज सादर करतील संबधीत कर्मचा-यांना त्या-त्या तारखेपासून शासन निर्णयाप्रमाणे वाहतूक भत्ता लागू करता येईल.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२-०३ डिसेंबर २००० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५७ बाबत पुर्नविचार होऊन, शिर्डी नगरपंचायतीचे हद्दीमध्ये खाजगी निवासात वास्तव्यास असलेल्या संस्थान कर्मचा-यांना शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे वाहतूक लागू करणेस मान्यता असावी, हि विनंती.

**निर्णय क्र.२५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३७** **मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतींमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा मे.ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद यांचे अहवालानुसार येणाऱ्या रु.२.१५ कोटी खर्चास तसेच खरेदी विभागामार्फत सदरची ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस व सी.आय.एस.एफ.मुंबई यांचेमार्फत करण्यात आलेले असुन सदर ऑडीट रिपोर्ट फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडे प्राप्त झालेला आहे.फायर ऑडीटमधील सुचविलेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी मा.व्य.समितीचे दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.०१ व निर्णय क्रं.६३८ नुसार फायर अॅण्ड सेफ्टी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येवून निविदे प्रक्रियेतील न्युनतम दर धारक मे.इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांची नेमणुक करुन त्यांना पुरवठा आदेश देणेत आलेला आहे तसेच संस्थानमार्फत फायर सल्लागार यांचेसमवेत करावयाचे कामांबाबत करारनामा करण्यात आलेला असुन दि.०७.११.२०१७ पासुन फायर सल्लागार यांनी प्रत्यक्ष मंदिर परिसरापासुन कामास सुरुवात केलेली आहे.

आता आवक क्र.०२१६२० दि.२२.०१.२०१८ रोजी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनीचे पत्र व अहवाल इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर पत्रामध्ये असे नमुद केलेले आहे की, सर्व मंदिर परिसराची पहाणी करुन मंदिर व परिसरात अग्निसुरक्षिततेकामी करावयाच्या उपाययोजना ज्यामध्ये (स्थायी अग्निशमन यंत्रणा, स्प्रिंकलर सिस्टीम, स्मोक डिटेकर, अलार्म सिस्टीम, फायर पंप, फायर डिझेल पंप) मंदिराच्या कोणत्या ठिकाणी बसविणेत यावा याबाबत सर्व्हे करुन ड्राईंग व ई - निविदा टेंडर तयार करुन संस्थानकडे टेंडर प्रक्रीया करणेकामी देणेत आलेले आहे. सदर अहवालानुसार मंदिर व मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी १.फायर हायड्रंट सिस्टीमकरीता- रु.९८,२२,५००/-, २.स्प्रिंकलर सिस्टीमकरीता रु.८९,५२,१००/- तसेच ३.फायर अलार्म व डिटेक्शन सिस्टीमकरीता – रु.२७,८६,५५५/- अशी एकुण अंदाजे रु.२,१५,६१,१५५/- (दोन कोटी पंधरा लाख एकसष्ट हजार एकशे पंच्चावन्न मात्र) ( शासनाचे DSR / मार्केट रेट तसेच 18 % GST सह) इतका खर्च अपेक्षित असलेबाबत नमुद केलेले आहे. संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०१८-२०१९ चे वार्षिक बजेटमध्ये संस्थानचे सर्व इमारतींसाठी (६४ इमारती) ०८ कोटी खर्चास मंजुरी घेण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय**– संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०१८ -२०१९ मधील बजेटमध्ये ०८ कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. मंदिर परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी संस्थानचे फायर सल्लागार यांनी दिलेल्या अहवालानुसार अंदाजे २ कोटी १५ लाख खर्च अपेक्षित आहे. परंतु सदरची टेंडर प्रक्रिया ५ लाखांपेक्षा जास्त किमंतीची असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९९९ नुसार सदरची प्रक्रिया खरेदी विभागामार्फत राबविणेबाबत उपरोक्त संदर्भ क्रं ०२ नुसार कळविलेले आहे.संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवुन सदर परिसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्तापीत करण्याकरीता मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांची नेमणुक करण्यात आलेली असुन सदर एजन्सीमार्फत अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेत येणार आहे.तसेच फायर विभागाकडे सध्या ऑफीस कामासाठी ०१ प्र.फायर ऑफीसर उपलब्ध असुन त्यांना उर्वरीत इमारतींची पहाणी करणेकामी मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे सोबत उपलब्ध रहावे लागणार आहे. त्यामुळे सदरची ई - टेंडर प्रक्रीया खरेदी विभागामार्फत होणे आवश्यक आहे.

संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीना स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी ऑडीटर यांचे प्रकल्प अहवालानुसार येणा-या अंदाजे ०२ कोटी १५ लाख खर्चाबाबत सदरचा विषय मा.व्य.समिती सभेपुढे सादर करणे आवश्यक असुन सदरची ई- निविदा प्रक्रिया खरेदी विभागामार्फत करता येईल तसेच फायर ऑडीटचे काम फायर विभाग, मे.ग्राकिक इन्फ्रास्ट्रक्चर औरंगाबाद व सल्लागार उंडे यांचे समवेत संयुक्तीक रीत्या करता येईल असे नम्र मत आहे.

**करीता.**

अ) मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतींना स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेकामी मे.ग्राकिक इन्फ्रास्ट्रक्चर औरंगाबाद यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार येणा-या अंदाजे २.१५ कोटी सर्व समावेशक खर्चास मान्यता असावी.

ब. मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतींना स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीबाबत मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे प्राप्त अहवालप्रमाणे **खरेदी विभागामार्फत** ई-निविदा प्रक्रिया राबविणेस, महाराष्ट्र शासनाचे व संस्थानचे संकेत स्थळावर ई– निविदा प्रसिध्द तसेच पुणे, मुंबई, नाशिक, अहमदनगर व इतर मोठया शहरातील वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेषक खर्चास मान्यता असावी.

तरी **अ** आणि **ब** बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२.१५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८ हॉस्पिटल विभागाकडे देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या स्टेंटस रुग्णांना मोफत देणेबाबत रुग्ण श्री बावीस्कर रामदास नागु यांचे अनुषंगाने.**

**प्रस्ताव-** रुग्ण श्री बावीस्कर रामदास नागु या रुग्णास दि.२०/०७/२०१७ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रोजी डॉ.मनोहर शिंदे, कार्डीओलॉजीस्ट यांना दाखवले असता त्यांनी २डि इको तपासणी करणेची सल्ला दिला. २ डि इकोच्या तपासणीवरुन त्यांना ॲन्जिओप्लास्टी करणेबाबत सल्ला दिला व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेबाबत माहितीही दिली. परंतु रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांनी पैसे भरुन प्रोसिजर करणेस तयारी दाखवली. डॉक्टरांनी रुग्णांला सीआरयु-०२, एसपीआर,टिएसआर या वार्डमध्ये ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होवु शकेल त्या ठिकाणी भरती करणेबाबत केसपेपर वर लिहुन दिले. त्यानुसार उपलब्धतेनुसार रुग्णांचे नातेवाईक यांनी सदर रुग्णाला एसपीआर वार्ड मध्ये ॲडमीट केले होते.

दि.२७/०७/२०१७ रोजी दोन स्टेंटची ॲन्जीओप्लास्टी ही प्रोसिजर करणेत आली आहे. सदर प्रोसिजर करीता रु ३३००/- व रु १२५००/- इतके किमतीचे दोन स्टेंन्ट वापरलेले आहे. पैकी रु १२५००/-चा वापरणेत आलेला स्टेट हा श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता देणगी स्वरुपात मिळालेला आहे. सदर रुग्णांचे दोनही स्टेंटचे चार्जेस आकारुन एकुण बील रु ६७९६०/- (सदुसष्ट हजार नउशे साठ मात्र) इतके होत आहे. सदर प्रोसिजर्स करीता रुग्णाने रु ५५,४६०/- अक्षरी (पंच्चावन्न हजार चारशे साठ रु मात्र) डिपॉझीट म्हणुन भरलेले आहेत. सदर देणगी स्वरुपात आलेल्या स्टेंटचे चार्जेस जर रुग्णाकडुन आकारले नाही तर रुग्णाला रु ५५,४६०/- अक्षरी पंच्चावन्न हजार चारशे साठ रुपये भरावे लागतील व तेवढी रक्कम रुग्णाने डिपॉझीट म्हणुन भरलेली आहे.सदर फाईलवर तत्कालीन प्र.वैद्यकीय संचालक यांनी Accept other charges excluded cost of donated stent & close the folio. Discharge the patient, Put up for meeting notes of regarding policy of donated /sample Stents.

देणगी स्वरुपात आलेल्या स्टेंट/ सर्व विभागांना लागणारे इम्प्लांट याबाबत बील रुग्णाकडुन आकारावे किंवा नाही याबाबत निर्णय झालेला नाही. देणगी स्वरुपात आलेल्या स्टेंटचे/ सर्व विभागांना लागणारे इम्प्लांट यांचे बील रुग्णांकडुन आकारु नये असे मत आहे तसेच अशी सदरचे स्टेंट व इम्प्लांट मा.वैद्यकीय संचालक, उपचार करणारे कन्सलटंट डॉक्टर व परचेस मॅनेजर या तिघांनी चर्चा करुन निर्णय घेवुन रुग्णांना वापरावे.

तरी सदर रुग्ण श्री बावीस्कर रामदास नागु यांना रु १२५००/- इतके रुपयाचे देणगी स्वरुपातले स्टेंटवापरले असल्याने फक्त देणगी स्वरुपात मिळालेल्या स्टेंटचे चार्जेस त्यांच्याकडुन आकारु नये व उरलेल्या बीलाचे डिपॉझीट म्हणुन भरलेल्या रकमेचे बीलात समावेश करावा व फक्त देणगी स्टेंटचे बीलाची चॅरीटी करुन बील सेटलमेंट करावे व यापुढे देणगी स्वरुपात आलेल्या स्टेंट/ सर्व विभागांना लागणारे इम्प्लांट यांची चार्जेसची रुग्णांकडुन आकारणी न करता तेवढी रकमेची सोशल वर्कर यांचेमार्फत चॅरीटी फॉर्म भरुन सवलत द्यावी. याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बावीस्कर रामदास नागु यांना देणगी स्वरुपातले स्टेंट वापरले असल्याने फक्त देणगी स्वरुपात मिळालेल्या स्टेंटचे चार्जेस त्यांच्याकडुन आकारु नये व डिपॉझीट म्हणुन भरलेल्या रकमेचा त्यांच्या उर्वरित बीलामध्ये समावेश करणेत यावा. तसेच यापुढे देणगी स्वरुपात मिळालेले साहित्य रुग्णास वापरल्यास त्याचे बील आकारु नये, असे ठरले.**

**उपरोक्त चर्चेच्या वेळी सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सर्व रुग्णांना संस्थानमार्फत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु सर्जरीच्या वेळेस रुग्णांना Implant खरेदीसाठी धावपळ करावी लागते, यासाठी श्री साईनाथ रुग्णालयामधील रुग्णांना मोफत Implant देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.३९ श्री साईबाबा रुग्णालयातील (Orthopaedic Surgery) या विभागाकरीता Basic Trauma Instrument खरेदी करणेसाठी रु.६,६२,३००/- खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

**प्रास्ताविक**:- श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागाने नग नविन Basic Trauma Instrument ची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागामध्ये असलेले Basic Trauma Instrument जुने झालेले असल्यामुळे तुटले आहे.सदर Instrument चा वापर अपघातग्रस्त पेशंटचे Operation करणेकरीता होतो. त्यामुळे त्यांनी नवीन मागणी केली आहे.

नविन Basic Trauma Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता M/s. JJ International Instrument, Kerala यांचेकडून ई-मेल व्दारे अंदाजे खर्चाकरीता दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| Sr. No. | Deescription | Total Qty. | Rate per in Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | Periosteal elevator with Handle १४mm cvd | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| २ | Periosteal elevator with Handle ११०mm cvd | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| ३ | Periosteal elevator with Handle ५mm cvd | १ | ३६००.०० | ३६००.०० |
| ४ | Periosteal elevator with Handle ५mm Str | १ | ३६००.०० | ३६००.०० |
| ५ | Periosteal elevator with Handle ३mm cvd | १ | ३६००.०० | ३६००.०० |
| ६ | Periosteal elevator with Handle ३mm Str | १ | ३६००.०० | ३६००.०० |
| ७ | Muller femoral Neck elvator | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| ८ | Homan bone Lever ८mm | १ | ३८००.०० | ३८००.०० |
| ९ | Homan bone Lever १०mm | १ | ४२००.०० | ४२००.०० |
| १० | Homan bone Lever १७mm | १ | ४८००.०० | ४८००.०० |
| ११ | Homan bone Lever २२mm | १ | ४८००.०० | ४८००.०० |
| १२ | Homan bone Lever २६mm | १ | ५२००.०० | ५२००.०० |
| १३ | Homan bone Lever ३३mm | १ | ५२००.०० | ५२००.०० |
| १४ | Homan bone Lever ४४mm | १ | ५२००.०० | ५२००.०० |
| १५ | Bone hook Sharp | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| १६ | Bone hook Blunt | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| १७ | Murphy Bonr skid | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| १८ | Femoral tibial spreader | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| १९ | Bone Cutter ६" cvd | १ | ५८००.०० | ५८००.०० |
| २० | Bone Cutter Ruski Liston ८" cvd | १ | ७२००.०० | ७२००.०० |
| २१ | Bone Cutter १०.५" cvd | १ | ८८००.०० | ८८००.०० |
| २२ | Bone Nibler ६"cvd & str | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| २३ | Bone Nibler ९"cvd & str | २ | ७८००.०० | १५६००.०० |
| २४ | Bone Nibler १०.५"cvd & str | २ | ८८००.०० | १७६००.०० |
| २५ | Mallet Small | १ | ४६००.०० | ४६००.०० |
| २६ | Mallet Medium | १ | ५८००.०० | ५८००.०० |
| २७ | Mallet Big | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| २८ | Bone & plate Holding Forceps २.७ | १ | ४६००.०० | ४६००.०० |
| २९ | Bone & plate Holding Forceps ३.५ | १ | ४९००.०० | ४९००.०० |
| ३० | Bone & plate Holding Forceps ४.५ | १ | ४९००.०० | ४९००.०० |
| ३१ | Gouge eith Handle ५mm str & cvd | २ | ४९००.०० | ९८००.०० |
| ३२ | Gouge eith Handle १०mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३३ | Gouge eith Handle १५mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | Gouge eith Handle २०mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३५ | Osteotome with Handle ५mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३६ | Osteotome with Handle १०mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३७ | Osteotome with Handle १५mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३८ | Osteotome with Handle २०mm str & cvd | २ | ५८००.०० | ११६००.०० |
| ३९ | Osteotome JJ५mm str & cvd | २ | ५२००.०० | १०४००.०० |
| ४० | Osteotome JJ१०mm str & cvd | २ | ५२००.०० | १०४००.०० |
| ४१ | Osteotome JJ१५mm str & cvd | २ | ५२००.०० | १०४००.०० |
| ४२ | Osteotome JJ२०mm str & cvd | २ | ५२००.०० | १०४००.०० |
| ४३ | Bone curette with hollow handle | १ | ४८००.०० | ४८००.०० |
| ४४ | Bone awl Radious | १ | ३८००.०० | ३८००.०० |
| ४५ | Bone Awl Humerous | १ | ३८००.०० | ३८००.०० |
| ४६ | Bone Awl Finger | १ | ३६००.०० | ३६००.०० |
| ४७ | Broken Nail Ectractor | १ | ५८००.०० | ५८००.०० |
| ४८ | Implant Extractor with stapped Hammer | १ | २१५००.०० | २१५००.०० |
| ४९ | Mippo write Passer | १ | १५५००.०० | १५५००.०० |
| ५० | Wire Passing guide Large | १ | ४२००.०० | ४२००.०० |
| ५१ | Wire Passing guide Medium | १ | ४२००.०० | ४२००.०० |
| ५२ | Wire Passer Demal Large | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| ५३ | Wire Passer Demal small | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| ५४ | Wire Passer Demal Medium | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| ५५ | pelvic Reduction Forceps १६" १X१ | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| ५६ | pelvic Reduction Forceps १६" १X२ | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| ५७ | pelvic Reduction Forceps Asymetric | १ | ७२००.०० | ७२००.०० |
| ५८ | pelvic Reduction Screw type | १ | ७२००.०० | ७२००.०० |
| ५९ | Bone Reduction Forceps Pointed ५.५" | १ | ४८००.०० | ४८००.०० |
| ६० | Bone Reduction Forceps Pointed ७.५" | १ | ५८००.०० | ५८००.०० |
| ६१ | Bone Reduction Forceps Pointed ९.५" | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| ६२ | Bone Reduction Forceps Pointed ६.५" | १ | ५२००.०० | ५२००.०० |
| ६३ | Bone Reduction Forceps Pointed ७.५" | १ | ५८००.०० | ५८००.०० |
| ६४ | Bone Reduction Forceps Pointed ९.५" | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| ६५ | Charnley Retarctor with ४ blades | १ | १६५००.०० | १६५००.०० |
| ६६ | Retarctor Weitlaner ६" str & cvd | १ | ५२००.०० | ५२००.०० |
| ६७ | Retarctor Weitlaner ८" str & cvd | १ | ६८००.०० | ६८००.०० |
| ६८ | Retarctor Weitlaner १०" str & cvd | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| ६९ | Retarctor beckman Weitlaner ६" | १ | ५६००.०० | ५६००.०० |
| ७० | Retarctor beckman Weitlaner ८" | १ | ६८००.०० | ६८००.०० |
| ७१ | Retarctor beckman Weitlaner १२" | १ | ८२००.०० | ८२००.०० |
| ७२ | charnley Removal Instrument(set of १०) | १ | ५८०००.०० | ५८०००.०० |
| ७३ | Nose Plier ७" Pointed | १ | ३९००.०० | ३९००.०० |
| ७४ | Nose Plier Dolphine | १ | ४२००.०० | ४२००.०० |
| ७५ | Multipurpose Plier Big | १ | ६२००.०० | ६२००.०० |
| ७६ | Multipurpose Plier small | १ | ५८००.०० | ५८००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७७ | K wire cutter Arjuna | १ | २६५००.०० | २६५००.०० |
| ७८ | K wire cutter ९" TC | १ | १२५००.०० | १२५००.०० |
| ७९ | K wire cutter ७" TC | १ | ९५००.०० | ९५००.०० |
| ८० | Arthoscopy punch ३०° | १ | १४५००.०० | १४५००.०० |
| ८१ | Bone Awl with trocar | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| | | | **Total Amt. in Rs..** | **6,62,300.00** |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त Orthopaedic Surgery खरेदीकामी रु.६,६२,३००/- (अक्षरी रक्कमसहा लाख बासष्ट हजार तीनशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईनाथरुग्णालयातील Orthopaedic Surgeryया विभागाने Basic Trauma Instrumentची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागाने नगनविन Basic Trauma Instrument ची मागणी केलेली आहे. श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागामध्ये असलेले Basic Trauma Instrumentजुने झालेले असल्यामुळे तुटले आहे. सदर Instrument चा वापर अपघातग्रस्त पेशंटचे Operation करणेकरीता होतो. त्यामुळे त्यांनी नवीन मागणी केली आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार Basic Trauma Instrument विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागाकरीता नविन Basic Trauma Instrument विहित पध्दतीने ई-निविदामागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,६२,३००/- (अक्षरी रू. सहा लाख बासष्ट हजार तीनशे मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.२६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Orthopaedic Surgery या विभागाकरीता नविन Basic Trauma Instrument खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,६२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४० **श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१७ ते ऑक्टोबर २०१७ व फेब्रुवारी २०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या रु.६,५४,८५,८०८/- सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/ सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर

महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. तरीमाहे नोव्हेंबर २०१७व डिसेंबर २०१७ महिन्यात झालेल्या सवलतीची मान्यता दि.०२/०२/२०१८ रोजी मा.व्य.समितीचे सभेमध्ये मिळाली आहे. तसेच माहे जानेवारी२०१८ महिन्यात झालेल्या सवलतीची मान्यता दि.०७/०३/२०१८ रोजी मा.व्य.समितीचे सभेमध्ये मिळाली आहे. माहे **एप्रिल २०१७ ते ऑक्टोबर २०१७ व फेब्रुवारी २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१,०५,६२९** व १०,७६६ आयपीडी रुग्णांपैकी २८,७०५ ओपीडी व **४,८८९** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.६,१६,९१,६७८**/-इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **२,५४९** रुग्णाना रक्कम **रु.३७,९४,१३०/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

## एप्रिल २०१७

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३६० | ३,५५८,३७२/- | १,५०५,५८५/- | २,०५२,७८७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३०३ | १,९२०,८७२/- | १,१८३,२२६/- | ७३७,६४६/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | १७,२९१/- | - | १७,२९१/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | २५४ | ३२०,७०५/- | १,६५०/- | ३१९,०५५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४१७ | १८,०३६,८४९/- | १५,०८२,०९२/- | २,९५४,७५७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २९१९ | १५,१४,५९५/- | - | १,५१४,५९५/- |
| | **एकुण** | **४२५९** | **२५,३६८,६८४/-** | **१,७७,७२,५५३/-** | **७,५९६,१३१/-** |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४४ | ५८,६००/- | - | ५८,६००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ४ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३५ | ४,२३०/- | - | ४,२३०/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १४० | २,८०,१००/- | - | २,८०,१००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १२५ | १,६५,४००/- | - | १,६५,४००/- |
| | **एकुण** | ३५४ | ५,२०,३३०/- | - | ५,२०,३३०/- |
| | **एकुण अ+ब** | **४६१३** | **२५,८८९,०१४/-** | **१,७७,७२,५५३/-** | **८१,१६,४६१/-** |

## मे २०१७

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८० | ९,२५,४८५/- | - | ९,२५,४८५/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८६ | ८,८७,८४५/- | ३,७३,९८१/- | ५,१३,८६४/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | ८,१५१/- | - | ८,१५१/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ९७७ | २२,०४६,१६१/- | १७,५७९,४४६/- | ४४,६६,७१५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४३३ | १७,४०८,८२२/- | १,४८,९८,१८६/- | २५,१०,६३६/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३,१११ | १५,५३,३७०/- | - | १५,५३,३७०/- |
| | **एकुण** | **४,६९३** | **४,२८,२९,८३४/-** | **३,२८,५१,६१३/-** | **९९,७८,२२१/-** |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३७ | ३६,४००/- | - | ३६,४००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ७ | ५,४००/- | - | ५,४००/- |
| ५ | व्हॅालंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३७ | ४,१००/- | - | ४,१००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १४२ | २,६७,०००/- | - | २,६७,०००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॅायी फ्रि | ९ | ९,०००/- | - | ९,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॅायी फ्रि | २ | १,८००/- | - | १,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ८३ | १,३७,२००/- | - | १,३७,२००/- |
| | **एकुण** | **३१८** | **४,६२,१००/-** | **-** | **४,६२,१००/-** |
| | **एकुण अ+ब** | **५,०११** | **४,३२,९१,९३४/-** | **३,२८,५१,६१३/-** | **१,०४,४०,३२१/-** |

## जुन २०१७

## (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०४ | ११,५४,८१०/- | - | ११,५४,८१०/- |
| २ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२७ | १६,०७,४४३/- | ६,०५,४५१/- | १०,०१,९९२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७ | १७,७५८/- | ५,०००/- | १२,७५८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ७९६ | २९,५४,५४५/- | १७,५५,४३६/- | ११,९९,१०९/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३४५ | १,४९,७५,४१३/- | १,३०,६७,२९०/- | १९,०८,१२३/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३०६४ | १६,०२,०९५/- | - | १६,०२,०९५/- |
| | **एकुण** | **४४४३** | **२,२३,१२,०६४/-** | **१,५४,३३,१७७/-** | **६८,७८,८८७/-** |

## (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४० | ४५,६००/- | - | ४५,६००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | २ | १,२००/- | - | १,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | ९,०००/- | - | ९,०००/- |
| ५ | व्हॅालंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३६ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १४७ | २,५७,०००/- | - | २,५७,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ७ | ११,४००/- | - | ११,४००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १५५ | २,२६,८००/- | - | २,२६,८००/- |
| | **एकुण** | **३९९** | **५,५९,४००/-** | **-** | **५,५९,४००/-** |
| | **एकुण अ+ब** | **४८४२** | **२,२८,७१,४६४/-** | **१,५४,३३,१७७/-** | **७४,३८,२८७/-** |

## जुलै २०१७

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३९ | १५,२१,५६४/- | - | १५,२१,५६४/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६८ | २१,६५,८८३/- | ८,७६,७५२/- | १२,८९,१३१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४ | ४९,३६३/- | ९,३५०/- | ४०,०१३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ८७५ | ३१,६२,५१४/- | १९,२९,०१७/- | १२,३३,४९७/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४१९ | १,४९,०९,३१८/- | १,२२,२८,८५०/- | २६,८०,४६८/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३६३३ | १९,८७,६०५/- | - | १९,८७,६०५/- |
| | **एकुण** | **५,२४८** | **२,३७,९६,२४७/-** | **१,५०,४३,९६९/-** | **८७,५२,२७८/-** |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४६ | ५०,२००/- | - | ५०,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १० | ९,८००/- | - | ९,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ४१ | ४,३००/- | - | ४,३००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | ११२ | २,०५,९००/- | - | २,०५,९००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,०००/- | - | ४,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | १ | १,८००/- | - | १,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ९८ | १,५४,४००/- | - | १,५४,४००/- |
| | **एकुण** | **३१२** | **४,३१,६००/-** | **-** | **४,३१,६००/-** |
| | **एकुण अ+ब** | **५,५६०** | **२,४२,२७,८४७/-** | **१,५०,४३,९६९/-** | **९१,८३,८७८/-** |

## ऑगस्ट २०१७

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४० | १७,६६,९८७/- | - | १७,६६,९८७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १९० | १८,०१,८५३/- | ७,८३,६५७/- | १०,१८,१९६/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | १,३६,०६२/- | १,०८,८५५/- | २७,२०७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ९०९ | ३८,९१,५८५/- | २३,५९,६९०/- | १५,३१,८९५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३९९ | १,५१,२६,८६०/- | १,२७,४३,२५०/- | २३,८३,६१०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३०१४ | १६,१२,४२४/- | - | १६,१२,४२४/- |
| | एकुण | ४,६६० | २,४३,३५,७७१/- | १,५९,९५,४५२/- | ८३,४०,३२०/- |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४० | ४९,२००/- | - | ४९,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेलॲनेमीया फ्रि | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ११ | १३,२००/- | - | १३,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३३ | ४,७००/- | - | ४,७००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १२९ | २,४५,८००/- | - | २,४५,८००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ४ | ९,२००/- | - | ९,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | २ | ३,०००/- | - | ३,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ९४ | १,४१,२००/- | - | १,४१,२००/- |
| | एकुण | ३१४ | ४,६७,५००/- | - | ४,६७,५००/- |
| | एकुण अ+ब | ४,९७४ | २,४८,०३,२७१/- | १,५९,९५,४५२/- | ८८,०७,८२०/- |

## <u>सप्टेंबर २०१७</u>

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १७३ | १४,३८,१२३/- | - | १४,३८,१२३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५१ | १०,१३,६१२/- | ५,०६,७८७/- | ५,०६,८२५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २० | १,१५,९८४/- | २७,२५२/- | ८८,७३२/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ९०४ | ४६,१३,४४६/- | २४,९४,४१२/- | २१,१९,०३४/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३७८ | १,६७,१९,३०५/- | १,४५,९०,३००/- | २१,२९,००५/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३२१९ | १७,६५,७७०/- | - | १७,६५,७७०/- |
| | एकुण | ४,८४५ | २,५६,६६,२४०/- | १,७६,१८,७५१/- | ८०,४७,४८९/- |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | २६ | २८,६००/- | - | २८,६००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | २ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | ११,८००/- | - | ११,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३९ | ५,०००/- | - | ५,०००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १२५ | २,५९,७००/- | - | २,५९,७००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ६ | ८,८००/- | - | ८,८००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | १ | ६००/- | - | ६००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १५१ | २,३५,२००/- | - | २,३५,२००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण | ३५९ | ५,५३,९००/- | - | ५,५३,९००/- |
| | एकुण अ+ब | ५,२०४ | २,६२,२०,१४०/- | १,७६,१८,७५१/- | ८६,०१,३८९/- |

## ऑक्टोबर २०१७

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५७ | ११,६४,०३२/- | - | ११,६४,०३२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३१ | ८,६०,४६६/- | ४,३०,२७३/- | ४,३०,१९३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | ४,२२३/- | - | ४,२२३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ७२० | ३८,८५,१८४/- | २१,१०,२०७/- | १७,७४,९७७/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २७१ | १,१७,८२,८९८/- | १,०३,५२,९५६/- | १४,२९,९४२/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २६८१ | १३,१०,२८५/- | - | १३,१०,२८५/- |
| | एकुण | ३,९६६ | १,९०,०७,०८८/- | १,२८,९३,४३६/- | ६१,१३,६५२/- |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३१ | ३५,८००/- | - | ३५,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ११ | १२,६००/- | - | १२,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २६ | २,८००/- | - | २,८००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | ९७ | १,९४,७००/- | - | १,९४,७००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ४ | ६,२००/- | - | ६,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | २ | ३,६००/- | - | ३,६००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ६० | १,२२,०००/- | - | १,२२,०००/- |
| | एकुण | २३१ | ३,७७,७००/- | - | ३,७७,७००/- |
| | एकुण अ+ब | ४,१९७ | १,९३,८४,७८८/- | १,२८,९३,४३६/- | ६४,९१,३५२/- |

## फेब्रुवारी २०१८

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८७ | ३,४१,१५७/- | - | ३,४१,१५७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५९ | १७,०५,४०२/- | ७,९५,२८३/- | ९,१०,११९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | ६१,८५६/- | ४५,०००/- | १६,८५६/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६८८ | ३८,७५,७४१/- | २,५६८,७०४ | १३,०७,०३७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३०४ | १,५८,१०,८१२/- | १,३५,७२,१४१/- | २२,३८,६७१/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,२१८ | ११,७०,८६०/- | - | ११,७०,८६०/- |
| | **एकुण** | **३,४६७** | **२,२९,६५,८२८/-** | **१,६९,८१,१२८/-** | **५९,८४,७००/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४३ | ४८,०००/- | - | ४८,०००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ४ | २,४००/- | - | २,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | १८ | १,९००/- | - | १,९००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२२ | २,६३,७००/- | - | २,६३,७००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ४,६००/- | - | ४,६००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ० | ३,६००/- | - | ३,६००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ७१ | १,०२,०००/- | - | १,०२,०००/- |
| | **एकुण** | २६२ | ४,२१,६००/- | - | ४,२१,६००/- |
| | **एकुण अ+ब** | **३,७२९** | **२,३३,८७,४२८/-** | **१,६९,८१,१२८/-** | **६४,०६,३००/-** |

**गोषवारा**

| अ.नं. | महिना | श्री साईबाबा हॉस्पिटल | श्री साईनाथ रुग्णालय | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | **एप्रिल २०१७** | ७५,९६,१३१/- | ५,२०,३३०/- | ८१,१६,४६१/- |
| २ | **मे २०१७** | ९९,७८,२२१/- | ४,६२,१००/- | १,०४,४०,३२१/- |
| ३ | **जुन २०१७** | ६८,७८,८८७/- | ५,५९,४००/- | ७४,३८,२८७/- |
| ४ | **जुलै २०१७** | ८७,५२,२७८/- | ४,३१,६००/- | ९१,८३,८७८/- |
| ५ | **ऑगस्ट २०१७** | ८३,४०,३२०/- | ४,६७,५००/- | ८८,०७,८२०/- |
| ६ | **सप्टेंबर २०१७** | ८०,४७,४८९/- | ५,५३,९००/- | ८६,०१,३८९/- |
| ७ | **ऑक्टोबर २०१७** | ६१,१३,६५२/- | ३,७७,७००/- | ६४,९१,३५२/- |
| ८ | **फेब्रुवारी २०१८** | **५९,८४,७००/-** | ४,२१,६००/- | **६४,०६,३००/-** |
| | **एकुण** | **६,१६,९१,६७८/-** | **३७,९४,१३०/-** | **६,५४,८५,८०८/-** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१७ ते ऑक्टोबर २०१७ व फेब्रुवारी २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या रु.६,५४,८५,८०८/-सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१७ ते ऑक्टोबर २०१७ व फेब्रुवारी २०१८ या महिन्यांमध्ये वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या रु.६,५४,८५,८०८/- मात्रचे सवलतीस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४१ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये न्युरोसर्जन पदावर व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेबाबत डॉ.मयुर विलास म्हात्रे यांचे दि.२३.०१.२०१८ रोजीचे अर्जाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ तदतुद-** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे

पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शती क्र ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्तअ नं ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-**

१) दि. ०३/०६/२००६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३२८ (२).

कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | Doctors Charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note:1. Anaesthist's share-30% of the Surgeon's Charges 2. Assistant Surgeon 10% of the Surgeon's Charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५०% हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५% हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

२) दि. २२/०९/२००७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ७७०.

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

**३) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७५(५).**

संस्थान रूग्णालयामध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊनत्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान करण्यात आले.

4) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८०६.

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डॉ म्हात्रे यांचे गैरवर्तन, वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करणे, त्यांचे बाबत डॉक्टर, सिस्टर इनचार्ज, स्टाफनर्स यांच्याकडून आलेल्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी, त्यांचा पुर्व इतिहास, संस्थान व रूग्णालय प्रशासनाविषयी गैरसमज निर्माण करणे इत्यादी बाबींचा विचार करता तसेच त्यांचेमुळे भविष्यात रूग्णालयात अडचणी निर्माण होवु नये याकरीता डॉ मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन व्हिजीटींग यांची सध्याची मोफत

सेवेची व्हिजीट बंद करणेत यावी, असे ठरले तसेच रूग्णालयाकडील ज्या डॉक्टर्स/ कर्मचा-यांची खातेचौकशी चालू आहेत त्या लवकरात-लवकर पुर्ण कराव्यात, अशा सुचना देण्यात आल्या.

५) मा व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४९३.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी याचा विचार करून तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपुर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन / प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावा.

याचबरोबर संस्थान रूग्णालये चालविणेसाठी कन्सल्टंन्सी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्ताविक-** डॉ मयुर म्हात्रे यांचा दि. २३/०१/२०१८ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

I, Dr Mayur Vilas Mhatre, Neurosurgeon had worked as full time Consultant Neurosurgeon at Shree Saibaba Hospital from 2013 to 2016. I belive in Saibaba's principles and want to work towards mankind. I am eager to join Superspeciality hospital at Shirdi as Honorary (Visiting) Neurosurgeon. I would be coming for 2 days for out patient department, in patient department and various Neuro-surgical procedures in every week. I would like to contribute in providing health care to patients through Baba's blessings.

डॉ मयुर म्हात्रे यांची माहिती व मंजुर आकृतीबंधानुसार सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

पुर्ण नाव- डॉ मयुर विलास म्हात्रे

पत्ता- तिसरा मजला, प्रियंका प्लाजा सेक्टर ४, सानपाडा नवी मुंबई ४००७०५.

शिक्षण- एमबीबीएस-२००३, एमएस(सर्जरी)-२००८, एमसीएच (न्युरोसर्जरी)-२०११.

न्युरोसर्जन पदासाठी मा डीन. बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता व रूग्णालयातील सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | मा डीन. बी जे मेडीकल कॉलेज यांनी संबंधीत पदासाठी प्रस्तावीत केलेली पात्रता | मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | अस्थायी (११ महिने) | |
| न्युरोसर्जन | 1) Age not more than 45 yrs. Age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS 3) MCH/DNB Neurosurgery 4) MS-CIT 5) MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०२ | ०० | ०२<br>डॉ गोडगे<br>डॉ संजेलिया | ०० |

डॉ मयुर म्हात्रे यांचा श्री साईबाबा संस्थानमधील पुर्वईतिहास खालीलप्रमाणे आहे.

डॉ मयुर म्हात्रे यांनी दि. २८/११/२०१२ रोजी न्युरोसर्जन पदावर नेमणूक मिळणेबाबत अर्ज केला होता त्यास अनुसरून निर्णय होणेचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २७/०४/२०१३ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र ४१९ नुसार डॉ म्हात्रे यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये न्युरोसर्जन पदावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेत आली होती. त्यानुसार ते दि. ०३/०६/२०१३ रोजी कामावर हजर झाले होते. तदनंतर दि. २०/०१/२०१५ रोजीचे नेमणूक आदेशान्वये दि. ०५/०५/२०१४ पासून १ वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो न्युरोसर्जन पदावर नेमणूक करणेत आली. तदनंतर दि. ०१/०३/२०१५ रोजीचे मुलाखतीस अनुसरून त्यांची दि. १४/०३/२०१५ रोजीचे नेमणूक आदेशान्वये १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी न्युरोसर्जन पदावर नेमणूक करणेत आली. डॉ म्हात्रे यांचे दि. ११/०४/२०१६ रोजीचे राजीनामा पत्रास अनुसरून त्यांचे न्युरोसर्जन

या पदाचा दि. १०/०५/२०१६ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेत आला. तदनंतर त्यांचे १४/०४/२०१६ रोजीचे अर्जास अनुसरून त्यांना दि. १८/०६/२०१६ रोजी व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेत आली होती.

डॉ म्हात्रे यांचेबाबत तक्रारी आल्याने त्यास अनुसरून खालीलप्रमाणे प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता.

डॉ मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन, सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मोफतसेवा देण्यासाठी Alternate रविवारी येत आहे. यापुर्वी ते पुर्णवेळ न्युरोसर्जन होते, त्यांनी पुर्णवेळ पदाचा राजीनामा दिलेला होता. दि. १९/०९/२०१६ रोजीच्या सकाळ या वृत्तपत्रात मोफत सेवा देणा-या डॉक्टरांना मनस्तप, शिर्डी संस्थान रूग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष, सुविधा नसलेल्या खोलीत तपासणी या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झालेली आहे. सोबत बातमीचे कात्रण परिशिष्ठ (A) म्हणुन जोडलेले आहे.

सदर बातमीचे अवलोकन केले असता व दि. १८/०९/२०१६ रोजी ऑनड्युटी असलेले अपघात विभागातील डॉ सचिन बागडे, डॉ कुणाल दळे तसेच अधिसेविका कार्यालयातील मॉर्निंग सुपर श्रीमती लिली जॉन यांनी सदर दिवशीच्या घटनेबाबतचा लेखी स्वरूपात अहवाल सादर केले असून त्यावरून सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे दिसुन येते.

अपघात विभागातील डॉ सचिन बागडे व डॉ कुणाल दळे यांचे दि. २६/०९/२०१६ रोजीच्या अहवालात म्हटले आहे की, रविवार दि. १८/०९/२०१६ रोजी सकाळी अंदाजे सकाळी १०.३० वा डॉ म्हात्रे अपघात विभागात आले व त्यांनी ब्रदर्सना व डॉक्टरांना अपघात विभागाची डॉक्टर्स रूम उघडून द्या, असे सांगितले, त्यानंतर थोड्या वेळाने श्री कुलकर्णी नामक इसम आमच्याकडे मोबाईल घेऊन आले व आम्हाला भोसले साहेबांचा फोन आहे तुम्ही फोनवर बोला असे सांगितले. आम्ही त्यावेळी पेशंट बघत असतांना तो फोन रिसिव्ह केला. मा श्री भोसले साहेबांनी आम्हाला तात्काळ डॉ म्हात्रे सरांसाठी ओपीडी रूम उघडून देण्यास सांगितले. फोन संपल्यानंतर कुलकर्णी नामक इसम आम्हाला चढे आवाजात अरेरावी करू लागले. तुम्हाला त्यांना रूम द्यायला काय झाले तुम्ही डॉक्टरांना (डॉ म्हात्रे) अशी वागणूक देता का असे म्हणाले. आम्ही दोघांनी त्यांना अतिशय शांतपणे तात्काळ ओपीडी रूम उघडून देण्याचे मान्य केले. ओपीडी नं ३ उघडून दिल्यानंतर डॉ म्हात्रे म्हणाले मला ओपीडी रूम नको मला न्युरो ओटी रूम उघडून पाहिजे. आम्ही अपघात विभागातील मामांना तात्काळ न्युरो ओटी उघडण्यास सांगितले. न्युरो ओ. टी. उघडल्यानंतर त्यांनी ओटी मध्ये सी.टी. व एमआरआय फिल्म बघता येणार नाही म्हणुन मला परत ओपीडी नं ३ उघडून द्या असे सांगितले नंतर त्यांना ओपीडी नं ३ उघडून देण्यात आली व त्यांनी तेथे पेशंट तपासले. डॉ म्हात्रे यांनी रूम उघडून देण्याच्या काळात संस्थान विषयी व वैद्यकीय संचालक विषयी रूग्ण व रूग्णांच्या नातेवाईकांना “मी येथे फ्री सेवा देत असुन सुध्दा मला ओपीडी रूम का मिळत नाही, अशी विचारणा केली” असे म्हटलेले आहे. सदर डॉक्टरांचा अहवाल सोबत परिशिष्ट (B) म्हणुन जोडलेला आहे.

तसेच अधिसेविका कार्यालयातील मॉर्निंग सुपर श्रीमती लिली जॉन्स यांनही दि २६/०९/२०१६ रोजीचे अहवालानुसार डॉ म्हात्रे यांचे म्हणण्यानुसार ओपीडी रूम उघडून दिली होती व बिलिंगमधुन केसपेपरही देण्यास सांगितले होते. त्यांचे स्टेटमेंट सोबत परिशिष्ठ (C) म्हणुन जोडलेले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता दि.१८/०९/२०१६ रोजी रविवार असल्याने डॉ म्हात्रे यांना अपघात विभागात ऑनड्युटी असलेल्या अपघात वैद्यकीय अधिकारी यांनी डॉ म्हात्रे सरांचे म्हणण्यानुसार जी प्रथम त्यांना पाहिजे होती ती अपघात विभागाचे शेजारील डॉक्टर्स रूम उघडून दिली होती, तसेच त्यांना न्युरो ओटी मधील रूम त्यांना पाहिजे असतांना ती उघडून देण्यात आली होती. तेथे एक्सरे View Box नसल्यामुळे त्यांचे म्हणण्यानुसार ओपीटी नं ३ ही उघडून देण्यात आली होती. यावरूनच डॉ म्हात्रे यांना ओपीडी देण्याचे नाकारलेले नव्हते. याबाबत संबंधितांना डॉ म्हात्रे यांनी गैरसमज करून दिलेला असावा.

डॉ मयुर म्हात्रे यांनी दि. १०/०८/२०१६ रोजीचे अर्जान्वये Alternate रविवारी रूग्णालयात ऑपरेशन थिएटर्स चालू करणेस व शस्त्रक्रिया करणेबाबत अर्ज केला होता. मात्र सर्व बाबींचा विचार करता रविवारी असलेल्या अडचणी बाबत डॉ म्हात्रे यांना समजावून सांगण्यात येऊन त्यांना दि. १९/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये रविवारी आठवडा सुट्टी असल्याने रूग्णालयातील ऑपेरेशन थिएटर बंद असतात, आठवड्यातून रविवारी ओटी चे फ्युमिगेशन करण्यात येत असते तसेच या दिवशी भुलतज्ञ ही उपलब्ध नसतात, इमर्जन्सी डॉक्टरही उपलब्ध होत नाही, इतर विभागही रविवारी बंद असतात यामुळे शस्त्रक्रीयेसाठी आवश्यक सर्व बाबींची पुर्तता करणे अडचणीचे आहे. फक्त आपणास रविवारी ओपीडी पाहता येता येईल, तसेच उपरोक्त बाबींचा विचार करता रविवार सोडून सोमवार ते शनिवार यामध्ये असलेल्या दिवशी आपणास न्युरो युनिटमधील

शस्त्रक्रीया करता येईल असे त्यांना कळविण्यात आलेले होते. सदर पत्र सोबत परिशिष्ट (D) म्हणुन जोडलेले आहे.

माञ ते दुरध्वनीवरून रविवारीच ओटी पाहिजे असलेबाबत वैद्यकीय संचालक यांचेशी हट्ट धरत होते.

डॉ संतोष सुरवसे, भुलतज्ञ यांनी दि. २३/०९/२०१६ रोजीच्या अर्जानवये नमुद कलेले आहे की, रविवार दि. ०४/०९/२०१६ रोजी इमर्जन्सी ड्युटीवर होतो त्या दिवशी साधारण सकाळी ०९.३० वा चे दरम्यान डॉ म्हात्रे यांचा फोन आला की, आपल्याला एक spine surgery करावयाची आहे. डॉ सुरवसे यांनी होकार दिल्याने त्यांनंतर १० ते १५ मिनिटांनी डॉ सुरवसे रूग्णालयात आले तोपर्यंत संबंधित रूग्ण ऑपरेशन टिएटर मध्ये आलेला होता ते बाहेर होते थोड्या वेळात डॉ म्हात्रे आले आणि त्यांनी केस कॅन्सल केली म्हणुन सांगितले. त्यानंतर केस कॅन्सल केल्याचे विचारले असता ते म्हणाले आता मुड नाही म्हणुन ऑपरेशन कॅन्सल झाले. तसेच याबाबत डॉ सुरवसे यांनी याच अर्जात डॉ म्हात्रे यांचेबाबत नमुद केलेले असून त्यांचा अर्जसोबत परिशिष्ट (E) जोडलेला आहे.

सदर रूग्णाचे ऑप्रेशन मूड नाही म्हणून अचानक रद्द केल्यामुळे रूग्णाचे नातेवाईक नाराज झाले व त्यांचे मनात रूग्णालयाविषयी गैरसमज निर्माण झाले असावेत.

तसेच डॉ म्हात्रे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुर्णवेळ कार्यरत असतांना त्यांचेबाबत येथील सिस्टर इनचार्ज व स्टाफनर्स यांचे डॉ म्हात्रे यांचे वागणुक, वर्तनाबाबत तक्रार अर्ज दिलेले आहेत ते खालीलप्रमाणे.

**अ)** न्युरो ओटी मधील सिस्टर इन्चार्ज सौ सुचिता मुठाळ व इतर ७ स्टाफ यांनी दि. १८/०७/२०१४ रोजीचे अर्जात दि. १४/०७/२०१४ रोजी सिस्टर इनचार्ज सौ मुठाळ सुट्टी होती दि. १५/०७/२०१४ रोजी मी ड्युटीवर आल्यानंतर डॉक्टर्स रूममधील कपाटाच्या एका काचेचे तुकडे तुकडे झालेले आढळले, सर्व स्टाफ, वॉर्डबॉय आया यांना विचारल्यानंतर असे समजले की, डॉ मयुर म्हात्रे यांनी स्टाफनर्स दिपाली झाल्टे यांना Hammer मागतिला, तीने विचारले असता मला पाहिजे असे सांगण्यात आले, त्यांनतर थोड्या वेळाने डॉक्टर्स रूममधील कपाटाची काच फुटल्याचा आवाज आला व सर्वकाचा जमिनीवर आढळल्या त्यानंतर दि. १५/०७/२०१४ रोजी केस संपल्यानंतर डॉ मयुर म्हात्रे यांनी मला सांगितले की, मी काच फोडली आहे व ती मी भरून देईल अशा तक्रार अर्ज सादर असून त्याची प्रत सोबत परिशिष्ट (F) म्हणुन जोडली आहे.

**ब)** दि. ०६/०५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जान्वये आयसीसीयू मधील स्टाफनर्स सौ विद्या भोसले व इतर ५ स्आफनर्स यांनी म्हटले आहे की, पेशंट पोपटराव भालके, वय २८ वर्षे, शिर्डी हा पेशंट आपल्याकडे दि. २२/०४/२०१५ रोजी जनरल वॉर्डमध्ये ॲडमिट होता. त्याचे Laminoctomy हे ऑपरेशन गोवा येथे एक महिन्यापुर्वी झाले होते.त्यांनतर दि. २६/०४/२०१५ रोजी पेशंट आयसीसीयू मध्ये त्याला हलवण्यात आले. त्यावेळेस त्याला श्वास घेण्यासाठी त्रास होत होता. दि.०२/०५/२०१५ रोजी रा ०८.३० वा डॉ म्हात्रे सर राऊंडला आले आम्ही कामात असतांना सरांनी आम्हाला भालके पेशंटजवळ बोलविण्यात आले त्यावेळी तेथे ऑनड्युटी आरएमओ ही उपस्थित होते पेशंटच्या उपचारासंबंधित आमच्यावर चुकीचे आवास्तव आरोप करून आम्हाला धमकवण्यात आले. उदा (नोकरीतून काढुन टाकेल, रजिस्ट्रेशन काढून टाकेल) अशा प्रकारे आरडाओरड करून आमच्या कामात अडथळा आणला. त्यानंतर पेशंटच्या नातेवाईकांना बोलवून आयसीसीयु मधील स्टाफचे काय करायचे ते करून टाका, याप्रमाणे दमदाटी सुरू केली, तसेच गावातील प्रतिष्ठीत राजकीय लोकांना (श्री कैलास बापु कोते व श्री विजु कोते) यांना बोलावून आमच्या पेशंटकडे लक्ष द्या व त्या गोष्टी सोडू द्या आमची कोणाविषयी काही तक्रार नाही असे सांगून देखील डॉ म्हात्रे सरांनी त्यांची दमदाटी चालु ठेवली. आम्ही पुर्ण ड्युटी प्रचंड मानसिक दडपणाखाली केली. दुस-या दिवशी दि. ०३/०५/२०१५ सकाळी ८ वाजता आल्यावर डॉ म्हात्रे सरांनी त्याचप्रमाणे अगोदरच्याच सारखे दमदाटी शब्दप्रयोग करून आयसीसीयू मधील कामात अडथळा निर्माण करून शंततेचा भंग केला. तसेच आम्हा सर्वांस अतिशय अश्लिल भाषेत लज्जा उत्पन्न होईल या प्रकारे शब्द प्रयोग केला, त्यांनी बोललेले वाक्य all ICCU staff should be F****D. डॉक्टरांनी अश्लिल शब्दप्रयोग करतेवेळेस रात्र पाळीचे डॉक्टर व दिवस पाळीचे डॉक्टर उपस्थित होते. त्या दिवसापासून ते आतापर्यंत दि. ०७/०५/२०१५ पर्यंत आम्ही प्रचंड मानसिक दडपणाखाली असून त्या संबंधात उचित कार्यवाही करण्यात यावी असा तक्रार अर्ज केला असून त्यांची प्रत सोबत परिशिष्ट (G) म्हणुन जोडली आहे.

**क)** तसेच वरील दि. ०६/०५/२०१५ रोजीचा सदर तक्रार अर्ज मागे घेण्यासाठी दि. ११/०५/२०१५ रोजीच्या अर्जात सदर डॉ म्हात्रे यांनी परत असे वागणुक देऊ नये, अर्वाच्च, अशोभनीय, असंस्कृतीक शब्दांचा वापर आयसीसीयू मध्ये करू नये व स्त्री जातीची त्यांनी नेहमी इज्जत करावी. तसेच अजुन असे निदर्शनास आले आहे की, पेशंटच्या नातेवाईकांना चिथावणी पुर्वक वाक्य प्रयोग करून डॉक्टर, सिस्टर, स्टाफ यांना सगळ्यांना

मारा, पोलीस स्टेशनला कंम्प्लेट करा व अजुन असे निदर्शनास आले की, आयसीसीयूच्या स्टाफला सिस्टर, डॉक्टर, आया व मामावर मला विश्वास नाही, त्यामळे तुम्ही येथेच बसून रहा, पुढे डॉक्टर म्हात्रे सर असे चिथावणी खोर भाषा, अंगावर धावून येत नातेवाईकांना बसून ठेवणे या गोष्टी करणार नाही व आम्हाला अर्वाच्या भाषेत बोलणार नाही व ती न करण्याचे आम्हाला लेखी देत असतील तरच हे आमचे पत्र मागे घेण्याचे मान्य करण्यात यावे. महत्वाचे स्त्रीयांबद्दल आदर, आई वडील बद्दल आदर या सगळ्या गोष्टी साईबाबांनी शिकवणीत सांगितले आहे. त्यामुळेच रूग्णसेवा चांगली घडत असते, पुढे मागे आम्ही अशी आशा करतो की, खास करून Ladies स्टाफला घाणेरडे उदगार, घाणेरडी भाषा यांचा प्रयोग करणार नाही असे त्यांचे लेखी निवेदन घ्यावे. पुढे भविष्यात अतिदक्षता विभागात काम करतांना ह्या भालके पेशंट संबंधातील गोष्टी वरून पुढे आम्हाला डॉक्टर म्हात्रे सर यांच्याकडून बदला म्हणुन त्रास दिला जाणार नाही याची डॉ म्हात्रे सर यांनी हमी द्यावी. सबब आम्ही पहिले दिलेले पत्र दि. ०७/०५/२०१५ वरील अटीला मान्य राहुन मागे घेण्यात येईल असा अर्ज दिला असून त्याची प्रत सोबत परिशिष्ट (H) म्हणुन जोडली आहे.

**ड)** सौ पी.एस. देव, सिस्टर इन्चार्ज व इतर ४ स्टाफनर्स यांनी दि.०६/०५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, फिमेल जनरल वॉर्डमध्ये स्टाफनर्स म्हणुन काम करतो. दि.०९/०४/२०१५ रोजी सकाळी ०८ ते ०२ या वेळेत ९ वाजेच्या दरम्यान डॉ म्हात्रे वॉर्डमध्ये राऊंडसाठी आले. त्यांच्या एका पेशंटला Fever होता. Fever check करण्यात आला होता, पेशंटला मेडीसीन ही दिले होते, cold sponging ही चालू होते. परंतु त्यांनी मला inform केले नाही म्हणुन पुर्णवॉर्ड १ ते २ तास डोक्यावर घेतला, सर्वपेशंट व नातेवाईकांसमोर मनाला येईल ते बोलले, फुकट का पेमेंट लेते हो सिर्फ चाय पिणे के लिए आते है, खाली बैठने के लिए इधर आते हो, नक्की RGNM शिकुन आल्या का, कि वशिल्याच्या भरल्या, ज्यांनी तुम्हाला कामाला लावले त्यांना घेऊन या माझ्यासमोर देखो आज तुम्हारा क्या हाल करता हू, तुम्हारे बजह मेरा पेशंट bad हो गया, आज तुम रहोगे,या मै रहूंगा असे म्हणुन दात खात हाताच्या मुठ्या पकडून आज तुम्हे नही छोडूंगा, असे न ऐकण्यासारखे व अंगाला काटा येण्यासारखे सर्व पेशंट व नातेवाईकांसमोर बोलत होते. नंतर त्या पेशंटच्या नातेवाईकांना बोलावून मैनेतो ऑपरेशन अच्छा किंया था, इन लोगों के बजह से तुम्हारा पेशंट bad हो गया, असे म्हणुन सर्व नातेवाईकांसमोर स्टाफची व हॉस्पिटलची बदनामी करण्याचा प्रयत्न केला असा तक्रार अर्ज केलेला असून त्याची प्रत सोबत परिशिष्ट (I) म्हणून जोडली आहे.

डॉ मयुर म्हात्रे यांना अडचणीमुळे रविवारी ओटी देतायेत नसल्याचे कळविल्याने त्यांनी दि. १८/०९/२०१६ रोजी जाणीवपुर्वक रूग्ण व नातेवाईकाचा गैरसमज करून दिलेला दिसून येतो. डॉ म्हात्रे यांना त्यांच्या म्हणण्यानुसार सीएमओ यांनी त्यांचे काम केले होते. त्यांना जेथे कॅबीन पाहिजे त्या उघडून दिल्या, मग गैरसमज करून देण्याची त्यांची काहीच गरज नव्हती. तसेच डॉ म्हात्रे यापूर्वीही ऑपरेशन झालेल्या रूग्णांच्या post operative केसेस पाहण्यास तयार नव्हते, त्यामुळे डॉ टिंगरे हे सुध्दा पहायला तयार होत नसत. रूग्णाला काही झाल्यास प्रशासनावर व नर्सिंग वर दोष देत असतात. त्यांना सोमवार ते शनिवार मध्ये कोणत्याही दिवशी शस्त्रक्रीया करणेचे सांगण्यात आले असता तरीही ते त्यांचे मर्जीनुसार वागत आहे. तसेच अडचणी स्वीकारून रविवारी चालू केल्यास इतरही डॉक्टर त्यांचे सोईनुसार रविवारी ओटी मागतील.

डॉ म्हात्रे यांच्या खोडसाळपणामुळे वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द करून संस्थान व रूग्णालयाची बदनामी केलेली आहे. डॉ म्हात्रे यांची वागणुक, कामकाजात अडथळे निर्माण करणे व इत्यादीमुळे त्यांचा इतर डॉक्टर वकर्मचा-यांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांचेमुळे संस्थान व रूग्णालयाचे नाव लौकीकास बाधा निर्माण होऊन पुढेही रूग्णालया बाबत अडचणी निर्माण करून शकतात. सध्या डॉ टिंगरे व्हिजीटींग न्युरोसर्जन असून ते पुर्णवेळ सारखी सेवा देत आहेत तसेच दि. १९/०९/२०१६ रोजीच्या मा व्य ससभेतील निर्णयानुसार आणखी एक डॉ गोडगे, न्युरोसर्जन म्हणुन पुर्ण वेळी स्वरूपात हजर होणार आहे.

तरी डॉ म्हात्रे यांचे वर्तन, वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करणे, त्यांचेबाबत डॉक्टर, सिस्टर इन्चार्ज स्टाफनर्स यांचे असलेले गंभर स्वरूपाची तक्रार, त्यांचा पुर्व इतिहास, संस्थान व रूग्णालय प्रशासनाची मुद्दामहुन गैरसमज करणे, इत्यादी बाबींचा विचार करता तसेच भविष्यात त्यांचेमुळे रूग्णालयात अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन डॉ म्हात्रे यांची सध्याची मोफत सेवेची व्हिजीट बंद करणेबाबत सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्तप्रमाणे**, डॉ मयुर म्हात्रे यांचेबाबतचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेत सादर केला होता. त्यावर निर्णय क्र ८०६ नुसार, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डॉ म्हात्रे यांचे गैरवर्तन, वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करणे, त्यांचे बाबत डॉक्टर, सिस्टर इनचार्ज, स्टाफनर्स यांच्याकडून आलेल्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी, त्यांचा पुर्व इतिहास, संस्थान व रूग्णालय प्रशासना विषयी गैरसमज निर्माण करणे इत्यादी

बाबींचा विचार करता तसेच त्यांचेमुळे भविष्यात रूग्णालयात अडचणी निर्माण होवु नये याकरीता डॉ मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन व्हिजीटींग यांची सध्याची मोफत सेवेची व्हिजीट बंद करणेत यावी, असे ठरले तसेच रूग्णालयाकडील ज्या डॉक्टर्स/ कर्मचा-यांची खातेचौकशी चालू आहेत त्या लवकरात-लवकर पुर्ण कराव्यात, अशा सुचना देण्यात आल्या.

उपरोक्त निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३८२/२०१६ दि. २३/०१/२०१७ चे पत्रान्वये तुम्ही देत असलेल्या व्हिजीट बंद करणेत येत आहे असे डॉ म्हात्रे यांना कळविणेत आले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये न्युरोसर्जनची दोन पदे मंजुर असुन सध्या दोन्ही पदांवर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याने डॉ मयुर विलास म्हात्रे यांचे दि.२३/०१/२०१८ रोजीचे व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन हे विनामुल्य सेवा देणार असल्यामुळे, त्यांना हॉस्पीटलच्या उपलब्धेनुसार रविवार वगळता आठवडयातून एक दिवस श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग पध्दतीने केवळ OPD साठी विनामुल्य सेवा देण्यास मान्यता देण्यात आली. परंतु त्यांना Operations साठी परवानगी देण्यात येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४२ **श्री साईबाबा संस्थान परिसरात बाहेरील रक्तपेढयांना रक्तसंकलनासाठी परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये साहय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.** – १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं .२३ निर्णय क्र. ८६९

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०२/२०१८ विषय नं .२५ निर्णय क्र. १३५

**प्रस्ताव**– श्री साईबाबा संस्थानचे मा. अध्यक्ष श्री. सुरेशजी हावरे साहेब यांनी दि. १२/०२/२०१७ रोजी घेतलेल्या रक्तपेढयांचे चर्चासत्रात समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल अॅनिमिया या सारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी, तसेच तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रकारे केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी अशी संकल्पना मांडली आहे. याकरिता श्री साईबाबा समाधी मंदीरात रोज ३६५ दिवस रक्तसंकलन केंद्र सुरु केले आहे.

यासाठी शासनाच्या परवानाकामी आवश्यक असलेले प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती संबंधीत रक्तपेढयांकडुन प्रस्तावासोबत मागवुन चार महाराष्ट्रातील रक्तपेढयांना संस्थानच्या रक्तपेढी नियमावली नुसार संस्थान परिसरात आठवडयातील एक दिवस रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देण्यात आलेली आहे. खालील नमुद केलेल्या रक्तपेढयांना मे २०१७ पासुन श्री साईबाबा समाधी मंदीर परीसरातील रक्त संकलन केंद्रात रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देणेत आलेली आहे.

१) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर
२) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद
३) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक
४) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर

उपरोक्त परवानगी देण्यात आलेल्या रक्तपेढींपैकी जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यामध्ये मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं .२३ निर्णय क्र. ८६९ अन्वये मान्यता रद्द करणेत आली आहे. वरील रक्तपेढयांप्रमाणेच महाराष्ट्रातील इतर ही नामांकीत १९ रक्तपेढयांनी श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये रक्तदान शिबीर घेणे बाबत नव्याने प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.नं. | रक्तपेढयांचे नाव | अर्ज | एफडीए लायसन्स | एसबीटीसी सर्टीफिकेट | दर पत्रक | ऑडीट रिपोर्ट | थॅलेसेमिया अहवाल | शासना मार्फत अनुदान | ब्लड कलेक्शन व्हॅन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अष्टविनायक रक्तपेढी, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०२ | जनकल्याण रक्तपेढी, जालना | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०३ | हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ठाकरे ट्रोमा केअर मुन्सीपल हॉस्पीटल ब्लँड बँक, मुंबई | | | | | | | | |
| ०४ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट ब्लँड बँक, लोणी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०५ | मालेगाव ब्लँड बँक, मालेगाव | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०६ | नाशिक ब्लँड बँक अॅण्ड ट्रान्सफ्युजन रिसर्च इन्सटीटयुट, नाशिक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०७ | बीड ब्लँड बँक, बीड | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०८ | जीवन ब्लँड बँक, नाशिक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | सादर केले नाही | ✓ | सादर केले नाही | ✓ |
| ०९ | अर्पण व्होलंटरी ब्लँड बँक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १० | साई ब्लँड स्टोरेज सेंटर, राहाता | ✓ | ✓ | ✓ | सादर केले नाही | सादर केले नाही | सादर केले नाही | ✓ | × |
| ११ | औरंगाबाद ब्लँड बँक, औरंगाबाद | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १२ | इंडीयन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | सादर केले नाही | सादर केले नाही | ✓ |
| १३ | आनंदऋषिजी ब्लँड बँक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १४ | लायन्स ब्लँड बँक, औरंगाबाद | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १५ | संजीवनी ब्लँड बँक, कोपरगाव | ✓ | ✓ | ✓ | ✓ | सादर केले नाही | ✓ | ✓ | × |
| १६ | महात्मा गांधी ब्लँड बँक, औरंगाबाद | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १७ | डॉ हेडगेवार रक्तपेढी, अकोला | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| १८ | गव्हरमेंट मेडीकल कॉलेज, जळगाव | ✓ | सादर केले नाही | सादर केले नाही | सादर केले नाही | सादर केले नाही | सादर केले नाही | सादर केले नाही | × |
| १९ | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |

<u>**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-**</u> उपरोक्त रक्तपेढयांपैकी संस्थान रक्तपेढी नियमावली प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता (रक्तसंकलन करणेकामी परवानगी बाबतचा अर्ज, एफडीए लायसन्स, एसबीटीसी सर्टिफिकेट, थॅलेसेमिया अहवाल, मागील वर्षांचे ऑडीट रिपोर्ट, दर आकारणी पत्र, शासना मार्फत थॅलेसेमिया रुग्णांकरीता मिळणारे अनुदाना बाबत माहिती) करणेकामी वरील रक्तपेढयांशी संपर्क साधुन कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्यापैकी खालील रक्तपेढयांनी श्री साईनाथ रुग्णालयाच्या, प्रशासकीय कार्यालयाकडे त्यांची कागदपत्रे जमा केलेली आहेत.

१) अष्टविनायक रक्तपेढी, अहमदनगर
२) जनकल्याण रक्तपेढी, जालना
३) हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रोमा केअर मुन्सीपल हॉस्पीटल ब्लँड बँक, मुंबई
४) प्रवरा मेडीकल ट्रस्ट ब्लँड बँक, लोणी
५) मालेगाव ब्लँड बँक, मालेगाव
६) नाशिक ब्लँड बँक अॅण्ड ट्रान्सफ्युजन रिसर्च इन्सटीटयुट, नाशिक
७) बीड ब्लँड बँक, बीड
८) अर्पण व्होलंटरी ब्लँड बँक, अहमदनगर
९) औरंगाबाद ब्लँड बँक, औरंगाबाद
१०) आनंदऋषिजी ब्लँड बँक, अहमदनगर

११) लायन्स ब्लॅड बॅक, औरंगाबाद
१२) महात्मा गांधी ब्लॅड बॅक, औरंगाबाद
१३) डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर

रक्तदान शिबीर घेणेकामी उपरोक्त कागदपत्रांची पुर्तता केलेल्या रक्तपेढयांपैकी काही रक्तपेढयांकडे ब्लड कलेक्शन व्हॅन असुन ब्लड कलेक्शन व्हॅनमुळे रक्तदान शिबीर घेणे सोपे झाले आहे. सदर रक्तपेढयां ठिकठिकाणी जाऊन सदरहु ब्लड कलेक्शन व्हॅनमध्ये रक्तसंकलन करीत आहेत. उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव सादर केलेल्या रक्तपेढयांपैकी खालील रक्तपेढयांकडे ब्लड कलेक्शन व्हॅन उपलब्ध आहे.

१) हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रोमा केअर मुन्सीपल हॉस्पीटल ब्लॅड बॅक, मुंबई
२) नाशिक ब्लॅड बॅक ॲण्ड ट्रान्सफ्युजन रिसर्च इन्सटीटयुट, नाशिक
३) अर्पण व्होलंटरी ब्लॅड बॅक, अहमदनगर
४) आनंदऋषिजी ब्लॅड बॅक, अहमदनगर
५) महात्मा गांधी ब्लॅड बॅक, औरंगाबाद

**विभागाचे मत / अभिप्राय** – १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं .२३ निर्णय क्र. ८६९ अनव्ये समिती सदस्यांमार्फत रक्तसंकलनासाठी परवानगी द्यावयाच्या सर्व रक्तपेढयांचे Due Diligence करुन घेण्यात यावे व Due Diligence करुन ज्या रक्तपेढया सर्व कागदपत्रांची पुर्तता करतीन व सेवाभावी वृत्तीने रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देतील, अशा रक्तपेढयांनाच संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलनासाठी परवानगी देण्यात यावी, असे ठरले.

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०२/२०१८ विषय नं .२५ निर्णय क्र. १३५ अनव्ये संस्थान परिसरामध्ये रक्तदात्यांचा व रक्तसंकलन करणेसाठी मागणी करण्यासाठी येणा-या अर्जांचा प्रतिसाद पहाता, संस्थान निवासस्थाने, साईप्रसादालय परिसर व १६ गुंठे परिसर अशा, साईभक्तांच्या वरदळीच्या ठिकाणी फिरते रक्तसंकलन करणा-या रक्तपेढयांना, रक्तसंकलनासाठी परवानगी देणेत यावी असे ठरले.

पान क्रं.२ वर उल्लेखित केलेल्या १३ रक्तपेढयांनी कागदपत्रांची सर्व पुर्तता केलेली आहे.अशा रक्तपेढयांना श्री साईबाबा समाधी मंदीर रक्तसंकलन केंद्र व संस्थान परिसर अशा ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे रक्तदान शिबीर घेणेस परवानगी देता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त अ.नं. क्र. ०१ व ०२ ठराव निर्णया अन्वये १३ रक्तपेढयांनी संस्थान नियमानुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे. अशा रक्तपेढयांची Due Diligence करण्यात आलेले आहे. तसेच ज्या रक्तपेढयांकडे ब्लॅड कलेक्शन व्हॅन आहे अशांना श्री साईमंदीर परिसर लगत १६ गुंठे परिसर, साईप्रसादालय परिसर, संस्थान निवासस्थाने अशा ठिकाणी परवानगी देता येईल. व उर्वरीत रक्तपेढयांना साईआश्रम – १ येथे स्थित असलेल्या फस्ट एड रुममध्ये आठवडयातील एक वार निश्चिती करुन रक्तदान शिबीर घेणेस परवानगी देता येईल. असे नम्र मत आहे.

सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित १३ रक्तपेढयांनी संस्थान नियमानुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांचे Due Diligence करण्यात आलेले आहे. याकरीता उपरोक्त १३ रक्तपेढयांमधील ज्या रक्तपेढयांकडे ब्लॅड कलेक्शन व्हॅन आहे अशांना श्री साईमंदीर परिसर लगत १६ गुंठे परिसर, साईप्रसादालय परिसर, संस्थान निवासस्थाने अशा ठिकाणी व उर्वरीत रक्तपेढयांना साईआश्रम– १ येथील फस्ट एड रुममध्ये आठवडयातील एक वार निश्चित करुन रक्त संकलीस करणेस परवानगी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.४३ **संस्थान परिसरात जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांना रक्त संकलीत करणेकामी परवानगी मिळणेबाबतचे विनंती अर्जावर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र** – मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ रोजीचे विषय नं. २३ निर्णय क्र. ८६९

**प्रास्ताविक-** उपरोक्त विषयांन्वये श्री साईबाबा संस्थानचे मा. अध्यक्ष श्री. सुरेशजी हावरे साहेब यांनी दि.१२/०२/२०१७ रोजी घेतलेल्या रक्तपेढयांचे चर्चासत्रात समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या सारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी, तसेच तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रकारे केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी अशी संकल्पना मांडली आहे. याकरिता श्री साईबाबा समाधी मंदीरात रोज ३६५ दिवस रक्तसंकलन केंद्र सुरु केले आहे.

यासाठी शासनाच्या परवानाकामी आवश्यक असलेले प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती संबंधीत रक्तपेढयांकडुन प्रस्तावासोबत मागवुन चार महाराष्ट्रातील रक्तपेढयांना संस्थानच्या रक्तपेढी नियमावली नुसार संस्थान परिसरात आठवडयातील एक दिवस रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देण्यात आलेली आहे. खालील नमुद केलेल्या रक्तपेढयांना मे २०१७ पासुन श्री साईबाबा समाधी मंदीर परीसरातील रक्त संकलन केंद्रात रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देणेत आलेली आहे.

१) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर
२) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद
३) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक
४) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर

उपरोक्त परवानगी देण्यात आलेल्या रक्तपेढींपैकी जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर या रुग्णालयामध्ये गैरप्रकार होत असल्याचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिले असुन, नुसार मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं.२३ निर्णय क्र. ८६९ अन्वये जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांची मान्यता रद्द करणेत आली आहे. सदर रद्द करणेबाबतचा प्रस्ताव दि. १२/०१/२०१८ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केला असता. "प्रस्ताव Government ला पाठवा" असे निर्देशीत करणेत आले आहे.

तथापी, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांनी दि. १४/०२/२०१८ रोजीच्या पत्राने पुन्हा सदर रक्तदान शिबीरामध्ये त्यांना सहभागी करण्यात यावी असे विनंती केलेली असुन, माहे मे २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर येथे एकुण ३५५७ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आलेले असुन त्यापैकी ११३० रक्तपिशव्यांचे रक्तघटक विलगीकरण करण्यात आलेले आहे त्यामधून ३६१९ रक्तपिशव्या ह्या मोफत वितरीत केल्या असुन केवळ ३७१ रक्तपिशव्या ह्या सहशुल्क वितरीत केल्या आहेत.

दि. १९ मे २०१७ पासुन ०५ जानेवारी २०१८ पर्यंत शिर्डी संस्थान येथे आयोजीत रक्तदान शिबीरामध्ये एकुण ११७३ रक्तपिशव्यांचे संकलन केलेले आहे, असे त्यांच्या पत्रात नमुद केलेले आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान** - मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं .२३ निर्णय क्र. ८६९ अन्वये जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांची मान्यता रद्द करणेत आली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांचे श्री साईबाबा संस्थान रुग्णालयास नेहमी सहकार्य लाभते. तसेच संस्थानच्या रुग्णालयाचे सोनोग्राफी, रक्तपेढी, बॉम्बे पब्लीक ॲक्ट ट्रस्ट, इ. चे सर्टिफिकेट नुतनीकरण तथा परवाना देणेकामी जिल्हा रुग्णालयामार्फत कार्यवाही करण्यात येते. तसेच कुंभमेळा व समाधी शताब्दी वर्षात आवश्यकतेनुसार डॉक्टर्स व इतर स्टाफ पुरविण्यात येते.

तरी जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांना संस्थान परिसरात रक्तदान शिबीरात परवानगी देणे बाबत योग्य ते निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर यांचेबरोबरच जिल्हा रक्तपेढी, नाशिक यांनाही श्री साईमंदीर परिसर लगत १६ गुंठे परिसर, साईप्रसादालय परिसर, संस्थान निवासस्थाने या ठिकाणी रक्तसंकलन करणेसाठी परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१ मधील (त्रिकोण) दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे.**

**प्रस्ताव-** मा. अध्यक्ष महोदय यांनीमौजै शिर्डी येथील सर्व्हे नं.१ मधील (त्रिकोण) दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे बाबतचे प्रकरण अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेने संबंधीत १०१ दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेत येऊन प्रश्न कायमस्वरुपी सोडवावयाचा आहे, त्यामुळे मा. अध्यक्ष साहेब यांनी सदर विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेबाबतचे निर्देश दिले असल्याचे त्यांचे स्विय सहाय्यक यांनी दि.३१/३/२०१८, रोजी दुरध्वनीवरुन कळविले आहे.

सय्यद रतनभाई सय्यद (मयत) यांचे वारसदार मोहम्मद सय्यदभाई सय्यद व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली, येथे एस.एल.पी.नं.२८५९६-२८५९७ /२०१७, महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्ददाखल केले आहे.

प्रस्तुत एस.एल.पी. हे मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री उत्तमराव रंभाजी शेळके, यांनी, ९ मी. रुंदीचा पालखी रस्ता तयार करणेकामी, स.नं. १ मधील १०१ दुकानदारांचे अतिक्रमण काढणेबाबत रिट पिटीशन नं.७८/२००४, दाखल केले होते, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०५/०७/२००५ रोजी शिर्डी नगरपंचायतीस स.नं. १ मधील अतिक्रमण दुर करणेबाबत आदेश केला होता, सदर आदेशानुसार कार्यवाही न झाल्याने श्री उत्तमराव रं. शेळके यांनी कन्टेम्प्ट पिटीशन नं.२५८/२०१७, दाखल केले होते, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २६/०९/२०१७ रोजी स.नं. १ मधील अतिक्रमण दुर करणेबाबत आदेश केला होता, सदर आदेशाचे विरुध्द रिट पिटीशन नं.११९४९/२०१७, हे सय्यद रतनभाई सय्यद यांनी शिर्डी नगरपंचायत शिर्डी व इतर यांचे विरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, येथे दाखल केले होते.

रिट पिटीशन नं.११९४९/२०१७, मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१३/१०/२०१७, रोजी दि.२६/०९/२०१७ रोजीचा आदेश कायम ठेवून श्री साई मंदिराजवळील स.नं. १ मधील दुकानदारांचे अतिक्रमण काढणेबाबत आदेश केलेला आहे, सदर आदेशाचे नाराजीने सय्यद रतनभाई सय्यद (मयत) यांचे वारसदार मोहम्मद सय्यदभाई सय्यद व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एस.एल.पी. नं. २८५९६-२८५९७ /२०१७ महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केले आहे.

परंतू मौजे शिर्डी येथील मोफत स.नं. १ मधील ३० गुंठे जागेबाबत, मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली, यांचे कोर्टातील, एस.एल.पी.नं.२७९८८/२०१०, २८३५८/२०१०, २९६८३-८५/२०१० व त्यामधील सिव्हील अपील नं.१४०१६/२०१५, १४०१७/२०१५, ३१५४/२०११, ३१५५ -३१५७ /२०११, ३१५८/२०११ दाखल होते, त्यामध्ये, दि.२२/०२/२०१६, रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश करुन प्रकरण निकाली काढले असून,सदर १०१ दुकानदारांना पर्यायी योग्य जागा किंवा नुकसान भरपाईची रक्कम दोन्ही पैकी एक कार्यवाही निकालाच्या तारखे पासून ६ आठवड्याचे आत (०४ एप्रिल २०१६ पुर्वी), करावीअसा आदेश केलेला आहे.

**मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशातील पॅरा नं. ६२ खालील प्रमाणे आहे.**

62. In this precipitable eventuality, a realistic balance of theattendant exigencies is the clarion call of justice. As advertedto hereinabove, even on the date of the conclusion of thearguments, this Court had desired to be informed by the Stateabout the availability of alternative sites of land toaccommodate the appellants. Inspite of assurances given, byits learned counsel, no information has been provided. In thispremise, having regard to the ensuing consequences qua theappellants, we consider it appropriate to direct, to start with,the State and its functionaries to undertake an exercise toidentify a suitable site to accommodate the appellants. Wemake it clear that even if such a site is not available in theimmediate proximity of the land presently in their occupation, asincere endeavour would be made to locate a plot as near aspossible thereto. The District Administration in coordinationwith the Sansthan and other authorities, as deemed necessaryin law, would undertake the process. The appellants would alsocooperate in the pursuit and would not delay the completionthereof.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर, दुकानदारांना पर्यायी जागा दाखविण्यासाठी, दि.०५/०३/२०१६, दि.०९/०३/२०१६ व दि.१३/०३/२०१६, रोजी, मा.उपविभागीय अधिकारी व मा.जिल्हाधिकारी, यांनी बैठका आयोजीत करुन दुकानदारांसोबत खालील जागांची प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे.

१) सेवाधाम इमारत, (सी.टी.एस.नं.११९) २) साईनाथ छाया इमारत, (सी.टी.एस.नं.७७७)
३) खुलेनाट्य गृह (सी.टी.एस.नं. ९३) ४) केशव मंदिर स.नं. (स.नं.४/२१)

५) साईउद्यान इमारत (सर्व्हे नं. ४/३) ६) जुने साई प्रसादालय व परिसर (सर्व्हे नं. २/४)
७) सुलभ शौचालय-जुनेप्रसादालय(स.नं.३/१) ८) जनरल टॉयलेट ब्लॉक्स् (स.नं.३/७)

या जागांची प्रत्यक्ष पहाणी केल्यानंतर दुकानदारांच्या प्रतिनिधींनी सुचवीलेल्यापर्यायी जागांपैकी, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशातील उपरोक्त परिच्छेद क्र.६२, मध्ये निर्देशीत केल्यानुसार, दुकानदारांना देण्यासाठी पर्यायी योग्य मोकळी जागा द्याव्यात (alternative sites of land) असे नमुद केले आहे. तथापी दुकानदारांनी सुचविलेल्या संस्थानच्या जागांवरती इमारती असून, त्यांचा वापर भक्तांसाठीच्या सोयी सुविधांसाठी होत आहे. म्हणजेच सदर जागा मोकळ्या नाहीत. तसेच सदर जागांवरती भक्तांच्या सोयीसाठी काही प्रकल्प प्रस्तावीत आहेत, म्हणजेच दुकानदारांनी मागणी केलेल्या जागा संस्थानला आवश्यक आहेत, त्यामुळे दुकानदारांच्या मागणी प्रमाणे त्यांना जागा देता येणार नाही, याबाबत उपस्थीत दुकानदारांना सांगण्यात आलेले आहे, दुकानदारांना जागा देता येत नसल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधीत दुकानदारांना द्यावयाची देय रक्कम, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, येथे जमा करणे न्यायोचीत होईल असे मत झाले व त्यानुसार, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार, ५०% रक्कम शासनाने व ५०% रक्कम संस्थानने अदा करावयाची होती, त्यानुसार शासनाच्या हिश्याची ५०% रक्कम रु.८/- कोटी डि.डि. नं.७०५५४६ दि.२९/०३/२०१६, व संस्थानच्या हिश्याची ५०% रक्कम रु.८/- कोटी डि.डि. नं.७०५५४७, दि.२९/०३/२०१६, ने मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ, येथे जमा केली आहे, सदरची रक्कम दि. ४ एप्रिल, २०१६, पुर्वी (मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ आठवड्याचे आत) जमा करण्यात आलेली आहे.

त्यानंतर संस्थानचे वतीने जागा उपलब्ध करुन देता येत नसल्याबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना जा.क्र. एसएसएस/ मालमत्ता/ ६८८४/२०१६, दि.१४/०३/२०१६ ने मा. कार्यकारी अधिकारी साहेब व मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय शिर्डी यांचे सहीने तसेच पुन्हा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना जा.क्र. एसएसएस/ वशी- विधी/६५६९/२०१६, दि.३१/०३/२०१६ ने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे सहीने कळविले आहे.

तसेच प्रस्तुत अतिक्रमीत दुकानदारांना संस्थानचे वतीने जागा उपलब्ध करुन देता येत नसल्याबाबत पुर्वीच दि.१८/०१/२०११, चे शपथपत्र एस.एल.पी.नं.२९६८३-८५/२०१०,मधील आय.ए. मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतआयत्या वेळचा विषय नं. २८ व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्यावेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**निर्णय क्र.** ४४७ आजचे सभेत गेट नं. ४ चे समोरच्या सर्व्हे नं. १ मधील दुकानदारांनी सभेसमोर येऊन, दि. ५/०४/२०१६ रोजी मा.ना. मुख्यमंत्री श्री देवंद्रजी फडणवीस साहेब, मा. श्री अनिलजी कवडे साहेब (जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य त्रिसदस्य समिती), श्री कुंदनकुमार सोनवणे, (उपविभागीय अधिकारी, शिर्डी तथा कार्यकारी अधिकारी) व दुकानदार प्रतिनिधी यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी होणेबाबतचे निवेदन समिती सभेस दिले.

या निवेदनावर सविस्तर चर्चा होऊन, दि. ५/४/२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व निवेदनामधील मुद्यांच्या अनुषंगाने या दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी, या दुकानदारांनी मागणी केलेल्या जागेची पहाणी करुन, महसुल विभागासोबत चर्चा करावी. तसेच याबाबतच्या सर्व कायदेशीर बाजु व मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश याचा सर्वांगीन अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, असे मा. कार्यकारी अधिकारी यांनी मत प्रदर्शित केले.

परंतू सर्व्हे नं. १ मधील दुकानदार अतिक्रमीत झालेले असून त्यांचे पुनर्वसन करणेसाठी या दुकानदारांना त्यांनी मागणी केलेली जागा देण्यात यावी व दुकानदारांनी सर्व्हे नं. १ मधील अतिक्रमण हटवावे असे समिति सदस्यांनी मत मांडले त्यास मान्यता देण्यात आली, तसेच दुकानांसाठी आवश्यक असणा-या परवानग्या सदरहू दुकानदारांनी प्राप्त करुन घ्याव्यात, असे त्यांना कळविणेत यावे. याचबरोबर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानदारांना नुकसान भरपाई देणेकामी मा. उच्च न्यायालयामध्ये जमा केलेली संस्थानची रक्कम परत घेणेसाठी कायदेशीर कार्यवाही सुरु करणेत यावी, परंतू त्यापुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे.

प्रस्तुतचे निर्णयाबाबत पुन्हा मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेत दि.२३/०५/२०१७ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करतांना निर्णय क्र. ४५९ ४४७ (५) अन्वये वरिल निर्णयाचे शेवटी "परंतू त्यापुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले." असे नमुद करण्यात आले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय होणेपुर्वीच्या परिस्थीतीचा विचार करता मा. व्यवस्थापन समितीने दि.२३/०५/२०१७ व १५/०६/२०१७ रोजी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे शक्य नसल्याने सदर निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ च्या कलम २८ (१) अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांना जा.क्र. एसएसएस वशी विधी/ ७००३/२०१८ दि. २९/०३/२०१८ रोजीचे पत्राने पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे.

तसेच मा.सर्वोच्च न्यायालयातील एस एल पी नं.२८५९६/२०१७, २८५९७/२०१७, मध्ये संस्थानचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहीने जागा उपलब्ध करुन देता येत नसल्याबाबतचे दि.३०/०३/२०१८ रोजीचे शपथपत्र मा.कोर्टात दाखल केले आहे, सदर एस.एल.पी. मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ आहे.

निर्णयार्थ सादर.

**सदर विषयावरील चर्चेच्या वेळी, मा.अध्यक्ष महोदय यांना संबंधीत दुकानदारांनी दि.२२.०३.२०१८ रोजी सादर केलेले निवेदन त्यांनी समितीसमोर मांडले.**

**या निवेदनात दुकानदारांनी पुढीलप्रमाणे पर्याय सुचविले आहेत.**

**प्रस्ताव क्र.१- सेवाधाम इमारत**

मा.महोदय सदरील सेवाधाम इमारत ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे मालकीची असून सदर इमारत ही मोडकळीस आल्याने व राहण्यास योग्य नसल्याकारणामुळे गेल्या ५ ते ७ वर्षापासून तिचा वापर होत नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था हे सदरील इमारत पाडून नवीन बांधकाम करण्याचे मनस्थितीत असल्यामुळे सदरील इमारतीच्या तळमजल्यावर अर्जदार ४५ दुकानदारांची दुकाने बसवून वरील मजल्यावर संस्थानचे ऑफीस, गेस्टरुम,भक्तनिवास इ.वापरासाठी होवू शकेल. सदर इमारतीचे क्षेत्र हे ७ गुंठे आहे.

**प्रस्ताव क्र.२- मोफत सर्वे क्र.१ (त्रिकोण)**

मा.महोदय, सदरील मोफत सर्व्हे क्र.१ ही जागा ३० गुंठे क्षेत्र असून सदरील जागा ही मे.महाराष्ट्र शासन महसूल विभागा यांचे मालकीची असून सदरील ठिकाणी हे सर्व ४५ दुकानदारांची दुकाने ५० वर्षापासून आजपावेतो व्यवसाय चालू आहेत सदरील ठिकाणी पुर्वी आरक्षण कुर.१३ अे व १३ बी बगीचा व दुकान केंद्र असे होते. नवीन २०१७ डी पी नुसार सदरील ठिकाणी आरक्षण क्र.७ बगीचा दर्शविले आहे. सदरील ठिकाणचे बगीचा आरक्षण रद्द करुन दुकानदारांची सदरील आरक्षणास हरकती घेतल्या असून सुनावणीमध्ये ही आरक्षण रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

सदरील त्रिकोणातील जागा ही नगर मनमाड रोड लगत असल्याने रोडच्या मध्यापासून ३७ मी.अंतर सोडून तसेच त्रिकोणाच्या पूर्व बाजूस ९ मी. प्रस्तावीत पालखी रस्ता तसेच त्रिकोणाच्या उत्तरेकडील १२ मी.प्रस्तावीत रस्ता नवीन डी.पी.नुसार आहे. वरील दोन नवे रस्ते त्रिकोणातून जावून सुध्दा आणि नगर मनमाड रस्त्याचे मध्यापासून ३७ मी.अंतर सोडून ही त्रिकोणाची ३० गुंठे क्षेत्रापैकी ५ ते ६ गुंठे जागा शिल्लक राहते. सदरील त्रिकोणाच्या जागेतही अर्जदार यांची पर्यायी जागा देवून व्यवस्था होवू शकते. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनाही सदरील इमारतीचे वरील मजले त्यांच्या कामात येतील. त्याकामी महाराष्ट्र शासनाने सदरील ठिकाणचे बगीचाचे आरक्षण रद्द करुन दुकान केंद्र असा फेरबदल नगरविकास विभागाकडून करुन द्यावा तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना तिस गुंठे क्षेत्रासाठी लागणारा नजराणा महसूल विभागाकडे भरावा व जागा संस्थानचे मालकीची करावी तसेच अर्जदार ४५ दुकानदारांनी तळमजल्यासाठी लागणारा सर्व खर्च स्वत: सोसावा व दुकानदारांनी आपली दुकाने वारसा हक्काने चालवावी.

तसेच शिर्डी व राहाता शहराकरीता मे. महाराष्ट्र शासनाचे शिर्डी राहाता बायपास रोड तयार केलेला असून तो फेब्रुवारी २०१८ पासून वाहतुकीस खुला केलेला असल्याने शिर्डी व राहाता नगरपालीका नगरपंचायत हद्दीतून जाणारा नगर मनमाड रोड हा डी क्लासीफिकेशन होवून तो नगरपालीका अगर नगरपंचायत यांचेकडे वर्ग होणारा आहे. तसेच मे.महाराष्ट्र शासनाने सदरील मोफत स.नं.१ ची जागा दुकानदार व संस्थान यांना उपलब्ध

करुन दिल्यास मे.महाराष्ट्र शासन, श्री साईबाबा संस्थान आणि अर्जदार ४५ दुकानदार यांचा प्रदिर्घ असा न्यायालयीन वाद संपुष्टात येईल व श्री साईबाबा संस्थानची कुठेही जागा येणार नाही.

**प्रस्ताव क्र.३- गेट क्र.३ जवळील १६ गुंठे जागा (जुने आरक्षण क्र.१०)**

सदरील ठिकाणी २००४ साली नगरपंचायत शिर्डीने एम आर टी पी ॲक्ट सेक्शन ३७ नुसार सदरील ठिकाणी असलेले बगीचाचे आरक्षण रद्द करुन १२ मी.रुंदीचा दक्षिणोत्तर रस्ता व त्याच्या पुर्व व पश्चिम बाजूस दुकानदारांसाठी टपरी पुनर्वसन असा फेरबदल केला होता. सदरील फेरबदलाचा अध्यादेश मे.महाराष्ट्र शासन यांचे नगरविकास विभागाचे सचिव यांनी दि.२४ ऑगस्ट २००४ रोजी मंजूर केलेला आहे.सदरील ठिकाणीही अर्जदार ४५ दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध आहे.

**प्रस्ताव क्र.४- जुने प्रसादालयाची जागा (सर्वे नं.२ ची जुना पिंपळवाडी रोड लगतची बाजू)**

शिर्डी येथील सर्व्हे क्र.२ ही जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे मालकीची असून तिचे क्षेत्रफळ साडेपाच एकर असून श्री साईबाबा संस्थान यांनी जुने प्रसादालय पाडून त्याठिकाणी भक्तांसाठी अत्याधुनिक अशी दर्शन रांगेची इमारत उभी करणार असून सदरील इमारतीचे दक्षिण बाजुस म्हणजेच जुना पिंपळवाडी रोडलगत ही मोठया प्रमाणावर जागा उपलबध असून सदरील ठिकाणीही अर्जदार ४५ दुकानदारांची दुकाने होवू शकतील.

**यावेळी दुकानदारांनी सुचविलेल्या पर्याय क्र.१,३ व ४ या ठिकाणी संस्थानचे विविध प्रकल्प सुरु/ प्रस्तावित असल्यामुळे ते मान्य करता येणार नाही. तसेच मोफत सर्व्हे नं.१ ही जागा महसूल विभागाची असल्याने या जागेबाबत समितीने निर्णय घेणे योग्य होणार नाही, असे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस सांगितले.**

**निर्णय क्र.२६७** **सदर विषयावर चर्चा होऊन, दुकानदारांनी सुचविलेल्या पर्याय क्र.१,३ व ४ या ठिकाणी संस्थानचे विविध प्रकल्प सुरु/ प्रस्तावित असल्यामुळे उपरोक्त पर्याय क्र.१,३ व ४ अमान्य करणेत आले.**

**पर्याय क्र.२ हा महसूल व नगरविकास विभागांशी संबंधीत असल्याने पर्याय क्र.२ ला मान्यता देण्यात आली. त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे नियमानुसार शिल्लक राहणाऱ्या ५ ते ६ गुंठे जागेमध्ये तळमजल्यावर प्रस्तावित ४५ दुकानदारांचे पुनर्वसन करणेत यावे, यासाठी तळमजला बांधकामाचा सर्व खर्च दुकानदारांनी सहन करावा. त्यासाठी याबाबतच्या सर्व मंजूऱ्या दुकानदारांनी मिळवाव्यात. तसेच त्यावरील दोन मजले संस्थान वापरासाठी ठेवण्यात यावे. सदर जमिनीचा नजराणा खर्च साईबाबा संस्थान व दुकानदारांनी समप्रमाणात करावा. त्याचप्रमाणे यासंदर्भात कोर्टात सामोपचाराने निर्णय करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र क्र.सासंवि-१०१७/१८४३/प्र.क्र.२००/का.१६, दि.०७/०२/२०१८ च्या अनुषंगाने श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर, रा.शिर्डी यांचे मालकीचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथील जमीन गट नं.१४३/अ/१ (जुना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर या जमीन क्षेत्राची योग्यता संस्थानसाठी या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे किंवा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता याबाबत संस्थानचे व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद**– संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव**– शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र क्रं. सासंवि-१०१७/१८४३/प्र.क्र.२००/का.१६ दि.०७/०२/२०१८ च्या अनुषंगाने श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांचे मालकीची मौजे कनकुरी, ता.राहाता येथील जमीन गट नं.१४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर या जमीन क्षेत्राची योग्यता, संस्थानसाठी या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे वा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता याबाबत संस्थानचे व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणेबाबत..

**प्रस्तावना-** श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील जमीन गट नं.१४३/ अ/१ (जूना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर आकार रु.५=२५ ही जमीन श्री साईबाबा संस्थानला कायमस्वरुपी खरेदी देणेकामीच्या प्रकरणी १) यापूर्वी त्रिसदस्यीय समिती अस्तित्वात असल्याने उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन

क्रं.१२३१५/ २०१४ चे दाखल करण्यात आले होते. त्यात मौजे शिर्डी येथील संस्थानसाठी आरक्षित असलेली जमीन स.नं.२०३/१ पै. व २०३/२ पै.आणि स.नं.२१२/२ पै. व २१२/३ या जमीनी खरेदीकामी आणि मौजे कनकुरी येथील सदर गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५ हेक्टर ही जमीन संस्थान मालकीची असलेली जमीन गट नं.१३४ ला सलग असलेचे नमूद केलेले होते. त्यामुळे मे.उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ रोजी सदर सिव्हील ॲप्लिकेशन मान्य केले आहे व त्यातील Clause B मधील विनंतीप्रमाणे मौजे कनकुरी येथील गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५० आर हे संबंधीत दुय्यम निबंधक यांचेकडून बाजारमूल्य ठरवून घेवून त्याप्रमाणे उक्त क्षेत्र खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि चौकशीअंती सदरचे क्षेत्र संस्थानच्या जमीनीलगत नसलेचे निदर्शनास आलेले आहे. निदर्शनास आल्यानंतर अर्जदार यांनी कागदपत्रात दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्यात पोटहिस्सा फाळणीमुळे सदर जमीनीचा गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. परिणामी संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ ला सदर क्षेत्र सलग येत नाही.

२) उक्त जमीनीच्या लगतच्या चारही बाजूंस असलेल्या जमीनीच्या शासनाचे सन २०१६-१७ चे रेडी रेकनरचे अवलोकन केले असता त्यात प्रस्तुतची जमीन विभाग क्रं.९ बिनशेती झालेल्या जमीनी या झोनमध्ये दर्शविलेली असून इतर जमीनी विभाग क्रं.६ जिरायत जमीनी यात दर्शविलेल्या आहेत. परिणामी उक्त जमीनीचा दर प्रति चौमी रु.३,६७०/- इतका दर्शविला असून आजूबाजूच्या जमीनींचा दर प्रति हेक्टरी रु.२१,६३,३००/- (प्रति चौमी रु.२१६/-) इतका दर्शविलेला आहे. तथापि उक्त जमीन ही शेतजमीन आहे.

सन २०१६-१७ चे रेडी रेकनर दराप्रमाणे सदर जमीनीची एकूण किंमत रक्कम रु.५,५६,००,५००/- (अक्षरी रु.पाच कोटी छप्पन्न लाख पाचशे मात्र) अशी होत आहे.

३) यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीनी खरेदी संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीच्या सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.४२ अन्वये प्रस्तावित जमीनीचा वापर कशासाठी होवू शकतो,संस्थान मिळकतीशेजारी यापैकी कोणत्या जमीनी आहेत, (उपयोगिता व सलगता तपासणे), रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दराने जमीनी मिळणार आहे काय याप्रमाणे प्राधान्यक्रम करणेबाबतचा

निर्णय झालेला आहे. तथापि याबाबतची कार्यपध्दती निश्चित झालेली नसलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे बाकी आहे.

४) सदर अर्जाप्रमाणे सध्यस्थितीत संस्थानकडे, संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामीचे १० प्रस्ताव प्राप्त झालेले असून आरक्षणा व्यतिरिक्त इतर जमीनी खरेदी देणेबाबतचे सुमारे ३७ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. जमीनींच्याखरेदीबाबत वेळोवेळी जमीनी खरेदी करणे हा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत जमीन खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेनंतर प्रत्येक वेळी शासनाचे विधी व न्याय विभागाची परवानगी घ्यावी लागेल इ. बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीच्या सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे. यावर निर्णय क्रं.७५८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, "उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दर तक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व सध्यस्थितीत जमीनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमीनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमीनीच्या दराप्रमाणे खरेदी करणेस हरकत नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमीनीच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत यावा," असे ठरले.

तथापि तद्नंतर सदरचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेचे इतिवृत्त दि.२५/०९/२०१७ रोजीच्या बैठकीत वाचून कायम करतेवेळी निर्णय क्रं.७९२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय करण्यात आलेला आहे.

**निर्णय क्रं.७९२-** दि.०८/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरवण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येवून, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(४) निर्णय क्रं.७५८- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दर तक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि, सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व

सध्यस्थितीत जमीनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमीनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमीनीच्या दराप्रमाणे खरेदी करण्यास हरकत नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमीनीच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन त्रिसदस्य समितीच्या दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६३० अन्वये प्रस्तावित जमीनी खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या त्रिसदस्य समितीच्या निर्णयास अधीन राहून श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांच्या मालकीची मौजे कनकुरी,ता.राहाता येथील गट नं.१४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) शेतजमीन क्षेत्र १.५१.५० आर खरेदी करण्यात यावी,असे ठरले. आजच्या सभेत अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर, रा.शिर्डी व इतर उपस्थित होते. त्यांनी सन २०१७ मधील रेडी रेकनरप्रमाणे जमीनीची किंमत मिळावी, अशी विनंती केली. परंतु सदरहू जमीन खरेदी करावयास मान्यता मिळाली, त्या वेळेसच्या शासकीय दराने सदरहू जमीनीची खरेदी करणेत यावी,असे समितीचे मत झाले, त्यास अर्जदार यांनी संमती दिली. तसेच याकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३९०९/२०१७ दि.२६/१०/२०१७ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस अहवाल सादर करणेत आलेला आहे.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील क्रं.सासंवि-१०१७/ १८४३/ प्र.क्र.२००/ का.१६ दि.०७/०२/२०१८ अन्वये “उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की गट नं.१४३/अ/१,शेतजमीन क्षेत्र १.५१.५० आर या श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या जमीन क्षेत्राची योग्यता,संस्थानसाठी या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे वा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता याबाबत आपले तसेच श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे अभिप्राय तात्काळ या विभागास उपलब्ध करुन देण्यात यावेत” असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुतकामी उपरोक्त प्रस्तावात मुद्देसूद अहवाल सादर करणेत आलेला आहे. प्रस्तुत जमीनीचे ७/१२ उतारे,जमीनीचा मोजणी नकाशा, गावचा नकाशा इ.कागदपत्रांचे अवलोकन केले असता वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) “मौजे कनकुरी,ता.राहाता येथील उक्त जमीन गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर ची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ४०० मीटर व पूर्व पश्चिम रुंदी ४० मीटर अशी आहे. सदर जमीनीची उपअधिक्षक,भूमी अभिलेख, राहाता यांनी दि.१२/०३/२०१६ रोजी मोजणी केलेली असून सदर मोजणी नकाशावरुन बिन स्केली स्थळदर्शक नकाशा (लोकेशन प्लॅन) तयार करुन यासोबत सादर केलेला आहे. सदर प्रस्तावित क्षेत्राचे पश्चिमेकडेस मुळ मालकांचे क्षेत्र आहे व त्यात मुळ मालकांच्या दोन विहीरी आहेत.

२) शासनाचे रेडी रेकनरप्रमाणे सदर क्षेत्राचे व त्यालगत असलेल्या जमीनींचे वर्षवार दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | वर्ष | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मालकीचे उपरोक्त जमीनीचे प्रति चौमी.दर | सदर क्षेत्रालगत गाव नकाशात दर्शविलेल्या जमीनी गट नं.१३०,१३१,१३२, १३४,१३६,१३८, १३९, १४४ व १४५ चे प्रति हेक्टरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४ | रु.२,९८०/- | -- |
| ०२ | सन २०१५ | रु.३,४००/- | रु.२०,०३,१००/- (i.e.प्रति चौमी.रु.२००/-) |
| ०३ | सन २०१६-१७ | रु.३,६७०/- | रु.२१,६३,३००/- (i.e.प्रति चौमी रु.२१६/-) |
| ०४ | सन २०१७-१८ | रु.३,८५०/- | रु.२७,०४,१००/- (i.e.प्रति चौमी रु.२७०/-) |

३) सदरची जमीन ही शेतजमीन आहे.

४) चौकशीअंती सदरचे क्षेत्र संस्थानच्या जमीनीलगत नसलेचे निदर्शनास आलेले आहे. निदर्शनास आल्यानंतर अर्जदार यांनी कागदपत्रात दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्यात पोटहिस्सा फाळणीमुळे सदर जमीनीचा गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. परिणामी संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ ला सदर क्षेत्र सलग येत नाही.

मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त दि.०७/०२/२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विषयांकित जमीन क्षेत्राची योग्यता, संस्थानची या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे किंवा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता या उपस्थित मुद्यांवर मा.व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित जमीनीचे क्षेत्र योग्य असून भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची राहील. विषयांकीत जमीन व लगतचे जमीनींचे शासनाचे दरसुचीनुसार प्र.चौ.मी. दर पुढीलप्रमाणे असून,**

| अ.नं. | वर्ष | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मालकीचे उपरोक्त जमीनीचे प्रति चौमी.दर | सदर क्षेत्रालगत गाव नकाशात दर्शविलेल्या जमीनी गट नं.१३०,१३१,१३२, १३४,१३६,१३८, १३९, १४४ व १४५ चे प्रति हेक्टरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४ | रु.२,९८०/- | -- |
| ०२ | सन २०१५ | रु.३,४००/- | रु.२०,०३,१००/- (i.e.प्रति चौमी.रु.२००/-) |
| ०३ | सन २०१६-१७ | रु.३,६७०/- | रु.२१,६३,३००/- (i.e.प्रति चौमी रु.२१६/-) |
| ०४ | सन २०१७-१८ | रु.३,८५०/- | रु.२७,०४,१००/- (i.e.प्रति चौमी रु.२७०/-) |

**किंमतीबाबत उपरोक्त दरांची वस्तुस्थिती पाहून शासनाने किंमत ठरवावी, असा समितीचा अभिप्राय शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थानमधील महत्वाचे चालु व प्रस्तावीत असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती अहवाल.**

**निर्णय क्र.२६९** आजचे सभेमध्ये संस्थानमधील चालु व प्रस्तावित असलेल्या उपरोक्त महत्वाच्या प्रकल्पांच्या सद्यस्थितीची माहिती घेऊन, त्याचा आढावा घेण्यात आला. त्यामधील LED Wall Screen खरेदी संदर्भात दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८२ अन्वये LED Wall Screen देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या बसविणेत याव्यात व त्या स्क्रीनवर सौजन्य म्हणून सदरहू साईभक्तांना जाहिरात करणेसाठी एक स्ट्रीप ठेवणेस परवानगी देण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत सदरहू LED Wall Screen वर जाहिराती दाखविण्यात येऊ नये, असे ठरले होते. परंतु आजतागायत LED Wall Screen देणगी स्वरुपात मिळालेली नसल्याने प्रथम ५ नग LED Wall Screen विहीत पध्दतीने खरेदी करणेस मंजूरी देण्यात आली व त्याची उपयुक्तता पाहून भविष्यामध्ये उर्वरित LED Wall Screen खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात यईल. तसेच त्यानुशंगाने इतर प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करणेबाबत सुचना करण्यात आल्या व सर्व प्रकल्पांची दर आठवडयाची सद्यथिती अद्ययावत करुन सर्व समिती सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम/ सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शिर्डी नगरपंचायत मालकिच्या शिर्डी हद्दीत नगरपंचायत मालकीचे स.नं. १०३ पै. मध्ये इनडोर गेम हॉल, ऑडीटोरीअम, स्विमिंगपूल विकसीत करणेसाठी रु.१२,०८,८३,६७४/- अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१(२) (दोन) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**प्रस्तावना**:- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक २७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. शिर्डी नगरपंचायत हद्दीमध्ये नगरपंचायत मालकीचे सर्व्हे नं.१०३ पै. मध्ये मंजूर रेखांकनात ॲमिनीटी स्पेस (सुविधा क्षेत्र) क्षेत्र ४१.३३ आर. व ओपन स्पेस (खुला भुखंड) क्षेत्र- ३२.४५ आर व ८.८८ आर क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. सदर जागेचा ७/१२ उता-यावर नगरपंचायतीची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. नगरपंचायत मालकीच्या या जागेमध्ये शिर्डी शहरात येणा-या साईभक्तांना व येथील स्थानिक नागरीकांना अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोणतून योगा हॉल, बॅडमिन्टन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, अत्याधुनिक चेस व कॅरम हॉल या क्रीडा सुविधांनी सुसज्ज असे अद्यावत इनडोअर गेम स्टेडीअम तसेच यामध्ये ७०० नागरीक बसू शकतील असे ऑडीटोरीअम यासह खुल्या भुखंडामध्ये स्विमींगपुल व गार्डन

विकासीत करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीचे नियोजन आहे. सदर प्रस्तावित कामाचे नगरपंचायत द्वारे आराखडे व खालीलप्रमाणे ब्लॉक इस्टीमेट तयार करण्यात आलेले आहेत.

१. योगा हॉल, बॅडमिन्टन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, अत्याधुनिक चेस व कॅरम हॉल या क्रिडा सुविधांनी सुसज्ज असे अद्यावत इनडोर गेम स्टेडीअम तसेच यामध्ये ७०० नागरीक बसु शकतील असे ऑडीटोरीअम:-रु.८,९६,१०,८४६/-

२. स्विमिंगपूल व गार्डन :-रु.३,१२,७२,८२८/-

**कामाची एकुण किंमत :- रु.१२,०८,८३,६७४/-**

सदरच्या कामासाठी लागणारा खर्च अंदाजीत रक्कम रु.१२,०८,८३,६७४/- इतका असून, नगरपंचायतीस सदर निधी उभारणे शक्य होणार नाही. सबब याकामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून निधी अनुदान स्वरुपात उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदरची सुविधा कामे पुर्ण झालेनंतर येथील साईभक्तांना त्याचा लाभ घेता येणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून सदरच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर याकामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन तांत्रीक मंजूरीसह आपणाकडे सादर करण्यात येतील. तरी प्रस्तावित कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार रक्कम रु.१२,०८,८३,६७४/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.”

**प्रस्ताव:-** शिर्डी नगरपंचायतीचे उपरोक्त प्रस्तावानुसार रु.१२,०८,८३,६७४/- मात्र इतके अनुदान देणेकामी सदरचे प्रस्तावावर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **साईसृष्टी, प्लॅनेटोरियम, म्युझीयम व बॉटनिकल गार्डनसह साई नॉलेज पार्क प्रकल्पास मान्यतेसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणे तसेच शासन मंजूरीनंतर “Design, Build, Finance, Operation & Transfer (DBFOT)” तत्वावर ई निविदा मागविणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : खालील प्रमाणे आहे.

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) -पोटकलम(२)खंड(ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम(१)खंड(झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. दिनांक ०९/०३/२०१७ निर्णय क्र.२१७
२. दिनांक ०२/०२/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७७ ब ०१
३. दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२

प्रस्तावना:- मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील एकूण २०.०६ एकर क्षेत्रातील प्रस्तावीत साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझीयम (Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदिप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ ३६८३२०१७ दि.०९/१०/२०१७ रोजी नेमणूक पत्र दिलेले आहे. सल्लागार यांनी प्रकल्पाचे 3D सादरीकरण करणे, Walk through DPR सादरीकरण करणे, प्रकल्पाचे नाव साईसृष्टी ऐवजी साई नॉलेज पार्क असे करणे इत्यांदिबाबत दि.०८/०१/२०१८ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार वरील बाबींचा अंतर्भाव करुन दि.१८/०१/२०१८ च्या आत मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची मुंबई येथे किंवा दि.१९/०१/२०१८ रोजी शिर्डी येथे येऊन सादरीकरण करणेबाबत सल्लागार यांना इकडील दि.१२/०१/२०१८ रोजीचे पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानुसार त्यांनी मा.अध्यक्ष महोदय यांची मुंबई येथे भेट घेतली. मात्र उपरोक्त कागदपत्रे (प्रकल्पाचे 3D सादरीकरण, Walk through, DPR, Draft e-tender)

सादर केले नसल्याने याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७७ ब ०१ चे अनुषंगाने सल्लागार संदिप शिक्रे, मुंबई यांना दि.१४/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये दि.१७/०२/२०१८ पर्यंत सदरहू पुर्तता करणेबाबत कळविणेत आले होते. परंतू त्यांनी सदरची पुर्तता केली नाही. याबाबत दि. १७/०२/२०१८ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी सल्लागार यांनी अद्याप पुर्तता केली नसल्याने त्यांना पत्र (Termination Notice) देणेबाबत सूचना दिल्या.

सदर कामाचे ई-प्रस्तावामध्ये पान नं.४३ आर्टिकल क्र.६मधील अट ६.६ नुसार सल्लागार संदिप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना दि.२१/०२/२०१८ अन्वये Termination Notice देणेत आली होती. मात्र सल्लागार यांचे प्रतिनिधींनी दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेत सादरीकरण केले असल्याने उपरोक्त नोटीस रद्द करणेस व सल्लागार श्री. संदिप शिक्रे यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे समक्ष उपस्थित राहून दि.२७/०३/२०१८ रोजी सादरीकरण करणेस दि.१६/०३/२०१८ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता देण्यात आली.

त्यानुसार सल्लागार यांनी दि.२७/०३/२०१८ रोजी सविस्तर सादरीकरण केले. सदरचे सादरीकरणाचे वेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सल्लागार यांनी दि.०२/०४/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे प्रकल्पाचे Synopsis (सारांश/रुपरेषा) सादर केलेली आहे. त्यात प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ट आहेत. अ) बांधकाम क्षेत्रफळ

| | | |
|---|---|---|
| १. | साईसृष्टी – बांधकाम क्षेत्र | ४६६०.०० चौ.मिटर |
| २. | साईप्लॅनेटोरीयम- | ३९९४.०० चौ.मि. |
| ३. | साई म्यूझियम- | २३७६.०० चौ.मि. |
| ४. | बॉटनिकल गार्डन- | |
| ५. | एंन्ट्रन्स ब्लॉक- | ७०६.९५ चौ.मि. |
| ६. | मेडीटेशन, योगा व लायब्ररी ब्लॉक- | ७०६.९५ चौ.मि. |
| ७. | सॅनिटेशन ब्लॉक- | ८२७.२० चौ.मि. |
| ८. | पार्किंग ब्लॉक | ८३५०.०० चौ.मि. |

ब) कन्सेशन कालावधी- १५ वर्षे.

क) ठेकेदार यांनी संस्थानलाद्यावयाची कन्सेशन फी- प्रती वर्षी रु.१ लाख

ड) ॲडीशनल कन्सेशन फी ठेकेदार यांनी निविदा भरतांना नमुद करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रती वर्षी वाढ ही ५ टक्के करणेत येईल.

ई) तिकिट दर

| | |
|---|---|
| १. साईसृष्टी | रु.२५०/- |
| २. साईप्लॅनेटोरियम व म्यूझियम | रु.१५०/- |
| ३. कॉम्बो तिकिट | रु. ३००/- |

(साईसृष्टी, साईप्लॅनेटोरियम व म्यूझियम)

४. बॉटनीकल गार्डन रु.५०/-

५. १२ वर्षे वयाखालील मुलांसाठी ५० टक्के सुट राहील.

तसेच प्रकल्पाचे स्वरुप, बांधावयाचे इमारतींचा तपशिल, प्रारुप निविदेतील अटी शर्ती, प्राथमिक आराखडे निविदा सादरकर्त्यांचे पात्रतेचे किमान निकष, इत्यादि बाबींचा समावेश आहे.

सदरहु प्रकल्पाचा समावेश शताब्दीनिमित्त करावयाचे कृती आराखडयामध्ये आहे तसेच प्रकल्पाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१४१.०० कोटी असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार या प्रकल्पास शासन मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी सदहु प्रकल्पास येणारे अंदाजे रु.१४१.०० कोटीचे कामास शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच शासन मान्यतेनंतर “Design, Build, Finance, Operation & Transfer (DBFOT)” तत्वावर ई-निविदा मागविणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

विषय नं.०६ **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री शिवकृपानंद स्वामी यांचे समर्पण ध्यान योग शिबीर दि.२३/०४/२०१८ ते दि.३०/०४/२०१८ अखेरचे कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ई-निविदेचा तांत्रीक व वणिज्यीक लिफाफा उघडून मा.उपसमितीचे मान्यतेने कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३८ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, समर्पण ध्यानयोग शिबीरासाठी लागणा-या शेती महामंडळाचे जागेचे भाडे व स्टेज, मंडपाच्या व्यवस्थेसाठीचा रु.१५ लक्ष मात्रचा खर्च पुर्वी निर्णय झालेप्रमाणे संस्थानने सहन करावा व त्याव्यतिरिक्त येणारा उर्वरीत खर्च योग प्रभा भारती ( सेवा संस्था) ट्रस्ट, पुणे यांनी करावा, असे ठरले. "*

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत साजरे करणेत येत असल्याने, शताब्दी कालावधीत वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शताब्दी कालावधीत श्री शिवकृपानंद स्वामी यांचे ध्यान धारणा अनुभुती या विषयावर अधारित प्रवचण कार्यक्रमाचे आयोजन दि.२३/०४/२०१८ ते ३०/०४/२०१८ या कालावधीत करणेत आलेले आहे. सदरहू शिबीरासाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार १५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर शिबिर कार्यक्रमासाठी स्टेज, बैठक व्यवस्था, कार्यक्रमाचे ठिकाणी ग्राऊंडवर सर्व बाजूंनी सुशोभित कापडाचे पार्टीशन तसेच आवश्यक मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी इकडील विभागामार्फत रु.१४,३५,०००/- मात्र रकमेचे अंदाजपत्रक तयार करुन याकामी २०% कमी करुन रु.११,४८,०००/- नुसार याकामी आयटमरेट पध्दतीने ई-निविदा मागविणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.१४/०३/२०१८ ते दि.०३/०४/२०१८ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदर निविदेचा तांत्रीक लिफाफा उघडणेची ता.०५/०४/२०१८ रोजी देणेत आलेली आहेत.

**प्रस्तावः-** श्री शिवकृपानंद स्वामी यांचे समर्पण ध्यान योग शिबीर कार्यक्रमाचा कालावधी दि.२३/०४/२०१८ ते दि.३०/०४/२०१८ असा असून, सदरहू व्यवस्थेतील प्रवचन कार्यक्रम व परम पुज्य गुरु मॉ. यांचे कार्यक्रमासाठी स्टेज व रॅम्प व्यवस्था दि.१८/०४/२०१८ अखेर तसेच इतर व्यवस्था दि.२१/०४/२०१८ अखेर पूर्ण करावयाचे आहे. याकामी मंडप ठेकेदार यांना दि.१३/०४/२०१८ पर्यंत शिबीर कार्यक्रमाची जागा ताब्यात द्यावयाची आहे. तत्पुर्वी ठेकेदार यांची निवड होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राप्त होणा-या ई–निविदांचा तांत्रिक व वाणिज्यीक लिफाफा मा.खरेदी समितीचे सभेत उघडून निम्नतम दराचे ठेकेदार यांचेशी मा. उप समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करुन निम्नतम दराचे ठेकेदार यांना त्यांचे मान्यतेने कार्यादेश देणेबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री शिवकृपानंद स्वामी यांचे समर्पण ध्यान योग शिबीर दि.२३/०४/२०१८ ते दि.३०/०४/२०१८ अखेरचे कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ई-निविदेचा तांत्रीक व वणिज्यीक लिफाफा उघडून मा.उपसमितीचे मान्यतेने पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **श्री साईनाथ रुग्णालय, तिसरा मजला बांधकामाचे आर्किटेक्ट निकम पाटील असो. श्रीरामपूर यांची फी निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी

करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालय इमारतीचे बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्स्लटंट श्री.बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी केलेले आहेत. याकरीता या रुग्णालयाच्या दोन्हीही इमारतींवर बांधकाम करणेकामी बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्स्लटंट श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरले.”

**प्रस्तावना:** सर्व्हेनं.१४८ पैकी मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतींमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करणेत आलेले आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांची दिवसेंदिवस संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे, त्यामुळे मुलभुत सोयी-सुविधा फारच कमी पडत आहेत. त्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयाचे दोंन्ही इमारतींवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत नि.क्र.८८९ अन्वये ठरले. यामधे आर. सी. सी. फ्रेम्ड स्ट्रक्चरमध्ये बांधकाम, प्लास्टर, व्हेट्रीफाईड टाईल फ्लोरींगव डॅडो (उंची ७’) ॲल्युमिनिअम खिडक्या, ग्रेनाईट फ्रेमसह ॲल्युमिनिअम शटर, टॉयलेटमध्ये ग्रेनाईट फ्रेमसह पी. व्हि. सी. दरवाजे, जिप्सम प्लास्टर, आय. सी. यु. व कॉन्फरन्स हॉलसाठी फॉल्स सिलींग, जिन्याचे नुतनीकरण, आतिल भिंतीला लस्टर पेन्ट, बाहेरील बाजूने ॲपेक्स / रिनोव्हो पेन्ट इ. तसेच सध्याची सोलर सिस्टम स्थलांतरीत करून नविन मजल्यावर बसविणेचे कामाचा समावेश करणेत आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील नि.क्र.८८९ अन्वये साईनाथ रुग्णालय इमारतीचे बांधकाम नकाशे आर्किटेक्ट निकम पाटील असो. श्रीरामपूर यांचेकडून तयार करुन घेणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार आर्किटेक्ट यांना संस्थानचे जा.क्र. ५४३१ दि.२३/०१/२०१७ अन्वये सदरहु प्रकल्पासाठी विस्तृत अंदाजपत्रक व नकाशे तयार करणेसाठी तसेच त्यांचे फीचा प्रस्ताव सादर करणेसाठी कळविण्यात आले होते.

श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या कामाचे आर.सी.सी. सल्लागार श्री. मधुकर बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी प्रस्तावित तिसरा मजला बांधकामाकरीता स्ट्रक्चरल डिझाईनकरणेसाठी रु.५/- प्रती चौ. फुट या दराने तसेच साईट व्हीजीट करीता रु.३,०००/- मात्र प्रती व्हीजीटप्रमाणे फि मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८८९ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदरहू फि वर स्ट्रक्चरल डिझाईन करणे कामासाठी श्री. मधूकर बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांना दि. २३/०१/२०१७ रोजी नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८ अन्वये याकामी एकून रक्कम रू.४,५६,८५,७६७/- मात्रचे खर्चास तसेच विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०५१(०९) अन्वये श्री साईनाथ रुग्णालयांचे दोन्ही इमारतींवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणेकामी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.३,९९,९७,१६२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत आले. सदरहू कामास नगरपंचायत शिर्डी यांचेकडून दि.१६/०३/२०१८ रोजी बांधकाम परवाणगी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना दि.२०/०३/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी त्यांचे दि.१५/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरचे कामासाठी नकाशे, अंदाजपत्रक तयार करणे कामाची वेळोवेळी देखरेख करणे व ठेकेदार यांची बिले तपासणी करुन प्रमाणीत करणे. यासाठीप्रकल्प किंमतीचे (रक्कम रु.३,९९,९७,१६२/-) १% अधिक जी.एस.टी इतक्या फीची मागणी केलेली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट यांना रु.३,९९,९७२/- अधिक १८ टक्के जी.एस.टी. रु.७१,९९५/- अशी एकूण रुपये ४,७१,९६७/- मात्र फी होते.

तरी साईनाथ रुग्णालयाचे दोन्हीही इमारतींवर तिसरा मजला बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून आर्कीटेक्चरल सेवा घेणे कामासाठीची फी अंतिम करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालयाचे दोन्हीही इमारतींवर तिसरा मजला बांधकाम करणेसाठी आर्कीटेक्चरल सेवा घेणेकामी आर्किटेक्ट निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर यांना प्रकल्प किमतीवर १% + जी.एस.टी. मात्र फी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०८ **दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेकामाचे सल्लागार मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांची फी निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:** अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:**

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२०९ खालीलप्रमाणे समंत करण्यात आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रुफिंग व संस्थान वापरामध्ये असलेल्या भागाची प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. या ठिकाणी संस्थानच्या नावाचा नवीन फलक बसविणेत यावा व लिफ्ट बसविणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच कार्यकारी अधिकारी व समिती सदस्यांनी या इमारतीची पाहणी करावी, असे ठरले."*

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.४४४ खालीलप्रमाणे समंत करण्यात आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs, Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:** संस्थानचे मुंबई येथील साईनिकेतन दादर या इमारतीचे स्ट्रक्चरल दुरूस्ती करणेसाठी म्हाडा मुंबई बिल्डींग रिपेअर्स ॲण्ड् रिकन्ट्रक्शन बोर्ड तर्फे कार्यकारी अभियंता, एफ. एन. डिव्हीजन, एम.बी. आर. ॲण्ड आर. बोर्ड, मुंबई यांचे जा. नं. ई ई/ एफ एन/४००१/ ५८/२०१५ यांनी दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. सदर इमारतीचा वापर सुरु झालेनंतर तिस वर्षांनी नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून इमारत वापरासाठी योग्य/ असल्याचे प्रमाणपत्र घेवून आयुक्त, म्हाडा, मुंबई यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याचसाठी म्हाडा यांचे MBR & R बोर्डाकडे नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून साईनितेकन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत आली. त्यापैकी Barve Consultant, Chembur, Mumbai यांनी नाममात्र रु.१/- मात्र अधिक १४.५% सर्व्हिस टॅक्स इतक्या फी ची मागणी केली होती. त्यानुसार त्यांना इकडील जा. नं.६१६९/२०१६ दि.०८/०२/२०१६ अन्वये या कामासाठी कार्यादेश देणेत आला होता.

Barve Consultants, Chembur, Mumbai यांनी सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन दि.१८/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. सदरचा अहवाल मुंबई महानगरपालीका आयुक्त व कार्यकारी अभियंता, FN Divison, M.B.R.&R. Board यांना संस्थानचे जा.क्र. २१३४/२०१६, दि.३०/०७/२०१६ रोजीचे पत्राव्दारे सादर केलेला आहे.

मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी प्रोफेशनल फी पोटी प्रकल्प किमतीच्या ४% ची मागणी केली होती. दि.०३/०४/२०१८ रोजी मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी प्रोफेशनल फी बाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे कडून सुधारित फी चा प्रस्ताव घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करावा अशा सुचना दिल्या आहेत. मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी प्रोफेशनल फी पोटी दि.०३/०४/२०१८ रोजीचे ई मेल व्दारे सुधारित प्रस्ताव सादर केला असून त्यानुसार फीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ) निवीदा रक्कम रु.१६,२३,५१०/- X २.५ % = रु. ४०,५८८/-

ब) सुपरविजन चार्जेस रु. २१,०००/- प्रती महीना X ०४ महीने = रु. ६४,०००/-

-----------------------------------------------------------

एकुन रक्कम = रु.१,०४,५८८/-

तरी दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेकामाचे सल्लागार मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांची फी निश्चित करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.अध्यक्ष महोदय यांनी दादर येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेकामाचे सल्लागार मे.बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांचेबरोबर चर्चा करुन, याकामीची फी त्यांनी निश्चित करावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ **साईटेक प्रकल्प टप्पा- २ अंतर्गत संगणक प्रणालीबाबत कार्यवाही CSR अंतर्गत मोफत स्वरुपात करुन देण्याचे M/s Tata Sons Ltd. यांचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१)भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :- --

प्रास्ताविक:- M/s Tata Sons Ltd चे अध्यक्ष श्री एन.चंद्रशेखरन हे दि.१८.०३.२०१८ रोजी शिर्डी येथे साईदर्शनासाठी आले होते. सदरवेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी साईटेक प्रकल्पाविषयी संस्थानमध्ये कार्यान्वीत करणेत आलेल्या प्रणाली व सद्यस्थिती याबाबत त्यांना अवगत केले होते. यावेळी M/s Tata Sons Ltd चे अध्यक्ष यांनी प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत संगणक प्रणाली विषयीची भविष्यातील सर्व कार्यवाही त्यांचेमार्फत Corporate social responsibility (निगमीत सामाजिक दायित्व) अंतर्गत मोफत स्वरुपात करुन देणेची ईच्छा दर्शविलेली होती. त्यानुसार M/s Tata Sons Ltd यांचेमार्फतश्री रजन्ना व्ही. व त्यांचे सहकारी यांनी दि.२७.०३.२०१८ ते दि.२९.०३.२०१८ या कालावधीमध्ये शिर्डी येथे येऊन प्रकल्पाचे अनुषंगिक सर्व बाबींचे सविस्तर माहिती घेऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेबरोबर प्राथमिक चर्चा केलेली आहे. चर्चेदरम्यान सदर प्रतिनिधींनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

त्यांचेमार्फत अशा प्रकारची सेवा श्री तिरुमला देवस्थान, तिरुपती याठिकाणी गेले ४ वर्षापासुन देण्यात येत आहे. याकामी त्यांचेमार्फत एकूण १५० तांत्रिक कर्मचा-यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर प्रणालींमध्ये इतर प्रणालींबरोबरच Oracle ERPया प्रणालीचाही समावेश असून सदरची प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानने परवानगी दिल्यास “साईटेक प्रकल्प टप्पा-२” अंतर्गंतची संगणक प्रणालीबाबतची सर्व कार्यवाही उदा. Oracle ERPप्रणाली परिणामकारकरित्या पुर्णपणे कार्यान्वीत करणे, चालू असलेल्या प्रणालींमध्ये आवश्यक सुधारणा, मागणीप्रमाणे नविन प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणे, आवश्यकतेप्रमाणे कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे इ. त्यांचेमार्फत विनामुल्य स्वरुपात करणेत येईल. तसेच संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेकामी आवश्यक असलेले डेटा सेंटर, डीआर सेंटर, हार्डवेअर, नेटवर्क याबाबत त्यांचेमार्फत मार्गदर्शन तथा सल्ला देणेत येईल व कार्यान्वीत करणेत आलेल्या सदरच्या डेटा सेंटर, डीआर सेंटर, हार्डवेअर, नेटवर्क यांचे व्यवस्थापनाबाबत संस्थानला सहकार्य करणेत येईल, या सर्व कार्यवाहीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक मनुष्यबळ त्यांचेमार्फत विनामुल्य उपलब्ध करुन देणेत येईल, असे यावेळी प्राथमिक स्वरुपात कळविणेत आलेले आहे. याबाबतच्या सविस्तर प्रस्तावाचे सादरीकरण त्यांचेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी यावेळी विनंती केलेली आहे.

सद्यस्थितीत साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभाल (साईटेक प्रकल्प-१) साठी कंपनीची नेमणूक करणेकामी ई-निविदा प्रक्रिया इकडील विभागामार्फत सुरू करणेत आलेली असून,साईटेक प्रकल्प-२ साठी ई-निविदा प्रक्रिया लवकरच राबविणे प्रस्तावित आहे. साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांना देणेत आलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांचा याकामीचा कालावधी एप्रिल-२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना याकामी मुदतवाढ देणेस परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे.

“साईटेक प्रकल्प-२” प्रकल्पाअंतर्गत प्रामुख्याने पुढील आवश्यक बाबी कार्यान्वीत करणे प्रस्तावीत आहेत.

1. IT Infrastructure (Hardware & Network)

a. Procurement
b. Installation
c. CMC and necessary licenses for 5 years
d. Support for 5 years.

2. Application (Revamp, Development & Support)
    a. Enhancement in present applications
    b. Implementation of new functionalities as per requirement.
    c. Integration of various applications (Online portal, mobile app etc.) as per requirement.
    d. Implementation of Oracle ERP (Procurement, Inventory & Finance).
    e. Bug fixes.
    f. Support for 5 years.
3. Cloud enabled Database Services
    a. Design, configuration, installation and setup of Cloud site.
    b. Maintenance & support of implemented Cloud site.
4. Data Centre
    a. On premise Data Centre for critical applications.
5. Helpdesk
    a. For Sai Devotees
    b. For internal users

M/s Tata Sons Ltd यांनी प्राथमिकरित्या केलेल्या चर्चेनुसार साईटेक प्रकल्प-२ अंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या उपरोक्त बाबींपैकी Sr.No.2 बाबतची पुर्ण कार्यवाही विनामुल्य करण्याची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे. तसेच उर्वरीत Sr.No. 1,3,4,5 बाबत ते संस्थानला मार्गदर्शन करणेची व सदरच्या बाबी कार्यान्वीत झालेनंतर त्यांचे व्यवस्थापन संदर्भात कार्यवाही विनामुल्य करण्याची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे. Sr.No. 1,3,4,5 अंतर्गत खरेदीसाठी येणारा खर्च संस्थानला करावा लागणार आहे.

नमुद केलेप्रमाणे "साईटेक प्रकल्प-१" व "साईटेक प्रकल्प-२" बाबतची सद्यस्थिती व M/s Tata Sons Ltd यांनी मोफत स्वरुपात देऊ केलेल्या सेवेबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- M/s Tata Sons Ltd यांचे "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत संगणक प्रणाली (Applications) बाबतची सर्व कार्यवाही तसेच It-Infrastructure, Data Centre, Cloud based services बाबत मार्गदर्शन (Consultancy)व व्यवस्थापन (Support)बाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करून देण्याचा प्रस्ताव हा संस्थानचे फायद्याचा असल्याने सदर प्रस्ताव स्विकारणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे. सदरचा प्रस्ताव स्विकारल्यास सद्यस्थितीत राबविणेत येत असलेली साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभाल ("साईटेक-१") ई-निविदा प्रक्रिया अंतर्गतची संपुर्ण Supportव Development ची कार्यवाही तसेच प्रस्तावीत "साईटेक-२" प्रकल्पाअंतर्गतचे Software Development,Supportव Hardware, Data Centre Cloud Base Services Supportची कार्यवाही त्यांचेमार्फत करणेत येईल. सबब, साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभाल ("साईटेक-१") ई-निविदा प्रक्रिया रद्द करता येईल तसेच प्रस्तावीत "साईटेक-२" प्रकल्पाअंतर्गत त्यांचे सल्ल्यानुसार It-Infrastructure(Hardware & Network) खरेदी व Cloud Base Services ची कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे M/s Tata Sons Ltd यांचे "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत संगणक प्रणाली (Applications) बाबतची सर्व कार्यवाही तसेच It-Infrastructure, Data Centre, Cloud based services बाबत मार्गदर्शन (Consultancy) व व्यवस्थापन (Support) बाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करून देण्याचे प्रस्तावाबाबत तसेच सदर निर्णयानुसार "साईटेक-१" निविदा प्रक्रिया रद्द करणे व

"साईटेक-२" बाबत M/s Tata Sons Ltd यांचे सल्ल्यानुसार It-Infrastructure, Data Centre, Cloud based services साठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२७५** **आजचे समध्ये मे.टाटा सन्स यांचे प्रतिनिधी श्री भीमाशेखर यांनी मा.व्यवस्थापन समितीचे समोर त्यांचेमार्फत साईटेक प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास, प्रत्यक्ष शिर्डी येथे दि.२७.०३.२०१८ ते दि.२९.०३.२०१८ येऊन करणेत आलेला असल्याचे अवगत केले. त्यानुसार साईटेक प्रकल्पाबाबत त्यांचेमार्फत करणेत येणा-या प्रस्तावित कार्यवाहीचे व याकामी त्यांना संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा संदर्भातील सादरीकरण सभेसमोर केले.**

**यावर सविस्तर चर्चेअंती मे.टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली. तसेच याकामी सादरीकरणात त्यांनी मागणी केलेप्रमाणे संस्थानमार्फत त्यांना पुढीलप्रमाणे सुविधा त्याखाली नमुद केलेप्रमाणे मोफत स्वरुपात पुरविणेचे मान्य करणेत आले.**

- **श्री साईबाबा संस्थान शिर्डी ते टिसीएस, हैद्राबाद दरम्यान Minimum 4 Mbps dedicated lease link विहीत कार्यपद्धती राबवून उपलब्ध करुन देणे.**
- **त्यांचेमार्फत याकामी नेमणेत येणा-या कर्मचा-यांकरीता बैठक व्यवस्था व आवश्यक संगणके, Laptop (Quad Core, RAM 8 GB & above, i5 Processor above) उपलब्ध करुन द्यावी.**
- **याकामी नेमणेत येणा-या कर्मचा-यांसाठी ओळखपत्रपुरविण्यात यावे.**
- **कर्मचा-यांचे निवासाकरीता वातानुकूलीत खोल्या उपलब्धतेनुसार द्याव्यात.**
- **कर्मचाऱ्यांकरीता ग्रुप सिमकार्ड उपलब्ध करून द्यावे.**
- **आवश्यकतेनुसार शिर्डी अंतर्गत व शिर्डी विमानतळ येथे ये-जा करणेकरीता वाहन व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.**
- **कर्मचा-यांकरीता प्रसादालय येथे विशेष बैठक व्यवस्थेमध्ये भोजन व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.**
- **त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेसाठी त्यांचे कुटूंबासह निवासव्यवस्थेसाठी आवश्यकतेनुसार प्लॅट उपलब्ध करुन द्यावे.**
- **कॉन्फरन्स कॉल करीता दोन दुरध्वनी संच (जोडणी सह) उपलब्ध करुन द्यावे.**

**उपरोक्त सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मे.टाटा सन्स यांनी मागणी केलेप्रमाणे प्रकल्प हस्तांतरीत करणेकामी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुढील तीन महिनेकरीता (मे-२०१८ ते जुलै-२०१८) मुदतवाढ देण्यात यावी. मे.टाटा सन्स हे तात्काळ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करणार असल्याने सद्यस्थितीत राबविणेत येत असलेली "साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल (साईटेक-१)" निविदा प्रक्रिया राबविणे रद्द करणेत यावी. त्याचप्रमाणे "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत Hardware करीता मे.टाटा सन्स यांचे सल्ल्यानुसार, संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१०** **संस्थानच्या प्रसादालयासाठी आवश्यक असणारी तूरडाळ महाराष्ट्र शासनाकडून खरेदी करणेसाठी शासनाने केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१६ व १७ मार्च, २१०८ चे पत्रान्वये संस्थानच्या प्रसादालय विभागासाठी आवश्यक असणारी तूरडाळ शासनाकडून खरेदी करणेसाठी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

१. हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यात समाधानकारक पाऊस व पोषक वातावरण राहिल्यामुळे तुरीचे उत्पादन जवळपास ३-४ पटीने अधिक झालेले आहे. तुरीचे उत्पादन नेहमीपेक्षा फार मोठया प्रमाणात झाल्याने तुरीची आवक बाजारात वाढली. परिणामी तुरीचे दर केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा खाली कोसळले होते. यामुळे शेतक-यांच्या हिताकरीता केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेअंतर्गत एकुण ७६ लाख क्विंटल तुरीची खरेदी करण्यात आली आहे.

२. तुरीचे या वर्षीचे दर हे हमीभावापेक्षा कमी असल्यामुळे या वर्षीही मोठया प्रमाणात हमीभावाने तूर खरेदी करावी लागणार आहे. परंतु त्यापुर्वी मागील वर्षी हमी भावाने खरेदी करण्यात आलेल्या तुरीची, तूरडाळ करून विक्री करणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने रू.६०/- प्रति किलो या दराने मॉल्स, खाजगी सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था यांना तुरडाळ विकण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याच किंमतीत आपल्या संस्थानला देखील तुरडाळीचा पुरवठा करणे शक्य आहे. तुरडाळ १ किग्रॅ व ५० कि.ग्रॅ पॅकिंगच्या स्वरूपात मागणी केलेल्या पत्त्यावर कोणतेही वाहतूक शुल्क न लावता पुरविली जाईल. तरी आपल्या संस्थानाची तुरडाळीची मागणी लवकरात लवकर व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई यांचेकडे करावी, ही विनंती.

३. याबाबतची अधिकची माहिती आवश्यक असल्यास महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई मेल आयडी gmmktg@mahamarkfed.org फोन नं. ०२२-२३७५२२९४/ ९८ तसेच kalu.valvi@nic.in फोन नं. ०२२-२२८३०४३० यांचेशी संपर्क साधावा.

याबाबतची वस्तुथिती खालीलप्रमाणे-

संस्थानकडून साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा उपलब्ध करून देणेसाठी प्रसादालय चालविले जाते. याकामी आवश्यक असणारा किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य शासनाचे खरेदी नियमावलीनुसार ई-निविदा पध्दतीने खरेदी केले जाते. यामध्ये दर निश्चित करून महिन्याला आवश्यक असणा-या किराणामाल व साहित्याची खरेदी केली जाते. यामध्ये तूरडाळीचा समावेश असतो.

सन २०१८-१९ या वर्षासाठी भांडार विभागाकडून बिगरपॉलिश तूरडाळ १४०० क्विंटलची वार्षिक मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे तूरडाळ व इतर किराणामाल व साहित्यासाठी ई-निविदा मागविलेल्या आहेत. सदर ईनिविदांचे तांत्रिक बीड उघडले असून नमुने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

शासनाच्या सदर पत्रामध्ये तूरडाळ बिगर पॉलिश कि पॉलिश याचा उल्लेख नसल्यामुळे तसेच संस्थानच्या मासिक मागणीप्रामणे तूरडाळ संस्थानला पुरविणार अगर कसे? वगैरे सर्व माहिती घेण्यासाठी वरील दिलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधला असता श्री.हनुमंत पवार यांनी सदर शासनाची तूरडाळ ही बिगर पॉलिश व चांगल्या दर्जाची असल्याचे परंतु निवडलेली नसल्याचे सांगितले. तसेच प्लॅस्टिक गोणीमध्ये तूरडाळीचा पुरवठा केला जाईल असे त्यांनी सांगितले आहे.

तूरडाळ खराब पुरविणेत आल्यास बदलून दिली जाईल. तूरडाळ खरेदी करण्यापुर्वी त्याचे पेमेंट महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या नावाने ॲडव्हान्स आदा करावे लागेल. पेमेंट झालेनंतर ३-४ दिवसांत पुरवठा होईल, तसेच याबाबत उचित करारही करता येईल तसेच मासिक पुरवठयाबाबत नंतर कळवितो असे सांगितले आहे.

मागील वर्षी संस्थानने १२०० क्विंटल अंदाजे मागणीपोटी ११४० क्विंटल तुरडाळ खरेदी केली आहे. संस्थानची सन २०१८-१९ या वर्षाची मागणी १४०० क्विंटल आहे. सदर डाळ ई-निविदा पद्धतीने खरेदीकामी भांडार विभागाने दिनांक ०२.०२.२०१८ च्या सभेत रु.९३,९०,६२८/- मात्रचे खर्चास मान्यता घेतलेली आहे. याकामी ई-निविदाही प्राप्त झाल्या आहेत. मात्र नमुने निवडणे व कमर्शियल बीड उघडणे ही कार्यवाही प्रस्तावित आहे.

शासनाच्या उद्योग, उर्जा विभागाचे दिनांक १ डिसेंबर, २०१६ चे सुधारित खरेदी नियमपुस्तिकेनुसार संस्थानचे किराणामाल व इतर साहित्याची खरेदी करणे बंधनकारक आहे व त्याप्रमाणेच तूरडाळ खरेदीची कार्यवाही चालू आहे. तथापि महाराष्ट्र शासनाने संस्थानने शासनाकडून रु.६०/- प्रती किलो दराने तूरडाळ खरेदी करणेची विनंती केली आहे. याकामी संस्थानचे अंदाजे मागणी १४०० क्विंटलचा विचार करता अंदाजे रक्कम रु.८४,००,०००/- (रुपये चौऱ्याऐंशी लाख) मात्र खर्च येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता संस्थानने महाराष्ट्र शासनाकडून थेट तूरडाळ खरेदी करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या प्रसादालयासाठी आवश्यक असणारी तूरडाळ महाराष्ट्र शासनाकडून प्रती किलो रु.६०/- मात्र या दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. मात्र त्यापुर्वी सदर तुरडाळ वापरण्यायोग्य आहे काय? तसेच तुरडाळीचा पुरवठा टप्प्या–टप्प्याने आवश्यकतेनुसार केला जाईल काय? याबाबत व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व संस्थान अधिकारी यांनी एकत्रित प्रत्यक्ष पहाणी करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.११** **संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरुपयोगी भंगार साहित्याची विक्री/ विल्हेवाट लावणेकामी सन २०१७-२०१८ मधील निविदाधारकास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः-** महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १७(४) व कलम १४(२) (ग) नुसार संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे ठराव व निर्णय-** मागील वर्षीचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०९ प्रमाणे कार्यवाही करणे.

**मा.महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग मान्यता-** संदर्भीय १ चे पत्राने विधी व न्याय विभागाकडील संस्थानमधील दैनंदिन वापरामुळे जमा होणा-या निरूपयोगी साहित्याची वार्षिक उच्चत्तम दराने विक्री करणेसाठी मान्यता घेतलेली आहे.

**प्रस्तावीकः-** श्री साईबाबा संस्थानमध्ये दैनंदिन वापराने जमा होणारे सर्व विभागाकडील निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्याची अभिलेख कक्ष विभागामार्फत ई-निविदेतील वार्षिक उच्चत्तम दराने विक्री करणेत येत आहे. मागील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील दैनंदिन वापराने जमा झालेल्या भंगार साहित्याची विक्री करावयाची मुदत **दि.३१.०३.२०१८** रोजी संपुष्टात येत आहे.

सन-२०१८-१९ या नवीन वर्षातील भंगार साहित्य विक्रीसाठी नवीन दर बोलाविणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.९२ नुसार ई-निविदा बोलाविण्यात आलेल्या आहेत. ई-निविदा प्रक्रीयेतून नवीन दर प्राप्त होणेसाठी (मा.खरेदी समिती, मा.स्थानिक उपसमिती, मा.उपसमितीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे, तिचे इतिवृत्त) याकामी अजून कालावधी लागण्याची शक्यता आहे. या कालावधीत जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची साठवणूक करणेसाठी संस्थानचे इतर विभागांकडे बंदीस्त जागा नसलेने त्याची वेळीच विक्री/ विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे. कारण अशा प्रकारचे भंगार साहित्य साठवणूकीने सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. तसेच संबंधित विभागांना दैनंदिन काम करतांना व साईभक्तांना सोई-सुविधा देतांना अडचणी निर्माण होतात. कधी कधी बेमोसमी पावसामुळे साईप्रसादाल, लाडू निर्मिती विभागाकडील रिकामे तेलातूपाचे डबे ओले होवून गंजतात, जास्त जमा झालेने वा-याने इकडे तिकडे पडतात, कॅन्टीन, प्रकाशने, रूग्णालये लाडू निर्मिती विभागाकडील रिकामा खोकयाच्या पुठ्या, तेलकट/खराब पुठ्ठा, दुधाच्या रिकाम्या पिशव्या, औषधाचे प्लॅस्टीक ड्रम, निर्माल्य तेल, खराब बारदानसारखे साहित्य, तसेच कागदपत्रांची रद्दी वगैरे पावसाचे पाण्याने ओले झाल्यास सडतात, कुजतात. त्यामुळे त्याचे उग्र वासाने वातावरणात दुर्गंधी निर्माण होण्याची शक्यता असते.

सध्या श्री समाधी शताब्दी महोत्सव, श्रीरामनवमी उत्सव-२०१८, तसेच उन्हाळा सुटीमुळे साईभक्तांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा साहित्याची वेळीच विल्हेवाट लावणे क्रमप्राप्त आहे. संदर्भक्र.३ नुसार मागील वर्षी मा.व्यवस्थापन समिती दि.२८.०४.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.३०९ नुसार भंगार साहित्य विक्रीचे नवीन दर प्राप्त होईपर्यंत अशाप्रकारे जमा होणा-या अडगळीचे साहित्याची विक्री चालू आर्थिक वर्षातील आहे त्याचे दराने संबंधित व्यापा-यास विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. यामध्ये संस्थानचे कुठल्याही प्रकारे आर्थिक नुकसान होत नाही, त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल,असे मत आहे.

**मागणीः-**

अ) भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१८ रोजी पुर्ण होत असलेने तसेच चालू आर्थिक वर्ष सन २०१८-१९ साठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.९२ नुसार मान्यता घेवून Online ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. पुढील प्रक्रीयेतून वार्षिक उच्चत्तम दर मान्य होणेस अजून अंदाजे एक –दीड महिन्याचा कालावधी जाण्याची शक्यता असलेने, भंगार साहित्य साठवून न ठेवता प्रस्तावीक केलेप्रमाणे संस्थान कामाचा खोळंबा होवू नये, करीता अशा साहित्याची मागील वर्षी (सन २०१७-१८) मंजूर आहे त्याच दराने,चालू आर्थिक वर्षातील (सन-२०१८-१९) दर प्राप्त होईपावेतो, मागील वर्षीचे अटी व शर्तीप्रमाणे संबंधित व्यापा-यास विक्री करता कळविता येईल. तसे त्यांना मागील वर्षीचे कार्यादेशातील अट नं.२ मध्येच कळविणेत आलेले आहे. याबाबत त्यांचेकडून लेखी संमतीपत्र घेवून भंगार साहित्य उचलणेबाबत पत्राने कळविणे. तसेच संस्थानचे सर्व विभागांना त्याबाबतचा आदेश पारीत करणे.

ब) जर संबंधीत व्यापा-याने त्याचे साहित्य मागील मंजूर दराने उचलणेस असमर्थता दर्शविल्यास मागील वर्षातील मान्यताप्राप्त व्यापा-यांपैकी दुसरा कुणी व्यापारी असे साहित्य खरेदी करण्यासाठी उत्सुक असल्यास त्यांचेकडून तसे लेखी प्रतिज्ञापत्र घेवून त्या व्यापा-यास आहे त्याच मंजूर दराने व त्याच अटी-शर्तीस अधिन राहून विक्री करणेस परवानगी देणे.

**उपरोक्त "अ" व "ब" प्रमाणे भंगार साहित्य विक्री करणेकामी सन २०१७-१८ मधील निविदाधारकांस नवीन निविदा प्रक्रीया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सादर.**

निर्णय क्र.२७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरुपयोगी भंगार साहित्याची विक्री/ विल्हेवाट लावणेकामी नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सन २०१७-२०१८ मधील निविदाधारकास मुदतवाढ देणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

-----

आयत्या वेळेचा
विषय नं.१२ **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके या दि.३१.१२.२०१५ रोजी विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या होत्या. श्रीमती चव्हाणके यांचे सेवानिवृत्तीनंतर पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत ०४ सहा.शिक्षक, यांनी अर्ज केलेले होते. पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ०३ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.वाणी बाजीराव कनलाल | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक १) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | B | B+ |
| | | | | २०११-१२ | B+ | |
| | | | | २०१२-१३ | B+ | |
| | | | | २०१३-१४ | B+ | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०२. | श्री.वरघुडे गंगाधर विश्वनाथ | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक २) | बी.ए., बी.एड. डी.एस.एम. | २०१०-११ | A | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०३. | श्रीमती मिरजकर जहॉआरा शहाबुद्दीन | दि.१७.०६.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक ३) | एम.ए.बी.एड. (Phy.),एम.एड., डी.एस.एम., इंग्रजी टायपिंग ३० श.प्र.मि., MS-CIT | २०१०-११ | B+ | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |

तसेच पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०१ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.अरुण बाबुराव | दि.०१.०७.१९९६ | बी.एस्सी., | २०१०-११ | - | A+ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | घोडके | (सेवा जेष्ठता क्रमांक २२) | बी.एड. | २०११-१२ | A+ | |
| | | | | २०१२-१३ | A+ | |
| | | | | २०१३-१४ | A+ | |
| | | | | २०१४-१५ | A+ | |

श्री.अरुण बाबुराव घोडके, सहा.शिक्षक हे सध्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कार्यरत असून, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत. श्री.घोडके हे कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठतायादीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहेत.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी कामगार विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून कामगार विभागामार्फत कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

With reference to your letter dt.06/10/2015 seeking my opinion for appointment of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir I would like to invite your attention to rule No.3 (4) of MEPS Rules 1981 which provides that. In the case of girls Secondary School or Junior College of Education for women, the senior most lady teacher fulfilling the conditions laid down in clause (b) of sub rule (1) and having satisfactory record of service, shall be appointed as the Head of that school irrespective of her seniority vis-a-vis the male teachers.

Therefore in my opinion Smt.Mirajkar though she is junior to male candidate needs to be promoted on the post of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir.
If required, it is also advisable to clarify the position by visiting the office of Deputy Director of Education.

उपरोक्त अभिप्रायामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीकडे लक्ष वेधून, सदर तरतुदीनुसार श्रीमती मिरजकर यांना पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे, मात्र गरज असल्यास मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले आहे.

मात्र दरम्यानचे काळात इकडील कार्यालयाकडील दि.२४.१२.२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/३६९८/२०१५ दि.३० डिसेंबर, २०१५ चे आदेशान्वये श्रीमती जहॉंआरा शहाबुद्दीन मिरजकर यांचेकडे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी सुचित केलेनुसार इकडील कार्यालयाकडील दि.२५.०५.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.क्र.एसएसएस/वशी-०१/११४६/२०१६ दि.१०.०६.२०१६ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करुन, त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविण्यात येऊन, (कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली सहशिक्षण घेत असलेबाबत) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी सेवाज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करावी अगर जेष्ठतम महिला शिक्षिकेची नेमणूक करावी याबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमावि-२/पुवि/१५६३९/२०१६ दि.०२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम-३(४) मधील तरतुदीनुसार मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला विद्यालयाच्या बाबतीत पोटनियम-१ खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पुर्ववत असलेल्या जेष्ठतम शिक्षकेस पुरुष शिक्षकाच्या तुलनेने संबधित महिला कर्मचा-याची सेवाजेष्ठता लक्षात घेऊन शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून नियुक्ती करता येईल.*

*माध्यमिक शाळा संहिता नुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतात. उच्च माध्यमिक विभागाकडील प्राचार्यांच्या कामासाठी संबधित मुख्याध्यापकाच्या वेतनच्या ग्रेड पे मध्ये १००/- (रु.शंभर) वाढ त्यांना दिलेली असते. त्यामुळे आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कन्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी वरील सर्व नियमांच्या अधीन*

*राहुन सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठ महिलेची नियुक्ती मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून करता येईल" असे नमुद केलेले आहे.*

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदगनर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेबाबतचा विषय मा.व्य. समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ अन्वये *"श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा टिकून राहणेसाठी तेथे योग्य गुणवत्ता धारण करणारा मुख्याध्यापक असावा, असे समितीचे मत झाले, याकरिता येथील मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन गुणवत्तेच्या आधारे भरणे शक्य आहे काय, याबाबत मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा"* असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ अन्वये मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९७१/२०१६ दि.२९ ऑक्टोबर, २०१६ अन्वये अभिप्राय मिळणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, यांनी त्यांचेकडील दि.१७.११.२०१६ रोजीचे पत्रान्वये आपल्या संस्थेत माध्यमिक शाळा संहिता मधील नियम क्रमांक ६१.१ अ मधील तरतुदीनुसार पात्र उमेदवार नसेल तरच मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन भरता येईल, असा अभिप्राय दिलेला आहे.

मात्र दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.७५५ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे. "मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा, *श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबतच्या प्रस्तावामध्ये मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय नोंदविण्यात आलेला आहे. याकरिता पुन्हा मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचा अभिप्राय मागविणे आवश्यक नाही, त्यामुळे सदरहु प्रस्ताव फेरचर्चेसाठी पुढील व्यवस्थापन सभेसमोर सादर करणेत यावा" असे ठरले.*

त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत फेरसादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१८ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे. *यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३(४) मधील तरतुदीनुसार तसेच शिक्षण संचालक, पुणे विभाग यांचेशी दुरध्वनीद्वारे केलेल्या चर्चेनुसार, जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.*

मा.व्यवस्थापन समितीच दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१८ अन्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३६३२/२०१६ दि.०७ जानेवारी, २०१७ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४८००/- या वेतनश्रेणीत मुळवेतन रु.१९,०६०/- + ग्रेड पे रु.४८००/- प्रमाणे एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसह नेमणूक करण्यात आलेली आहे. श्रीमती मिरजकर यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.०६ जानेवारी, २०१८ रोजी सपलेला असल्याने, त्यांना मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, या पदावर कायम करावयाचे आहे.

मात्र श्रीमती मिरजकर यांचे कामकाजाबाबत शिक्षक, विद्यार्थीनी, ग्रामस्थ यांनी विविध तक्रारी केलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ. क्र. | श्रीमती मिरजकर यांचे विरुद्ध झालेल्या तक्रारींचा तपशिल | त्यावर झालेली कार्यवाही | झालेली शिक्षा/ निकाल |
|---|---|---|---|
| ०१. | दि.११.०७.२०१६ रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सहा.शिक्षक श्री.गंगाधार विश्वनाथ वरघुडे व श्री.सुजय आनंदराव बाबर यांनी स्वतंत्र अर्ज करुन, श्रीमती | याबाबत प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात श्रीमती मिरजकर व तक्रारदार शिक्षक यांना समक्ष बोलवून, | श्रीमती मिरजकर यांना मनमानी न करणेबाबत तोंडी समज दिलेली |

| | | | |
|---|---|---|---|
| | मिरजकर या मनमानी पद्धतीने तासिकांचे वाटप करत असलेबाबत तसेच विद्यार्थींनीचे हित न पाहाता अहितकारक निर्णय घेत असलेबाबत, तसेच स्वतःकडे अतिरिक्त कार्यभार असतांनाही स्वतःचे अध्यापनाचा कार्यभार कमी करुन घेतला, अशा प्रकारे मनमानी कारभार करुन सर्वच शिक्षकांना मानसिक त्रास देत असलेबाबत तक्रार केलेली होती. | सामंजस्याने प्रकरण मिटविण्यास सुचना दिल्या. | होती. |
| ०२. | श्री.विनोद साहेबराव ढाकणे, श्री.किरण आनंदराव बोरुडे व श्री.दिपक हिरामण शेजवळ, सर्व रा.शिर्डी यांना माहे-जुन-२०१७ मध्ये प्रत्येकी स्वतंत्र तक्रार अर्ज करुन, श्रीमती मिजरकर यांचे पती श्री.खलिल सय्यद हे शालेय प्रशासनात व इतर बाबतीत हस्तक्षेप करत असलेबाबत तक्रार केलेली होती, तसेच श्रीमती मिरजकर यांचे पती आपल्या पत्नीच्या पदाचा गैरवापर करुन संस्थान मधील भक्तांना व्हीआयपी दर्शन/ आरती उपलब्ध करुन आर्थिक लाभ उठवतात, श्रीमती मिरजकर यांना वेळोवेळी हजारो रुपये ॲडव्हान्स घेऊन, कोणत्याही प्रकारचे कोटेशन न मागविता समक्ष जाऊन खरेदी केलेली आहे, श्रीमती मिरजकर यांचे पती रोज सकाळी पचिंग मशिनजवळ बसतात, त्यामुळे महिला शिक्षिकांची कुचंबना होती, तसेच ते दिवसभर शाळेच्या परिसरातच बसून असतात, त्यामुळे मुलींना खेळण्यास कुचंबना वाटते, श्रीमती मिरजकर यांचे पती महिला शिक्षिकांशी व विद्यार्थीनींशी विनाकारण बोलण्याचा प्रयत्न करतात त्यांचेशी लगट करण्याचा प्रयत्न करतात, संस्थानची बदनामी करण्याच्या दृष्टीने शाळेची अनावश्यक माहिती सोशल मिडीयावर टाकून कर्मचा-यांच्या मनात भिती निर्माण करतात, रोजंदारी व कंत्राटी शिक्षक व इतर कर्मचारी यांचेवर दबाव आणून त्यांचेकडून आर्थिक लाभ मिळवतात व या सर्व प्रकारात श्रीमती मिरजकर या आपल्या पतीस साथ देतात वगैरे मुद्दे नमुद करुन तक्रार अर्ज केलेले होते. | याबाबत दि.२२.०७.२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात श्रीमती मिरजकर, तक्रारदार ग्रामस्थ व इतर शिक्षक यांची समक्ष सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदार यांनी श्रीमती मिरजकर यांचे पती श्री.खलील सय्यद यांनी कन्या शाळेमध्ये येऊन, शिक्षकांची मिटींग घेत असलेबाबतची व्हीडीओ क्लिप सादर केली होती. | त्यामुळे सदर सुनावणीमध्ये श्रीमती मिरजकर यांचे पती श्री.खलिल सय्यद हे दोषी आढळून आल्याने, श्रीमती मिरजकर यांना लेखी समज देऊन, त्यांचे पती श्री.खलिल सय्यद यांना यापुढे शालेय कामाकाजात हस्तक्षेप न करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| ०३. | श्रीमती मिरजकर या प्र.मुख्याध्यापिका असतांना त्यांनी माहे मे-२०१६ मध्ये दि.२०.०५.२०१६ ते २२.०५.२०१६ व दि.२४.०५.२०१६ रोजी रजा/सुट्टी उपभोगल्या होत्या व त्यानंतर दि.२८.०५.२०१६ रोजी रजा अर्ज मंजुरीसाठी सादर केला होता. | त्यामुळे तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्रीमती मिरजकर यांना समज देण्याबाबत निर्देश दिलेले होते, | त्यानुसार त्यांना समज देण्यात आलेली होती |
| ०४. | श्रीमती मिरजकर यांनी प्र.मुख्याध्यापिका म्हणून कार्यभार ताब्यात घेतल्यानंतर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाणके यांचेशी चार्ज देवाण-घेवाण करतांना जाणीवपुर्वक गैरवर्तन केले, त्यांना तास तास बसवून ठेवणे, स्वतः घरी निघून जाणे, कार्यालयातील कर्मचा-यांना जाणीवपुर्वक दुसरे काम सांगून श्रीमती चव्हाणके यांना असहकार्य केले याबाबत श्रीमती चव्हाणके यांनी दि.२५.०४.२०१६ रोजी लेखी तक्रार केलेली होती. तसेच श्रीमती मिरजकर यांचे कनिष्ठ महाविद्यालयाचा चार्ज घेतांना श्री.शिवगजे, सहा.शिक्षक यांचेशी देखील शाब्दीक वादावादी झाली होती. | त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये प्रशासनामार्फत अंतर्गत लेखापरिक्षण विभागाचे प्रमुख व एक कर्मचारी यांना सबंधीत ठिकाणी पाठवून त्यांचेमार्फत चार्ज देवाण घेवाणची प्रक्रिया पार पाडण्यात आलेली होती. | ------ |
| ०५. | इ.१० वी अ च्या सुमारे ४२ व इ.१० वी ब च्या ४९ विद्यार्थीनींनीं वेगवेगळे अर्ज करुन, श्रीमती मिरजकर मॅडम यांनी दि.२२.०९.२०१७ रोजी वर्गात येऊन, जबरदस्तीने, धमकी देऊन मुलींकडून स्वतः बद्दल चांगले लिहून घेतले. मुलींचा वेळोवेळी अपमान केला, त्यामुळे काही मुलींना शाळा सोडावी लागली, मुली बाहेर उभ्या राहिल्या तर “तुम्ही | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत त्यांना लेखी समज देण्यात आलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मुलांना पाहायला उभ्या राहिलात का" असे बोलून अपमानित करत, तसेच मी तुम्हांला ८ वी ला असतांना फार छान शिकवत होते, असे लिहिण्यास सांगितले अशा वेगवेगळया तक्रारी मुलींनी केलेल्या आहेत. | | |
| ०६. | तसेच इ.०८ वी मधील ५३ विद्यार्थ्यांनी श्रीमती मिरजकर यांच्या विरुद्ध अर्ज देऊन शाळा सुरु झाल्यापासून श्रीमती मिरजकर मॅडम यांचे आजपर्यंत इंग्रजी विषयाचे १० ते ११ तासच झालेले आहे, तसेच झालेल्या तासांमधूनही अनुक्रमणिके प्रमाणे न शिकवता कोणताही धडा व कविता केव्हांही घेण्यात येतात. त्यांनी शिकवलेले समजण्यात खुप अवघड वाटते, मॅडम आमचे म्हणणे ऐकुण घेत नाही, काही विचारावयास गेला की, तुमच्यामुळे माझा वेळ वाया गेला, तुम्हांला छोट्या छोट्या गोष्टया कळत नाही का असे बोलून रागवतात. त्यामुळे त्यांचेबद्दल आमचे मनात खुप भिती आहे. रोज तास होत नाही व ज्या दिवशी तास होतो त्या दिवशी मॅडम १००० शब्द, १०० वाक्य, १५० शब्द लिहून पाठ करणे इत्यादी अभ्यास देतात, त्यामुळे इतर विषयांचा अभ्यास करण्यास वेळच मिळत नाही मात्र मॅडम पुढच्या तास जेव्हां होईल तेव्हा अभ्यास पुर्ण नसेल तर या शाळेत मुलींची खुप गर्दी झाली, बाजार भरला, तुमचे दाखले देऊन गर्दी कमी केली जाईल असा दम देतात. मुलींची आर्थिक समस्या समजून घेत नाहीत, तसेच शाळा भरायाच्या आधी थ्रो बॉलची प्रॅक्टीस करण्यासाठी गेलेल्या मुलींची दप्तरे वर्गाबाहेर फेकुन देऊन, मुलींना तासभर वर्गाबाहेर उभे केले. तसेच माझ्या मनात आले तर तुमचा खेळाचा त्रास सुद्धा बंद करु शकते, अशा विविध तक्रारी करण्यात आलेली होत्या. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत त्यांना लेखी समज देण्यात आलेली आहे. |
| ०७. | श्री.अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी यांनी दि.१९.०९.२०१७ रोजी श्रीमती मिरजकर यांनी विद्यार्थीनीशी अयोग्य वर्तन केलेबाबत तक्रार केली होती. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत अर्जदार शिक्षक व श्रीमती मिरजकर असे दोघांनाही लेखी समज देण्यात आलेली आहे. |
| ०८. | श्री.अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी यांनी दि.२०.११.२०१७ रोजीचे तक्रार अर्जान्वये "दिवाळीच्या सुट्टीमध्ये श्रीमती मिरजकर या इ.७ वी च्या वर्गात शिकणा-या सानिया पठाण या विद्यार्थीनीच्या घरी गेल्या व तेथे त्यांनी विद्यार्थिनीच्या पालकांना सांगितले की, गायकवाड सर तुमच्या मुलीसोबत चांगले वर्तन करत नाहीत, ते तिच्याशी अयोग्य भाषेत बोलतात त्याचं व्यक्तित्व चांगल नाही. ते तुमच्या मुलीकडे वाईट नजरेने बघतात, यावर त्या मुलीला पालकांनी याबाबत विचारणा केली असता मुलींनी यामध्ये काहीही तथ्य नसल्याचे सांगितले. त्यामुळे पालकांनी श्रीमती मिरजकर यांना आम्ही तुम्ही म्हणता तस लिहून देणार नाही, यावर विनंती करुन श्रीमती मिरजकर म्हणाल्या की, तुम्हाला काय करायचे तुम्ही फक्त सही करुन द्या बाकीचे आम्ही पाहू. तुमच्या मुलीची संपुर्ण जबाबदारी आम्ही घेऊ. तुम्ही काळजी करु नका. परंतू पालक तयार झाले नाहीत व त्यांनी दिवाळी सुट्टी संपल्यानंतर झालेल्या प्रकार मला सांगितले. श्रीमती मिरजकर यांनी गलिच्छ पातळीवर उतरुन माझी बदनामी करण्याचा कट रचला होता. सुड बुद्धीने पेटलेल्या मुख्याध्यापिका जर या | याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आलेला आहे. | कार्यवाही चालु आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | थराला जाऊ शकतात तर भविष्यात पैसे देऊन मुलींकडून कट कारस्थान करु शकतात ही गोष्ट अजिबात नाकारता येणार नाही. यात शाळा व संस्थानाची बदनामी होऊ शकते, त्यामुळे श्रीमती मिरजकर यांना कडक शासन होणे गरजेचे असल्याचे" नमुद केलेले आहे. | | |
| ०९. | त्यानंतर दि.०८.१२.२०१७ रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्रित अर्ज करुन, श्रीमती मिरजकर यांनी श्री.गायकवाड सर यांच्या बद्दल सुड भावनेने पेटून अतिशय गलिच्छ पातळीवर उतरुन कट कारस्थान केले. भविष्यात श्रीमती मिरजकर यांचेकडून अशा प्रकारे सुड भावनेने इतर शिक्षकांच्या बाबतीत घडू शकते, त्यामुळे श्रीमती मिरजकर मॅडम यांचेपासून आमची सुरक्षितता व्हावी, म्हणून अर्ज केलेला आहे. | नोंद घेतली. | कार्यवाही चालु आहे. |
| १०. | जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी रिरपब्लिकन पक्ष तथा युथ रिपब्लिकन, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.१५.११.२०१७ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा कन्या विद्यालय, शिर्डी येथील मुख्याध्यापिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांनी शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे ७ नोव्हेंबरला विद्यार्थी दिवस साजरा न केल्याने त्यांचेवर गुन्हा दाखल करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच त्यांनी अर्जात श्रीमती मिरजकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केलेला आहे, असे नमुद केलेले आहे. | याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आलेला आहे. | कार्यवाही चालु आहे. |
| ११. | श्री.विश्वास दादासाहेब माघाडे, मु.पो.गोगलगाव, ता.राहाता यांनी दि.१२.०८.२०१७ रोजी अर्ज करुन, श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती जहॉआरा मिरजकर यांनी डमी विद्यार्थी बसवून एम.एड. केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करणेबाबत मागणी केलेली आहे. त्यांनी सदर तक्रार अर्जाच्या प्रती मा.सहसंचालक, म.रा., पुणे, मा.कुलगुरु, पुणे विद्यापीठ, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, म.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर, पोलीस निरिक्षक शिर्डी पोलीस स्टेशन यांना दिलेल्या आहेत. तसेच याबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये, सोशल मिडीयामध्ये बातम्या प्रसारीत झालेल्या होत्या. | त्यामुळे श्री.माघाडे यांचे तक्रार अर्जानुसार श्रीमती मिरजकर यांचेकडून त्यांचे एम.एड. बाबत माहिती घेण्यात आलेली असून, त्यांचे एम.एड. प्रमाणपत्राच्या सत्यता पडताळणीबाबत सबंधीत शिक्षण संस्थेस इकडील जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३२४४/ २०१७ दि.२० सप्टेंबर, २०१७ अन्वये पत्र पाठविण्यात आलेले आहे. | मात्र अद्याप सबंधीत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर अथवा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यांचेकडून उत्तर येणे बाकी आहे. |
| १२. | श्री.भास्कर वाघ, रा.शिर्डी यांनी दि.२२.०९.२०१७ रोजीचे तक्रार अर्जान्वये श्री साईबाबा संस्थानच्या कन्या शाळेत मुख्याध्यापिका जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांनी जंतनाशक गोळ्या वाटप न करता राष्ट्रीय कार्यात व विदृयार्थ्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने गुन्हा दाखल करणेची मागणी केलेली आहे. श्री.वाघ यांनी सदर तक्रार अर्जाच्या प्रती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य, मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर, मा.तालुका आरोग्य अधिकारी यांना दिलेल्या आहेत. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांचा लेखी खुलासा घेण्यात येऊन, त्यांच्या खुलाश्यामधील मजकुराप्रमाणे आरोग्य अधिकारी, राहाता तालुका यांना इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा / आस्था/४३१५/२०१७ दि.१७ नोव्हेंबर, २०१७ अन्वये पत्र देऊन, त्यांचे स्पष्टीकरण मागविलेले आहे. | आरोग्य अधिकारी, राहाता तालुका यांचेकडून उत्तर येणे बाकी आहे. |
| १३. | श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचे दि.०६.०७.२०१७ रोजीचे अर्जान्वये | त्यामुळे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील | मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून उत्तर |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री साईबाबा संस्थानच्या कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक करतांना सेवाज्येष्ठता डावलून कनिष्ठ शिक्षिकेला देण्यात आलेली नेमणूक रद्द करावी आणि माझ्यावर झालेला अन्याय दुर करुन माझी मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ही शाळा फक्त मुलींची/महिलांची नसून मुलामुलींची (Co-Education) शाळा असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१४-१५, २०१५-१६ व सन २०१६-१७ चे स्कुल रिपोर्ट कार्ड सादर केलेले आहे, सदर रिपोर्टकार्डमध्ये Type of School – Co-Educational असे नमुद केलेले आहे. तसेच सदरचे रिपोर्ट कार्ड हे इ.०५ ते इ.१२ वी.असे एकत्रित आहे. | मुख्याध्यापक हे पद पदोन्नतीने नेमणेबाबत जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३२१२/२०१७ दि. १८ सप्टेबर २०१७ रोजीचे पत्रान्वये मा.शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांचेकडून लेखी मार्गदर्शन व अभिप्राय मिळणेबाबत पुनश्ःच विनंती केलेली आहे, | येणे बाकी आहे. |

वरील अ.क्र.०१ ते १० मुद्दयांचे अवलोकन करता श्रीमती मिरजकर या प्र.मुख्याध्यापिका असतांना किंवा परिविक्षाधीन कालावधीमध्ये असतांना त्यांचे कार्यपद्धतीबाबत शिक्षक, विद्यार्थीनी तसेच ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रार अर्ज केलेले आहेत. त्यांचे काही तक्रार अर्जांबाबत अद्याप कार्यवाही चालु आहे. तसेच अ.क्र.११ ते १३ मधील मुद्यांचे अवलोकन करता सदर मुद्यांबाबत विविध विभागांकडून अभिप्राय येणे बाकी आहे.

त्यामुळे श्रीमती मिरजकर यांचे परिविक्षाधीन कालावधीबाबत निर्णय होणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२४.०१.२०१७ रोजी सविस्तर टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर वरिष्ठांकडून पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

कन्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावा या तरतुदीचा आधार घेत श्रीमती मिरजकर या सेवाज्येष्ठता यादीमध्ये अ.क्र.३ वर असतांनाही ज्येष्ठता डावलुन त्यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाली आहे. मात्र श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेचा दर्जा "मुलींची शाळा" असा नसून "सह-शिक्षण" असा आहे. त्यामुळे शाळा संहितेनुसार "सह-शिक्षण" दर्जा असलेल्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावी अशी तरतुद नाही. त्यामुळे श्रीमती मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन, सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करावी, तसेच ज्या तक्रारींबाबत विविध विभागांच्या अभिप्राय येणे बाकी आहे, त्या तक्रारी गंभीर स्वरुपाच्या असल्याने त्यामध्ये तथ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे तृयामुळे उत्तराची वाट पाहणे गरजेचे नाही. असे निर्देश दिलेले आहेत.

**(अ)** सबब उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता श्रीमती जहॅआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करणे संयुक्तिक राहील, असे नम्र मत आहे.

**(ब)** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुची पाहाता श्री.बाजीराव कणलाल वाणी, सहा.शिक्षक हे सेवाज्येष्ठतेमध्ये प्रथम क्रमांकावर आहेत. शासनाने दि.१३ जून, २००५ चे शासन निर्णयानुसार २००४-०५ पासून नियुक्त होणा-या मुख्याध्यापकांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "**शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम**" (डी.एस.एम.) बंधनकारक केलेला आहे. मात्र श्री.वाणी यांनी सदरचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला नाही. तसेच श्री.बाजीराव कणलाल वाणी यांचेवर सेवेत असतांना पुढीलप्रमाणे आरोप झालेले असून सद्यस्थितीमध्ये त्यांची विभागीय चौकशी सुरु आह

| अ.क्र. | श्री.बाजीराव कणलाल वाणी यांचे विरुद्ध झालेल्या तक्रारींचा तपशिल | त्यावर झालेली कार्यवाही | झालेली शिक्षा/ निकाल |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०८.०७.२००५ व दि.०१.०८.२००५ रोजी कन्या विद्या मंदिर विभागाकडील महिला शिक्षिका सौ.वैशाली नं. देशमुख यांनी श्री.वाणी हे वारंवार त्रास देत असलेबाबत तक्रारी केलेल्या आहेत. ज्यामध्ये त्यांनी वर्गाबाहेर येऊन उभे राहणे, त्यांचे मागे मागे फिरणे, शाळा सुटल्यानंतर स्टॅण्डवर त्यांचे मागे जाणे, एकटक पाहणे असे प्रकार करत | याबाबत तत्कालीन विश्वस्त डॉ.गोंदकर साहेब यांनी दोहोंनाही समजावून सांगून तक्रारीबाबत समझोता करुन विषय संपुष्टात आणला होता. त्याबाबतचा अहवाल उपलबध आहे. | प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | असलेबाबत नमुद केलेले आहे. | | |
| ०२. | श्री.वाणी यांनी प्रथम सत्र परिक्षेच्या इ.१० अ चा निकाल ठरलेल्या तारखेस दि.०३.१२.२०१६ रोजी विद्यार्थीनींना वाटप केला नाही. इ.९ वी अ च्या विज्ञान विषयाच्या मार्कांची यादी त्या वर्गशिक्षकांना न दिल्याने त्या वर्गाचाही निकाल विद्यार्थीनींना देता आला नाही. श्री.वाणी यांच्या बेजबाबदार वागण्यामुळे विद्यार्थीनींचे शैक्षणिक नुकसान होत असून या विद्यार्थीनींची एस.एस.सी. बोर्डाची परिक्षा दोन महिन्यावर आलेली असतांनाही त्यांचा विज्ञान विषयाचा अभ्यासक्रम ५०% सुद्धा शिकवून झालेला नाही. | याबाबत त्यांना नोटीस देऊन त्यांचा खुलासा घेण्यात आलेला आहे. | समज देण्यात आलेली होती. |
| ०३. | श्री.वाणी यांचेविरुद्ध महिला शिक्षिका व विद्यार्थीनींनी अनेकवेळा प्राचार्या यांचेकडे तोंडी तक्रारी केलेली आहे, तरी श्री.वाणी यांच्या या बेजबाबदार व अयोग्य वर्तणुकीमुळे शालेय वातावरण दुषित झालेले आहे. तसेच अभ्यासक्रमाबाबत वर्षा विसे व इतर ३१ विद्यार्थीनींनी अर्ज दिलेला आहे. | श्री.वाणी यांनी गंभीर गैरशिस्त वर्तन केल्याचे आढळून आल्याने, घटनेचे व शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता जा.क्र.एसएसएस/साप्रशा /वशी-७ए/ ३६४१/२०१७ दि.०९.०१.२०१७ अन्वये त्यांना तात्काळ संस्थानचे सेवेतून सेवानिलंबीत करण्यात आले होते.<br><br>तसेच सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.वाणी यांचे विरुद्ध आरोपपत्र तयार करण्यात आलेले असून श्री.ए.एम. देशमुख, नाशिक यांचेमार्फत त्यांचे विभागीय चौकशीचे कामकाज सुरु आहे.<br><br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त व अपील) विनियम २०१३ चे विनियम ४ उपकलम ५ (क) नुसार श्री.बाजीराव वाणी यांची जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/वशी-७ए/ ३२१६/ २०१७ दि.१८.११. २०१७ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर मध्ये सहा.शिक्षक या पदावर पुढील आदेश होईपावेतो पुनःस्थापना करण्यात आलेली आहे. | कार्यवाही चालु आहे. |
| ०४. | दि.०७.०१.२०१७ रोजी इ.९ वी अ च्या वर्गाचा प्रथम सत्राचा निकाल वाटप करण्यात आला. त्यावेळेस विद्यार्थिनींचे पालक निकाल घेण्यासाठी बोलावले होते. शाळेत आलेल्या पालकांनी श्री.वाणी यांच्या विषयी तक्रारी केली. पालकांपैकी श्री.ज्ञानेश्वर केशवराव गायके यांनी दि.०७.०१.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिलेला असून त्यात त्यांनी श्री.वाणी यांची मुलींशी असभ्य, अश्लील, गलीच्छ भाषा वापरतात, मुलींनी त्यांच्या विषयी तक्रा केल्यास दमदाटीचा भाषा वापरतात. पालकांना दमदाटी करतात, अशा प्रकारच्या तक्रारी केलेल्या आहेत व तक्रारींची दखल न घेतल्यास उपोषणास बसू असे कळविलेले आहे. | | |
| ०५. | इ.९ वी अ ची विद्यार्थीनी मानसी विजय पाटील हिने विज्ञान विषय शिक्षक श्री.वाणी यांचे विषयी तक्रार केलेली असून , त्यात तिने श्री वाणी हे मुलींना घाणेरडे बोलतात, प्रार्थना चालु असतांना मानसी पाटील हिस तोंडातून रक्त पडे पर्यंत माराहाण केली, दमदाटी करतात, नोकरीची गरज नाही अशा प्रकारची भाषा वापरतात अशा प्रकारची तक्रार केलेली आहे. | | |
| ०६. | श्री.वाणी हे वर्गात अश्लील शब्द वापरुन बोलल्याबाबत इ.९ वी अ च्या विद्यार्थीनी पल्लवी चव्हाण व इतर ६ यांनी दि.०९.०१.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिला आहे. | | |
| ०७. | कु.प्रियंका राऊत व इत ६ विद्यार्थीनींनी श्री.वाणी यांचे गैरवर्तनुकीसबंधी लेखी तक्रार केलेली आहे. | | |
| ०८. | इ.१० वी अ च्या विद्यार्थीनींनी श्री.वाणी हे वर्गशिक्षक असून ते विद्यार्थीनींनी विचित्र शब्द वापरतात अशी तक्रार केलेली आहे. | | |
| ०९. | प्राचार्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी श्री.वाणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांचा दि.०९.०१.२०१७ रोजी गैरवर्तन रिपोर्ट पाठविला असून, त्यात त्यानी श्री.वाणी यांनी शनिवार दि.०७.०१.२०१७ रोजी दुपारी १२.३५ वा. मा.मुख्याध्यापकांचे कार्यालयात त्यांचेविषयी तक्रार असणा-या पालकांशी वाद घातला, त्यांना धमकी दिली, असभ्य भाष वापरली, तसेच प्राचार्यांनी त्यांना समजवण्याचा प्रयत्न केल असता त्यांनाही मोडून ठेवीन तुम्ही मला शिकवू नका असा दम दिला व मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांचाही एकेरी उल्लेख करुन, त्यांना मी घाबरत नाही अशा प्रकारे गैरवर्तन केले असून, श्री.वाणी यांनी त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण केला नाही, तसेच वर्गात विद्यार्थीनींना अश्लील शब्द वापरुन बोलतात अशी मुलींची तक्रार आहे. त्यांच्या विषयी महिला शिक्षिका व मदतनीस यांची सुद्धा तक्रार आहे, त्यांनाही ते अश्लील शब्द वापरुन बोलतात, त्यामुळे शाळेत सर्वजण दडपणाखाली वागत आहेत, असे नमुद केलेले आहे. | | |

(क) श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुचीमध्ये दुस-या क्रमांवर असून मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता त्यांनी प्राप्त केलेली आहे. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम" (डी.एस.एम.) पुर्ण केलेला आहे. त्यांचे वैयक्तिक धारणी व सेवापुस्तकाची पडताळणी केली असता, त्यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा गैरशिस्त वर्तन रिपोर्ट झालेला नाही. तसेच त्यांना आजपावेतो एकही कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही.

तरी उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता परिच्छेद "अ" मध्ये नमुद केलेनुसार श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणेबाबतचे विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.११२ अन्वये "श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेण्यात येऊन, सदरहु प्रस्ताव फेरसादर करणेत यावा" असे ठरले.

दरम्यानचे काळात श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी शालेय न्यायाधिकरण, पुणे विभाग– सोलापूर येथे पदोन्नोतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत दावा दाखल केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.११२ नुसार इकडील जा.क्र. एसएसएस/ साप्रशा-आस्था/६२५९/२०१८ दि.२१ फेब्रवारी, २०१८ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग यांना पत्र देऊन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डीचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी लेखी मार्गदर्शन/ अभिप्राय मागविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचेकडील जाक्र/ शिउसं/ पुवि/ माध्य./ ४०२/ उमा/ २०१८/२३८० दि.३१ मार्च, २०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेस सन २००५-०६ पासून मुले व मुली सहशिक्षण (Co-Education) प्रवेश देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदरील शाळा सहशिक्षणाची असल्यामुळे सेवाजेष्ठतेनूसार प्राचार्यपदी नियुक्ती करण्यास हरकत नाही," असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे दि.३१ मार्च, २०१८ रोजीचे अभिप्रायानुसार श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा

विचार करता श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.२७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे दि.३१ मार्च, २०१८ रोजीचे अभिप्रायानुसार श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ **श्री साईबाबा हॉस्पिटलव श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मार्च २०१८ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या रु.८६,८०,६८८/-सवलतींस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/ सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/ २६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. माहे मार्च २०१८ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १४७५५ व १०८७ आयपीडी रुग्णांपैकी ३४९२ ओपीडी व ६७२ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.८२,१५,४८८/-**इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/ एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३०३ रुग्णाना रक्कम **रु.४,६५,२००/-**इतकी मोफत/ सवलत देण्यात आली आहे. सवलत/ मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

**<u>मार्च २०१८</u>**

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३७ | ७,७९,५५८ | - | ७,७९,५५८ |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०२ | २७,०८,८५२ | ११,७७,२९६ | १५,३१,५५६ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७ | १,४१,०२७ | ८२,००० | ५९,०२७ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ७१६ | ४८,५४,२०८ | ३१,३९,७४२ | १७,१४,४६६ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३६२ | १,८९,६६,००६ | १,६२,३८,९७५ | २७,२७,०३१ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २७४० | १४,०३,८५० | - | १४,०३,८५० |
| | **एकुण** | ४१६४ | २,८८,५३,५०१ | २,०६,३८,०१३ | ८२,१५,४८८ |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४० | ४८,४०० | - | ४८,४०० |
| २ | हिमोफिलीया | - | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | - | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ६ | ६,२०० | - | ६,२०० |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २२ | २,७०० | - | २,७०० |
| ६ | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | ११४ | २,२६,७०० | - | २,२६,७०० |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | १०,६०० | - | १०,६०० |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ४ | ४,२०० | - | ४,२०० |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ११० | १,६६,४०० | - | १,६६,४०० |
| | **एकुण** | ३०३ | ४,६५,२०० | - | ४,६५,२०० |
| | **एकुण अ+ब** | | **२,९३,१८,७०१** | **२,०६,३८,०१३** | **८६,८०,६८८** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मार्च **२०१८** मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या **रु.८६,८०,६८८/-**सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मार्च २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या रु.८६,८०,६८८/- मात्र सवलतीस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ **दि.२९.०३.२०१८ रोजीचे दहा हजारासाठी साईबाबा सुपर रुग्णालयात मृतदेहाची अवहेलना व बिलासाठी ९ तास रुग्णांच्या मृतदेहाची हेळसांड या बातमीबाबत.**

**प्रस्ताव-** वृत्तपत्रात दहा हजारासाठी साईबाबा सुपर रुग्णालयात मृतदेहाची अवहेलना व बिलासाठी ०९ तास रुग्णाच्या मृतदेहाची हेळसांड या शिर्षकात श्री साईबाबा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल संदर्भात बातमी आलेली आहे. "त्यात दोन हजार कोटीपेक्षा जास्त संपत्ती असणा-या साईबाबा संस्थानच्या तिजोरीत कोटयावधी रुपयाचे दान भाविक साईचरणी टाकत असताना दुसरीकडे मात्र साईबाबा सुपर रुग्णालयात केवळ दहा हजार रुपयांसाठी एक दोन नव्हे तर तब्बल ९ तास मृतदेहाची अवहेलना करण्यात आली मृतदेह ताब्यात मिळत नसल्याने अखेर नातेवाईकांनी राहाता शहरात जावुन पै.पै.गोळा करुन दहा हजार रुपये जमा करुन मृतदेहाची सुटका करुन घेतली संतापजनक प्रकारामुळे रुग्णांच्या नातेवाईकांत रुग्णालय प्रशासनाविरुदध प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे पुणे येथील छाया संतोष पारखे (वय-४५) ही महिला राहाता येथे पाडव्याच्या सणानिमीत्त आपल्या नातेवाईकांना भेट देण्यासाठी आल्या होत्या दरम्यान त्यांना ब्रेन टयुमरचा त्रास होत असल्याने संस्थानच्या श्री साईबाबा सुपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. या ठिकाणी त्यांच्यावर दहा दिवस उपचार सुरु असताना त्यांचे बुधवार दि.२८ रोजी सकाळी निधन झाले. या हॉस्पिटलचे बिल सुमारे एक लाखाच्या जवळपास झाले होते यापैकी श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालय प्रशासनाने जवळपास८० हजार रुपये माफ केले. उर्वरीत दहा हजार रुपये भरल्याशिवाय मृतदेह ताब्यात दिला जाणार नसल्याचे रुग्णालयाच्या वतीने नातेवाईकांना सांगण्यात आले एवढी मोठी रक्कम माफ केली मात्र केवळ दहा हजार रुपयांसाठी मृतदेह देत नसल्याने नातेवाईकांनी वारंवार विनंती केली मात्र रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट नकार दिला अखेर नाराज झालेल्या नातेवाईकांनी राहाता येथे जावुन दहा रुपये जमा करण्यासाठी प्रयत्न केले परीस्थिती गरीबीची असल्याने नातेवाईक ही रक्कम भरु शकत नव्हते. पैसे नसल्याने हताश झालेल्या नातेवाईकांना हात पसरण्याची वेळ आले पै.पै.जमा करुन अखेर दहा हजार रुपये जमा केले पैसे भरल्यानंतरच साईबाबा रुग्णालयातुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देणत आला. पैशा अभावी पुणे येथे जावु न शकल्याने या मृतदेहावर राहाता येथे अंत्यसंस्कार करण्यात आले साईबाबा संस्थानकडे मोठी गंगाजळी भक्तांच्या दानातुन जमा होत असताना केवळ दहा हजार रुपयांसाठी तब्बल नऊ तास मृतदेहाची अवहेलना करण्यात आली साईबाबांनी आपल्या हयातीत रुग्णसेवा करुन गरीबांना

मदत केली मात्र साईबाबांच्या शिकवणीला हरताळ फासण्याचे काम रुग्णालय प्रशासनाने केल्याने नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केले जात आहे.

सदर घटनेबाबत घटनाक्रम खालीलप्रमाणे.

रुग्ण पारखे छाया संतोष यांना दि.१८/०३/२०१८ (Lt Side Weakness) डाव्या बाजुना अशक्तपणा आलेले असल्यामुळे श्री साईबाबा रुग्णालयात दु.०३.२५ वा अपघात विभागात दाखविणेत आले यावेळेस त्यांचे एमआरआय ही तपासणी करणेत आली त्या रिपोर्टमध्ये Medium sized right middle cerebral artery territory acute non hemorrhagic infarct is seen in right fronto-temporal- parietal and ganglio capsular regions हे निदान करणेत आले संध्या ०५.२४ वा डॉ.जाधवर यांचे मार्गदर्शनाखाली अतिदक्षता विभागात भरती करुन सदर आजारावर उपचार करणेत आले.त्यानंतर रुग्णांचा पुन्हा सिटी स्कॅन केला सदर निदानावर डॉ.गोडगे यांनी दि.२०/०३/२०१८ रोजी Emergency Craniotomy हि शस्त्रक्रिया केली. दरम्यानचे काळात रुग्णांची परिस्थीती गंभीर आहे अशी माहिती देवुन रुग्णांचे नातेवाईक यांना सांगण्यात आले होते तसेच रुग्णांचे बीलाबाबत आपण पैसे भरावे असे सांगण्यात आलेले होते.

रुग्णांचे आयसीयुमध्ये अॅडमिशनचे वेळी रु-५०००/- डिपॉझीट म्हणुन भरलेले होते तदनंतर रु २५,०००/- रु चार्जेस असलेले ऑपरेशनला दि.२०/०३/२०१८ रोजी सोशल वर्कर यांचे मार्फत वैद्यकीय संचालक यांनी रु १२,०००/- भरुन शस्त्रक्रियेस परवानगी दिली. दि.२६/०३/२०१८ रोजी सोशल वर्कर यांनी राऊंडचे दरम्यान रुग्णाची मुलगी दिप्ती वाघमारे जावई शिवाजी वाघमारे व भाचा संतोष गायकवाड यांना रु १०,०००/-भरण्याचे सांगितलेले होते त्यावेळी सदर नातेवाईकांनी रु १०,०००/- भरु असे सांगितले व त्यासाठी दोन दिवसांची परवानगी मा.वैद्यकीय संचालक यांचेकडुन घेतली. त्यानंतर दि.२७/०३/२०१८ रोजी पुन्हा राऊंडचे वेळी सोशल वर्कर यांनी दिप्ती वाघमारे (रुग्णाची मुलगी) यांना बीलाची रक्कम व चुकीचा पत्ता असल्याकारणाने अॅफेडिव्हीट (शपथपत्र) करुन आणणेस सांगीतले होते. त्यावेळी सुदधा रुग्णांचे नातेवाईक यांनी बीलाची रक्कम भरणेस व अॅफेडिव्हीट (शपथपत्र) आणणेस सहमती दर्शवली होती. दि.२८/०३/२०१८ रोजी रुग्णांची तब्येत अचानक खराब होवुन सकाळी ०६.४१ वा सदर रुग्णाचा मृत्यु झाला. त्यावेळी आयसीसीयु विभागातील डॉ.निलेश पवार यांनी रुग्णाचे जावई व नातेवाईक यांना डेड बॉडी (मृतदेह) ताब्यात देण्याची परवानगी दिली तसेच एका नातेवाईकांने थांबुन सोशल वर्कर आलेनंतर बीलींगची व चॅरीटीची प्रक्रिया पुर्ण करुन द्यावी असे सांगुन मृतदेह मॉर्च्युरी (शवागार) येथे व्यवस्थीत ठेवले. त्यानंतर स.११.०० वाजेपर्यंत नातेवाईक आले नाही. सकाळी ११.०० वा दरम्यान सोशल वर्कर यांचेकडे नातेवाईक चॅरीटीची प्रक्रियेकरीता गेले सोशल वर्कर यांनी सुदधा मृतदेह घेवुन जाणेची परवानगी दिली व एक नातेवाईकांने थांबुन रु.१०,०००/- भरावे व चॅरीटीची प्रक्रिया पुर्ण करावी तसेच अॅफेडिव्हीट (शपथपत्र) नंतर आणुन द्यावे असे सांगितले तदनंतर रुग्णाचे नातेवाईकांनी थेट दुपारी ०३.४० वा रु.१०,०००/- भरले व आम्ही डेडबॉडी घेवुन जातो व चॅरटीची सवलतीची प्रक्रिया नंतर करतो असे सांगितले.

श्री साईबाबा हॉस्पिटल प्रशासनाने रुग्णांच्या नातेवाईकांना वेळोवेळी सवलतीसाठी सहकार्य केलेले आहे.मृतदेह सुदधा लगेच ताब्यात देण्याची सुदधा परवानगी देण्यात आलेली होती. यावरुन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सदर रुग्णांच्या मृतदेहाची अवहेलना किंवा हेळसांड झालेली नाही.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.२८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान रुग्णालयांमध्ये रुग्ण मयत झाल्यानंतर त्यांनी भरलेले बील जमा करुन घेण्यात यावे व उर्वरित रक्कम माफ करणेत यावी. तसेच यापुर्वी झालेल्या निर्णयानुसार मृतदेह पोहोचविणेकरीता रुग्णांच्या नातेवाईकांना विनामुल्य शववाहिका उपलब्ध करुन देण्यात यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०१८-२०१९ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये (दि.31/03/2018 पर्यंत) एकुण रु.56,08,95,713.53/- इतक्या रकमेचे 943 मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन सन 2006 पासून नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2017-18 यावर्षाकरीता 274 नग मशिन्सचे संबंधीत 23

कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण रु.83,54,536/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयात (दि.31/03/2018 पर्यंत) एकुण रु.4,09,65,945/- इतक्या रकमेचे 762 मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरी, उपकरणे खरेदी करणेत आले असुन (सन 1999 पासून) नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2017-18 यावर्षाकरीता 48 नग मशिन्सचे संबंधीत 12 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुणरु. 9,80,257/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2018-19 (दि 01/04/2018 तेदि 31/03/2019) या एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/ CMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टसह Monopoly याप्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

**मागणी:** सन 2018-19 या वर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट ‘अ’) दिलेल्या 294 नग मशिन्सचे संबंधीत 25 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता अंदाजे रू.10929059/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट ‘ब’) दिलेल्या एकुण 81 नग मशिन्सचे संबंधीत 23 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता अंदाजे रू.2330480/- इतका खर्च अपेक्षित आहे.

काही कंपन्यांनी मागील वर्षीप्रमाणेच दर दिलेले असुन काही कंपन्यांनी दरामध्ये वाढ केली आहे. मागील वर्षी काही कंपन्यांनी सर्व्हीस टॅक्स मध्ये जरी वाढ झाली होती तरी अतिरिक्त सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली नव्हती. तसेच दोन्ही रुग्णालयातील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता असलेल्या मशिन्सची संख्या मागील वर्षापेक्षा वाढलेली असल्यामुळे अंदाजे खर्चाचे रकमेत देखील वाढ दिसून येत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरीलसंस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सदर दुरूस्ती करीता रु.3 लाखापेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा.व्यवस्थापनसमिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2018-19 (दि 01/04/2018 तेदि 31/03/2019) या एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/CMC करणे आवश्यक आहे.

काही कंपन्यांनी दिलेल्या दरांमध्ये QC (Quality Control) चे दर समाविष्ट आहेत.(उदा. अ. क्र. 2)

काही कंपन्यासोबत चालु वर्षी CMC कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. मागील वर्ष AMC कॉन्ट्रॅक्ट करणेत आहे होते. (उदा. अ. क्र. 8)

काही कंपन्यांनी त्यांना मागील वर्षी सर्व्हिस टॅक्स लागु नसल्यामूळे संस्थानकडे मागणी केलेली नव्हती, परंतु चालु वर्षी GST लागु झालेनंतर सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली आहे. (उदा. अ.क्र. 38,39, 42 ते 47)

मागील वर्षी सर्व्हीस टॅक्स 15% होता परंतु 1 जुलै 2017 नंतर GST लागु झालेमुळे तो 18 % झालेला आहे.

वरील सर्व कारणांमुळे चालु वर्षाचे दर हे मागील वर्षाच्या दरापेक्षा जास्त दिसत आहे. त्याबाबत कंपनी प्रतिनिधीसोबत दूरध्वनीवरुन चर्चा केली असता प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी सदर दरांमध्ये सुट देणे बाबत कळविले आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टसह Monopoly याप्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्सकरीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण 294 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 81 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 294 नग आणि श्री साईनाथ रुग्णालयामधील एकुण 81 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी संबंधीत कंपन्यांच्या प्रतिनिधींना स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलविणेत येऊन दरांबाबत प्रत्यक्ष चर्चा करणेत यावी व अंतीम दर निश्चित करुन उपसमितीच्या शिफारशीने कार्यारंभ देण्यात यावा, असे ठरले.**
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** राष्ट्रपती सन्मानित पद्मश्री कृषीऋषी मा.सुभाष पाळेकर यांनी दि.२६/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये त्यांनी महाराष्ट्र व देशभरातून अंदाजे २ ते ३ हजार शेतकरी बंधूसाठी १२ दिवस झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्न निवासी शिबीर माहे- ऑगस्ट किंवा डिसेंबर २०१८ मध्ये आयोजित करणेस तसेच शिबीरासाठी राहण्याची, भोजनाची व परिसंवादाची व्यवस्था विनामूल्य करावी, असे नमूद केले आहे.

दि.०३/०४/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये त्यांनी राष्ट्रपती सन्मानित पद्मश्री कृषीऋषी मा.सुभाष पाळेकर यांचे झिरो बजेट नैसर्गिक शेती शेतकरी प्रशिक्षण शिबीर दिनांक २६ सप्टेंबर- २०१८ ते ०७ ऑक्टोबर २०१८ रोजी शिर्डी संस्थान, शिर्डी येथे करण्याचे आयोजन आहे. शिबीरासाठी येणा-या तीन ते चार हजार शिबीरार्थीसाठी आपल्या संस्थानकडून चर्चासाठी हॉल, तसेच निवास, भोजन व्यवस्था व इतर सुविधा विनामुल्य करण्यात यावी , असे नमूद केले आहे.

दि.०४/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये त्यांनी पद्मश्री मा.सुभाष पाळेकर यांचे झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्न या विषयावर जनजागृतीचे व्रत घेतले असून शेतक-यांमध्ये सदर विचार सुयोग्य प्रकारे पोहचविण्याकरीता ते शिबीर घेत असतात.

एका देशी गायीचे शेण व गोमित्रापासून ३० एकर शेतीरासायनिक खते व औषधे न वापरता लाभप्रत कशी करावयाची या विषयी सखोल मार्गदर्शन पाळेकर गुरजी करतात. या उपक्रमाच्या अंमलबजावणीने देशभरातील शेतकरी कर्ज मुक्त होऊ शकतात, शेती व्यवसाय नफ्यात चालू शकतो, तसेच उपभोक्त्यांना विषमुक्त अन्न उपलब्ध होऊ शकते. असे विचार व त्या मागची भूमिका, अंमलबजावणीची सुत्रे इ. विषयांवर शिर्डी येथेही आपल्या परिसरातील व महाराष्ट्रातून शेतकरी बांधवाकरीता शिबीर आयोजित करीत आहोत. हा उपक्रम हा निव्वळ शेतकरी बांधवांच्याच नव्हे तर सर्व देशवासियांच्या दृष्टीने महत्वपूर्ण व उपकारक असाच आहे.

शिर्डी येथे आयोजित करीत असलेल्या या शिबीराचा कालावधी दिनांक २७ सप्टेंबर- २०१८ ते ०८ ऑक्टोबर २०१८ असा १२ दिवसांचा राहणार असून शिबीरात अंदाजे ३००० निवासी शेतकरी बांधव सहभागी होती.

श्री साईबाबांचे पवित्र भूमीमध्ये, त्यातही हे वर्ष श्री साई शताब्दी महोत्सवाचे असल्याने, शताब्दी महोत्सवातील एक लोकोपयोगी उपक्रम राबविण्याकामी पुढाकार घ्यावा व या उपक्रमाकरीता संस्थानमार्फत ३००० व्यक्ती यांचेकरीता निवास, दोन वेळचे भोजन, दोन वेळेस चहा, सकाळी नाष्टा व परिसंवादासाठी स्थळ व त्या ठिकाणी व्यासपीठ, ३००० व्यक्ती समावेश होऊ शकतील असा हॉल, अगर वॉटरप्रुफ तंबू/ मंडप, ध्वनीवर्धक, बैठक व्यवस्था (३००० खुर्च्या) गाद्या, फन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी व विज पुरवठा, पार्किंगची सुविधा, ५०० व्यक्तींकरीता एक स्क्रीन या प्रकारे ६ स्क्रीन इ. १२ दिवसांकरीता व्यवस्था व्हावी, असे नमूद केले आहे.

सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास ३००० शिबीरार्थीसाठी साईधर्मशाळा येथे आयोजन करावे लागेल. सदर ठिकाणी शिबीरासाठी वॉटरप्रुफ तंबू/ मंडप, ध्वनीवर्धक, बैठक व्यवस्था (३००० खुर्च्या) गाद्या, फॅन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी व विज पुरवठा, पार्किंगची सुविधा आदि बाबी संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास त्यासाठी अंदाजे रु.२१,१२,०००/- व ५०० व्यक्तींकरीता एक स्क्रीन या प्रकारे ६ स्क्रीन साठी अंदाजे रु.२० ते २५ लाखापर्यंतचा खर्च येण्याची शक्यता आहे.

निर्णय क्र.२८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पद्मश्री कृषीऋषी मा.सुभाष पाळेकर यांना झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतकऱ्यांचे १२ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीर आयोजित करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. तथापि, सदरहू कार्यक्रमाचे आयोजनासाठी येणारा खर्च जास्त असल्याने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१७
निर्णय क्र.२८३ मा.संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे दि.०१ एप्रिल, २०१५ रोजीच्या ई-मेलद्वारे प्राधान्यक्रमानुसार राज्यातील २४ जिल्हयातील शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना सी.टी.स्कॅन व एक्स रे मशिन खरेदीसाठी रु.४३.६४ कोटीची मागणी संस्थानकडे केली होती. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभागाने शासन निर्णय क्र.सासंवि- २०१५/ ४१४/ प्र.क्र./ का.सोळा, दि.१९ मे, २०१६ निर्गमित करुन, रक्कम रु.४३.६४ कोटी मात्र अर्थसहाय्य मंजुर केलेले आहे. या विधी व न्याय विभागाच्या निर्णयावर अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदरहू शासन निर्णय रद्द करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.
(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१८
निर्णय क्र.२८४ श्री साईअर्पण सेवा द्वैमासिकाचे वितरण प्रिंटींग प्रेसमार्फत करण्यात येत आहे. त्याच पध्दतीने श्री साईलिला द्वैमासिके सभासदांना वितरीत करण्यात यावेत, असे ठरले व याकामी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१९
निर्णय क्र.२८५ श्री साईबाबा संस्थानचे मेडिकल कॉलेज व नर्सिंग कॉलेज उभारणी करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२०
निर्णय क्र.२८६ मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५ अन्वये शैक्षणिक संकुलाकडील ०७ शिक्षकांना जादा देण्यात आलेले वेतन समान हप्त्यामध्ये वसुल करणेचे ठरले आहे, याबाबतचा फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तोपावेतो सदर वसुली स्थगित ठेवावी.
(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र.२२४ ते २८६ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर दुपारी ०४.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**